भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# भारतीय दंड संहिता

(सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५)

[दिनांक १ ऑक्टोबर, १९८६ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Indian Penal Code

## (Act No. 45 of 1860)

[*As in force on the 1st October, 1986*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
(१९८६)

[किंमत — १८ रुपये]

प्रशिक्षणार्थ प्रत
(प्रमाणित)
भाषा संचालक
महाराष्ट्र राज्य

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ ऑक्टोबर, १९८६ रोजी यथाविद्यमान असलेला दि इंडियन पिनल कोड, १८६०, याचा मराठीतील प्राधिकृत अनुवाद दिलेला आहे. हा अनुवाद **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ४, अंक ३, दिनांक ३० ऑक्टोबर, १९८६ यात पृष्ठे ७८ ते १९२ वर प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी अनुवाद, प्राधिकृत अनुवाद (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ यांच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा अनुवाद, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी अनुवाद म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक ३० ऑक्टोबर, १९८६.

**एस. रामय्या,**
भारत सरकारचे सचिव.

---

## PREFACE

This edition of The Indian Penal Code, 1860, as on the 1st October, 1986 contains the authorised translation of that act in Marathi and the same was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 3, Vol. 4, dated 30th October, 1986 on pages 78 to 192.

This authorised translation in Marathi was published under the Authority of the President under clause (*a*) of section 2 of the Authorised Translations (Central Laws) Act, 1973, and on such publication, it became the authorised translation of the Act in Marathi.

New Delhi :
Dated 30th Octoder, 1986.

S. RAMAIAH,
Secretary to the Government of India.

एम ४१२५—१

# भारतीय दंड संहिता, १८६०

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची यादी

१. निरसन अधिनियम, १८७० (१८७० चा १४).

२. भारतीय दंड संहिता विशोधन अधिनियम, १८७० (१८७० चा २७).

२-क. भारतीय दंड संहिता विशोधन अधिनियम, १८७२ (१८७२ चा १९).

३. भारतीय शपथ अधिनियम, १८७३ (१८७३ चा १०).

४. भारतीय दंड संहिता विशोधन अधिनियम, १८८२ (१८८२ चा ८).

५. फौजदारी प्रक्रिया संहिता, १८८२ (१८८२ चा १०).

६. भारतीय फौजदारी विधि विशोधन अधिनियम, १८८६ (१८८६ चा १०).

६-क. भारतीय सागरी अधिनियम, १८८७ (१८८७ चा १४).

७. धातु चिन्ह अधिनियम, १८८९ (१८८९ चा १).

८. भारतीय पण्य चिन्ह अधिनियम, १८८९ (१८८९ चा ४).

९. छावणी अधिनियम, १८८९ (१८८९ चा १३).

१०. भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० (१८९० चा ९).

११. भारतीय फौजदारी विधि विशोधन अधिनियम, १८९१ (१८९१ चा १०).

१२. विशोधन अधिनियम, १८९१ (१८९१ चा १२).

१३. भारतीय फौजदारी विधि विशोधन अधिनियम, १८९४ (१८९४ चा ३).

१४. भारतीय फौजदारी विधि विशोधन अधिनियम, १८९५ (१८९५ चा ३).

१५. भारतीय दंड संहिता विशोधन अधिनियम, १८९६ (१८९६ चा ६).

१६. भारतीय दंड संहिता विशोधन अधिनियम, १८९८ (१८९८ चा ४).

१७. चलनी नोट बनावटीकरण अधिनियम, १८९९ (१८९९ चा १२).

१८. भारतीय दंड संहिता विशोधन अधिनियम, १९१० (१९१० चा ३).

१९. भारतीय फौजदारी विधि विशोधन अधिनियम, १९१३ (१९१३ चा ८).

२०. भारतीय निवडणूक अपराध आणि चौकशी अधिनियम, १९२० (१९२० चा ३९).

२१. भारतीय दंड संहिता (विशोधन) अधिनियम, १९२१ (१९२१ चा १६.)

२२. भारतीय दंड संहिता (विशोधन) अधिनियम, १९२३ (१९२३ चा २०).

२२-क. भारतीय दंड संहिता (विशोधन) अधिनियम, १९२४ (१९२४ चा ५).

२३. भारतीय फौजदारी विधि विशोधन अधिनियम, १९२४ (१९२४ चा १८).

२४. कामगार संविदाभंग (निरसन) अधिनियम, १९२५ (१९२५ चा ३).

२५. अश्लील प्रकाशन अधिनियम, १९२५ (१९२५ चा ८).

२६. भारतीय दंड संहिता (विशोधन) अधिनियम, १९२५ (१९२५ चा २९).

२७. निरसन व विशोधन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १०).

२८. फौजदारी विधि विशोधन अधिनियम, १९२७ (१९२७ चा २५).

२९. निरसन व विशोधन अधिनियम, १९३० (१९३० चा ८).

३०. भारतीय वायुसेना अधिनियम, १९३२ (१९३२ चा १४).

३१. विशोधन अधिनियम, १९३४ (१९३४ चा ३५).

३२. भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७.

३३. फौजदारी विधि विशोधन अधिनियम, १९३९ (१९३९ चा २२).

३३-क. जहाज व विमानविषयक अपराध अधिनियम, १९४० (१९४० चा ४).

३४. भारतीय पण्य चिन्ह (विशोधन) अधिनियम, १९४१ (१९४१ चा २).

३५. भारतीय दंड संहिता (विशोधन) अधिनियम, १९४२ (१९४२ चा ८).
३६. भारतीय दंड संहिता (विशोधन) अधिनियम, १९४३ (१९४३ चा ६).
३७. भारतीय स्वातंत्र्य (केंद्रीय अधिनियम आणि अध्यादेश अनुकूलन) आदेश, १९४८.
३८. फौजदारी विधि (वांशिक भेदभावांचे निराकरण) अधिनियम, १९४९ (१९४९ चा १७).
३९. भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९४९ (१९४९ चा ४२).
४०. विधि अनुकूलन आदेश, १९५०.
४१. निरसन व विशोधन अधिनियम, १९५० (१९५० चा ३५).
४२. भाग 'ख' राज्य (विधि) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ३).
४३. फौजदारी विधि विशोधन अधिनियम, १९५२ (१९५२ चा ४६).
४४. निरसन व विशोधन अधिनियम, १९५२ (१९५२ चा ४८).
४५. निरसन व विशोधन अधिनियम, १९५३ (१९५३ चा ४२).
४६. फौजदारी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९५५ (१९५५ चा २६).
४७. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६.
४८. निरसन व विशोधन अधिनियम, १९५७ (१९५७ चा ३६).
४९. फौजदारी विधि विशोधन अधिनियम, १९५८ (१९५८ चा २).
५०. व्यापार व पण्य चिन्ह अधिनियम, १९५८ (१९५८ चा ४३).
५१. भारतीय दंड संहिता (विशोधन) अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५२).
५२. भारतीय दंड संहिता (विशोधन) अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४१).
५३. भ्रष्टाचार निवारण विधि (विशोधन) अधिनियम, १९६४ (१९६४ चा ४०).
५४. फौजदारी आणि निवडणूक विधि विशोधन अधिनियम, १९६९ (१९६९ चा ३५).
५५. भारतीय दंड संहिता (विशोधन) अधिनियम, १९६९ (१९६९ चा ३६).
५६. फौजदारी विधि (विशोधन) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ३१).
५७. कर्मचारी भविष्य निधि आणि कुटुंब वेतन निधि (विशोधन) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४०).
५८. कर्मचारी राज्य विमा (विशोधन) अधिनियम, १९७५ (१९७५ चा ३८).
५९. निवडणूक विधि (विशोधन) अधिनियम, १९७५ (१९७५ चा ४०).
६०. फौजदारी विधि (विशोधन) अधिनियम, १९८३ (१९८३ चा ४३).
६१. फौजदारी विधि (दुसरे विशोधन) अधिनियम, १९८३ (१९८३ चा ४६).

# भारतीय दंड संहिता, १८६०

## कलमांचा अनुक्रम

### प्रकरण १ ले

### प्रस्तावना

प्रास्ताविका
कलमे

१. संहितेचे नाव व तिच्या प्रवर्तनाचा विस्तार.

२. भारतात केलेल्या अपराधांबद्दल शिक्षा.

३. जे अपराध भारताबाहेर केलेले असतील पण ज्यांची कायद्यानुसार भारतात संपरीक्षा करता येईल अशा अपराधांबद्दल शिक्षा.

४. संहितेची राज्यक्षेत्रातीत प्रयुक्ती.

५. विवक्षित कायद्यांवर या अधिनियमाचा परिणाम होणार नाही.

### प्रकरण २ रे

### सर्वसाधारण स्पष्टीकरणे

६. संहितेतील व्याख्या अपवादांस अधीन समजावयाच्या.

७. एकदा स्पष्टीकरण केलेल्या शब्दप्रयोगाचा अर्थ.

८. " लिंग ".

९. " वचन ".

१०. " पुरुष ".
" स्त्री ".

११. " व्यक्ति " / " इसम ".

१२. " जनता ".

१३. [ निरसित. ]

१४. " शासनाचा सेवक ".

१५. [ निरसित ].

१६. [ निरसित ].

१७. " शासन ".

१८. " भारत ".

१९. " न्यायाधीश ".

२०. " न्यायालय ".

२१. " लोक सेवक ".

२२. " जंगम मालमत्ता ".

२३. " गैर लाभ ", " गैर हानी ", " गैरपणे लाभ मिळवणे ", " गैरपणे हानी सोसणे ".

२४. " अप्रामाणिकपणाने ".

२५. " कपटीपणाने ".

२६. " समजण्यास कारण ".

२७. पत्नीच्या, कारकुनाच्या किंवा चाकराच्या कब्जातील मालमत्ता.

२८. " नकलीकरण ".

२९. " दस्तऐवज ".

३०. " मूल्यवान् रोखा ".

## कलमांचा अनुक्रम

कलमे

३१. " मृत्युपत्र ".

३२. कृतींचा निर्देश करणाऱ्या शब्दांमध्ये अवैध अकृतींचा समावेश आहे.

३३. " कृति ".
" अकृति ".

३४. दोन किंवा अधिक व्यक्तींनी समान उद्देशाच्या पुर:सरणार्थ केलेल्या कृती.

३५. जेव्हा अशी कृती गुन्हेगारी जाणीव किंवा उद्देश असताना करण्यात आल्याच्या कारणान गुन्हेगारी स्वरूपाची असते तेव्हा.

३६. अंशतः कृतीद्वारे आणि अंशतः अकृतीद्वारे घडवून आणलेला परिणाम.

३७. अपराधाला घटकभूत असलेल्या निरनिराळ्या कृतींपैकी एक कृती करून सहकार्य.

३८. गुन्हेगारी कृतीत निबद्ध असलेल्या व्यक्ती निरनिराळ्या अपराधांबद्दल दोषी असू शकतील.

३९. " इच्छापूर्वक ".

४०. " अपराध ".

४१. " विशेष कायदा ".

४२. " स्थानिक कायदा ".

४३. " अवैध ".
" करण्यास विधित: बद्ध असणे ".

४४. " क्षति ".

४५. " जीवित ".

४६. " मृत्यू ".

४७. " प्राणी ".

४८. " जलयान ".

४९. " वर्ष ".
" महिना ".

५०. " कलम ".

५१. " शपथ ".

५२. " सदभाव ".

५२क. " आसरा देणे ".

## प्रकरण ३ रे

### शिक्षांविषयी

५३. शिक्षा.

५३क. " काळे पाणी " या निर्देशाचा अर्थ लावणे.

५४. मृत्यूची शिक्षा परिवर्तित करून सौम्य करणे.

५५. आजीव कारावासाची शिक्षा परिवर्तित करून सौम्य करणे.

५५क. " समुचित शासन " याची व्याख्या.

५६. [ निरसित ].

५७. शिक्षेच्या मुदतीचे अंश.

५८. [ निरसित ].

५९. [ निरसित ].

६०. शिक्षा (कारावासाच्या विवक्षित प्रकरणांमध्ये) संपूर्णतः किंवा अंशतः सश्रम किंवा साधी असू शकेल.

६१. [ निरसित ].

कलमे


६२. [निरसित].

६३. द्रव्यदंडाची रक्कम.

६४. द्रव्यदंड न भरण्याबद्दल कारावासाची शिक्षा.

६५. कारावास आणि द्रव्यदंड ही शिक्षा देता येण्यासारखी असेल तेव्हा, द्रव्यदंड न भरण्याबद्दलच्या कारावासाची मर्यादा.

६६. द्रव्यदंड न भरण्याबद्दल कोणत्या वर्णनाच्या कारावासाची शिक्षा.

६७. अपराध फक्त द्रव्यदंडास पात्र असेल तेव्हा, द्रव्यदंड न भरण्याबद्दल कारावास.

६८. द्रव्यदंडाचा भरणा होताच कारावास समाप्त होणे.

६९. द्रव्यदंडाचा प्रमाणशीर हिस्सा भरण्यात आल्यावर कारावासाची समाप्ती.

७०. सहा वर्षांच्या आत किंवा कारागृहात असताना द्रव्यदंड वसुलीयोग्य.
मृत्युमुळे मालमत्ता दायित्वातून मुक्त होत नाही.

७१. अनेक अपराध मिळून बनलेल्या अपराधाबद्दलच्या शिक्षेची मर्यादा.

७२. अनेक अपराधांपैकी एकाबद्दल दोषी असलेली व्यक्ती त्यांपैकी कोणत्या अपराधाबद्दल दोषी आहे ते शंकास्पद असल्याचे न्यायनिर्णयात नमूद केलेले असेल तेव्हा त्या व्यक्तीला शिक्षा.

७३. एकांत बंदिवास.

७४. एकांत बंदिवासाची मर्यादा.

७५. प्रकरण १२ वे किंवा प्रकरण १७ वे याखाली पूर्वी दोषसिद्धी झाली असता, त्याखालील विवक्षित अपराधांबद्दल वाढीव शिक्षा.


## प्रकरण ४ थे

### सर्वसाधारण अपवाद


७६. विधितः बद्ध असलेल्या अथवा तथ्यविषयक चूकभुलीमुळे स्वतःला विधितः बद्ध समजणाऱ्या व्यक्तीने केलेली कृती.

७७. न्यायिकतः कार्य करत असताना न्यायाधीशाची कृती.

७८. न्यायालयाच्या न्यायनिर्णयाला किंवा आदेशाला अनुसरून केलेली कृती.

७९. विधितः समर्थन मिळालेल्या किंवा तसे स्वतःला समर्थन आहे असे तथ्यविषयक चूकभूलीमुळे समजणाऱ्या व्यक्तीने केलेली कृती.

८०. कायदेशीर कृती करताना अपघात.

८१. अपहानी करण्याचा संभव असलेली, पण गुन्हेगारी उद्देशाशिवाय, आणि अन्य अपहानी होऊ नये म्हणून केलेली कृती.

८२. सात वर्षे वयाखालील बालकाची कृती.

८३. सात वर्षांवरील व बारा वर्षांखालील अपरिपक्व समजशक्ती असलेल्या बालकाची कृती.

८४. मनोविकल व्यक्तीची कृती.

८५. स्वतःच्या इच्छेविरुद्ध नशा चढवण्यात आल्यामुळे निर्णयबुद्धी चालवण्यास असमर्थ झालेल्या व्यक्तीची कृती.

८६. ज्यामध्ये विशिष्ट उद्देश किंवा जाणीव आवश्यक असते असा अपराध नशा चढलेल्या व्यक्तीने केला असता.

८७. जिच्यामुळे मृत्यू किंवा जबर दुखापत घडून यावी असा उद्देश नाही किंवा तसा संभव असल्याची जाणीव नाही अशी संमतीने केलेली कृती.

८८. मृत्यू घडवून आणण्याचा उद्देश नसताना, व्यक्तीच्या हितासाठी तिच्या संमतीने सद्भावपूर्वक केलेली कृती.

८९. बालकाच्या किंवा भ्रमिष्ट व्यक्तीच्या हितासाठी पालकाने किंवा पालकाच्या संमतीनिशी सद्भावपूर्वक केलेली कृती.
परंतुके.

कलमे

९०. भयापोटी किंवा गैरसमजापोटी संमती दिली असल्याची जाणीव असणे.
भ्रमिष्ट व्यक्तीची संमती.
बालकाची संमती.

९१. ज्या कृती त्यांच्यामुळे होणाऱ्या अपायाच्या निरपेक्षतेने अपराध आहेत त्या वगळणे.

९२. सद्भावपूर्वक एखाद्या व्यक्तीच्या हितासाठी संमतीशिवाय केलेली कृती.
परंतुके.

९३. सद्भावपूर्वक केलेले निवेदन.

९४. धमक्यांद्वारे जी कृती करण्याची सक्ती व्यक्तीवर होते ती कृती.

९५. अल्पसा अपाय करणारी कृती.

**खाजगीरीत्या बचाव करण्याच्या हक्काविषयी**

९६. खाजगीरीत्या बचाव करण्याच्या ओघात केलेल्या गोष्टी.

९७. शरीराचा व मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क.

९८. मनोविकल, इत्यादी व्यक्तीच्या कृतीपासून खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क.

९९. ज्यांच्यापासून खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क नाही त्या कृती.
कोणत्या मर्यादेपर्यंत हक्क बजावता येईल.

१००. शरीराचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क हा, मृत्यू घडवून आणण्याइतपत केव्हा व्यापक असतो.

१०१. असा हक्क मृत्यूहून अन्य अपाय करण्याइतपत केव्हा व्यापक असतो.

१०२. शरीराचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क सुरू होणे व चालू राहाणे.

१०३. मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क हा, मृत्यू घडवून आणण्याइतपत केव्हा व्यापक असतो.

१०४. असा हक्क मृत्यूहून अन्य अपाय करण्याइतपत केव्हा व्यापक असतो.

१०५. मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क सुरू होणे व चालू राहणे.

१०६. निर्दोष व्यक्तीला अपाय होण्याचा धोका असेल तेव्हा, प्राणघातक हमल्यापासून खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क.

प्रकरण ५ वे

**अपप्रेरणाविषयी**

१०७. एखाद्या गोष्टीचे अपप्रेरण.

१०८. अपप्रेरक.

१०८क. भारताबाहेरील अपराधांचे भारतात अपप्रेरण.

१०९. अपप्रेरणामुळे परिणामतः अपप्रेरित कृती घडली असून, त्या अपप्रेरणाकरता शिक्षेचा कोणताही उपबंध केलेला नसल्यास त्याबद्दल शिक्षा.

११०. अपप्रेरित व्यक्तीने अपप्रेरकाच्यापेक्षा वेगळ्या उद्देशाने कृती केल्यास अपप्रेरणाबद्दल शिक्षा.

१११. जेव्हा एका कृतीला अपप्रेरणा दिली जाऊन निराळी कृती केली जाते तेव्हा अपप्रेरकाचे दायित्व.

११२. अपप्रेरित कृतीबद्दल व केलेल्या कृतीबद्दल अपप्रेरक समुच्चयी शिक्षेस केव्हा पात्र असतो.

११३. अपप्रेरित कृतीमुळे घडून आलेल्या, पण अपप्रेरकाला उद्देशित असलेल्या कृतीहून भिन्न अशा परिणामाबद्दल अपप्रेरकाचे दायित्व.

११४. अपराध घडला तेव्हा अपप्रेरक उपस्थित असणे.

११५. मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाचे अपप्रेरण—
अपराध न घडल्यास.
परिणामी अपाय करणारी कृती केली गेल्यास.

११६. कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाचे अपप्रेरण—अपराध न घडल्यास.
अपप्रेरक किंवा अपप्रेरित व्यक्ती ही अपराध घडण्यास प्रतिबंध करणे हे ज्याचे कर्तव्य आहे असा लोक सेवक असल्यास.

११७. जनतेकडून किंवा दहाहून जास्त व्यक्तींकडून अपराध घडून येण्यास अपप्रेरणा देणे.

११८. मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्याचा बेत लपवणे—
अपराध घडल्यास;
अपराध न घडल्यास.

कलमे

११९. ज्यास प्रतिबंध करणे हे आपले कर्तव्य आहे तो अपराध करण्याचा बेत लोक सेवकाने लपवणे—
अपराध घडल्यास;
मृत्यू, इत्यादी शिक्षेस अपराध पात्र असल्यास;
अपराध न घडल्यास.

१२०. कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्याचा बेत लपवणे—
अपराध घडल्यास;
अपराध न घडल्यास.

प्रकरण ५ वे-क

**फौजदारीपात्र कट**

१२०क. "फौजदारीपात्र कट" याची व्याख्या.

१२०ख. फौजदारीपात्र कटाबद्दल शिक्षा.

प्रकरण ६ वे

**देशविरोधी अपराधांविषयी**

१२१. भारत सरकारविरुद्ध युद्ध करणे किंवा युद्ध करण्याचा प्रयत्न करणे किंवा युद्ध करण्यास अपप्रेरणा देणे.

१२१क. कलम १२१ अन्वये शिक्षापात्र असे अपराध करण्याचा कट.

१२२. भारत सरकारविरुद्ध युद्ध करण्याच्या उद्देशाने शस्त्र, इत्यादी गोळा करणे.

१२३. युद्ध करण्याचा बेत ते सुकर करण्याच्या उद्देशाने लपवणे.

१२४. कोणताही कायदेशीर अधिकार वापरण्यास भाग पाडण्याच्या किंवा निरुद्ध करण्याच्या उद्देशाने राष्ट्रपती, राज्यपाल. इत्यादींवर हमला करणे.

१२४क. प्रजाक्षोभन.

१२५. भारत सरकारशी सख्याचे संबंध असलेल्या, कोणत्याही आशियायी सत्तेविरुद्ध युद्ध करणे.

१२६. भारत सरकारशी शांततेचे संबंध असलेल्या कोणत्याही सत्तेच्या राज्यक्षेत्रात लूटमार करणे.

१२७. १२५ व १२६ या कलमांमध्ये उल्लेखिल्याप्रमाणे युद्धात किंवा लूटमारीत हस्तगत झालेली मालमत्ता स्वीकारणे.

१२८. राज्यकैद्याला किंवा युद्धकैद्याला पळून जाण्यास लोकसेवकाने इच्छापूर्वक मुभा देणे.

१२९. लोकसेवकाने हयगयीने अशा कैद्याला पळून जाऊ देणे.

१३०. अशा कैद्याला पळून जाण्यास मदत करणे किंवा अवैधपणे सोडवणे किंवा आसरा देणे.

प्रकरण ७ वे

**भूसेना, नौसेना आणि वायुसेना यांसंबंधीच्या अपराधांविषयी**

१३१. लष्करी बंडास अपप्रेरणा देणे अथवा भूसैनिक, नौसैनिक किंवा वायुसैनिक याला त्याच्या कर्तव्यापासून विचलित करण्याचा प्रयत्न करणे.

१३२. लष्करी बंडाचे अपप्रेरण—त्याच्या परिणामी बंड घडून आल्यास.

१३३. भूसैनिकाला, नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला त्याचा वरिष्ठ अधिकारी आपले पदकार्य बजावत असताना त्याच्यावर हमला करण्यास अपप्रेरणा देणे.

१३४. असा हमला करण्याचे अपप्रेरणा—हमला घडून आल्यास.

१३५. भूसैनिकाला, नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला चाकरी सोडून पळून जाण्यास अपप्रेरणा देणे.

१३६. पलायिताला आसरा देणे.

१३७. व्यापारी जलयानावर नौकाधिपतीच्या हयगयीमुळे पलायित इसम लपून राहणे.

१३८. भूसैनिकाच्या, नौसैनिकाच्या किंवा वायुसैनिकाच्या शिरजोरीच्या कृतीस अपप्रेरणा देणे.

१३८ क. [निरसित].

१३९. विवक्षित अधिनियमांना अधीन असलेल्या व्यक्ती.

१४०. भूसैनिक, नौसैनिक किंवा वायुसैनिक वापरतो तशी वर्दी परिधान करणे अथवा तसे ओळखचिन्ह जवळ बाळगणे.

कलमे

## प्रकरण ८ वे

### सार्वजनिक प्रशांततेच्या विरोधी अपराधांविषयी


१४१. बेकायदेशीर जमाव.

१४२. बेकायदेशीर जमावाचा घटक असणे.

१४३. शिक्षा.

१४४. प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होऊन बेकायदेशीर जमावात सामील होणे.

१४५. बेकायदेशीर जमावाला पांगण्याचा आदेश झाला असल्याचे माहीत असूनही त्यात सामील होणे किंवा थांबून राहणे.

१४६. दंगा करणे.

१४७. दंगा करण्याबद्दल शिक्षा.

१४८. प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होऊन दंगा करणे.

१४९. समान उद्दिष्ट साधण्यासाठी केलेल्या अपराधाबद्दल बेकायदेशीर जमावाचा प्रत्येक घटक दोषी असणे.

१५०. बेकायदेशीर जमावात सामील होण्यासाठी भाडोत्री व्यक्ती गोळा करणे किंवा भाडोत्री व्यक्ती गोळा करण्याकडे काणाडोळा करणे.

१५१. पाच किंवा अधिक व्यक्तींच्या जमावाला पांगण्याचा आदेश मिळाल्यानंतर जाणीपूर्वक त्यात सामील होणे किंवा थांबून राहणे.

१५२. लोक सेवक दंगा, इत्यादी शमवीत असताना त्याच्यावर हमला करणे किंवा त्याला अटकाव करणे.

१५३. दंगा घडवून आणण्याच्या उद्देशाने बेछूटपणे प्रक्षोभन करणे—
दंगा घडून आल्यास ;
दंगा घडून न आल्यास.

१५३क. धर्म, वंश, जन्मस्थान, निवास भाषा, इत्यादी कारणांवरून निरनिराळ्या गटांमध्ये शत्रुत्व वाढवणे आणि एकोपा टिकण्यास बाधक अशा कृती करणे.
उपासनास्थान इत्यादी ठिकाणी केलेला अपराध.

१५३ख. राष्ट्रीय एकात्मतेला बाधक असे अभ्यारोप, प्रपादने.

१५४. जेथे बेकायदेशीर जमाव जमतो त्या जमिनीचा मालक किंवा ताबाधारक.

१५५. जिच्या हितार्थ दंगा घडवून आणला असेल त्या इसमाची शिक्षापात्रता.

१५६. ज्याच्या हितार्थ दंगा घडवून आणला त्या मालकाच्या किंवा ताबाधारकाच्या अभिकर्त्याची शिक्षापात्रता.

१५७. बेकायदेशीर जमावासाठी गोळा केलेल्या भाडोत्री व्यक्तींना आसरा देणे.

१५८. बेकायदेशीर जमावात किंवा दंग्यात सहभागी होण्यासाठी भाडोत्री होणे;
किंवा शस्त्रसज्ज होऊन जाणे.

१५९. दंगल.

१६०. दंगल करण्याबद्दल शिक्षा.


## प्रकरण ९ वे

### लोक सेवकांकडून किंवा त्यांच्यासंबंधी घडणाऱ्या अपराधांविषयी


१६१. लोक सेवकाने पदीय कार्याच्या बाबतीत वैध पारिश्रमिकाहून अन्य परितोषण घेणे.

१६२. लोक सेवकावर प्रभाव पाडण्यासाठी भ्रष्ट किंवा अवैध मार्गाने परितोषण घेणे.

१६३. लोक सेवकावर वैयक्तिक प्रभाव पाडण्यासाठी परितोषण घेणे.

१६४. कलम १६२ किंवा १६३ मध्ये व्याख्या केलेल्या अपराधांस लोक सेवकाने अपप्रेरण दिल्या-बद्दल शिक्षा.

कलमे

१६५. लोक सेवकाने केलेल्या कार्यवाहीत किंवा व्यवहारात निबद्ध असलेल्या व्यक्तीकडून अशा लोक सेवकाने प्रतिफलाविना मूल्यवान् वस्तू मिळवणे.

१६५क. कलम १६१ किंवा कलम १६५ मध्ये व्याख्या केलेल्या अपराधांना अपप्रेरणा देण्याबद्दल शिक्षा.

१६६. कोणत्याही व्यक्तीला क्षती पोचवण्याच्या उद्देशाने लोक सेवकाने कायद्याची अवज्ञा करणे.

१६७. क्षती पोचवण्याच्या उद्देशाने लोक सेवकाने चुकीच्या दस्तऐवजाची मांडणी करणे.

१६८. लोक सेवकाने बेकायदेशीरपणे व्यापारधंदा करणे.

१६९. लोक सेवकाने बेकायदेशीरपणे मालमत्ता विकत घेणे किंवा तीसाठी बोली देणे.

१७०. लोक सेवकाची बतावणी करुन तोतयेगिरी करणे.

१७१. लोक सेवक वापरतो तशी वर्दी किंवा तसे ओळखचिन्ह कपटी उद्देशाने परिधान करणे किंवा जवळ बाळगणे.

## प्रकरण ९ वे —क

### निवडणुकींसंबंधीच्या अपराधांविषयी

१७१क. "उमेदवार", "निवडणूकविषयक हक्क" यांच्या व्याख्या.

१७१ख. लाचलुचपत.

१७१ग. निवडणुकांमध्ये गैरवाजवी प्रभाव पाडणे.

१७१घ. निवडणुकांमध्ये तोतयेगिरी करणे.

१७१ङ. लाचलुचपतीबद्दल शिक्षा.

१७१च. निवडणुकीत गैरवाजवी प्रभाव पाडण्याबद्दल किंवा तोतयेगिरी करण्याबद्दल शिक्षा.

१७१छ. निवडणुकीच्या संबंधात खोटे कथन.

१७१ज. निवडणुकीच्या संबंधात अवैधपणे पैसे खर्च करणे.

१७१झ. निवडणुकीचे हिशेब ठेवण्यास चुकणे.

## प्रकरण १० वे

### लोक सेवकांच्या कायदेशीर प्राधिकाराच्या अवमानांविषयी

१७२. समन्सची बजावणी किंवा इतर कार्यवाही टाळण्यासाठी फरारी होणे.

१७३. समन्सची बजावणी किंवा इतर कार्यवाही यास प्रतिबंध करणे किंवा त्याच्या प्रकाशनाला प्रतिबंध करणे.

१७४. लोक सेवकाने दिलेल्या आदेशानुसार उपस्थित न राहणे.

१७५. लोक सेवकाकडे दस्तऐवज हजर करण्यास बद्ध असलेल्या व्यक्तीने तो हजर करण्याचे टाळणे.

१७६. लोक सेवकाला दखल किंवा माहिती देण्यास विधितः बद्ध असलेल्या व्यक्तीने ती देण्याचे टाळणे.

१७७. खोटी माहिती पुरवणे.

१७८. शपथ घेण्यास किंवा दृढकथन करण्यास लोक सेवकाने रीतसर फर्मावले असता त्यास नकार देणे.

१७९. प्रश्न विचारण्यास प्राधिकृत असलेल्या लोक सेवकाला उत्तर देण्यास नकार देणे.

१८०. कथन स्वाक्षरित करण्यास नकार देणे.

१८१. शपथ घेववण्यास किंवा दृढकथन करून घेण्यास प्राधिकृत असलेला लोक सेवक किंवा अन्य व्यक्ती यांच्यासमोर शपथ घेऊन किंवा दृढकथन करून खोटे कथन करणे.

१८२. लोक सेवकाला आपल्या कायदेशीर अधिकाराचा वापर दुसऱ्या व्यक्तीला क्षती पोचेल अशाप्रकारे करायला लावण्याच्या उद्देशाने खोटी माहिती देणे.

कलमे

१८३. लोक सेवकाच्या कायदेशीर प्राधिकारान्वये मालमत्ता ताब्यात घेतली जाण्यास प्रतिकार करणे.

१८४. लोक सेवकाच्या प्राधिकारान्वये विक्रीस काढलेल्या मालमत्तेच्या विक्रीला अटकाव करणे.

१८५. लोक सेवकाच्या प्राधिकारान्वये मालमत्ता विक्रीस काढली असता अवैधपणे ती खरेदी करणे किंवा तीसाठी बोली बोलणे.

१८६. लोक सेवक सार्वजनिक कार्ये पार पाडीत असता त्याला अटकाव करणे.

१८७. लोक सेवकाला साहाय्य देणे विधित: बंधनकारक असताना साहाय्य देण्याचे टाळणे.

१८८. लोक सेवकाने रीतसर जारी केलेल्या आदेशाची अवज्ञा.

१८९. लोक सेवकाला क्षती पोचवण्याचा धाक.

१९०. लोक सेवकाकडे संरक्षणासाठी अर्ज करण्यापासून एखाद्या व्यक्तीला परावृत्त राहण्याबद्दल मन वळण्याकरता क्षती पोचवण्याचा धाक.

## प्रकरण ११ वे

### खोटा पुरावा आणि सार्वजनिक न्यायाच्या विरोधी अपराध यांविषयी

१९१. खोटा पुरावा देणे.

१९२. खोटा पुरावा रचणे.

१९३. खोट्या पुराव्याबद्दल शिक्षा.

१९४. देहांतदंडाच्या अपराधाबद्दल दोषसिद्धी घडवून आणण्याच्या उद्देशाने खोटा पुरावा देणे किंवा रचणे.

जर त्यायोगे निरपराध व्यक्ती सिद्धदोष ठरली आणि फाशी गेली तर.

१९५. आजीव कारावासाच्या किंवा कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषसिद्धी घडवून आणण्याच्या उद्देशाने खोटा पुरावा देणे किंवा रचणे.

१९६. खोटा असल्याचे माहीत असलेला पुरावा वापरणे.

१९७. खोटे प्रमाणपत्र देणे किंवा स्वाक्षरित करणे.

१९८. खोटे असल्याचे माहीत असलेले प्रमाणपत्र खरे म्हणून वापरणे.

१९९. जे अधिकथन विधित: पुरावा म्हणून स्वीकार्य आहे त्यात केलेले खोटे कथन.

२००. असे अधिकथन खोटे असल्याचे माहीत असताना ते खरे म्हणून वापरणे.

२०१. अपराध्याला वाचवण्यासाठी अपराधाचा पुरावा नाहीसा होण्याची तजवीज करणे किंवा खोटी माहिती देणे—

अपराध देहांतदंडाचा असल्यास;

आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास;

दहा वर्षांहून कमी कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास.

२०२. अपराधाची माहिती देण्यास विधित: बद्ध असलेल्या व्यक्तीने माहिती देण्याचे उद्देशपूर्वक टाळणे.

२०३. घडलेल्या अपराधाबाबत खोटी माहिती देणे.

२०४. कोणताही दस्तऐवज पुरावा म्हणून हजर केला जाऊ नये यासाठी तो नष्ट करणे.

२०५. दाव्यातील किंवा खटल्यातील कोणत्याही कृतीच्या किंवा कामकाजाच्या प्रयोजनार्थ तोतयेगिरी करणे.

२०६. समपहृत म्हणून किंवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून मालमत्तेचे अभिग्रहण होऊ नये यासाठी ती कपटीपणाने हलवणे किंवा लपवणे.

२०७. समपहृत म्हणून किंवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून मालमत्तेचे अभिग्रहण होऊ नये यासाठी कपटीपणाने तिच्यावर दावा सांगणे.

२०८. देय नसलेल्या रकमेसाठी कपटीपणाने हुकूमनामा होऊ देणे.

कलमे

२०९. अप्रामाणिकपणाने न्यायालयात खोटा मागणीहक्क सांगणे.

२१०. देय नसलेल्या रकमेसाठी कपटीपणाने हुकूमनामा मिळवणे.

२११. क्षती पोचवण्याच्या उद्देशाने अपराधाचा खोटा दोषारोप करणे.

२१२. अपराध्याला आसरा देणे—
अपराध देहांतदंडय असल्यास ;
आजीव कारावासाच्या किंवा कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास.

२१३. अपराध्याला शिक्षेपासून वाचवण्यासाठी देणगी घेणे, इ.—
अपराध देहांतदंडय असल्यास ;
आजीव कारावासाच्या किंवा कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास.

२१४. अपराध्याला शिक्षेपासून वाचवण्याच्या प्रतिफलादाखल देणगी देऊ करणे किंवा मालमत्ता परत करणे—
अपराध देहांतदंडय असल्यास ;
आजीव कारावासाच्या किंवा कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास.

२१५. चोरीला गेलेली मालमत्ता परत मिळवण्याच्या कामी मदत करण्याबद्दल देणगी घेणे, इ.

२१६. हवालतीतून पळालेल्या किंवा ज्याच्या गिरफदारीचा आदेश देण्यात आला आहे अशा अपराध्याला आसरा देणे.—
अपराध देहांतदंडय असल्यास;
अपराध आजीव कारावासाच्या, किंवा कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास.;

२१६क. लुटारु किंवा दरवडेखोर यांना आसरा दिल्याबद्दल दंड.

२१६ख. [ निरसित. ]

२१७. व्यक्तीला शिक्षेपासून किंवा मालमत्तेला समपहरणापासून वाचवण्याच्या उद्देशाने लोक सेवकाने कायद्याच्या निदेशाची अवज्ञा करणे.

२१८. एखाद्या व्यक्तीला शिक्षेपासून किंवा मालमत्तेला समपहरणापासून वाचवण्याच्या उद्देशाने लोक सेवकाने चुकीच्या अभिलेखाची किंवा लेखाची मांडणी करणे.

२१९. न्यायिक कार्यवाहीत लोक सेवकाने भ्रष्टतापूर्वक बेकायदा अहवाल देणे, इ.

२२०. प्राधिकार असलेल्या व्यक्तीने आपण बेकायदा वागत असल्याचे माहीत असताना संपरीक्षेसाठी सुपूर्द करणे किंवा बंदिवासात पाठवणे.

२२१. गिरफदार करण्यास बद्ध असलेल्या लोक सेवकाने गिरफदारी करण्याचे उद्देशपूर्वक टाळणे.

२२२. शिक्षादेशाधीन असलेल्या किंवा कायदेशीरपणे हवालतीत पाठवलेल्या व्यक्तीला गिरफदार करण्यास बद्ध असलेल्या लोकसेवकाने गिरफदारी करण्याचे उद्देशपूर्वक टाळणे.

२२३. लोक सेवकाने हयगयीने बंदिवासातून किंवा हवालतीतून पळून जाऊ देणे.

२२४. एखाद्या व्यक्तीने आपल्या कायदेशीर गिरफदारीला प्रतिकार किंवा अटकाव करणे.

२२५. दुसऱ्या व्यक्तीच्या कायदेशीर गिरफदारीला प्रतिकार किंवा अटकाव करणे.

२२५क. ज्यांसाठी अन्यथा उपबंध केलेला नाही अशा प्रकरणात, लोकसेवकाने गिरफदारी करण्याचे टाळणे किंवा पळून जाऊ देणे.

२२५ख. ज्यांसाठी अन्यथा उपबंध केलेला नाही अशा प्रकरणात, कायदेशीर गिरफदारीला प्रतिकार करणे किंवा पळून जाणे किंवा अवैधपणे सुटका करणे.

२२६. [ निरसित ]

२२७. शिक्षा-माफीच्या शर्तींचा भंग.

२२८. न्यायिक कार्यवाहीत पीठासीन असलेल्या लोक सेवकाचा उद्देशपूर्वक अपमान करणे किंवा त्याच्या कामात व्यत्यय आणणे.

२२८क. विवक्षित अपराधांना बळी पडलेली व्यक्ती कोण ते उघड करणे, इत्यादी.

२२९. ज्यूरी-सदस्याची किंवा न्यायसहायकाची बतावणी करून तोतयेगिरी करणे.

कलमे

## प्रकरण १२ वे

### नाणी व शासकीय मुद्रांक यांसंबंधीच्या अपराधांविषयी


२३०. "नाणे" याची व्याख्या.
भारतीय नाणे.

२३१. नाणे नकली तयार करणे.

२३२. भारतीय नाणे नकली तयार करणे.

२३३. नाणे नकली तयार करण्याचे साधन बनवणे किंवा विकणे.

२३४. भारतीय नाणे नकली तयार करण्याचे साधन बनवणे किंवा विकणे.

२३५. नाणे नकली तयार करण्याच्या कामी वापरण्याकरता साधन किंवा सामग्री कब्जात बाळगणे ;
भारतीय नाणे असेल तर.

२३६. भारताबाहेर नाण्याचे नकलीकरण करण्यास भारतामध्ये अपप्रेरणा देणे.

२३७. नकली नाण्याची आयात किंवा निर्यात.

२३८. नकली भारतीय नाण्याची आयात किंवा निर्यात.

२३९. कोणतेही नाणे नकली आहे याची जाणीव असताना ते सुपूर्द करणे.

२४०. भारतीय नाणे नकली आहे याची जाणीव असताना ते सुपूर्द करणे.

२४१ एखादे नाणे खरे म्हणून सुपूर्द करणे---ते जेव्हा प्रथम कब्जात आले तेव्हा सुपूर्दकाराला ते नकली असल्याचे माहीत नसल्यास.

२४२. एखाद्या व्यक्तीने नकली नाणे कब्जात बाळगणे---ते कब्जात आले तेव्हा ते नकली असल्याचे तिला माहीत असल्यास.

२४३. एखाद्या व्यक्तीने भारतीय नाणे कब्जात बाळगणे.---ते नाणे कब्जात आले तेव्हा ते नकली असल्याचे तिला माहीत असल्यास.

२४४. टाकसाळीत कामाला असलेल्या व्यक्तीने कायद्यानुसार ठरलेल्याहून निराळ्या वजनाचे किंवा मिश्रणाचे नाणे घडवणे.

२४५. नाणी बनवण्याचे साधन बेकायदेशीरपणे टाकसाळीतून घेऊन जाणे.

२४६. कपटीपणाने किंवा अप्रामाणिकपणाने नाण्याचे वजन कमी करणे किंवा मिश्रण बदलणे.

२४७. कपटीपणाने किंवा अप्रामाणिकपणाने भारतीय नाण्याचे वजन कमी करणे किंवा मिश्रण बदलणे.

२४८. एखादे नाणे निराळ्या वर्णनाचे नाणे म्हणून खपून जावे या उद्देशाने त्या नाण्याचे रूप बदलणे.

२४९. भारतीय नाणे निराळ्या वर्णनाचे नाणे म्हणून खपून जावे या उद्देशाने त्या नाण्याचे रूप बदलणे.

२५०. बदल करण्यात आला आहे हे माहीत असताना कब्जात बाळगलेले नाणे सुपूर्द करणे.

२५१. बदल करण्यात आला आहे हे माहीत असताना कब्जात बाळगलेले भारतीय नाणे सुपूर्द करणे.

२५२. बदल करण्यात आलेले नाणे एखाद्या व्यक्तीने कब्जात बाळगणे---ते नाणे कब्जात आले तेव्हा त्यात बदल केला असल्याचे तिला माहीत असल्यास.

२५३. बदल करण्यात आलेले भारतीय नाणे एखाद्या व्यक्तीने कब्जात बाळगणे---ते नाणे कब्जात आले तेव्हा त्यात बदल केला असल्याचे तिला माहीत असल्यास.

२५४. एखादे नाणे अस्सल म्हणून सुपूर्द करणे---ते नाणे पहिल्यांदा कब्जात आले तेव्हा त्यात बदल करण्यात आल्याचे सुपूर्दकाराला माहीत नसल्यास.

२५५. शासकीय मुद्रांक नकली तयार करणे.

२५६. शासकीय मुद्रांक नकली तयार करण्यासाठी साधन किंवा सामग्री कब्जात बाळगणे.

कलमे

२५७. शासकीय मुद्रांक नकली तयार करण्यासाठी साधन बनवणे किंवा विकणे.

२५८. नकली शासकीय मुद्रांकाची विक्री.

२५९. नकली शासकीय मुद्रांक कब्जात बाळगणे.

२६०. जो नकली असल्याचे माहीत आहे असा शासकीय मुद्रांक अस्सल म्हणून वापरणे.

२६१. शासनास हानी पोचवण्याच्या उद्देशाने, शासकीय मुद्रांक लावलेल्या पदार्थावरील लेख पुसून टाकणे किंवा एखाद्या दस्तऐवजासाठी वापरलेला मुद्रांक त्यावरून काढून टाकणे.

२६२. जो आधी वापरण्यात आलेला असल्याचे माहीत आहे असा शासकीय मुद्रांक वापरणे.

२६३. मुद्रांक वापरण्यात आलेला असल्याचे दर्शवणारी खूण खोडून टाकणे.

२६३क. खोटया मुद्रांकांना मनाई.

प्रकरण १३ वे

वजने व मापे यांसंबंधीच्या अपराधांविषयी

२६४. वजन करण्यासाठी खोटया साधनाचा कपटपूर्ण वापर.

२६५. खोटे वजन किंवा माप याचा कपटपूर्ण वापर.

२६६. खोटे वजन किंवा माप कब्जात बाळगणे.

२६७. खोटे वजन किंवा माप बनवणे किंवा विकणे.

प्रकरण १४ वे

सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता, सोय, सभ्यता व नीतिमत्ता यांना बाधक अशा अपराधांविषयी

२६८. सार्वजनिक उपद्रव.

२६९. जीवितास धोकादायक असलेल्या रोगाचा संसर्ग पसरवण्याचा संभव असलेली हयगयीची कृती.

२७०. जीवितास धोकादायक असलेल्या रोगाचा संसर्ग पसरवण्याचा संभव असलेली घातकी कृती.

२७१. पृथक्‌वासाच्या नियमाची अवज्ञा.

२७२. विक्रीसाठी असलेल्या खाद्यपदार्थात किंवा पेयात भेसळ.

२७३. अपायकारक खाद्यपदार्थाची किंवा पेयाची विक्री.

२७४. औषधिद्रव्यांमध्ये भेसळ.

२७५. भेसळयुक्त औषधिद्रव्यांची विक्री.

२७६. एखादे औषधिद्रव्य वेगळे औषधिद्रव्य किंवा सिद्धपदार्थ म्हणून विकणे.

२७७. सार्वजनिक झऱ्याचे किंवा जलाशयाचे पाणी घाण करणे.

२७८. वातावरण आरोग्यास अपायकारक करणे.

२७९. सार्वजनिक रस्त्यावर बेदरकारपणे वाहन हाकणे किंवा सवारी करणे.

२८०. जलयान बेदरकारपणे चालवणे.

२८१. फसवा प्रकाश, चिन्ह किंवा बोया दाखवणे.

२८२. भाडे घेऊन एखाद्या व्यक्तीला असुरक्षित किंवा जादा बोजा लादलेल्या जलयानातून जलमार्गे नेणे.

२८३. सार्वजनिक रस्त्यातील किंवा नौकानयन मार्गातील धोका किंवा अटकाव.

२८४. विषारी पदार्थाबाबत हयगयीचे वर्तन.

२८५. आग किंवा ज्वालाग्राही पदार्थ यांच्याबाबत हयगयीचे वर्तन.

२८६. स्फोटक पदार्थांच्याबाबत हयगयीचे वर्तन.

२८७. यंत्रसामग्रीबाबत हयगयीचे वर्तन.

२८८. इमारती पाडण्याबाबत किंवा दुरुस्त करण्याबाबत हयगयीचे वर्तन.

कलमे

२८९. प्राण्याबाबत हयगयीचे वर्तन.

२९०. ज्यांबाबत अन्यथा उपबंध केलेला नाही त्या प्रकरणी सार्वजनिक उपद्रवाबद्दल शिक्षा.

२९१. उपद्रव थांबवण्याबाबतच्या व्यादेशानंतरही तो चालू ठेवणे.

२९२. अश्लील पुस्तके, इ. ची विक्री, इ.

२९३. अश्लील वस्तू तरुण व्यक्तीला विकणे, इ.

२९४. अश्लील कृती व गाणी.

२९४क. लॉटरी कार्यालय ठेवणे.

प्रकरण १५ वे

**धर्मासंबंधीच्या अपराधांविषयी**

२९५. कोणत्याही वर्गाच्या धर्माचा अपमान करण्याच्या उद्देशाने उपासना स्थानाचे नुकसान करणे किंवा ते अपवित्र करणे.

२९५क. कोणत्याही वर्गाच्या धर्माचा किंवा धार्मिक श्रद्धांचा अपमान करून धार्मिक भावनांवर अत्याचार करण्याच्या उद्देशाने बुद्धिपुरस्सर व दुष्ट उद्देशाने कृती करणे.

२९६. धार्मिक जमावास व्यत्यय आणणे.

२९७. पुरण्याच्या जागा, इत्यादी ठिकाणी अतिक्रमण.

२९८. धार्मिक भावना दुखावण्याच्या बुद्धिपुरस्सर उद्देशाने शब्द उच्चारणे, इ.

प्रकरण १६ वे

**मानवी शरीरास बाधक होणाऱ्या अपराधांविषयी**

**जीवितास बाधक होणाऱ्या अपराधांविषयी**

२९९. सदोष मनुष्यवध.

३००. खून.
सदोष मनुष्यवध हा केव्हा खून नव्हे.

३०१. ज्या व्यक्तीचा मृत्यू घडवून आणणे उद्देशित होते त्याहून अन्य व्यक्तीचा मृत्यू घडवून आणण्याने सदोष मनुष्यवध.

३०२. खुनाबद्दल शिक्षा.

३०३. जन्मठेप-कैद्यांनी केलेल्या खुनाबद्दल शिक्षा.

३०४. 'खून' या सदरात न मोडणाऱ्या सदोष मनुष्यवधाबद्दल शिक्षा.

३०४क. हयगयीने मृत्यूस कारण होणे.

३०५. बालकाच्या किंवा भ्रमिष्ट व्यक्तीच्या आत्महत्येला अपप्रेरणा देणे.

३०६. आत्महत्येला अपप्रेरणा देणे.

३०७. खुनाचा प्रयत्न करणे.
जन्मठेप-कैद्यांनी केलेले प्रयत्न.

३०८. सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न करणे.

३०९. आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणे.

३१०. ठग.

३११. शिक्षा.

३१२. गर्भस्राव घडवून आणणे.

३१३. स्त्रीच्या संमतीशिवाय गर्भस्राव घडवून आणणे.

३१४. गर्भस्राव घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेल्या कृतीमुळे मृत्यू घडून येणे—
ती कृती स्त्रीच्या संमतीशिवाय केली असल्यास.

कलमे

३१५. मूल जिवंत जन्माला येण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा जन्मानंतर त्याचा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली कृती.

३१६. 'सदोष मनुष्यवध' या सदरात मोडणाऱ्या कृतीद्वारे, स्पंदन पावणाऱ्या अजात गर्भजीवाचा मृत्यू घडवून आणणे.

३१७. बारा वर्षांखालील मुलाला त्याच्या आई-वा-बापाने किंवा जिच्याकडे त्याची देखभाल आहे त्या व्यक्तीने उघड्यावर टाकणे आणि त्याचा परित्याग करणे.

३१८. मृत देहाची गुप्तपणे विल्हेवाट लावून अपत्यजन्माची लपवणूक करणे.

## दुखापतीविषयी

३१९. दुखापत.

३२०. जबर दुखापत.

३२१. इच्छापूर्वक दुखापत पोचवणे.

३२२. इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे.

३२३. इच्छापूर्वक दुखापत पोचवण्याबद्दल शिक्षा.

३२४. घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे.

३२५. इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवण्याबद्दल शिक्षा.

३२६. घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे.

३२७. मालमत्ता जबरीने घेण्यासाठी किंवा अवैध कृती करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे.

३२८. अपराध करण्याच्या उद्देशाने विष, इत्यादींच्या साहाय्याने दुखापत पोचवणे.

३२९. मालमत्ता जबरीने घेण्यासाठी किंवा अवैध कृती करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे.

३३०. कबुलीजबाब जबरीने घेण्यासाठी अथवा मालमत्ता परत करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे.

३३१. कबुलीजबाब जबरीने घेण्यासाठी अथवा मालमत्ता परत करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे.

३३२. लोक सेवकाला त्याच्या कर्तव्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे.

३३३. लोक सेवकाला त्याच्या कर्तव्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे.

३३४. प्रक्षोभकारणामुळे इच्छापूर्वक दुखापत पोचवणे.

३३५. प्रक्षोभकारणामुळे इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे.

३३६. इतरांचे जीवित किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणारी कृती.

३३७. इतरांचे जीवित किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या कृतीने दुखापत पोचवणे.

३३८. इतरांचे जीवित किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या कृतीने जबर दुखापत पोचवणे.

## गैर निरोध आणि गैर परिरोध यांविषयी

३३९. गैर निरोध.

३४०. गैर परिरोध.

३४१. गैर निरोधाबद्दल शिक्षा.

३४२. गैर परिरोधाबद्दल शिक्षा.

३४३. तीन दिवस किंवा त्याहून अधिक काळ गैर परिरोध.

३४४. दहा दिवस किंवा त्याहून अधिक काळ गैर परिरोध.

कलमे


३४५. जिच्या मुक्ततेसाठी प्राधिलेख काढण्यात आला असेल अशा व्यक्तीस गैरपणे परिरुद्ध करून ठेवणे.

३४६. गुप्त स्थळी गैर परिरोध.

३४७. मालमत्ता जबरीने घेण्यासाठी किंवा अवैध कृती करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी गैर परिरोध.

३४८. कबुलीजबाब जबरीने घेण्यासाठी अथवा मालमत्ता परत करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी गैर परिरोध·

**फौजदारीपात्र बलप्रयोग आणि हमला यांविषयी**

३४९. बलप्रयोग.

३५०. फौजदारीपात्र बलप्रयोग.

३५१. हमला.

३५२. गंभीर प्रक्षोभकारण नसताना एरव्ही हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करण्याबद्दल शिक्षा.

३५३. लोक सेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे.

३५४. स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे

३५५. गंभीर प्रक्षोभकारण नसताना एरव्ही, एखाद्या व्यक्तीची मानहानी करण्याच्या उद्देशाने हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे.

३५६. एखाद्या व्यक्तीने जवळ बाळगलेल्या मालमत्तेची चोरी करण्याचा प्रयत्न करताना हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे.

३५७. एखाद्या व्यक्तीला गैरपणे परिरुद्ध करण्याचा प्रयत्न करताना हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे.

३५८· गंभीर प्रक्षोभकारणावरून हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे.

**अपनयन, अपहरण, गुलामगिरी व वेठबिगार यांविषयी**

३५९. अपनयन.

३६०. भारतातून अपनयन करणे.

३६१. कायदेशीर पालकाच्या ताब्यातून अपनयन करणे.

३६२. अपहरण.

३६३. अपनयनाबद्दल शिक्षा.

३६३क. भीक मागण्यासाठी अज्ञान व्यक्तीचे अपनयन करणे किंवा तिला विकलांग करणे.

३६४. खून करण्यासाठी अपनयन करणे किंवा अपहरण करणे.

३६५. गुप्तपणे व गैरपणे एखाद्या व्यक्तीला परिरुद्ध करण्याकरिता तिचे अपनयन किंवा अपहरण करणे.

३६६. विवाह, इत्यादीची सक्ती करण्यासाठी स्त्रीचे अपनयन किंवा अपहरण करणे किंवा तिला प्रलोभित करणे.

३६६क. अज्ञान मुलगी अनैतिक कृत्यासाठी मिळवणे.

३६६ख. परकीय देशातून मुलीची आयात करणे.

३६७. एखाद्या व्यक्तीला जबर दुखापत पोचवणे, तिला गुलाम बनवणे, इत्यादींसाठी तिचे अपनयन किंवा अपहरण करणे.

३६८. अपनयन किंवा अपहरण केलेल्या व्यक्तीला गैरपणे लपवणे किंवा परिरुद्ध करून ठेवणे.

३६९. दहा वर्षांखालील बालकाच्या अंगावरील मालमत्ता चोरण्याच्या उद्देशाने त्याचे अपनयन किंवा अपहरण करणे.

३७०. गुलाम म्हणून कोणत्याही व्यक्तीची खरेदी करणे किंवा वासलात लावणे.

कलमे

३७१. गुलामांचा नित्यश: व्यवहार करणे.

३७२. वेश्याव्यवसाय, इत्यादी प्रयोजनार्थ अज्ञान व्यक्तीची विक्री करणे.

३७३. वेश्याव्यवसाय, इ. प्रयोजनार्थ अज्ञान व्यक्तीची खरेदी करणे.

३७४. बेकायदेशीर वेठबिगारी.

लैंगिक अपराधांविषयी

३७५. बलात्कार.

३७६. बलात्काराबद्दल शिक्षा.

३७६क. फारकतीच्या कालावधीत एखाद्या पुरुषाने आपल्या पत्नीशी संभोग करणे.

३७६ख. लोक सेवकाने आपल्या हवालतीत असलेल्या स्त्रीशी संभोग करणे.

३७६ग. तुरुंग, सुधारगृह, इत्यादींच्या अधीक्षकाने संभोग करणे.

३७६घ. एखाद्या रुग्णालयाच्या व्यवस्थापक वर्गापैकी किंवा कर्मचारीवर्गापैकी कोणाही व्यक्तीने त्या रुग्णालयातील कोणत्याही स्त्रीशी संभोग करणे.

अनैसर्गिक अपराधांविषयी

३७७. अनैसर्गिक अपराध.

प्रकरण १७ वे

मालमत्तेच्या विरोधी अपराधांविषयी
चोरीविषयी

३७८. चोरी.

३७९. चोरीबद्दल शिक्षा.

३८०. राहाते घर, इत्यादींतील चोरी.

३८१. कारकुनाने किंवा चाकराने मालकाच्या कब्जातील मालमत्तेची चोरी करणे.

३८२. चोरी करण्यासाठी मृत्यू, दुखापत किंवा निरोध घडवून आणण्याची पूर्वतयारी करून चोरी करणे.

बलाद्ग्रहणाविषयी

३८३. बलाद्ग्रहण.

३८४. बलाद्ग्रहणाबद्दल शिक्षा.

३८५. बलाद्ग्रहण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला क्षती पोचवण्याची भीती घालणे.

३८६. एखाद्या व्यक्तीस मृत्यू किंवा जबर दुखापत यांची भीती घालून बलाद्ग्रहण करणे.

३८७. बलाद्ग्रहण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला मृत्यू किंवा जबर दुखापत यांची भीती घालणे.

३८८. मृत्यू किंवा आजीव कारावास, इ. शिक्षांस पात्र अशा अपराधाचा आरोप करण्याची धमकी देऊन बलाद्ग्रहण करणे.

३८९. बलाद्ग्रहण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला तिने अपराध केल्याचा आरोप करण्याची भीती घालणे.

जबरी चोरी व दरवडा

३९०. जबरी चोरी.
चोरी ही जबरी चोरी केव्हा ठरते.
बलाद्ग्रहण हे केव्हा जबरी चोरी ठरते.

३९१. दरवडा.

३९२. जबरी चोरीबदल शिक्षा.

३९३. जबरी चोरी करण्याचा प्रयत्न करणे.

कलमे

३९४. जबरी चोरी करताना इच्छापूर्वक दुखापत करणे.

३९५. दरवड्याबद्दल शिक्षा.

३९६. खुनासहित दरवडा.

३९७. मृत्यू किंवा जबर दुखापत घडवून आणण्याच्या प्रयत्नासहित जबरी चोरी किंवा दरवडा.

३९८. प्राणघातक हत्यारानिशी सज्ज असताना जबरी चोरी करण्याचा किंवा दरवडा घालण्याचा प्रयत्न करणे.

३९९. दरवडा घालण्याची पूर्वतयारी करणे.

४००. दरवडेखोरांच्या टोळीपैकी असल्याबद्दल शिक्षा.

४०१. चोरांच्या टोळीपैकी असल्याबद्दल शिक्षा.

४०२. दरवडा घालण्यासाठी एकत्र जमणे.

मालमत्तेच्या फौजदारीपात्र अपहाराविषयी

४०३. मालमत्तेचा अप्रामाणिक अपहार.

४०४. मृत व्यक्तीच्या मृत्युसमयी तिच्या कब्जात असलेल्या मालमत्तेचा अप्रामाणिकपणाने अपहार.

फौजदारीपात्र न्यासभंगाविषयी

४०५. फौजदारीपात्र न्यासभंग.

४०६. फौजदारीपात्र न्यासभंगाबद्दल शिक्षा.

४०७. परिवाहक, इत्यादींनी केलेला फौजदारीपात्र न्यासभंग.

४०८. कारकुनाने किंवा चाकराने केलेला फौजदारीपात्र न्यासभंग.

४०९. लोकसेवकाने अथवा बँकव्यवसायी, व्यापारी किंवा अभिकर्ता याने केलेला फौजदारीपात्र न्यासभंग.

चोरीची मालमत्ता स्वीकारण्याविषयी

४१०. चोरीची मालमत्ता.

४११. अप्रामाणिकपणाने चोरीची मालमत्ता स्वीकारणे.

४१२. दरवडा घालताना चोरलेली मालमत्ता अप्रामाणिकपणाने स्वीकारणे.

४१३. चोरीच्या मालमत्तेचा नित्यश: व्यवहार करणे.

४१४. चोरीची मालमत्ता लपवून ठेवण्याच्या कामी साहाय्य करणे.

ठकवणुकीविषयी

४१५. ठकवणूक.

४१६. तोतयेगिरी करून ठकवणूक.

४१७. ठकवणूक करण्याबद्दल शिक्षा.

४१८. जिच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यास अपराधी बद्ध आहे अशा व्यक्तीला परिणामी गैर हानी पोचू शकेल अशा जाणिवेने ठकवणूक करणे.

४१९. तोतयेगिरी करून ठकवणूक करण्याबद्दल शिक्षा.

४२०. ठकवणूक करणे आणि मालमत्तेची सुपूर्दगी करण्यास अप्रामाणिकपणाने प्रवृत्त करणे.

मालमत्तेचे कपटपूर्ण विलेख आणि विल्हेवाटी यांविषयी

४२१. मालमत्तेची धनकोंमध्ये विभागणी ज्यास प्रतिबंध करण्यासाठी ती अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने हलविणे किंवा लपविणे.

कलमे

४२२. धनकोंना ऋण उपलब्ध होऊ देण्यास अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने प्रतिबंध करणे.

४२३. प्रतिफलाबाबतचे खोटे कथन अंतर्भूत असणारे हस्तांतरणपत्र अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने निष्पादित करणे.

४२४. मालमत्ता अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने हलविणे किंवा लपवून ठेवणे.

आगळिकीविषयी

४२५. आगळीक.

४२६. आगळिकीबद्दल शिक्षा.

४२७. पन्नास रुपये इतक्या रकमेचे नुकसान करून आगळीक करणे.

४२८. दहा रुपये किंमतीच्या जनावरास ठार मारून किंवा विकलांग करून आगळीक करणे.

४२९. कितीही किंमतीची गुरेढोरे, इत्यादींना किंवा पन्नास रुपये किंमतीच्या जनावरास ठार मारून किंवा विकलांग करून आगळीक करणे.

४३०. पाटबंधाऱ्यांच्या कामाची खराबी करून किंवा गैरपणे पाण्याची दिशा बदलून आगळीक करणे.

४३१. सार्वजनिक रस्ता, पूल, नदी किंवा कालवा याची खराबी करून आगळीक करणे.

४३२. सार्वजनिक निचरा-गटारे नुकसानकारक होईल अशाप्रकारे भरून वाहू देऊन किंवा त्यात अडथळा निर्माण करून आगळीक करणे.

४३३. दीपगृह किंवा सागरी धोक्याची निशाणी नष्ट करून, ती हलवून किंवा त्याची उपयुक्तता कमी करून आगळीक करणे.

४३४. सार्वजनिक प्राधिकरणाने लावलेले सीमाचिन्ह नष्ट करून, हलवून, इत्यादी प्रकारे आगळीक करणे.

४३५. शंभर रुपयांच्या मर्यादेपर्यंत अथवा (शेतमालाच्या बाबतीत) दहा रुपयांच्या मर्यादेपर्यंत नुकसान करण्याच्या उद्देशाने विस्तव किंवा स्फोटक पदार्थ याद्वारे आगळीक करणे.

४३६. घर, इत्यादी नष्ट करण्याच्या उद्देशाने विस्तव किंवा स्फोटक पदार्थ याद्वारे आगळीक करणे.

४३७. मजली जलयान किंवा २० टन बारदान भरलेले जलयान नष्ट करण्याच्या अथवा असुरक्षित करण्याच्या उद्देशाने आगळीक करणे.

४३८. विस्तव किंवा स्फोटक पदार्थ याद्वारे केलेल्या कलम ४३७ मध्ये वर्णन केलेल्या आगळिकीबद्दल शिक्षा.

४३९. चोरी, इत्यादी करण्याच्या उद्देशाने जलयान उथळ पाणी असलेल्या जमिनीत किंवा किनाऱ्यावर उद्देशपूर्वक घुसवल्याबद्दल शिक्षा.

४४०. मृत्यू किंवा दुखापत घडवून आणण्याची पूर्वतयारी करून केलेली आगळीक.

फौजदारीपात्र अतिक्रमणाविषयी

४४१. फौजदारीपात्र अतिक्रमण.

४४२. गृह-अतिक्रमण करणे.

४४३. चोरटे गृह-अतिक्रमण.

४४४. रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण करणे.

४४५. घरफोडी.

४४६. रात्रीच्या वेळी घरफोडी करणे.

४४७. फौजदारीपात्र अतिक्रमणाबद्दल शिक्षा.

४४८. गृह-अतिक्रमणाबद्दल शिक्षा.

४४९. मृत्यूच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी गृह-अतिक्रमण.

४५०. आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी गृह-अतिक्रमण.

४५१. कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी गृह-अतिक्रमण.

४५२. दुखापत, हमला किंवा गैरनिरोध करण्याची पूर्वतयारी करून नंतर गृह-अतिक्रमण.

४५३. चोरट्या गृह-अतिक्रमणाबद्दल किंवा घरफोडीबद्दल शिक्षा.

कलमे

४५४. कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी.

४५५. दुखापत, हमला किंवा गैरनिरोध करण्याची पूर्व तयारी करून नंतर चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी.

४५६. रात्रीच्या वेळी केलेल्या चोरट्या गृह-अतिक्रमणाबद्दल किंवा घरफोडीबद्दल शिक्षा.

४५७. कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी.

४५८. दुखापत, हमला किंवा गैरनिरोध करण्याची पूर्व तयारी करून नंतर रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी.

४५९. चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी करताना जबर दुखापत करणे.

४६०. रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी करण्यात संयुक्तपणे निबद्ध असलेल्यांपैकी एका व्यक्तीने मृत्यू घडवून आणल्यास किंवा जबर दुखापत केल्यास त्याबाबतीत सर्व व्यक्ती शिक्षापात्र.

४६१. आतमध्ये मालमत्ता असलेले पात्र अप्रामाणिकपणाने फोडून उघडणे.

४६२. जिच्याकडे अभिरक्षेचे काम सोपवले आहे त्या व्यक्तीने असा अपराध केला असता त्याबद्दल शिक्षा.

## प्रकरण १८ वे

### दस्तऐवज आणि स्वामित्व-चिन्हे यासंबंधीच्या अपराधांविषयी

४६३. बनावटीकरण.

४६४. खोटा दस्तऐवज बनवणे.

४६५. बनावटीकरणाबद्दल शिक्षा.

४६६. न्यायालयीन अभिलेख किंवा सार्वजनिक नोंदपुस्तक, इ. चे बनावटीकरण.

४६७. मूल्यवान् रोखा, मृत्युपत्र, इ. चे बनावटीकरण.

४६८. ठकवणूक करण्यासाठी बनावटीकरण.

४६९. लौकिकास बाध आणण्यासाठी बनावटीकरण.

४७०. बनावट दस्तऐवज.

४७१. बनावट दस्तऐवज खरा म्हणून वापरणे.

४७२. कलम ४६७ अन्वये शिक्षापात्र असलेले बनावटीकरण करण्याच्या उद्देशाने नकली मोहोर, इत्यादी बनवणे किंवा कब्जात बाळगणे.

४७३. अन्यथा शिक्षापात्र असलेले बनावटीकरण करण्याच्या उद्देशाने नकली मोहोर, इत्यादी बनवणे किंवा कब्जात बाळगणे.

४७४. कलम ४६६ किंवा ४६७ मध्ये वर्णन केलेला दस्तऐवज तो बनावट असल्याचे माहीत असताना, तो खरा म्हणून वापरण्याच्या उद्देशाने कब्जात बाळगणे.

४७५. कलम ४६७ मध्ये वर्णन केलेले दस्तऐवज अधिप्रमाणित करण्यासाठी वापरले जाणारे बोधचिन्ह किंवा चिन्ह नकली तयार करणे किंवा अशी नकली चिन्हाने अंकित सामग्री कब्जात बाळगणे.

४७६. कलम ४६७ मध्ये वर्णन केलेल्याहून अन्य दस्तऐवज अधिप्रमाणित करण्यासाठी वापरले जाणारे बोधचिन्ह किंवा चिन्ह नकली तयार करणे किंवा अशी नकली चिन्हाने अंकित सामग्री कब्जात बाळगणे.

४७७. कपटीपणाने मृत्युपत्र, दत्तक घेण्यासंबंधीचे प्राधिकारपत्र किंवा मूल्यवान् रोखा खोडून रद्द करणे, तो नष्ट करणे, इत्यादी.

४७७ क. खोटे हिशेब तयार करणे.

### स्वामित्व विषयक व इतर चिन्हे यांविषयी

४७८. [निरसित.]

४७९. स्वामित्व—चिन्ह.

४८०. [निरसित.]

कलमे


४८१. खोटे स्वामित्व-चिन्ह वापरणे.

४८२. खोटे स्वामित्व-चिन्ह वापरण्याबद्दल शिक्षा.

४८३. दुसऱ्याने वापरले असेल तसे स्वामित्व-चिन्ह नकली तयार करणे.

४८४. लोक सेवकाने वापरलेले चिन्ह नकली तयार करणे.

४८५. स्वामित्व-चिन्ह नकली तयार करण्यासाठी कोणतेही साधन बनवणे किंवा कब्जात बाळगणे.

४८६. नकली स्वामित्व-चिन्हाने अंकित असलेला माल विकणे.

४८७. ज्याच्या आत माल आहे अशा कोणत्याही पात्रावर खोटे चिन्ह करणे.

४८८. अशा कोणत्याही खोट्या चिन्हाचा उपयोग करण्याबद्दल शिक्षा.

४८९. क्षती पोचवण्याच्या उद्देशाने स्वामित्व-चिन्हाबाबत गैरफेर करणे.


### चलनी नोटा किंवा बँक-नोटा यांविषयी


४८९क. चलनी नोटा किंवा बँक-नोटा नकली तयार करणे.

४८९ख. बनावट किंवा नकली चलनी नोटा किंवा बँक-नोटा खऱ्या म्हणून वापरणे.

४८९ग. बनावट किंवा नकली चलनी नोटा किंवा बँक-नोटा कब्जात बाळगणे.

४८९घ. चलनी नोटा किंवा बँक-नोटा बनावट किंवा नकली तयार करण्यासाठी साधने किंवा सामग्री बनवणे किंवा कब्जात बाळगणे.

४८९ङ. चलनी नोटा किंवा बँक-नोटा यांसारखे दिसणारे दस्तऐवज बनवणे किंवा वापरणे.


## प्रकरण १९ वे

### सेवा-संविदांच्या फौजदारीपात्र भंगाविषयी


४९०. [निरसित.]

४९१. असहाय व्यक्तीची देखभाल करणे व तिच्या गरजा पुरवणे यांबाबतच्या संविदेचा भंग.

४९२. [निरसित].


## प्रकरण २० वे

### विवाहासंबंधीच्या अपराधांविषयी


४९३. एखाद्या पुरुषाने कायदेशीर विवाह झाल्याचा समज लबाडीने निर्माण करून दांपत्यभावाने सहवास घडवून आणणे.

४९४. पती किंवा पत्नी हयात असतानाच्या काळात पुन्हा विवाह करणे.

४९५. ज्या व्यक्तीबरोबर नंतरचा विवाह झाला असेल तिच्यापासून पूर्वीच्या विवाहाची वस्तुस्थिती लपवल्याने तोच अपराध घडतो.

४९६. कायदेशीर विवाह न करता कपटीपणाने आपला विवाह-संस्कार करून घेणे.

४९७. परगमन.

४९८. गुन्हेगारी उद्देशाने विवाहित स्त्रीस भुरळ पाडून नेणे, किंवा पळवून नेणे किंवा अडकवून ठेवणे.


## प्रकरण २० वे-क

### पतीने किंवा पतीच्या नातेवाईकांनी क्रूर वागणूक देण्याविषयी


४९८क. एखाद्या स्त्रीच्या पतीने किंवा पतीच्या नातेवाईकांनी तिला क्रूर वागणूक देणे.

कलमे

## प्रकरण २१ वे

### अब्रूनुकसानीविषयी

४९९. अब्रूनुकसानी
लोकहितासाठी आवश्यक अशा खऱ्या गोष्टीचा अभ्यारोप करणे किंवा ती प्रकाशित करणे.
लोकसेवकांचे सार्वजनिक वर्तन.
कोणत्याही सार्वजनिक प्रश्नाच्या अनुषंगाने कोणत्याही व्यक्तीचे वर्तन.
न्यायालयाच्या कार्यवाहीची प्रतिवृत्ते प्रकाशित करणे.
न्यायालयात निर्णीत झालेल्या खटल्याचे गुणावगुण किंवा साक्षीदारांचे आणि इतर संबंधितांचे वर्तन.
जाहीर आविष्कृतीचे गुणावगुण.
दुसऱ्यावर कायदेशीर हुकूमत असलेल्या व्यक्तीने सद्भावपूर्वक निर्भर्त्सना करणे.
प्राधिकृत व्यक्तीकडे सद्भावपूर्वक आरोप सादर करणे.
एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या किंवा इतरांच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी सद्भावपूर्वक केलेला अभ्यारोप.
एखाद्या व्यक्तीला तिचे हित करण्याच्या किंवा लोकहित साधण्याच्या उद्देशाने सावधान-सूचना देणे.
५००. अब्रूनुकसानीबद्दल शिक्षा.
५०१. अब्रूनुकसानीकारक असल्याचे माहीत असलेले साहित्य छापणे किंवा कोरणे.
५०२. अब्रूनुकसानीकारक साहित्य अंतर्भूत असलेला छापील किंवा कोरीव पदार्थ विकणे.

## प्रकरण २२ वे

### फौजदारीपात्र धाकदपटशा करणे, अपमान करणे आणि त्रास देणे यांविषयी

५०३. फौजदारीपात्र धाकदपटशा.
५०४. शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे.
५०५. सार्वजनिक आगळीक होण्यास साधक अशी विधाने.
वर्गावर्गांमध्ये शत्रुत्व, द्वेषभाव किंवा दुष्टावा निर्माण करणारी किंवा वाढवणारी विधाने.
उपासनास्थान, इत्यादी ठिकाणी केलेला पोटकलम (२) खालील अपराध.
५०६. फौजदारीपात्र धाकदपटशाबद्दल शिक्षा.
मृत्यू किंवा जबर दुखापत घडवून आणणे इत्यादींची धमकी असल्यास.
५०७. निनावी संदेशाद्वारे फौजदारीपात्र धाकदपटशा.
५०८. एखादी व्यक्ती दैवी प्रकोपाचा विषय होईल असा तिचा समज करून देऊन घडवलेली कृती.
५०९. स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने शब्दोच्चार, हावभाव किंवा कृती करणे.
५१०. नशापाणी केलेल्या व्यक्तीने सार्वजनिक ठिकाणी केलेले गैरवर्तन.

## प्रकरण २३ वे

### अपराध करण्याच्या प्रयत्नांविषयी

५११. आजीव कारावासाच्या किंवा अन्य कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेले अपराध करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल शिक्षा.

# भारतीय दंड संहिता

## (सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५)[१]

[ ६ ऑक्टोबर, १८६० ]

### प्रकरण १ ले

#### प्रस्तावना

ज्याअर्थी, [२][भारताकरता] एक सर्वसाधारण दंड संहिता उपबंधित करणे समयोचित आहे; त्याअर्थी पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :— प्रास्ताविका.

१. या अधिनियमास 'भारतीय दंड संहिता' असे म्हटले जाईल आणि [३][त्याचा विस्तार [४][जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून] संपूर्ण भारतावर] असेल. संहितेचे नाव व तिच्या प्रवर्तनाचा विस्तार.

२. प्रत्येक व्यक्ती या संहितेच्या उपबंधांना विरोधी अशा ज्या कृतीबद्दल किंवा अकृतीबद्दल ती [५]* * * [६][भारतात] दोषी असेल त्या प्रत्येक कृतीबद्दल किंवा अकृतीबद्दल या संहिते-खाली शिक्षेस पात्र होईल, अन्यथा नाही. भारतात केलेल्या अपराधांबद्दल शिक्षा.

---

१. 'भारतीय दंड संहिता' हा अधिनियम 'वऱ्हाड विधि अधिनियम, १९४१' (१९४१ चा ४) याद्वारे वऱ्हाडवर विस्तारित करण्यात आला आहे व

संथाळ परगण्यांमध्ये 'संथाळ परगणे जमाबंदी विनियम, १८७२' (१८७२ चा ३)—कलम २ द्वारे;

पंथ पिपलोदमध्ये 'पंथ पिपलोद विधि विनियम, १९२९' (१९२९ चा १)-कलम २ व अनुसूची यांद्वारे;

खोंडमाळ जिल्ह्यामध्ये 'खोंडमाळ विधि विनियम, १९३६' (१९३६ चा ४)-कलम ३ व अनुसूची यांद्वारे; आणि

अंगुल जिल्ह्यामध्ये 'अंगुल विधि विनियम, १९३६' (१९३६ चा ५)-कलम ३ व अनुसूची यांद्वारे,

अंमलात आल्याचे घोषित करण्यात आले आहे.

'अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४' (१८७४ चा १४)-कलम ३ (क) खाली हा अधिनियम पुढील अनुसूचित जिल्ह्यांमध्ये अंमलात आल्याचे घोषित करण्यात आले आहे, ते म्हणजे, संयुक्त प्रांत तराई जिल्हे—भारताचे राजपत्र, १८७६, भाग १ ला, पृष्ठ ५०५; हजारीबाग, लोहरदाग (आताचा रांची जिल्हा—कलकत्ता राजपत्र, १८९९, भाग १ ला, पृष्ठ ४४ पहा; आणि मानभूम व परगणा दालभूम आणि सिंहभूम जिल्ह्यातील कोल्हाण—भारताचे राजपत्र, १८८१, भाग १ ला, पृष्ठ ५०४.

त्याच अधिनियमाच्या कलम ५ खाली हा अधिनियम लुशाई टेकड्यांवर विस्तारित करण्यात आला आहे.— पहा, भारताचे राजपत्र, १८९८, भाग २ रा, पृष्ठ ३४५.

१९६२ चा विनियम १२-कलम ३ व अनुसूची यांद्वारे गोवा, दमण व दीव यांवर;

१९६३ चा विनियम ६-कलम २ व अनुसूची १ ली यांद्वारे दादरा व नगरहवेली यांवर;

१९६३ चा विनियम ७-कलम ३ आणि अनुसूची १ ली यांद्वारे पाँडेचेरीवर आणि १९६५ चा विनियम ८—कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे लखदीव, मिनिकॉय व अमीनदीवी या बेटांवर हा अधिनियम विस्तारित करण्यात आला आहे.

२. क्रमश: अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे "ब्रिटिश इंडियाकरिता" या शब्दांऐवजी वरील शब्द घातले.

३. क्रमश: १८९१ चा अधिनियम १२-कलम २ व अनुसूची १ ली, अनुकूलन आदेश, १९३७, अनुकूलन आदेश १९४८ आणि अनुकूलन आदेश, १९५० यांद्वारे मूळ शब्द वरीलप्रमाणे विशोधित करण्यात आलेले आहेत.

४. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग ख राज्ये खेरीजकरून" याऐवजी घातले.

५. १८९१ चा अधिनियम १२-कलम २ व अनुसूची १ ली यांद्वारे "उक्त १ मे, १८६१ रोजी किंवा त्यानंतर" हा मजकूर निरसित केला.

६. क्रमश: अनुकूलन आदेश, १९३७, अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'उक्त राज्यक्षेत्रे' हा मूळ शब्दोल्लेख वरील-प्रमाणे विशोधित करण्यात आलेला आहे.

जे अपराध भारताबाहेर केलेले असतील पण ज्यांची कायद्यानुसार भारतात संपरीक्षा करता येईल अशा अपराधांबद्दल शिक्षा.

३. [1][भारताबाहेर] केलेल्या अपराधाबद्दल [2][कोणत्याही भारतीय कायद्यानुसार] संपरीक्षा केली जाण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर तिने [1][भारताबाहेर] केलेल्या कोणत्याही कृतीबद्दल जणू काही अशी कृती [3][भारतामध्ये] केलेली होती असे समजून या संहितेच्या उपबंधांनुसार कारवाई केली जाईल.

संहितेची राज्यक्षेत्रातीत प्रयुक्ती.

[4][४. [5][(१) भारताच्या नागरिकाने भारताबाहेर केलेला कोणताही अपराध;

(२) भारतात नोंदलेल्या कोणत्याही जहाजावर किंवा विमानावर—मग ते कोठेही असो—कोणत्याही व्यक्तीने केलेला कोणताही अपराध,

यांनादेखील या संहितेचे उपबंध लागू असतील.]

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ "अपराध" या शब्दामध्ये, जी जी कृती [6][भारतात] केली गली तर या संहितेखाली शिक्षापात्र होईल अशा, [1][भारताबाहेर] केलेल्या प्रत्येक कृतीचा समावेश आहे.

[7][उदाहरण]

[8]* * * 'क' [9][हा [10][भारताचा नागरिक] असून] युगांडामध्ये खून करतो. [6][भारतात] जेथे तो सापडेल अशा कोणत्याही स्थळी खुनाबद्दल त्याची संपरीक्षा व दोषसिद्धी केली जाऊ शकते.

[11]* * * * *]

विवक्षित कायद्यांवर या अधिनियमाचा परिणाम होणार नाही.

[12][५. भारत सरकारच्या सेवेतील अधिकारी, भूसैनिक, नौसैनिक किंवा वायुसैनिक यांच्या बंडाबद्दल किंवा पळून जाण्याबद्दल शिक्षा करण्याबाबतच्या कोणत्याही अधिनियमाच्या उपबंधांवर अथवा कोणत्याही विशेष किंवा स्थानिक कायद्याच्या उपबंधांवर या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही.]

## प्रकरण २ रे

## सर्वसाधारण स्पष्टीकरणे

संहितेतील व्याख्या अपवादांस अधीन समजावयाच्या.

६. या संहितेत सर्वत्र प्रत्येक अपराधाची व्याख्या, प्रत्येक दंडविषयक उपबंध व अशा प्रत्येक व्याख्येचे किंवा दंडविषयक उपबंधाचे प्रत्येक उदाहरण ही, "सर्वसाधारण अपवाद" या नावाच्या प्रकरणात जे अपवाद अंतर्भूत आहेत त्यांची अशा व्याख्येत, दंडविषयक उपबंधात किंवा उदाहरणात जरी पुनरावृत्ती केलेली नसली तरी, त्या अपवादांस अधीन असल्याचे मानले जाईल.

### उदाहरणे

(क) या संहितेतील ज्या कलमांत अपराधांच्या व्याख्या अंतर्भूत आहेत त्यांत, सात वर्षे वयाखालील बालक असा अपराध करू शकत नाही असे व्यक्त केलेले नाही; पण सात वर्षे वयाखालील बालकाने केले असेल असे कोणतेही कृत्य अपराध होत नाही असा उपबंध करणाऱ्या सर्वसाधारण अपवादास त्या व्याख्या अधीन आहेत असे अध्याहृत समजावयाचे आहे.

---

१. क्रमशः अनुकूलन आदेश, १९३७, अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३–कलम ३ व अनुसूची यांद्वारे "उक्त राज्यक्षेत्रांच्या मर्यादांच्या बाहेर" हे मूळ शब्द वरीलप्रमाणे विशोधित करण्यात आलेले आहेत.

२. अनुकूलन आदेश, १९३७ याद्वारे "गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया-इन-कौन्सिल याने संमत केलेल्या कोणत्याही कायद्यानुसार" याऐवजी घातले.

३. क्रमशः अनुकूलन आदेश, १९३७, अनुकूलन आदेश १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'उक्त राज्यक्षेत्रे' हा मूळ शब्दोल्लेख वरीलप्रमाणे विशोधित करण्यात आलेला आहे.

४. १८९८ चा अधिनियम ४-कलम २ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.

५. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे खंड (१) ते (४) यांच्याऐवजी घातले.

६ क्रमशः अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३–कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' हा शब्दोल्लेख वरीलप्रमाणे विशोधित करण्यात आलेला आहे.

७. १९५७ चा अधिनियम ३६-कलम ३ व अनुसूची २री यांद्वारे "उदाहरणे" याऐवजी घातले.

८. कित्ता–कलम ३ व अनुसूची २री याद्वारे "(क)" हे अक्षर गाळले.

९. अनुकूलन आदेश, १९४८ याद्वारे "नेटिव्ह इंडियाचा प्रजाजन असलेला हमाल" याऐवजी घातले.

१०. अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "भारतीय अधिवास असलेला ब्रिटिश प्रजाजन" याऐवजी घातले.

११. कित्ता–द्वारे उदाहरणे (ख), (ग) व (घ) गाळली.

१२. कित्ता–द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.

(ख) 'क' हा पोलीस अधिकारी, ज्याने खून केला आहे अशा 'य' ला वॉरंटाविना पकडतो. येथे 'क' हा गैर परिरोधाच्या अपराधाबद्दल दोषी नाही; कारण 'य' ला पकडण्यास तो विधित: बद्ध होता, आणि म्हणून ती बाब "जी गोष्ट करण्यास एखादी व्यक्ती बद्ध आहे अशी कोणतीही गोष्ट तिने केली असता ती अपराध होत नाही" असा उपबंध करणाऱ्या सर्वसाधारण अपवादाखाली येते.

७. या संहितेच्या कोणत्याही भागात स्पष्टीकरण केलेला प्रत्येक शब्दप्रयोग या संहितेच्या प्रत्येक भागात स्पष्टीकरणानुरूप वापरण्यात आला आहे. एकदा स्पष्टीकरण केलेल्या शब्दप्रयोगाचा अर्थ.

८. "तो" हे सर्वनाम व त्याचे साधित शब्द कोणत्याही व्यक्तीबद्दल–मग ती पुरुष असो वा स्त्री–वापरण्यात आले आहेत असे समजावे. "लिंग."

९. संदर्भावरून विरुद्ध दिसून आले नाही तर, एकवचनार्थी शब्दांमध्ये अनेकवचनाचा समावेश आहे व अनेकवचनार्थी शब्दांमध्ये एकवचनाचा समावेश आहे. "वचन".

१०. "पुरुष" हा शब्द कोणत्याही वयाचा पुरुषजातीचा मनुष्यप्राणी दर्शवतो. "स्त्री" हा शब्द कोणत्याही वयाचा स्त्रीजातीचा मनुष्यप्राणी दर्शवतो. "पुरुष" "स्त्री."

११. "व्यक्ति" "इसम" या शब्दामध्ये कोणत्याही कंपनीचा किंवा संघाचा अथवा व्यक्ति-निकायाचा—मग तो निगमित असो वा नसो—समावेश आहे. "व्यक्ति"/"इसम"

१२. "जनता" या शब्दात, कोणताही लोकवर्ग किंवा कोणताही जनसमाज याचा समावेश आहे. "जनता".

१३. ["क्वीन" याची व्याख्या.] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे निरसित.

[१][१४. "शासनाचा सेवक" हे शब्द शासनाने किंवा त्याच्या प्राधिकारान्वये सेवेत चालू ठेवलेला, नियुक्त केलेला किंवा कामावर लावलेला कोणताही अधिकारी किंवा सेवक दर्शवतात.] "शासनाचा सेवक".

१५. ["ब्रिटिश इंडिया" याची व्याख्या.] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे निरसित.

१६. ["भारत सरकार" याची व्याख्या.] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे निरसित.

[१][१७. "शासन" हा शब्द केंद्र शासन किंवा एखाद्या[२]*** राज्याचे शासन दर्शवतो.] "शासन".

[३][१८. "भारत" याचा अर्थ जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून भारताचे राज्यक्षेत्र असा आहे.] "भारत".

१९. "न्यायाधीश" हा शब्द, न्यायाधीश म्हणून अधिकृतपणे नामनियुक्त केलेली व्यक्तीच केवळ नव्हे तर, जी जी व्यक्ती दिवाणी अथवा फौजदारी अशा कोणत्याही वैध कार्यवाहीमध्ये निर्णायक न्याय-निर्णय किंवा ज्यावर अपील केले नाही तर जो निर्णायक होऊ शकेल असा न्यायनिर्णय किंवा दुसऱ्या एखाद्या प्राधिकाऱ्याने कायम केला तर जो निर्णायक होऊ शकेल असा न्यायनिर्णय देण्यास विधित: अधिकार प्राप्त झालेली व्यक्ती आहे अशी, किंवा "न्यायाधीश".

अशा न्यायनिर्णय देण्यास ज्या व्यक्तिनिकायाला विधित: अधिकार प्राप्त झालेला असेल त्या व्यक्ति-निकायापैकी एक आहे अशी

प्रत्येक व्यक्तीदेखील दर्शवतो.

## उदाहरणे

(क) १८५९ चा अधिनियम १० याखालील दाव्यामध्ये अधिकारिता वापरणारा जिल्हाधिकारी हा न्यायाधीश होय.

(ख) ज्या आरोपाबद्दल द्रव्यदंडाची किंवा कारावासाची शिक्षा–मग त्यावर अपील होत असो वा नसो देण्याचा अधिकार आपणांस आहे त्या आरोपाच्या संबंधात अधिकारिता वापरणारा दंडाधिकारी हा न्यायाधीश होय.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.

२. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग क" हे शब्द गाळले.

३. किता—कलम ३ व अनुसूची यांद्वारे हे कलम अनुकूलन आदेश, १९५० द्वारे समाविष्ट करण्यात आलेल्या, पूर्वीच्या कलमाऐवजी घातले. मूळ कलम १८ हे अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे निरसित केले होते.

(ग) मद्रास विधि संहितेतील १८१६ चा [१] विनियम ७ वा याखालील दाव्यांची संपरीक्षा व निर्णय करण्याचा अधिकार असलेला पंचायतीचा सदस्य हा न्यायाधीश होय.

(घ) ज्या आरोपाचे प्रकरण दुसऱ्या न्यायालयाकडे संपरीक्षार्थ पाठवण्याचाच केवळ अधिकार आपणांस आहे त्या आरोपाच्या संबंधात अधिकारिता वापरणारा अधिकारी हा न्यायाधीश नव्हे.

'न्यायालय'. २०. "न्यायालय" हा शब्द, केवळ एकट्याने न्यायिकत: काम करण्यास विधित: अधिकार प्राप्त झालेला न्यायाधीश किंवा निकाय म्हणून न्यायिकत: काम करण्यास विधित: अधिकार प्राप्त झालेल्या न्यायाधीशांचा निकाय जेव्हा न्यायिकत: काम करत असेल तेव्हा, असा न्यायाधीश किंवा न्यायधीशांचा निकाय दर्शवतो.

**उदाहरण**

मद्रास विधि संहितेतील १८१६ चा [१] विनियम ७ वा याखाली काम करणारी व दाव्यांची संपरीक्षा आणि निर्णय करण्याचा अधिकार असलेली पंचायत ही न्यायालय होय.

"लोक सेवक". २१. "लोक सेवक" हा शब्द, यात यापुढे दिलेल्यापैकी कोणत्याही वर्णनात मोडणारी व्यक्ती दर्शवतो, ते असे :—

[२]* * * *

दुसरे.—[३][भारताच्या] भूसेनेतील, [४][नौसेनेतील किंवा वायुसेनेतील] प्रत्येक राजादिष्ट अधिकारी;

[५][तिसरे.—प्रत्येक न्यायाधीश—एकट्याने किंवा एखाद्या व्यक्तिनिकायाची सदस्य म्हणून कोणतीही अभिनिर्णयाची कार्ये पार पाडण्यास विधित: अधिकार प्रदान झालेली कोणतीही व्यक्ती धरून ;]

चवथे.—न्यायालयाचा अधिकारी या नात्याने कोणत्याही विधिविषयक किंवा तथ्यविषयक बाबीचे अन्वेषण करणे किंवा तीवर अहवाल देणे, अथवा कोणताही दस्तऐवज तयार करणे, अधिप्रमाणित करणे किंवा जपून ठेवणे, अथवा कोणतीही मालमत्ता ताब्यात घेणे किंवा तिची विल्हेवाट लावणे, अथवा कोणत्याही न्यायिक आदेशिकेची अंमलबजावणी करणे, अथवा कोणतीही शपथ देवविणे, अथवा भाषांतर करून सांगणे, अथवा न्यायालयात सुव्यवस्था राखणे हे ज्याचे कर्तव्य असेल असा न्यायालयाचा प्रत्येक अधिकारी [६][(समापक, प्रापक किंवा आयोगी यांसुद्धा)], आणि न्यायालयाने अशी कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी खास प्राधिकृत केलेली प्रत्येक व्यक्ती;

पाचवे.—न्यायालयाला किंवा लोक सेवकाला साहाय्य करणारा प्रत्येक ज्यूरी-सदस्य, न्यायसहायक किंवा पंचायतीचा सदस्य ;

सहावा.—कोणत्याही न्यायालयाने किंवा अन्य कोणत्याही सक्षम लोक प्राधिकरणाने ज्याच्याकडे कोणताही कज्जा किंवा बाब निर्णयासाठी किंवा अहवालासाठी निर्देशित केलेली असेल असा प्रत्येक लवाद किंवा अन्य व्यक्ती ;

सातवे.—ज्या पदाच्या योगे कोणत्याही व्यक्तीस स्थानबद्ध करण्याचा किंवा स्थानबद्धतेत ठेवण्याचा अधिकार आपणांस प्राप्त होतो असे पद धारण करीत असेल ती प्रत्येक व्यक्ती ;

आठवे.—[७][शासनाचा] अधिकारी या नात्याने अपराधांना प्रतिबंध करणे, अपराधांची खबर देणे अपराध्यांना न्यायासनासमोर आणणे, अथवा सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता किंवा सोय यांचे रक्षण करणे हे ज्याचे कर्तव्य असेल तो [७][शासनाचा] प्रत्येक अधिकारी;

---

१. मद्रास दिवाणी न्यायालये अधिनियम, १८७३ (१८७३ चा ३) याद्वारे निरसित.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे पहिला खंड वगळला.

३. क्रमश: अनुकूलन आदेश, १९३७, अनुकूलन आदेश, १९४८ आणि अनुकूलन आदेश, १९५० यांद्वारे "भारत सरकारच्या किंवा कोणत्याही शासनाच्या सेवेत असलेला क्वीनच्या" हा मजकूर वरील-प्रमाणे विशोधित करण्यात आलेला आहे.

४. १९२७ चा अधिनियम १०-कलम २ व अनुसूची १ ली यांद्वारे "किंवा नौसेनेतील" या शब्दांऐवजी घातले.

५. १९६४ चा अधिनियम ४०-कलम २ द्वारे पूर्वीच्या खंडाऐवजी घातला.

६. किता-कलम २ द्वारे घातले.

७. अनुकूलन आदेश १९५० द्वारे 'क्राऊन' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे 'सरकार' याऐवजी 'क्राऊन' हा शब्दोल्लेख घातला होता.

नववे.—एक अधिकारी या नात्याने [1][शासनाच्या] वतीने कोणतीही मालमत्ता ताब्यात घेण, स्वीकारणे, ठेवणे किंवा खच करणे, अथवा [1][शासनाच्या] वतीने कोणतेही सर्वेक्षण, निर्धारण किंवा संविदा करणे, अथवा कोणत्याही महसूल-आदेशिकेची अंमलबजावणी करणे, अथवा [1][शासनाच्या] आर्थिक हितसंबंधावर परिणाम करणाऱ्या कोणत्याही बाबीचे अन्वेषण करणे किंवा तीवर अहवाल देणे, अथवा [1][शासनाच्या] आर्थिक हितसंबंधाशी संबंधित असा कोणताही दस्तऐवज तयार करणे, अधिप्रमाणित करणे किंवा जपून ठेवणे; अथवा [1][शासनाच्या] [2]* * * आर्थिक हितसंबंधाच्या रक्षणा-बाबतच्या कोणत्याही कायद्याच्या भंगास प्रतिबंध करणे हे ज्याचे कर्तव्य असेल असा प्रत्येक अधिकारी ;

दहावे.—एक अधिकारी या नात्याने कोणत्याही गावाच्या, नगराच्या किंवा जिल्ह्याच्या कोणत्याही धार्मिकेतर सामयिक प्रयोजनासाठी कोणतीही मालमत्ता घेणे, स्वीकारणे, ठेवणे किंवा खर्च करणे, कोणतेही सर्वेक्षण किंवा निर्धारण करणे, कोणतीही पट्टी किंवा कर वसूल करणे अथवा कोणत्याही गावातील, नगरातील किंवा जिल्ह्यातील लोकांचे हक्क विनिश्चित करण्यासाठी कोणताही दस्तऐवज तयार करणे, अधिप्रमाणित करणे किंवा जपून ठेवणे हे ज्याचे कर्तव्य असेल असा प्रत्येक अधिकारी ;

[5][अकरावे.—ज्या पदाच्या योगे मतदार-यादी तयार करण्याचा, प्रकाशित करण्याचा, राखण्याचा किंवा सुधारण्याचा अथवा निवडणुकीचे किंवा निवडणुकीच्या भागाचे चालन करण्याचा अधिकार आपणांस प्राप्त होतो असे पद धारण करीत असेल ती प्रत्येक व्यक्ती; ].

[3][बारावे.—(क्) शासनाच्या सेवेत असलेली किंवा त्याच्याकडून वेतन मिळणारी अथवा एखादे सार्वजनिक काम करण्याबद्दल शासनाकडून फीच्या किंवा कमिशनच्या रूपात पारिश्रमिक मिळणारी ;

(ख्) स्थानिक प्राधिकरणाच्या अथवा केंद्रीय, प्रांतिक किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली स्थापन केलेल्या महामंडळाच्या अथवा 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) याच्या कलम ६१७ मध्ये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेल्या शासकीय कंपनीच्या सेवेत असलेली किंवा त्यांच्याकडून वेतन मिळणारी,

प्रत्येक व्यक्ती.]

**उदाहरण**

नगरपालिका आयुक्त हा लोक सेवक होय.

**स्पष्टीकरण १.**—वरीलपैकी कोणत्याही वर्णनात मोडणाऱ्या व्यक्ती लोक सेवक असतात—मग त्या शासनाने नियुक्त केलेल्या असोत वा नसोत.

**स्पष्टीकरण २.**—"लोक सेवक" हा शब्द जेथे जेथे येतो तेथे तेथे तो, लोकसेवकाचे स्थान प्रत्यक्षात धारण करत असलेल्या प्रत्येक व्यक्तीला अनुलक्षून असल्याचे समजण्यात येईल—मग ते स्थान धारण करण्याच्या तिच्या हक्कात काहीही कायदेविषयक उणीव असो.

[5][**स्पष्टीकरण ३.**—"निवडणूक" हा शब्द ज्या प्राधिकरणाबाबत निवडीची पद्धत ही कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याखाली निवडणुकीच्या स्वरूपात विहित केलेली असते अशा कोणत्याही वैधानिक, नगरपालिकीय किंवा इतर लोक प्राधिकरणाच्या—मग त्याचे स्वरूप कोणतेही असो—सदस्यांची निवड करण्याच्या प्रयोजनार्थ घ्यावयाची निवडणूक दर्शवतो.

[4]* * * * *

२२. "जंगम मालमत्ता" या शब्दांमध्ये, जमीन आणि भू-संलग्न असलेल्या किंवा भू-संलग्न असेल अशा कोणत्याही वस्तूबरोबर कायमच्या जखडल्या गेलेल्या गोष्टी खेरीजकरून प्रत्येक वर्णनाच्या मूर्त मालमत्तेचा समावेश अभिप्रेत आहे. "जंगम मालमत्ता".

२३. "गैर लाभ" म्हणजे तो लाभ होणारी व्यक्ती जिला विधितः हक्कदार नाही अशा माल-मत्तेचा बेकायदेशीर साधनाद्वारे लाभ होय. "गैर लाभ".

"गैर हानी" म्हणजे हानी होणारी व्यक्ती जिला विधितः हक्कदार असेल अशा मालमत्तेची बेकायदेशीर साधनांद्वारे हानी होय. "गैर हानी".

जेव्हा एखादी व्यक्ती काहीतरी गैरपणे ठेवून घेते, त्याचप्रमाणे जेव्हा अशी व्यक्ती गैरपणे संपादन करते तेव्हा, अशी व्यक्ती गैरपणे लाभ मिळवते असे म्हटले जाते. "गैरपणे लाभ मिळवणे".

जेव्हा एखाद्या व्यक्तीला कोणत्याही मालमत्तेपासून गैरपणे दूर ठेवले जाते, त्याचप्रमाणे जेव्हा त्या व्यक्तीस मालमत्तेपासून गैरपणे वंचित केले जाते तेव्हा, अशी व्यक्ती गैरपणे हानी सोसते असे म्हटले जाते. "गैरपणे हानी सोसणे".

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'क्राऊन' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे 'शासन' या ऐवजी 'क्राऊन' हा शब्दोल्लेख घातला होता.

२. १९६४ चा अधिनियम ४०-कलम २ द्वारे विवक्षित शब्द गाळले.

३. कित्ता—४०-कलम २ द्वारे पूर्वीच्या खंडाऐवजी घातला.

४. कित्ता—४०-कलम २ द्वारे स्पष्टीकरण ४ गाळले.

५. १९२० चा अधिनियम ३९-कलम २ द्वारे घातले.

"अप्रामाणिकपणाने". २४. जो कोणी एखाद्या व्यक्तीस गैर लाभ व्हावा किंवा दुसऱ्या व्यक्तीची गैर हानी व्हावी या उद्देशाने जेव्हा कोणतीही गोष्ट करतो तेव्हा, तो ती गोष्ट "अप्रामाणिकपणाने" करतो असे म्हटले जाते.

"कपटीपणाने". २५. एखाद्या व्यक्तीने जर लुबाडण्याच्या उद्देशाने एखादी गोष्ट केली तर, तिने ती गोष्ट "कपटीपणाने" केली असे म्हटले जाते, परंतु एरव्ही नाही.

"समजण्यास कारण". २६. एखाद्या व्यक्तीस जर एखादी गोष्ट समजून चालण्यास पुरेसे कारण असेल तर, तिला तसे समण्यास कारण असल्याचे म्हटले जाते, पण एरव्ही नाही.

पत्नीच्या, कारकुनाच्या किंवा चाकराच्या कब्जातील मालमत्ता. २७. जेव्हा मालमत्ता एखाद्या व्यक्तीच्या कारणे त्या व्यक्तीच्या पत्नीच्या, कारकुनाच्या किंवा चाकराच्या कब्जात असते तेव्हा, या संहितेच्या अर्थानुसार ती त्या व्यक्तीच्या कब्जात असते.

स्पष्टीकरण.—तात्पुरती किंवा विशिष्ट प्रसंगी कारकून किंवा चाकर या नात्याने नोकरीस ठेवलेली व्यक्ती या कलमाच्या अर्थानुसार कारकून किंवा चाकर असते.

"नकलीकरण". २८. जर एखाद्या व्यक्तीने एक वस्तू दुसऱ्या वस्तूशी सदृश अशी केली आणि त्या सादृश्याच्या साहाय्याने फसवणूक करण्याचा तिचा उद्देश असेल किंवा त्यामुळे फसवणूक होणे संभवनीय असल्याची तिला जाणीव असेल तर, ती "नकलीकरण" करते असे म्हटले जाते.

[1][स्पष्टीकरण १:—नकलीकरणासाठी नक्कल तंतोतंत असणे अत्यावश्यक नाही.

स्पष्टीकरण २ :—जेव्हा एखादी व्यक्ती एक वस्तू दुसऱ्या वस्तूशी सदृश अशी करील आणि त्यामुळे एखाद्या व्यक्तीची फसगत होण्यासारखी असेल तेव्हा, विरुद्ध शाबीत होत नाही तोपर्यंत असे गृहीत धरले जाईल की, एक वस्तू याप्रमाणे दुसऱ्या वस्तूशी सदृश अशी करणाऱ्या व्यक्तीचा त्या सादृश्याच्या साहाय्याने फसगत करण्याचा उद्देश होता किंवा त्यामुळे फसगत होणे संभवनीय असल्याची तिला जाणीव होती.]

"दस्तऐवज." २९. "दस्तऐवज" हा शब्द, कोणत्याही बाबीचा पुरावा म्हणून अक्षरे, आकडे/आकृत्या किंवा चिन्हे असे जे साधन वापरण्याचे उद्देशित असेल किंवा वापरता येईल त्या साधनाने किंवा अशा एकाहून अधिक साधनांनी कोणत्याही पदार्थावर व्यक्त केलेली किंवा रेखलेली किंवा अभिलिखित केलेली ती बाब दर्शवतो.

स्पष्टीकरण १ :—अक्षरे, आकडे/आकृत्या किंवा चिन्हे कोणत्या साधनाद्वारे किंवा कोणत्या पदार्थावर काढली आहेत अथवा तो पुरावा न्यायालयात वापरण्याचा उद्देश आहे किंवा तेथे वापरता येईल की नाही हे बिनमहत्त्वाचे आहे.

### उदाहरणे

संविदेच्या अटी व्यक्त करणारा जो लेख त्या संविदेचा पुरावा म्हणून वापरता येईल तो दस्तऐवज होय.

बँकरवरील धनादेश हा दस्तऐवज होय.

मुखत्यारनामा हा दस्तऐवज होय.

पुरावा म्हणून जो वापरण्याचा उद्देश आहे किंवा जो वापरता येईल तो नकाशा किंवा तो आराखडा दस्तऐवज होय.

निदेश किंवा अनुदेश अंतर्भूत असलेला लेख हा दस्तऐवज होय.

स्पष्टीकरण २ :—वाणिज्यिक किंवा अन्य परिपाठाअन्वये ज्यांचे स्पष्टीकरण केले जाते अशी अक्षरे, आकडे/आकृत्या किंवा चिन्हे यांद्वारे जे काही व्यक्त केलेले असेल ते जरी प्रत्यक्षपणे तसे व्यक्त केलेले नसले तरी, अशी अक्षरे, आकडे/आकृत्या किंवा चिन्हे यांद्वारे ते या कलमाच्या अर्थानुसार व्यक्त केले असल्याचे मानले जाईल.

### उदाहरण

'क' आपल्या आदिष्टास प्रदेय असलेल्या विनिमयपत्राच्या मागे आपले नाव लिहितो. व्यापारी परिपाठाअन्वये स्पष्ट केल्यानुसार पृष्ठांकनाचा अर्थ असा आहे की, त्या विपत्राची रक्कम धारकास द्यावयाची आहे. पृष्ठांकन हा दस्तऐवज आहे व "धारकास द्यावेत" हे शब्द किंवा त्या आशयाचे शब्द जणू काही स्वाक्षरीच्यावर लिहिलेले असावेत असे समजून त्याच रीतीने त्याचा अर्थ लावला पाहिजे.

"मूल्यवान् रोखा". ३०. "मूल्यवान् रोखा" या शब्दांद्वारे, जो दस्तऐवज म्हणजे ज्याद्वारे कोणत्याही वैध हक्काची निर्मिती, विस्तारण, हस्तांतरण, निर्बंधन, विलोपन किंवा परिमोचन केले जाते अथवा आपण वैध दायित्वाला अधीन आहोत किंवा आपणांस विवक्षित वैध हक्क नाही असे कोणीही व्यक्ती अभिस्वीकृत करते असा दस्तऐवज आहे किंवा तसा असल्याचे दिसते तो दस्तऐवज दर्शवला जातो.

---

१. १८८९ चा अधिनियम १-कलम ९ द्वारे मूळ स्पष्टीकरणाऐवजी घातले.

**उदाहरण**

'क' विनिमयपत्राच्या मागे आपले नाव लिहितो. जी व्यक्ती त्या विपत्राची कायदेशीर धारक होईल अशा कोणत्याही व्यक्तीला त्यावरील हक्क हस्तांतरित होणे हा या पृष्ठांकनाचा परिणाम असल्यामुळे ते पृष्ठांकन म्हणजे "मूल्यवान् रोखा" होय.

३१. "मृत्युपत्र" हा शब्द कोणताही मृत्युपत्रीय दस्तऐवज दर्शवतो. "मृत्युपत्र".

३२. या संहितेच्या प्रत्येक भागामध्ये, संदर्भावरून विरुद्ध उद्देश दिसून येत असल्यास ते खेरीजकरून एरव्ही, केलेल्या कृतींचा निर्देश करणाऱ्या शब्दांच्या व्याप्तीत अवैध अकृतीदेखील येतात. कृतींचा निर्देश करणाऱ्या शब्दांमध्ये अवैध अकृतींचा समावेश आहे.

३३. "कृति" हा शब्द एक कृती व त्याचप्रमाणे कृतींची मालिकादेखील दर्शवतो; "अकृति" हा शब्द एक अकृती व त्याचप्रमाणे अकृतींची मालिकादेखील दर्शवतो. "कृति". "अकृति".

[1][३४. जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्तींनी, त्या सर्वांच्या समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ गुन्हेगारी कृती केलेली असते तेव्हा, अशापैकी प्रत्येक व्यक्ती जणू काही ती कृती तिने एकटीनेच केलेली असावी त्याप्रमाणे त्याच रीतीने त्याबद्दल दायी होते.] दोन किंवा अधिक व्यक्तींनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ केलेल्या कृती.

३५. जी कृती गुन्हेगारी जाणीव किंवा उद्देश असताना ती करण्यात आली एवढ्याच कारणाने गुन्हेगारी स्वरूपाची असते ती जेव्हा केव्हा दोन किंवा अधिक व्यक्तींनी केलेली असते तेव्हा, अशा व्यक्तींपैकी जो अशी जाणीव किंवा उद्देश असताना त्या कृतीत सामील होतो तो प्रत्येकजण जणू काही ती जाणीव किंवा उद्देश असताना त्याने एकटयाने ती कृती केलेली असावी त्याप्रमाणे त्याच रीतीने दायी होतो. जेव्हा अशी कृती गुन्हेगारी जाणीव किंवा उद्देश असताना करण्यात आल्याच्या कारणाने गुन्हेगारी स्वरूपाची असते तेव्हा.

३६. जेथे जेथे कृतीद्वारे किंवा अकृतीद्वारे विवक्षित परिणाम घडवून आणणे किंवा तो परिणाम घडवून आणण्याचा प्रयत्न करणे हा अपराध असतो तेथे तेथे, अंशतः कृतीद्वारे व अंशतः अकृतीद्वारे परिणाम घडवून आणणे हा तोच अपराध असतो असे समजावयाचे असते. अंशतः कृतीद्वारे आणि अंशतः अकृतीद्वारे घडवून आणलेला परिणाम.

**उदाहरण**

'क' हा अंशतः 'य' ला अन्न देण्याचे अवैधपणे टाळून व अंशतः 'य' ला मारहाण करून, उद्देशपूर्वक 'य' चा मृत्यू घडवून आणतो. 'क' ने खून केलेला आहे.

३७. जेव्हा एखादा अपराध निरनिराळ्या कृती करून केला जातो तेव्हा, जो कोणीही एकटाच किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर संयुक्तपणे त्यांपैकी कोणतीही एक कृती करून तो अपराध करण्यास उद्देशपूर्वक सहकार्य देतो त्याने तो अपराध केला असे होते. अपराधाला घटकभूत असलेल्या निरनिराळ्या कृतींपैकी एक कृती करून सहकार्य.

**उदाहरण**

(क) 'क' आणि 'ख' हे त्यांच्यापैकी प्रत्येकाने स्वतंत्रपणे व निरनिराळ्या वेळीं 'य' ला विषाचे लहान लहान मितभाग देऊन त्याचा खून करावा असे मिळून ठरवतात. 'क' व 'ख' हे 'य' चा खून करण्याच्या उद्देशाने ठरल्यानुसार विष देतात. 'य' हा त्याला याप्रमाणे देण्यात आलेल्या विषाच्या अनेक मितभागांच्या परिणामामुळे मरण पावतो. याबाबतीत 'क' व 'ख' खून करण्याच्या कामी उद्देशपूर्वक सहकार्य करतात व त्यांच्यापैकी प्रत्येकजण जिच्यामुळे मृत्यू घडून येतो अशी कृती करतो, म्हणून ते दोघेही, जरी त्यांच्या कृती वेगवेगळ्या असल्या तरी, त्या अपराधाबद्दल दोषी आहेत.

(ख) 'क' व 'ख' संयुक्त तुरुंगाधिकारी आहेत व त्या नात्याने त्यांच्याकडे आलटून पालटून 'य' या कैद्याचा एका वेळेस सहासहा तासांसाठी ताबा असतो. 'य' चा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने 'क' व 'ख' हे 'य' ला देण्यासाठी म्हणून त्यांना पुरवठा केलेले अन्न, आपापल्या देखरेखीच्या वेळात त्याला देण्याचे अवैधपणे टाळून, तो परिणाम घडवून आणण्याच्या कामी जाणूनबुजून सहकार्य करतात. 'य' भुकेपायी मरण पावतो. 'क' व 'ख' दोघेही 'य' च्या खुनाबद्दल दोषी आहेत.

---

१ १८७० चा अधिनियम २७-कलम १ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.

(ग) 'क' या तुरुंगाधिकाऱ्याकडे 'य' या कैद्याचा ताबा आहे. 'क' हा 'य'चा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने 'य'ला अन्न पुरवण्याचे अवधपणे टाळतो ; त्याचा परिणाम म्हणून 'य'ची शक्ती बरीच क्षीण होते, पण ती उपासमार त्याचा मृत्यू घडवून आणण्यास पुरेशी नाही. 'क'ला त्याच्या पदावरून काढून टाकण्यात येते आणि 'ख' त्याचा उत्तराधिकारी होतो. 'क'शी संगनमत किंवा सहकार्य न करता, आणि 'य'ला अन्न देण्याचे अवैधपणे टाळण्याने आपण त्याच्या मृत्यूला कारण होण्याचा संभव आहे ही जाणीव असताना 'ख' तसे करतो. 'य' भुकेपायी मरण पावतो. 'ख' खुनाबद्दल दोषी आहे, पण 'क'ने 'ख'शी सहकार्य केलेले नसल्याने 'क' केवळ खून करण्याच्या प्रयत्नाबद्दल दोषी आहे.

**गुन्हेगारी कृतीत निबद्ध असलेल्या व्यक्ती निरनिराळ्या अपराधांबद्दल दोषी असू शकतील.**

३८. जेथे निरनिराळ्या व्यक्ती एखादी गुन्हेगारी कृती करण्यात सहभागी किंवा निबद्ध असतील तेथे, त्या कृतीमुळे त्या निरनिराळ्या अपराधांबद्दल दोषी होऊ शकतील.

**उदाहरण**

'क' हा 'य'वर अशा गंभीर प्रक्षोभक परिस्थितीत हल्ला करतो की, त्याने 'य'ला ठार मारणे म्हणजे 'खून' या सदरात न मोडणारा केवळ सदोष मनुष्यवध ठरू शकेल. 'ख' हा 'य'-बद्दल द्वेषभाव असताना व त्याला मारण्याच्या उद्देशाने आणि त्याच्या बाबतीत प्रक्षोभकारण नसताना 'य'ला ठार मारण्यास 'क'ला साहाय्य करतो. याबाबतीत 'क' व 'ख' दोघेही 'य'चा मृत्यू घडवून आणण्याच्या कामात सहभागी असले तरी, 'ख' खुनाबद्दल दोषी आहे व 'क' केवळ सदोष मनुष्य-वधाबद्दलच दोषी आहे.

**"इच्छापूर्वक".**

३९. एखादी व्यक्ती ज्याद्वारे एखादा परिणाम घडवून आणण्याचा तिचा उद्देश होता त्या साधनाद्वारे अथवा ज्यामुळे तो परिणाम घडून येण्याचा संभव आहे अशी तिला त्याचा वापर करण्याच्या वेळी जाणीव होती किंवा तसे समजण्यास कारण होते त्या साधनाद्वारे तो घडवून आणते तेव्हा, तो परिणाम तिने इच्छापूर्वक घडवून आणला असे म्हटले जाते.

**उदाहरण**

'क' एका मोठ्या नगरातील वस्ती असलेल्या घरास रात्रौ जबरी चोरीचे काम सुकर करण्यासाठी आग लावतो व अशा प्रकारे एका व्यक्तीचा मृत्यू घडवून आणतो. याबाबतीत मृत्यू घडवून आणावा असा 'क'चा उद्देश नसेल आणि आपल्या कृतीमुळे मृत्यू घडून आल्याबद्दल त्याला खेदही होईल : तथापि, जर आपण मृत्यूस कारणीभूत होण्याचा संभव होता याची त्यास जाणीव असेल तर, त्याने तो मृत्यू इच्छापूर्वक घडवून आणला असे होते.

**"अपराध".**

[१][४०. या कलमाच्या खंड २ व ३ यांखाली नमूद केलेली [२][प्रकरणे] व कलमे खेरीजकरून अन्यत्र "अपराध" हा शब्द या संहितेद्वारे शिक्षापात्र केलेली गोष्ट दर्शवतो.

प्रकरण ४ थे, [३][प्रकरण ५ वे-क] यांमध्ये आणि पुढील कलमांमध्ये म्हणजेच, कलमे [४][६४, ६५, ६६, [५][६७], ७१], १०९, ११०, ११२, ११४, ११५, ११६, ११७, १८७, १९४, १९५, २०३, २११, २१३, २१४, २२१, २२२, २२३, २२४, २२५, ३२७, ३२८, ३२९, ३३०, ३३१, ३४७, ३४८, ३८८, ३८९ व ४४५ यांमध्ये "अपराध" हा शब्द या संहितेखाली किंवा यात यापुढे केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेल्या कोणत्याही विशेष किंवा स्थानिक कायद्याखाली शिक्षापात्र असलेली गोष्ट दर्शवतो.

आणि कलमे १४१, १७६, १७७, २०१, २०२, २१२, २१६ आणि ४४१ यांमध्ये विशेष किंवा स्थानिक कायद्याखाली शिक्षापात्र असलेली गोष्ट अशा कायद्याखाली सहा महिने किंवा त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस—मग ती द्रव्यदंडासह असो वा त्याविना असो—पात्र असते तेव्हा "अपराध" या शब्दाला तोच अर्थ असतो.]

**"विशेष कायदा".**

४१. "विशेष कायदा" म्हणजे विशिष्ट विषयाला लागू असलेला कायदा होय.

---

१. १८७० चा अधिनियम २७-कलम २ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.
२. १९३० चा अधिनियम ८-कलम २ व अनुसूची १ ली यांद्वारे 'प्रकरण' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.
३. १९१३ चा अधिनियम ८-कलम २ द्वारे घातले.
४. १८८२ चा अधिनियम ८-कलम १ द्वारे घातले.
५. १८८६ चा अधिनियम १०-कलम २(१) द्वारे घातले.

४२. "स्थानिक कायदा" म्हणजे [1][ [2][भारतातील] [3] * * * ] केवळ विशिष्ट भागालाच लागू असलेला कायदा होय. "स्थानिक कायदा".

४३. "अवैध" हा शब्द, जी गोष्ट अपराध असेल किंवा जी कायद्याद्वारे मना करण्यात आली असेल, किंवा जी दिवाणी कारवाईचे आधारकारण होत असेल अशा प्रत्येक गोष्टीला लागू आहे ; आणि एखादी व्यक्ती तिने जी कोणतीही गोष्ट न करणे हे अवैध असते ती गोष्ट "करण्यास विधितः बद्ध" आहे असे म्हटले जाते. "अवैध". "करण्यास विधितः बद्ध असणे".

४४. "क्षति" हा शब्द कोणत्याही व्यक्तीला तिचे शरीर, मन, लौकिक किंवा मालमत्ता यांच्या बाबतीत अवैधपणे घडवून आणलेला कोणताही अपाय दर्शवितो. "क्षति".

४५. संदर्भावरून विरुद्ध काही दिसत नसेल तर, "जीवित" हा शब्द मनुष्यप्राण्याचे जीवित दर्शवितो. "जीवित".

४६. संदर्भावरून विरुद्ध काही दिसून येत नसेल तर, "मृत्यु" हा शब्द मनुष्यप्राण्याचा मृत्यु दर्शवितो. "मृत्यु".

४७. "प्राणी" हा शब्द मनुष्यप्राण्याहून अन्य कोणताही सजीव प्राणी दर्शवितो. "प्राणी".

४८. "जलयान" हा शब्द मनुष्यप्राणी किंवा मालमत्ता जलमार्गाने वाहून नेण्यासाठी तयार केलेली कोणतीही वस्तू दर्शवितो. "जलयान".

४९. "वर्ष" हा शब्द किंवा "महिना" हा शब्द जेथे जेथे वापरलेला असेल तेथे तेथे, वर्षाची किंवा महिन्याची गणना ब्रिटिश कालगणनेप्रमाणे करावयाची असते असे समजण्यात यावे. "वर्ष". "महिना"

५०. "कलम" हा शब्द, या संहितेच्या प्रकरणाचे जे भाग त्यामागे जोडलेल्या संख्यादर्शक आकड्यांद्वारे वेगवेगळे दाखवले असतील त्यांपैकी एक भाग दर्शवितो. "कलम".

५१. "शपथ" या शब्दात विधितः शपथेएवजी योजलेले गांभीर्यपूर्वक दृढकथन व लोकसेवकासमोर करावयाचे किंवा शाबितीसाठी उपयोगात आणावयाचे म्हणून—मग ते न्यायालयात असो वा नसो—विधितः आवश्यक किंवा प्राधिकृत केलेले कोणतेही अधिकथन यांचा समावेश आहे. "शपथ".

५२. एखादी गोष्ट जेव्हा प्रामाणिकपणाने आणि यथायोग्य काळजी घेऊन व अवधान ठेवून केली जाते किंवा समजली जाते ती "सद्भावपूर्वक" केली आहे किंवा समजली गेली आहे असे म्हटले जाते. "सद्भाव".

[4][५२क. "आसरा देणे" याचा अर्थ एखाद्या व्यक्तीला आश्रय देणे असा आहे, आणि त्यात गिरफदारी चुकवण्यासाठी एखाद्या व्यक्तीला अन्नपाणी, पैसा, कपडे, शस्त्रे, दारूगोळा किंवा ने-आण करण्याची साधने पुरवणे किंवा एखाद्या व्यक्तीला कोणत्याही रीतीने साहाय्य करणे यांचा समावेश आहे.] आसरा देणे".

## प्रकरण ३ रे

## शिक्षांविषयी

५३. अपराधी या संहितेच्या उपबंधांखाली ज्या शिक्षांना पात्र आहेत त्या अशा :— शिक्षा.

पहिली—मृत्यु;

[5][दुसरी—आजीव कारावास; ]

[6]* * *

चवथी—कारावास हा दोन प्रकारचा असतो:—

(१) सश्रम म्हणजे सक्तमजुरीचा;

(२) साधा;

पाचवी—मालमत्तेचे समपहरण;

सहावी—द्रव्यदंड.

---

१. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे "ब्रिटिश इंडियाच्या" याऐवजी घातले.

२. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'राज्ये' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांत' याऐवजी 'राज्ये' असा शब्दोल्लेख घातला होता.

३. १९५२ चा अधिनियम ४८-कलम ३ व अनुसूची २ री यांद्वारे "समाविष्ट राज्यक्षेत्रांच्या" हा मजकूर गाळला.

४ १९४२ चा अधिनियम ८-कलम २ द्वारे घातले.

५. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे "**दुसरी—काळे पाणी**" याऐवजी घातले (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

६. १९४९ चा अधिनियम १७-कलम २ द्वारे खंड तिसरा गाळला (६ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

"काळे पाणी" या निर्देशाचा अर्थ लावणे.

[1][५३ क. (१) पोटकलम (२) व पोटकलम (३) यांच्या उपबंधांच्या अधीनतेने, त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यातील अथवा अशा कोणत्याही कायद्याच्या किंवा कोणत्याही निरसित अधिनियमितीच्या आधारे परिणामक असलेल्या कोणत्याही संलेखातील किंवा आदेशातील "जन्मठेप काळे पाणी" या निर्देशाचा अर्थ "आजीव कारावास" असा लावला जाईल.

(२) एखाद्या मुदतीच्या काळ्या पाण्याचा शिक्षादेश 'फौजदारी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, [2][१९५५]' (१९५५ चा २६) याच्या प्रारंभापूर्वी देण्यात आला असेल अशा प्रत्येक प्रकरणी, अपराध्याला जणू काही तितक्याच मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा देण्यात आली असावी असे समजून त्याप्रमाणे त्याच रीतीने त्याच्याबाबत कार्यवाही केली जाईल.

(३) त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यातील एखाद्या मुदतीची काळ्या पाण्याची शिक्षा अथवा त्याहून कमी अशा कोणत्याही मुदतीची काळ्या पाण्याची शिक्षा (मग ती कोणत्याही नावाने संबोधलेली असो) याचा कोणताही निर्देश गाळण्यात आला असल्याचे मानले जाईल.

(४) त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यातील "काळे पाणी"—

(क) या शब्दप्रयोगाचा अर्थ जर जन्मठेप काळे पाणी असा असेल तर, अशा कोणत्याही निर्देशाचा अर्थ आजीव कारावासाचा निर्देश म्हणून लावला जाईल;

(ख) या शब्दप्रयोगाचा अर्थ जर त्याहून कमी अशा कोणत्याही मुदतीची काळ्या पाण्याची शिक्षा असा असेल तर, असा कोणताही निर्देश गाळण्यात आला असल्याचे मानले जाईल.]

मृत्यूची शिक्षा परिवर्तित करून सौम्य करणे.

**५४.** मृत्यूचा शिक्षादेश देण्यात येईल त्या प्रत्येक प्रकरणी, [3][समुचित शासन] अपराध्याच्या संमतीवाचून ती शिक्षा या संहितेद्वारे उपबंधित केलेल्या अन्य कोणत्याही शिक्षेत परिवर्तित करून सौम्य करू शकेल.

आजीव कारावासाची शिक्षा परिवर्तित करून सौम्य करणे.

**५५.** [4][आजीव कारावासाचा] शिक्षादेश देण्यात येईल त्या प्रत्येक प्रकरणी, [5][समुचित शासन] अपराध्याच्या संमतीवाचून ती शिक्षा जास्तीत जास्त चौदा वर्षांइतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेमध्ये परिवर्तित करून सौम्य करू शकेल.

"समुचित शासन" याची व्याख्या.

[6][५५क. चौपन्नाव्या व पंचावन्नाव्या कलमांमध्ये "समुचित शासन" याचा अर्थ, पुढीलप्रमाणे आहे :—

(क) जेथे शिक्षादेश हा मृत्यूचा शिक्षादेश असेल किंवा संघराज्याच्या शासनशक्तीच्या व्याप्तीत येणाऱ्या बाबींसंबंधीच्या कोणत्याही कायद्याविरुद्ध घडलेल्या अपराधाबद्दल असेल त्या प्रकरणीं, केंद्र शासन; आणि

(ख) जेथे शिक्षादेश हा (मग तो मृत्यूचा असो वा नसो) राज्याच्या शासनशक्तीच्या व्याप्तीत येणाऱ्या बाबींसंबंधीच्या कोणत्याही कायद्याविरुद्ध घडलेल्या अपराधाबद्दल असेल त्या प्रकरणीं, ज्या राज्यामध्ये अपराध्यास शिक्षा ठोठावण्यात आली असेल त्या राज्याचे शासन.]

**५६.** [युरोपियनांना व अमेरिकनांना दिलेली सक्तमजुरीची शिक्षा दहा वर्षांहून अधिक पण आजीव नव्हे अशा शिक्षेबाबत परंतुक.] 'फौजदारी विधि (वांशिक भेदभाव उच्चाटन) अधिनियम, १९४९' (१९४९ चा १७) याद्वारे निरसित (६ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

शिक्षेच्या मुदतींचे अंश.

**५७.** शिक्षेच्या मुदतींचे अंश परिगणना करून ठरवताना, आजीव [4][कारावास] हा वीस वर्षांच्या [4][कारावासाशी] तुल्य म्हणून मानला जाईल.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे घातले (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १९५७ चा अधिनियम ३६-कलम ३ व अनुसूची २ री यांद्वारे "१९५४" याऐवजी घातले.

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "केंद्र शासन किंवा अपराध्याला ज्यामध्ये शिक्षा देण्यात आलेली असेल त्या प्रांताचे प्रांतिक शासन" याऐवजी घातले. हा दुहेरी अवतरण चिन्हांत दिलेला मजकूर अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "भारत सरकार किंवा अपराध्याला ज्यामध्ये शिक्षा देण्यात आलेली असेल त्या ठिकाणचे शासन" याऐवजी घातला.

४. १९५५चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

५. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "अपराध्याला ज्यामध्ये शिक्षा देण्यात आलेली असेल त्या प्रांताच्या प्रांतिक शासनाला" याऐवजी घातले. हा दुहेरी अवतरणचिन्हांत दिलेला मजकूर अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "भारत सरकारला किंवा अपराध्याला ज्यामध्ये शिक्षा देण्यात आलेली असेल त्या ठिकाणच्या शासनाला" याऐवजी घालण्यात आला होता.

६. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे घातलेल्या कलम ५५ क ऐवजी हे कलम अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल करण्यात आले.

५८. [काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या अपराध्यांना काळ्या पाण्यावर पाठवले जाईपर्यंत कसे वागवावयाचे.] 'फौजदारी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९५५' (१९५५ चा २६)-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे निरसित (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

५९. [कारावासाऐवजी काळ्या पाण्याची शिक्षा.]

किता—कलम. ११७ व अनुसूची यांद्वारे निरसित (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून.)

शिक्षा (कारावासाच्या विवक्षित प्रकरणांमध्ये) संपूर्णतः किंवा अंशतः सश्रम किंवा साधी असू शकेल.

६०. अपराधी कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेला पात्र असेल अशा प्रत्येक प्रकरणात, अशा अपराध्याला शिक्षा देणाऱ्या न्यायालयाने शिक्षादेशात, असा कारावास संपूर्णतः सश्रम असावा अथवा असा कारावास संपूर्णतः साधा असावा अथवा अशा कारावासाचा एखादा भाग सश्रम व बाकीचा साधा असावा असे निदेशित करणे विधिमान्य असेल.

६१. [मालमत्तेच्या समपहरणाचा शिक्षादेश.] 'भारतीय दंड संहिता (विशोधन) अधिनियम, १९२१' (१९२१ चा १६)-कलम ४ द्वारे निरसित.

६२. [मृत्यूची, काळ्या पाण्याची किंवा कारावासाची शिक्षा यांस पात्र असलेल्या अपराध्यांबाबत मालमत्तेचे समपहरण.] किता—कलम ४ द्वारे निरसित.

द्रव्यदंडाची रक्कम.

६३. द्रव्यदंड किती रकमेपर्यंत असावा ती मर्यादा व्यक्त केलेली नसेल तेथे, अपराधी ज्यास पात्र होतो त्या द्रव्यदंडाच्या रकमेवर मर्यादा असणार नाही, पण ती रक्कम बेसुमार असणार नाही.

द्रव्यदंड न भरण्याबद्दल कारावासाची शिक्षा.

६४. [1][कारावास व त्याचप्रमाणे द्रव्यदंड या शिक्षांस पात्र असलेल्या अपराधाबद्दल अपराध्याला ज्यामध्ये द्रव्यदंडाची–मग तो कारावासासहित असो वा त्याविना असो–शिक्षा झाली असेल अशा प्रत्येक प्रकरणी,

आणि [2][कारावास किंवा द्रव्यदंड किंवा] फक्त द्रव्यदंड या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल अपराध्याला ज्यामध्ये द्रव्यदंडाची शिक्षा झाली असेल अशा प्रत्येक प्रकरणी,]

अशा अपराध्यास शिक्षा देणाऱ्या न्यायालयाने शिक्षादेशात असे निदेशित करणे विधिमान्य असेल की, द्रव्यदंडाचा भरणा करण्यात कसूर झाल्यास, अपराध्याला कारागृहात टाकण्यात यावे आणि हा कारावास, त्याला जी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे अथवा शिक्षा-परिवर्तनामुळे तो ज्याला पात्र होऊ शकेल अशा इतर कोणत्याही कारावासापेक्षा अधिक असेल.

कारावास आणि द्रव्यदंड ही शिक्षा देता येण्यासारखी असेल तेव्हा, द्रव्यदंड न भरण्याबद्दलच्या कारावासाची मर्यादा.

६५. अपराध हा कारावासाच्या व त्याचप्रमाणे द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल तर, न्यायालय द्रव्यदंडाचा भरणा करण्यात कसूर केल्याबद्दल अपराध्याला जितक्या मुदतीसाठी कारागृहात टाकण्याचा निदेश देईल ती मुदत अपराधासाठी निश्चित केलेल्या कमाल मुदतीच्या कारावासाच्या एक-चतुर्थांशापेक्षा अधिक असणार नाही.

द्रव्यदंड न भरण्याबद्दल कोणत्या वर्णनाच्या कारावासाची शिक्षा.

६६. द्रव्यदंडाचा भरणा करण्यात कसूर केल्याबद्दल न्यायालय जो कारावास देईल तो कारावास अपराध्याला अपराधाबद्दल ज्या प्रकारचा कारावास दिला जाऊ शकला असता अशा कोणत्याही वर्णनाचा असू शकेल.

अपराध फक्त द्रव्यदंडास पात्र असेल तेव्हा, द्रव्यदंड न भरण्याबद्दल कारावास.

६७. अपराध फक्त द्रव्यदंडासच पात्र असेल तर, [3][न्यायालय द्रव्यदंडाचा भरणा करण्यात कसूर केल्याबद्दल जो कारावास देईल तो साधा असेल, आणि] न्यायालय द्रव्यदंडाचा भरणा करण्यात कसूर झाल्यास अपराध्याला जितक्या मुदतीसाठी कारागृहात ठेवण्याचा निदेश देईल ती मुदत पुढील प्रमाणापेक्षा अधिक असणार नाही,–म्हणजेच, द्रव्यदंडाची रक्कम पन्नास रुपयांपेक्षा अधिक नसेल तेव्हा तो कारावास जास्तीत जास्त दोन महिन्यांपर्यंत कितीही मुदतीचा असेल आणि रक्कम शंभर रुपयांपेक्षा अधिक नसेल तेव्हा तो कारावास जास्तीत जास्त चार महिन्यांपर्यंत कितीही मुदतीचा असेल आणि इतर कोणत्याही प्रकरणी, जास्तीत जास्त सहा महिन्यांपर्यंत कितीही मुदतीचा असेल.

---

१. १८८२ चा अधिनियम ८-कलम २ द्वारे "अपराध्याला द्रव्यदंडाची शिक्षा झाली असेल अशा प्रत्येक प्रकरणी" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

२. १८८६ चा अधिनियम १०-कलम २१ (२) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. १८८२ चा अधिनियम ८-कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

द्रव्यदंडाचा भरणा होताच कारावास समाप्त होणे.

६८. द्रव्यदंडाचा भरणा करण्यातील कसुरीबद्दल देण्यात आलेला कारावास हा, जेव्हा केव्हा द्रव्यदंड भरण्यात येईल किंवा विधिप्रक्रियेनुसार वसूल करण्यात येईल तेव्हा समाप्त होईल.

द्रव्यदंडाचा प्रमाणशीर हिस्सा भरण्यात आल्यावर कारावासाची समाप्ती.

६९. द्रव्यदंडाचा भरणा करण्यातील कसुरीबद्दल ठोठावण्यात आलेल्या कारावासाची मुदत संपण्यापूर्वी जर, द्रव्यदंडाचा काही हिस्सा भरण्यात किंवा वसूल करण्यात आला व भरणा करण्यातील कसुरीबद्दलच्या कारावासापैकी जितक्या मुदतीचा कारावास भोगण्यात आला तितकी मुदत ही द्रव्यदंडापैकी न भरलेल्या हिश्श्याशी प्रमाणशीर असलेल्या मर्यादेपेक्षा कमी नसेल तर, कारावास समाप्त होईल.

उदाहरण

'क' याला शंभर रुपये द्रव्यदंड व तो न भरल्यास चार महिन्यांच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. या प्रकरणी, कारावासाचा एक महिना संपण्यापूर्वी जर पंचाहत्तर रुपये द्रव्यदंड भरण्यात किंवा वसूल करण्यात आला तर, पहिला महिना संपला की लगेच 'क' ला मुक्त करण्यात येईल. जर पहिला महिना संपण्याच्या वेळी किंवा 'क' कारावासात असेपर्यंतच्या काळात नंतर कोणत्याही वेळी पंचाहत्तर रुपये भरण्यात किंवा वसूल करण्यात आले तर, 'क' ला तत्काळ मुक्त करण्यात येईल. कारावासाचे दोन महिने संपण्यापूर्वी द्रव्यदंडापैकी पन्नास रुपये भरण्यात किंवा वसूल करण्यात आले तर, दोन महिने पूर्ण झाले की लगेच 'क' ला मुक्त करण्यात येईल. जर दोन महिने संपण्याच्या वेळी किंवा 'क' कारावासात असेपर्यंतच्या काळात नंतर कोणत्याही वेळी पन्नास रुपये भरण्यात किंवा वसूल करण्यात आले तर, 'क' ला तत्काळ मुक्त करण्यात येईल.

सहा वर्षांच्या आत किंवा कारागृहात असताना द्रव्यदंड वसुलीयोग्य. मृत्यूमुळे मालमत्ता दायित्वातून मुक्त होत नाही.

७०. भरणा व्हावयाचा राहिलेला द्रव्यदंड किंवा त्याचा कोणताही भाग हा, शिक्षादेश देण्यात आल्यापासून सहा वर्षांच्या आत कोणत्याही वेळी किंवा शिक्षादेशानुसार अपराधी सहा वर्षांपेक्षा दीर्घ कालावधीच्या कारावासास पात्र असेल तर तो कालावधी समाप्त होण्यापूर्वी कोणत्याही वेळी वसूल करता येईल; आणि अपराध्याच्या मृत्यूनंतर जी कोणती मालमत्ता त्याच्या ऋणांबद्दल विधितः दायी होऊ शकेल ती त्याच्या मृत्यूमुळे या दायित्वातून मुक्त होत नाही.

अनेक अपराध मिळून बनलेल्या अपराधाबद्दलच्या शिक्षेची मर्यादा.

७१. अपराध असलेली कोणतीही गोष्ट अनेक भागांनी बनलेली असून, त्यांपैकी कोणताही भाग हा स्वयमेव अपराध असेल त्या बाबतीत, अपराध्याला त्याच्या अशा अपराधांपैकी एकापेक्षा अधिक अपराधांबद्दलची शिक्षा देण्यात येणार नाही—मात्र तसे स्पष्टपणे उपबंधित केले असेल तर गोष्ट अलाहिदा.

[1][त्या त्या वेळी अंमलात असलेल्या ज्या कोणत्याही कायद्याद्वारे अपराधांची व्याख्या दिलेली असेल किंवा त्यांबद्दल शिक्षा देण्यात येत असेल त्या कायद्याच्या दोन किंवा अधिक वेगवेगळ्या व्याख्यांनुसार एखादी गोष्ट ही, अपराध असेल त्या बाबतीत, किंवा,

ज्यांच्यापैकी एक किंवा एकाहून अधिक कृती स्वयमेव अपराध ठरण्यासारख्या आहेत अशा अनेक कृती मिळून एखादा वेगळाच अपराध घडत असेल त्या बाबतीत,

त्या अपराध्याला, त्याची संपरीक्षा करणारे न्यायालय अशांपैकी कोणत्याही एका अपराधाबद्दल जितकी कडक शिक्षा देऊ शकले असते त्यापेक्षा अधिक कडक शिक्षा देण्यात येणार नाही.]

उदाहरणे

(क) 'क' हा 'य' ला काठीने पन्नास तडाखे हाणतो. येथे 'क' ने संपूर्ण मारहाणीद्वारे आणि ती संपूर्ण मारहाण ज्या प्रहारांनी मिळून बनली त्या प्रत्येक प्रहाराद्वारेदेखील 'य' ला इच्छापूर्वक दुखापत करण्याचा अपराध केलेला असू शकेल. जर 'क' हा प्रत्येक प्रहाराबद्दल शिक्षेस पात्र असता तर प्रत्येक प्रहारागणिक एक वर्ष याप्रमाणे त्याला पन्नास वर्षे कारागृहात ठेवता आले असते. परंतु तो संपूर्ण मारहाणीबद्दल फक्त एकाच शिक्षेस पात्र आहे.

(ख) परंतु, 'क' हा 'य' ला मारहाण करत असताना 'म' मध्ये पडला व 'क' ने 'म' वर उद्देशपूर्वक तडाखा हाणला तर, 'म' वर केलेला प्रहार हा ज्या कृतीद्वारे 'क' हा 'य' ला इच्छापूर्वक दुखापत करतो त्याचा भाग नसल्यामुळे 'क' हा 'य' ला इच्छापूर्वक दुखापत केल्याबद्दल एका शिक्षेला आणि 'म' वर केलेल्या प्रहाराबद्दल दुसऱ्या शिक्षेला पात्र आहे.

---

१. १८८२ चा अधिनियम ८-कलम ४ द्वारे जादा दाखल केले.

७२. न्यायनिर्णयात विनिर्दिष्ट केलेल्या अनेक अपराधांपैकी एका अपराधाबद्दल एखादी व्यक्ती दोषी आहे, परंतु त्यांपैकी कोणत्या अपराधाबद्दल ती दोषी आहे ते शंकास्पद आहे, असा न्यायनिर्णय देण्यात आलेल्या सर्व प्रकरणी, सर्व अपराधांसाठी सारखीच शिक्षा उपबंधित केलेली नसेल तर त्यांपैकी ज्याबद्दल सर्वांत कमी शिक्षा उपबंधित केलेली असेल त्या अपराधाबद्दल अपराध्याला शिक्षा देण्यात येईल. अनेक अपराधांपैकी एकाबद्दल दोषी असलेली व्यक्ती त्यांपैकी कोणत्या अपराधाबद्दल दोषी आहे ते शंकास्पद असल्याचे न्यायनिर्णयात नमूद केलेले असेल तेव्हा त्या व्यक्तीला शिक्षा.

७३. न्यायालयाला या संहितेखाली ज्या अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीला सश्रम कारावासाची शिक्षा देण्याचा अधिकार आहे त्या अपराधाबद्दल जेव्हा केव्हा त्या व्यक्तीला सिद्धदोष ठरवण्यात येईल तेव्हा, न्यायालय त्याच्या शिक्षादेशाद्वारे असा आदेश देऊ शकेल की, अपराध्याला ज्या कारावासाची शिक्षा दिलेली असेल त्यांपैकी कोणत्याही एका किंवा अनेक अंशकालांपुरते––पण सर्व मिळून तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ नाही––पुढील प्रमाणानुसार त्याला एकांत बंदिवासात ठेवण्यात यावे, ते प्रमाण असे :–– एकांत बंदिवास.

कारावासाची मुदत सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल तर, जास्तीत जास्त एक महिना इतका काळ;

कारावासाची मुदत सहा महिन्यांपेक्षा अधिक असेल आणि [1][एक वर्षापेक्षा अधिक नसेल] तर जास्तीत जास्त दोन महिने इतका काळ;

कारावासाची मुदत एक वर्षापेक्षा अधिक असेल तर, जास्तीत जास्त तीन महिने इतका काळ.

७४. एकांत बंदिवासाच्या शिक्षादेशाची अंमलबजावणी करताना, असा बंदिवास कोणत्याही प्रकरणी एका वेळी चौदा दिवसांपेक्षा अधिक असणार नाही व एकांत बंदिवासाच्या कालावधींच्या दरम्यानची कालांतरे अशा कालावधींच्या व्याप्तीपेक्षा कमी असणार नाहीत, आणि ठोठावण्यात आलेला कारावास तीन महिन्यांपेक्षा अधिक असेल तेव्हा, एकांत बंदिवास हा दिलेल्या संपूर्ण कारावासाच्या कोणत्याही एका महिन्यामध्ये सात दिवसांपेक्षा अधिक असणार नाही व एकांत बंदिवासाच्या कालावधींच्या दरम्यानची कालांतरे अशा कालावधींपेक्षा कमी व्याप्तीची असतील. एकांत बंदिवासाची मर्यादा.

[2][७५. जो कोणी,––

(क) या संहितेतील प्रकरण १२ वे किंवा प्रकरण १७ वे याखाली तीन वर्षे किंवा त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल [3][भारतातील] एखाद्या न्यायालयाने,

[4](ख) * * * * *

त्यास सिद्धदोष ठरवलेले असताना, त्या दोहोंपैकी कोणत्याही प्रकरणाखाली तितक्याच मुदतीच्या त्याच प्रकारच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला कोणताही अपराध केल्याबद्दल दोषी होईल तो अशा नंतरच्या प्रत्येक अपराधाबद्दल [5][आजीव कारावासास] किंवा दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासास पात्र ठरेल.] प्रकरण १२ वे किंवा प्रकरण १७ वे याखाली पूर्वी दोषसिद्धी झाली असता, त्याखालील विवक्षित अपराधाबद्दल वाढीव शिक्षा.

## प्रकरण ४ थे

## सर्वसाधारण अपवाद

७६. जी व्यक्ती एखादी गोष्ट करण्यास विधित: बद्ध आहे किंवा जी व्यक्ती ती गोष्ट करण्यास आपण विधित: बद्ध आहोत असे विधिविषयक चूकभुलीमुळे नव्हे तर तथ्यविषयक चूकभुलीमुळे सद्भावपूर्वक समजते अशा व्यक्तीने केलेली ती गोष्ट ही अपराध होत नाही. विधित: बद्ध असलेल्या अथवा तथ्यविषयक चूकभुलीमुळे स्वत:ला विधित: बद्ध समजणाऱ्या व्यक्तीने केलेली कृती.

### उदाहरणे

(क) 'क' हा सैनिक विधिविहित समादेशांना धरून त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आदेशावरून जमावावर गोळीबार करतो. 'क' ने काहीही अपराध केलेला नाही.

---

१. १८८२ चा अधिनियम ८-कलम ५ द्वारे "वर्षापेक्षा कमी असेल" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

२. १९१० चा अधिनियम ३-कलम २ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

३. क्रमश: अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' याऐवजी वरील शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

४. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ द्वारे, खंड (क) च्या शेवटी असलेला "किंवा" हा शब्द व खंड (ख) वगळण्यात आला.

५. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

(ख) न्यायालयाचा अधिकारी 'क' याला त्या न्यायालयाने 'म' ला अटक करण्याचा आदेश दिलेला असता, यथायोग्य चौकशी केल्यानंतर, तो 'य' ला 'म' समजून अटक करतो. 'क' ने काहीही अपराध केलेला नाही.

न्यायिकतः कार्य करत असताना न्यायाधीशाची कृती.

७७. कायद्याने न्यायाधीशाला दिलेला आहे अथवा दिला असल्याचे तो सद्भावपूर्वक समजतो अशा कोणत्याही अधिकाराचा वापर करण्यासाठी तो न्यायिकतः कार्य करत असताना त्याने जे केले असेल ते काहीही अपराध होत नाही.

न्यायालयाच्या न्यायनिर्णयाला किंवा आदेशाला अनुसरून केलेली कृती.

७८. न्यायालयाचा न्यायनिर्णय किंवा आदेश याला अनुसरून जी गोष्ट केली आहे किंवा त्याद्वारे जिला समर्थन मिळाले आहे ती जर असा न्यायनिर्णय किंवा आदेश अंमलात असताना केलेली असेल तर अशी कोणतीही गोष्ट अपराध होत नाही,—मग अशा न्यायनिर्णय किंवा आदेश देण्याची न्यायालयाला अधिकारिता नव्हती असे असले तरी हरकत नाही—मात्र ती कृती करणारी व्यक्ती न्यायालयाला अशी अधिकारिता होती असे सद्भावपूर्वक समजत असली पाहिजे.

विधितः समर्थन मिळालेल्या किंवा तसे स्वतःला समर्थन आहे असे तथ्यविषयक चूकभुलीमुळे समजणाऱ्या व्यक्तीने केलेली कृती.

७९. एखादी कृती करण्यास ज्या व्यक्तीला विधितः समर्थन मिळालेले आहे किंवा जी व्यक्ती ती कृती करण्यास आपणाला विधितः समर्थन आहे असे विधिविषयक चूकभुलीमुळे नव्हे तर तथ्य-विषयक चूकभुलीमुळे सद्भावपूर्वक समजते अशा व्यक्तीने केलेली ती गोष्ट अपराध होत नाही.

**उदाहरण**

'क' ला जी गोष्ट खून असल्याचे वाटते ती गोष्ट 'य' करत असताना 'क' त्याला पाहातो. प्रत्यक्षात खून करणाऱ्या व्यक्तींना पकडण्याचा जो अधिकार कायद्याने सर्व व्यक्तींना दिलेला आहे त्याचा सद्भावपूर्वक चालवलेल्या आपल्या सर्वोत्तम निर्णयबुद्धीनुसार वापर करून 'क' हा 'य' ला योग्य प्राधिकाऱ्यांसमोर आणण्यासाठी त्याला सक्तीने ताब्यात घेतो. 'य' स्वसंरक्षणार्थ तसे करत होता असे मागाहून आढळून आले तरीही, 'क' ने काहीही अपराध केलेला नाही.

कायदेशीर कृती करताना अपघात.

८०. कायदेशीर रीतीने कायदेशीर साधनांनी आणि योग्य ती काळजी व खबरदारी घेऊन एखादी कायदेशीर कृती करत असताना अपघाताने किंवा दुर्दैवाने, आणि कोणताही गुन्हेगारी उद्देश किंवा जाणीव नसताना जी गोष्ट हातून घडते अशी कोणतीही गोष्ट अपराध होत नाही.

**उदाहरण**

'क' हा लहान कुऱ्हाडीने काम करत असतो, तिचा मुंढा उडतो आणि बाजूस उभ्या असलेल्या माणसाला लागून तो मरतो. येथे, 'क' कडून योग्य खबरदारी घेण्यात कसूर झाली नसेल तर, त्याची कृती क्षम्य आहे आणि ती अपराध नव्हे.

अपहानी करण्याचा संभव असलेली, पण गुन्हेगारी उद्देशाशिवाय, आणि अन्य अपहानी होऊ नये म्हणून केलेली कृती.

८१. कोणतीही गोष्ट जर अपहानी करण्याचा गुन्हेगारी उद्देश नसताना आणि शरीराची किंवा मालमत्तेची अन्य अपहानी होऊ नये म्हणून किंवा ती टाळण्यासाठी सद्भावपूर्वक केलेली असेल तर, त्या गोष्टीमुळे अपहानी होणे संभवनीय आहे याची जाणीव असताना ती केली गेली एवढ्याच केवळ कारणाने ती गोष्ट अपराध होत नाही.

**स्पष्टीकरण.**—जिला प्रतिबंध करावयाचा किंवा जी टाळावयाची ती अपहानी अशा स्वरूपाची किंवा इतकी अतिनिकट होती काय की, ज्यायोगे ती कृती तिच्यामुळे अपहानी होण्याचा संभव आहे अशी जाणीव असताना करणे हे समर्थनीय किंवा क्षम्य होईल हा अशा प्रकरणी तथ्याचा प्रश्न असतो.

**उदाहरणे**

(क) आगबोटीचा कप्तान 'क' अकस्मात् आणि त्याच्या पक्षी कोणताही दोष किंवा हयगय नसताना, अशा परिस्थितीत सापडतो की, आगबोट थांबवू शकण्यापूर्वी त्याने आपल्या बोटीचा मार्ग बदलला नाही तर, अपरिहार्यपणे 'ख' या बोटीशी टक्कर होऊन तिच्यावरील वीस किंवा तीस उतारूंसह ती बुडणार, आणि मार्ग बदलल्यास त्यामुळे 'ग' या बोटीशी टक्कर होऊन तिच्यावरील फक्त दोन उतारूंसह ती बुडण्याचा धोका त्याला पत्करावा लागणार, पण त्यातून ती कदाचित् पारही पडू शकेल. याबाबतीत जर 'ग' या बोटीशी टक्कर करून तिला बुडवण्याचा कोणताही उद्देश नसताना व 'ख' या बोटीतील उतारूंना होणारा धोका टाळण्यासाठी सद्भावपूर्वक 'क' ने आपला मार्ग बदलला आणि जीमुळे परिणामी 'ग' या बोटीशी टक्कर होऊन ती बुडण्याचा संभव आहे हे त्याला माहीत होते ती कृती करून त्याने ती बोट बुडवली तरी, जर अशी वस्तुस्थिती आढळून आली की, जो धोका टाळण्याचा त्याचा उद्देश होता तो अशा प्रकारचा होता की जेणेकरून, 'ग' या बोटीशी टक्कर होऊन ती बुडण्याचा धोका पत्करणे क्षम्य होईल तर, तो अपराधाबद्दल दोषी होत नाही.

(ख) मोठी आग लागली असता, तो भडका पसरू नये यासाठी 'क' घरे पाडून टाकतो. मानवी जीवित किंवा मालमत्ता वाचवण्याच्या उद्देशाने सद्भावपूर्वक तो हे करतो. याबाबतीत, टाळावयाची अपहानी अशा स्वरूपाची व इतकी अतिनिकट होती की, ज्यायोगे 'क' ची कृती क्षम्य ठरते असे आढळून आल्यास, 'क' त्या अपराधाबद्दल दोषी होत नाही.

८२. सात वर्षे वयाखालील बालकाने केलेली कोणतीही गोष्ट अपराध होत नाही.

सात वर्षे वयाखालील बालकाची कृती.

८३. जी गोष्ट सात वर्षांवरील व बारा वर्षांखालील वयाच्या एखाद्या बालकाने केली असून त्या प्रसंगीच्या आपल्या वर्तनाचे स्वरूप व परिणाम अजमावता येण्याइतपत पुरेशी परिपक्वता त्याच्या समजशक्तीला आलेली नाही अशी कोणतीही गोष्ट अपराध होत नाही.

सात वर्षांवरील व बारा वर्षांखालील अपरिपक्व समजशक्ती असलेल्या बालकाची कृती.

८४. जी व्यक्ती एखादी गोष्ट करण्याच्यावेळी त्या कृतीचे स्वरूप काय आहे अथवा आपण जे करत आहोत ते गैर किंवा कायद्याच्या विरुद्ध आहे हे जाणण्यास मनोविकलतेमुळे असमर्थ असेल त्या व्यक्तीने केलेली अशी कोणतीही गोष्ट अपराध होत नाही.

मनोविकल व्यक्तीची कृती.

८५. जी व्यक्ती एखादी गोष्ट करण्याच्या वेळी त्या कृतीचे स्वरूप काय आहे अथवा आपण जे करतो आहोत ते गैर किंवा कायद्याच्या विरुद्ध आहे हे जाणण्यास नशेमुळे असमर्थ असेल त्या व्यक्तीने केलेली अशी कोणतीही गोष्ट अपराध होत नाही; मात्र ज्यामुळे तिला नशा चढली ते द्रव्य तिला तिच्या नकळत किंवा तिच्या इच्छेविरुद्ध पाजण्यात आलेले असले पाहिजे.

स्वतःच्या इच्छेविरुद्ध नशा चढवण्यात आल्यामुळे निर्णयबुद्धी चालवण्यास असमर्थ झालेल्या व्यक्तीची कृती.

८६. जेव्हा केलेली कृती ही विशिष्ट जाणिवेने किंवा उद्देशाने केलेली असल्याशिवाय अपराध होत नाही अशा प्रकरणांमध्ये, जी व्यक्ती नशेच्या अवस्थेत ती कृती करते त्या व्यक्तीला नशा चढली नसती तर जी जाणीव तिला झाली असती ती जणू काही त्या व्यक्तीला होती असे समजून तिच्या विरुद्ध कार्यवाही केली जाण्यास ती पात्र असेल, मात्र ज्यामुळे नशा चढली ते द्रव्य तिच्या नकळत किंवा तिच्या-इच्छेविरुद्ध तिला पाजण्यात आलेले नसावे.

ज्यामध्ये विशिष्ट उद्देश किंवा जाणीव आवश्यक असते असा अपराध नशा चढलेल्या व्यक्तीने केला असता.

८७. जिच्यामुळे मृत्यू किंवा जबर दुखापत घडून यावी असा उद्देश नाही आणि जिच्यामुळे मृत्यू किंवा जबर दुखापत घडून येणे संभवनीय असल्याची कर्त्याला जाणीव नाही अशी कोणतीही गोष्ट, तिच्यामुळे होणारा कोणताही अपाय सोसण्यास जिने व्यक्त किंवा उपलक्षित संमती दिली आहे अशा अठरा वर्षे वयाखालील कोणत्याही व्यक्तीला तो अपाय झाला किंवा तो व्हावा असे कर्त्याला उद्देशित होते या कारणाने, अथवा तिच्यामुळे होणाऱ्या कोणत्याही अपायाचा धोका पत्करण्यास अशा ज्या कोणत्याही व्यक्तीने संमती दिली आहे तिला त्या गोष्टीमुळे तो अपाय होणे संभवनीय असल्याची कर्त्याला जाणीव होती या कारणाने अपराध होत नाही.

जिच्यामुळे मृत्यू किंवा जबर दुखापत घडून यावी असा उद्देश नाही किंवा तसा संभव असल्याची जाणीव नाही अशी संमतीने केलेली कृती.

उदाहरण

'क' व 'य' हे करमणुकीखातर एकमेकांबरोबर शस्त्रक्रीडा करण्याचे ठरवतात. याप्रमाणे शस्त्रक्रीडा करण्याच्या ओघात गैर डाव नसताना जो कोणताही अपाय होईल तो सोसण्यास प्रत्येकाची संमती असल्याचे या ठरावात उपलक्षित आहे, आणि न्याय्यपणे खेळत असताना, 'क' कडून 'य'ला दुखापत झाली तर, 'क' चा काहीही अपराध होत नाही.

८८. जिच्यामुळे मृत्यू घडून यावा असा उद्देश नाही अशी जी गोष्ट एखाद्या व्यक्तीच्या हितासाठी सद्भावपूर्वक करण्यात आली असून तिच्यामुळे घडणारा कोणताही अपाय सोसण्यास, किंवा त्या अपायाचा धोका पत्करण्यास तिने व्यक्त किंवा उपलक्षित संमती दिलेली असेल तर, अशा कोणत्याही व्यक्तीला तो अपाय झाला किंवा तो व्हावा असे कर्त्याला उद्देशित होते किंवा तो होण्याचा संभव असल्याची कर्त्याला जाणीव होती या कारणाने अशी कोणतीही गोष्ट अपराध होत नाही.

मृत्यू घडवून आणण्याचा उद्देश नसताना, व्यक्तीच्या हितासाठी तिच्या संमतीने सद्भावपूर्वक केलेली कृती.

उदाहरण

एका वेदनापूर्ण विकाराने पीडित असलेल्या 'य' चा विशिष्ट शस्त्रक्रियेमुळे मृत्यू घडून येणे संभवनीय आहे अशी जाणीव असताना, पण 'य' चा मृत्यू घडवून आणण्याचा उद्देश नसताना आणि 'य' च्या हिताचा उद्देश सद्भावपूर्वक बाळगून 'क' हा शल्यचिकित्सक 'य' च्या संमतीने त्याच्यावर ती शस्त्रक्रिया करतो. 'क' ने काहीही अपराध केलेला नाही.

बालकाच्या किंवा भ्रमिष्ट व्यक्तीच्या हितासाठी पालकाने किंवा पालकाच्या संमतीनिशी सद्भावपूर्वक केलेली कृती.

८९. बारा वर्षांखालील वयाच्या किंवा विकल मनाच्या एखाद्या व्यक्तीच्या हितासाठी पालकाने किंवा ज्याच्याकडे त्या व्यक्तीचा कायदेशीर रक्षणभार आहे अशा अन्य इसमाने अथवा त्याच्या अगर तिच्या व्यक्त किंवा उपलक्षित संमतीनिशी सद्भावपूर्वक केलेली कोणतीही गोष्ट, तिच्यामुळे त्या व्यक्तीला जो कोणताही अपाय घडेल, किंवा घडावा असे कर्त्याला उद्देशित असेल, किंवा घडण्याचा संभव असल्याची कर्त्याला जाणीव असेल त्या अपायामुळे अपराध होत नाही; परंतु—

परंतुके.

**एक.**—उद्देशपूर्वक मृत्यू घडवून आणण्याच्या, किंवा मृत्यू घडवून आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नाच्या बाबतीत हा अपवाद लागू असणार नाही;

**दोन.**—कोणतीही गोष्ट करणाऱ्या व्यक्तीला त्या गोष्टीमुळे मृत्यू घडून येणे संभवनीय आहे अशी जाणीव असेल तर, ती गोष्ट मृत्यू किंवा जबर दुखापत टाळणे याहून अथवा कोणताही भीषण रोग किंवा विकलता बरी करणे याहून अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी करण्याच्या बाबतीत हा अपवाद लागू असणार नाही;

**तीन.**—इच्छापूर्वक जबर दुखापत करण्याच्या, किंवा जबर दुखापत करण्यासाठी प्रयत्न करण्याच्या बाबतीत हा अपवाद लागू असणार नाही—मात्र मृत्यू किंवा जबर दुखापत टाळण्यासाठी अथवा कोणताही भीषण रोग किंवा विकलता बरी करण्यासाठी ते केले असेल तर गोष्ट वेगळी;

**चार.**—जो कोणताही अपराध करण्याच्या बाबतीत हा अपवाद लागू होण्यासारखा नाही त्याच्या अपप्रेरणाच्या बाबतीत तो लागू असणार नाही.

**उदाहरण**

मुतखडा काढून टाकण्यासाठी आपल्या अपत्यावर शस्त्रक्रिया केल्यास त्यामुळे त्याचा मृत्यू घडून येण्याचा संभव असल्याची जाणीव असताना, पण त्या अपत्याचा मृत्यू घडून यावा असा उद्देश नसताना 'क' आपल्या अपत्याच्या हितासाठी त्याच्या संमतीशिवाय याच्यावर शल्यचिकित्सकाकरवी शस्त्रक्रिया करवतो. अपत्याला बरे करणे हे 'क' चे उद्दिष्ट होते, असे असल्यामुळे तो अपवादाच्या कक्षेत येतो.

भयापोटी किंवा गैरसमजापोटी संमती दिली असल्याची जाणीव असणे.

९०. जर इजा होण्याच्या भयापोटी किंवा एखाद्या तथ्याबाबतच्या गैरसमजापोटी संमती देण्यात आलेली असून, अशा भयामुळे किंवा गैरसमजामुळे ती संमती देण्यात आली हे ती कृती करणारी व्यक्ती जाणून असेल किंवा असे समजण्यास तिला कारण असेल तर; अथवा

भ्रमिष्ट व्यक्तीची संमती.

जर एखाद्या व्यक्तीने संमती दिली असून, आपण ज्याला संमती देत आहोत त्याचे स्वरूप व परिणाम समजण्यास ती मनोविकलतेमुळे किंवा नशेमुळे असमर्थ असेल तर; अथवा

बालकाची संमती.

बारा वर्षे वयाखालील व्यक्तीने संमती दिलेली असता, संदर्भावरून काही विरुद्ध दिसून येत नसेल तर,

ती संमती या संहितेच्या कोणत्याही कलमाला उद्देशित असलेली अशी संमती नव्हे.

ज्या कृती त्यांच्यामुळे होणाऱ्या अपायाच्या निरपेक्षतेने अपराध आहेत त्या वगळणे.

९१. ज्या कृती संमती देणाऱ्या किंवा जिच्या वतीने संमती दिली जाते त्या व्यक्तीला त्यामुळे जो कोणताही अपाय घडेल, किंवा घडावा असा उद्देश असेल, किंवा घडण्याचा संभव असल्याची जाणीव असेल त्या अपायामुळे नव्हे तर स्वतंत्रपणे अपराध ठरतात, त्यांना कलमे ८७, ८८ व ८९ यांमधील अपवाद लागू होणार नाहीत.

**उदाहरण**

गर्भस्राव घडवून आणणे (एखाद्या स्त्रीचे प्राण वाचविण्यासाठी तो सद्भावपूर्वक घडवून आणलेला असेल तर गोष्ट वेगळी) हा, त्यामुळे त्या स्त्रीला जो कोणताही अपाय घडेल किंवा घडावा असा उद्देश असेल त्यामुळे नव्हे तर स्वतंत्रपणे अपराध आहे म्हणून, तो "अशा अपायामुळे" अपराध होत नाही, आणि असा गर्भस्राव घडवून आणण्यास त्या स्त्रीने किंवा तिच्या पालकाने दिलेल्या संमतीमुळे त्या कृतीचे समर्थन होत नाही.

सद्भावपूर्वक एखाद्या व्यक्तीच्या हितासाठी संमतीशिवाय केलेली कृती.

९२. कोणतीही गोष्ट एखाद्या व्यक्तीच्या हितासाठी सद्भावपूर्वक केलेली असून, संमती दर्शवणे त्या व्यक्तीला शक्य नाही अशी परिस्थिती असेल तर, अथवा ती व्यक्ती संमती देण्यास असमर्थ असून, तिला हितकारक होईल अशाप्रकारे ती गोष्ट करण्यासाठी वेळीच ज्याच्याकडून संमती मिळवणे शक्य होईल असा तिचा कोणीही पालक किंवा ज्याच्याकडे तिचा कायदेशीर रक्षणभार आहे असा अन्य इसम नसेल तर, त्या व्यक्तीची संमती न घेताही ती गोष्ट केली तरी, तिच्या योगे त्या व्यक्तीला कोणताही अपाय घडल्यास त्यामुळे ती गोष्ट अपराध होत नाही; परंतु—

परंतुके.

**एक.**—उद्देशपूर्वक मृत्यू घडवून आणण्याच्या, किंवा मृत्यू घडवून आणण्यासाठी प्रयत्न करण्याच्या बाबतीत हा अपवाद लागू असणार नाही.

**दोन.**—कोणतीही गोष्ट करणाऱ्या व्यक्तीला, त्या गोष्टीमुळे मृत्यू घडून येणे संभवनीय आहे अशी जाणीव असेल तर, ती गोष्ट मृत्यू किंवा जबर दुखापत टाळणे याहून अथवा कोणताही भीषण रोग किंवा विकलता बरी करणे याहून अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी करण्याच्या बाबतीत हा अपवाद लागू असणार नाही.

**तीन.**—मृत्यू किंवा दुखापत टाळणे याहून अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी इच्छापूर्वक दुखापत करण्याच्या किंवा दुखापत करण्यासाठी प्रयत्न करण्याच्या बाबतीत हा अपवाद लागू असणार नाही.

**चार.**—जो कोणताही अपराध करण्याच्या बाबतीत हा अपवाद लागू होण्यासारखा नाही त्याच्या अपप्रेरणाच्या बाबतीत तो लागू असणार नाही.

**उदाहरणे**

(क्) 'य' आपल्या घोड्यावरून पडतो व बेशुद्ध होतो. 'य' वर कवटीला भोक पाडण्याची शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे असे 'क' या शल्यचिकित्सकाला आढळून येते. 'य' ला स्वतःचा निर्णय करण्याची शक्ती पुन्हा प्राप्त होण्यापूर्वी, 'क' हा 'य' चा मृत्यू घडावा या उद्देशाने नव्हे, तर 'य' चे हित व्हावे या सद्भावनेने ती शस्त्रक्रिया करतो. 'क' ने काहीही अपराध केलेला नाही.

(ख्) एक वाघ 'य' ला पळवून नेतो. वाघावर गोळी झाडल्यास त्या गोळीने 'य' कदाचित् मारला जाईल असा संभव आहे हे जाणूनही पण 'य' ला मारण्याच्या उद्देशाने नव्हे, तर 'य' चे हित व्हावे या सद्भावनेने 'क' वाघावर गोळी झाडतो. 'क' च्या गोळीने 'य' ला प्राणघातक जखम होते. 'क' ने काहीही अपराध केलेला नाही.

(ग्) 'क' या शल्यचिकित्सकाला असे दिसून येते की, एक बालक अपघातात सापडलेले असून ताबडतोब शस्त्रक्रिया केली नाही तर, तो प्राणघातक ठरण्याचा संभव आहे. बालकाच्या पालकाकडे विनंती करण्यास वेळ नाही. बालकाच्या विनवण्यांस न जुमानता त्याच्या हिताच्या उद्देशाने 'क' सद्भावपूर्वक ती शस्त्रक्रिया करतो. 'क' ने काहीही अपराध केलेला नाही.

(घ्) आग लागलेल्या घरात 'क' हा 'य' या मुलासह आहे. खालचे लोक घोंगडी पसरून धरतात. घराच्या गच्चीवरून मुलाला खाली टाकल्यास, त्याच्या पडण्यामुळे मूल मरण्याचा संभव असल्याची जाणीव असून, पण मुलाला मारण्याच्या उद्देशाने नव्हे, तर मुलाच्या हिताच्या उद्देशाने सद्भावपूर्वक तो तसे करतो. या बाबतीत वरून पडल्यामुळे ते मूल मेले तरी, 'क' ने काहीही अपराध केलेला नाही.

**स्पष्टीकरण.**—नुसता आर्थिक फायदा म्हणजे कलमे ८८, ८९ व ९२ यांच्या अर्थानुसार हित नव्हे.

९३. सद्भावपूर्वक केलेले कोणतेही निवेदन ज्या व्यक्तीला ते करण्यात आले तिच्या हितासाठी केलेले असेल तर, त्या व्यक्तीला होणाऱ्या कोणत्याही अपायामुळे ते अपराध होत नाही. **सद्भावपूर्वक केलेले निवेदन.**

**उदाहरण**

'क' हा शल्यचिकित्सक एका रुग्णाला, तो जगू शकणार नाही हे आपले मत निवेदन करतो. त्या धक्क्यामुळे रुग्ण मृत्यू पावतो. या निवेदनामुळे रुग्णाचा कदाचित् मृत्यू घडेल असा संभव आहे याची 'क' ला जाणीव असली तरी, त्याने काहीही अपराध केलेला नाही.

९४. खून आणि मृत्यूच्या शिक्षेस पात्र असलेले देशविरोधी अपराध खेरीजकरून, एखादी गोष्ट करण्याच्या वेळी एखाद्या व्यक्तीवर, ती केली नाही तर परिणामी त्या व्यक्तीचा किंवा त्या व्यक्तीच्या त्यावेळी हजर असलेल्या कोणत्याही जवळच्या नातलगाचा तात्काळ मृत्यू घडेल किंवा त्याला जबर शारीरिक अपाय घडेल अशी धास्ती वाजवीपणे निर्माण करणाऱ्या धमक्यांमुळे ती गोष्ट करण्याची सक्ती होते तेव्हा, तिने केलेली ती गोष्ट अपराध होत नाही—मात्र ती कृती करणाऱ्या व्यक्तीने स्वतः होऊन, अथवा तात्काळ मृत्यू किंवा जबर शारीरिक अपाय याहून सौम्य असा अपाय स्वतःला घडेल अशा वाजवी धास्तीपोटी, जेणेकरून तिच्यावर अशी बळजबरी होईल अशी परिस्थिती ओढवून घेतलेली असता नये. धमक्यांद्वारे जी कृती करण्याची सक्ती व्यक्तीवर होते ती कृती.

**स्पष्टीकरण १.**—जी व्यक्ती स्वतः होऊन, किंवा मारहाणीच्या धमकीमुळे दरवडेखोरांच्या टोळीत त्यांचे खरे स्वरूप जाणत असताही सामील होते त्या व्यक्तीला विधितः अपराध असेल अशी कोणतीही गोष्ट करण्यास तिच्या साथीदारांनी सक्ती केली या कारणावरून, ती व्यक्ती या अपवादाचा फायदा मिळण्यास हक्कदार होत नाही.

**स्पष्टीकरण २.**—दरवडेखोरांच्या टोळीने एखाद्या इसमाला पकडले व तात्काळ मृत्यूची धमकी देऊन त्याला विधितः अपराध असेल अशी गोष्ट करण्यास भाग पाडले तर,—उदाहरणार्थ, दरवडेखोरांना एका घरात प्रवेश करून ते लुटता यावे म्हणून आपली हत्यारे घेऊन त्या घराचा दरवाजा फोडण्याची एखाद्या लोहारावर सक्ती करण्यात आली तर, तो या अपवादाचा फायदा मिळण्यास हक्कदार आहे.

९५. एखाद्या गोष्टीमुळे होणारा कोणताही अपाय जर इतका अल्प असेल की, कोणीही सर्वसामान्य बुद्धीची व वृत्तीची व्यक्ती अशा अपायाबद्दल तक्रार करणार नाही तर, तिच्यामुळे तसा अपाय झाला किंवा तो व्हावा असा उद्देश होता किंवा तो होण्याचा संभव असल्याची जाणीव होती या कारणाने अशी कोणतीही गोष्ट अपराध होत नाही. **अल्पसा अपाय करणारी कृती.**

## खाजगीरीत्या बचाव करण्याच्या हक्काविषयी

खाजगीरीत्या बचाव करण्याच्या ओघात केलेल्या गोष्टी.

९६. खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क बजावण्यासाठी केलेली कोणतीही गोष्ट अपराध होत नाही.

शरीराचा व मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क.

९७. कलम ९९ मध्ये अंतर्भूत असलेल्या निर्बंधांच्या अधीनतेने, प्रत्येक व्यक्तीला—

एक—मानवी शरीराला बाधक होणाऱ्या कोणत्याही अपराधापासून, तिचे स्वतःचे शरीर आणि अन्य कोणत्याही व्यक्तीचे शरीर ;

दोन—चोरी, जबरी चोरी, आगळीक किंवा फौजदारीपात्र अतिक्रमण याच्या व्याख्येत येणारा अपराध अथवा चोरी, जबरी चोरी, आगळीक किंवा फौजदारीपात्र अतिक्रमण करण्याचा प्रयत्न या स्वरूपातील कोणत्याही कृतीपासून स्वतःची किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीची जंगम किंवा स्थावर मालमत्ता,

यांचा बचाव करण्याचा हक्क आहे.

मनोविकल, इत्यादी व्यक्तीच्या कृतीपासून खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क.

९८. जी कृती एरव्ही एखादा विवक्षित अपराध ठरली असती ती करणाऱ्या व्यक्तीच्या बालवयामुळे, तिच्या ठायी परिपक्व समजशक्तीचा अभाव असल्यामुळे, तिच्या मनोविकलतेमुळे किंवा ती नशेत असल्यामुळे अथवा तिचा काही गैरसमज झाला असल्यामुळे ती कृती अपराध होत नसेल तेव्हा, प्रत्येक व्यक्तीला ती कृती अपराध असती तर त्या कृतीपासून खाजगीरीत्या बचाव करण्याचा जो हक्क मिळाला असता तोच हक्क असतो.

### उदाहरणे

(क) 'य' वेडाच्या भरात 'क' ला ठार मारण्याचा प्रयत्न करतो; 'य' कोणत्याही अपराधाबद्दल दोषी नाही, पण 'क' ला 'य' शहाणा असता तर, जो खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क मिळाला असता तोच हक्क आहे.

(ख) 'क' ज्या घरात प्रवेश करण्यास विधितः हक्कदार आहे त्या घरात तो रात्रीच्या वेळी प्रवेश करतो. 'क' ला प्रामाणिकपणे घरफोड्या समजून 'ख' त्याच्यावर हल्ला करतो. येथे गैरसमजाने 'क' वर हल्ला चढवल्यामुळे 'य' काही अपराध करत नाही. पण 'क' ला 'य' ने त्या गैरसमजाने ते कृत्य केले नसते तर 'य' पासून खाजगीरीत्या बचाव करण्याचा जो हक्क मिळाला असता तो हक्क 'क' ला आहे.

ज्यांच्यापासून खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क नाही त्या कृती.

९९. ज्या कृतीमुळे मृत्यूची किंवा जबर दुखापतीची वाजवी धास्ती निर्माण होत नाही ती कृती एखाद्या लोक सेवकाने आपल्या पदाधिकाराच्या आभासामुळे सद्भावपूर्वक कार्य करताना केलेली असेल किंवा करण्याचा प्रयत्न केलेला असेल तर, ती कृती काटेकोरपणे विधितः समर्थनीय नसली तरी त्या कृतीपासून खाजगीरीत्या बचाव करण्याचा कोणताही हक्क नाही.

ज्या कृतीमुळे मृत्यूची किंवा जबर दुखापतीची वाजवी धास्ती निर्माण होत नाही ती कृती, एखाद्या लोक सेवकाने आपल्या पदाधिकाराच्या आभासामुळे सद्भावपूर्वक कार्य करताना निदेशावरून केलेली असता किंवा करण्याचा प्रयत्न केलेला असता, तो निदेश काटेकोरपणे विधितः समर्थनीय नसला तरी, त्या कृतीपासून खाजगीरीत्या बचाव करण्याचा कोणताही हक्क नाही.

लोक प्राधिकाऱ्यांच्या संरक्षणाचा अवलंब करण्याइतपत अवधी असेल त्या प्रकरणी खाजगीरीत्या बचाव करण्याचा कोणताही हक्क नाही.

कोणत्या मर्यादेपर्यंत हक्क बजावता येईल.

खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क, बचावासाठी जितका अपाय करणे आवश्यक असेल त्याहून अधिक अपाय करता येण्याइतपत व्यापक नसतो.

स्पष्टीकरण १.—एखादी व्यक्ती लोक सेवकाने लोक सेवक या नात्याने केलेल्या किंवा करण्याचा प्रयत्न केलेल्या कृतीपासून खाजगीरीत्या बचाव करण्याच्या हक्कापासून वंचित होत नाही—मात्र, ती कृती करणारा इसम असा लोक सेवक आहे याची तिला जाणीव किंवा तसे समजण्यास कारण असता कामा नये.

स्पष्टीकरण २.—एखादी व्यक्ती, लोक सेवकाच्या निदेशावरून केलेल्या किंवा करण्याचा प्रयत्न केलेल्या कृतीपासून खाजगीरीत्या बचाव करण्याच्या हक्कापासून वंचित होत नाही—मात्र, ती कृती करणारा इसम अशा निदेशावरून कृती करत आहे हे तिला माहीत असले तर किंवा तसे समजण्यास कारण असेल तर गोष्ट वेगळी अथवा त्या इसमाने आपण कोणत्या प्राधिकारान्वये कृती करीत आहोत ते सांगितले तर किंवा त्याच्याकडे लेखी प्राधिकारपत्र असल्यास, मागणी केली असता असे प्राधिकारपत्र त्याने काढून दाखवले तर गोष्ट वगळी.

**शरीराचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क हा, मृत्यू घडवून आणण्याइतपत केव्हा व्यापक असतो.**

१०० शरीराचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क वापरण्याचा प्रसंग ज्यामुळे उद्भवतो तो अपराध यात यापुढे नमूद केलेल्यांपैकी कोणत्याही वर्णनाचा असेल तर, लगतपूर्व कलमात उल्लेखिलेल्या निर्बंधाच्या अधीनतेने, तो हक्क इच्छापूर्वक हल्लेखोराचा मृत्यू घडवून आणण्याइतपत किंवा त्याला अन्य कोणताही अपाय करण्याइतपत व्यापक असतो, ती वर्णने अशी :—

**पहिले.**—ज्या हमल्याच्या परिणामी एरव्ही मृत्यू होईल अशी वाजवी धास्ती निर्माण होईल असा हमला ;

**दुसरे.**—ज्या हमल्याच्या परिणामी एरव्ही जबर दुखापत होईल अशी वाजवी धास्ती निर्माण होईल असा हमला ;

**तिसरे.**—बलात्कार करण्याच्या उद्देशाने केलेला हमला ;

**चवथे.**—निसर्गक्रमाविरुद्ध लैंगिक वासनापूर्ती करण्याच्या उद्देशाने केलेला हमला ;

**पाचवे.**—अपनयन किंवा अपहरण करण्याच्या उद्देशाने केलेला हमला ;

**सहावे.**—एखाद्या व्यक्तीला ज्या परिस्थितीत परिरुद्ध केल्यास आपल्या सुटकेसाठी तिला लोक-प्राधिकाऱ्यांकडे धाव घेणे शक्य होणार नाही अशी वाजवी धास्ती निर्माण होईल अशा परिस्थितीत तिला गैरपणे परिरुद्ध करण्याच्या उद्देशाने केलेला हमला.

**असा हक्क मृत्यूहून अन्य अपाय करण्याइतपत केव्हा व्यापक असतो.**

**१०१.** जर तो अपराध लगतपूर्व कलमात नमूद केलेल्यांपैकी कोणत्याही वर्णनाचा नसेल तर, शरीराचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क इच्छापूर्वक हल्लेखोराचा मृत्यू घडवून आणण्याइतपत व्यापक नसतो,—पण कलम ९९ मध्ये उल्लेखिलेल्या निर्बंधांच्या अधीनतेने, तो हक्क हल्लेखोराला मृत्यूहून अन्य कोणताही अपाय इच्छापूर्वक करण्याइतपत व्यापक असतोच.

**शरीराचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क सुरू होणे व चालू राहणे.**

१०२. शरीराचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क, अपराध करण्यात आला नसला तरी तो अपराध करण्याच्या प्रयत्नामुळे किंवा धमकीमुळे शरीराला धोका असल्याची वाजवी धास्ती निर्माण होताच सुरू होतो व शरीराला धोका असल्याची अशी धास्ती असेतोपर्यंत तो हक्क चालू राहातो.

**मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क हा, मृत्यू घडवून आणण्याइतपत केव्हा व्यापक असतो.**

१०३ जो अपराध करण्यात आल्यामुळे किंवा करण्याचा प्रयत्न करण्यात आल्यामुळे मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क वापरण्याचा प्रसंग उद्भवतो तो अपराध यात यापुढे नमूद केलेल्यांपैकी कोणत्याही वर्णनाचा असेल तर, कलम ९९ मध्ये उल्लेखिलेल्या निर्बंधांच्या अधीनतेने, तो हक्क इच्छापूर्वक अपकृत्यकर्त्याचा मृत्यू घडवून आणण्याइतपत किंवा त्याला अन्य कोणताही अपाय करण्याइतपत व्यापक असतो, ती वर्णने अशी :—

**पहिले.**—जबरी चोरी ;

**दुसरे.**—रात्रीची घरफोडी ;

**तिसरे.**—जी इमारत, तंबू किंवा जलयान माणसांचे वसतिस्थान म्हणून किंवा मालमत्तेच्या अभिरक्षेचे स्थान म्हणून वापरले जाते अशा कोणत्याही इमारतीला, तंबूला किंवा जलयानाला आग लावून आगळीक करणे ;

**चवथे.**—खाजगीरीत्या बचाव करण्याचा असा हक्क वापरला नाही तर, मृत्यू किंवा जबर दुखापत होईल अशी ज्यामुळे वाजवी धास्ती निर्माण झाली असेल अशा परिस्थितीत चोरी, आगळीक किंवा गृह-अतिक्रमण.

**असा हक्क मृत्यूहून अन्य अपाय करण्याइतपत केव्हा व्यापक असतो.**

**१०४.** जो अपराध करण्यात आल्यामुळे किंवा करण्याचा प्रयत्न करण्यात आल्यामुळे खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क वापरण्याचा प्रसंग उद्भवतो तो चोरीचा, आगळीक करण्याचा, किंवा फौजदारीपात्र अतिक्रमणाचा अपराध असून लगतपूर्व कलमात नमूद केलेल्यांपैकी कोणत्याही वर्णनाचा नसेल तर, तो हक्क इच्छापूर्वक अपकृत्यकर्त्याचा मृत्यू घडवून आणण्याइतपत व्यापक नसतो,—पण कलम ९९ मध्ये उल्लेखिलेल्या निर्बंधांच्या अधीनतेने, तो हक्क अपकृत्यकर्त्याला मृत्यूहून अन्य कोणताही अपाय इच्छापूर्वक करण्याइतपत व्यापक असतोच.

**मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क सुरू होणे व चालू राहणे.**

**१०५.** मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क मालमत्तेला धोका असल्याची वाजवी धास्ती निर्माण होते तेव्हा सुरू होतो.

चोरीपासून मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क अपराधी हा मालमत्तेसह काढता पाय घेईपर्यंत अथवा एकतर लोक प्राधिकाऱ्यांचे साहाय्य मिळविण्यात येईपर्यंत किंवा अशी मालमत्ता परत मिळविण्यात येईपर्यंत चालू राहतो.

जबरी चोरीपासून मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क हा, जोपर्यंत अपराधी कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू किंवा तिला दुखापत किंवा गैर निरोध करीत आहे तोपर्यंत किंवा करण्याचा प्रयत्न करीत आहे तोपर्यंत अथवा जोपर्यंत तात्काळ मृत्यूचे किंवा तात्काळ दुखापतीचे किंवा तात्काळ व्यक्तिगत निरोधाचे भय असते तोपर्यंत चालू राहतो.

फौजदारीपात्र अतिक्रमण किंवा आगळीक यापासून मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क, जोपर्यंत अपराधी फौजदारीपात्र अतिक्रमण करण्याचे चालू ठेवतो तोपर्यंत चालू राहतो.

रात्रीच्या घरफोडीपासून मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क, जोपर्यंत अशा घरफोडीमुळे सुरू झालेले गृह-अतिक्रमण चालू असते तोपर्यंत चालू राहतो.

निर्दोष व्यक्तीला अपाय होण्याचा धोका असेल तेव्हा, प्राणघातक हमल्यापासून खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क.

१०६. ज्यामुळे मृत्यूची वाजवी धास्ती निर्माण होते अशा हमल्यापासून खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क वापरत असताना जर बचाव करू पाहणारी व्यक्ती निर्दोष व्यक्तीला अपाय होण्याचा धोका पत्करल्याशिवाय तो हक्क परिणामकारकपणे वापरू शकत नाही अशा परिस्थितीत सापडली तर, खाजगीरीत्या बचाव करण्याचा तिचा हक्क तो धोका पत्करण्याइतपत व्यापक असतो.

**उदाहरण**

'क' वर एक जमाव हल्ला करतो व त्याचा खून करण्याचा प्रयत्न करतो. जमावावर गोळीबार केल्याशिवाय तो खाजगीरीत्या बचाव करण्याचा आपला हक्क परिणामकारणे वापरू शकत नाही व जमावात मिसळलेल्या लहान मुलांना अपाय होण्याचा धोका पत्करल्याशिवाय तो गोळीबार करू शकत नाही. याप्रमाणे गोळीबार केल्याने त्याच्याकडून त्यांपैकी कोणाही मुलाला अपाय झाला तर, 'क' ने अपराध केला असे होत नाही.

## प्रकरण ५ वे

## अपप्रेरणाविषयी

एखाद्या गोष्टीचे अपप्रेरण.

१०७. जेव्हा एखादी व्यक्ती—

एक :—एखादी गोष्ट करण्यास कोणत्याही व्यक्तीला चिथावणी देते तेव्हा; किंवा

दोन :—अन्य एका किंवा अधिक व्यक्तींबरोबर ती गोष्ट करण्याच्या कोणत्याही कटात सामील झाली असता, त्या कटाला अनुसरून आणि ती गोष्ट केली जाण्यासाठी एखादी कृती किंवा अवैध अकृती घडून येते तेव्हा; किंवा

तीन :—ती गोष्ट करण्याच्या कामी कोणत्याही कृतीद्वारे किंवा अवैध अकृतीद्वारे उद्देशपूर्वक साहाय्य करते तेव्हा,

तिने ती गोष्ट करण्यास अपप्रेरणा दिली असे होते.

**स्पष्टीकरण १.**—जी व्यक्ती एखादे महत्त्वाचे तथ्य प्रकट करण्यास ती बद्ध असताना त्याबाबत बुद्धिपुर:सर अपवेदन करून अथवा ते बुद्धिपुर:सर लपवून इच्छापूर्वक एखादी गोष्ट करविते किंवा घडवून आणते अथवा करवण्याचा किंवा घडवून आणण्याचा प्रयत्न करते तिने ती गोष्ट करण्यास चिथावणी दिली असे होते.

**उदाहरण**

'क' हा लोक अधिकारी 'य' ला गिरफदार करण्यास न्यायालयाकडून वॉरंटाद्वारे प्राधिकृत झाला आहे. 'ख' ला ते तथ्य आणि तसेच 'ग' हा 'य' नाही हेही माहीत असताना, तो 'ग' हा 'य' आहे असे 'क' ला बुद्धिपुर:सर अपवेदन करतो, आणि त्याद्वारे 'ग' ला उद्देशपूर्वक 'क' करवी गिरफदार करवतो. याबाबतीत 'ख' ने 'ग' ला गिरफदार करण्याच्या कामी चिथावणी देऊन अपप्रेरणा दिली असे होते.

**स्पष्टीकरण २.**—जो कोणी, एखादी कृती करण्यापूर्वी किंवा करतेवेळी, ती कृती करणे सुकर व्हावे यासाठी एखादी गोष्ट करतो आणि त्याद्वारे ती कृती करणे सुकर करतो तो ती कृती करण्याच्या कामी साहाय्य करतो असे म्हटले जाते.

अपप्रेरक.

१०८. जी व्यक्ती एखादा अपराध करण्यास अपप्रेरणा देते अथवा अपराध करण्याची क्षमता असणाऱ्या व्यक्तीने अपप्रेरकाप्रमाणे त्याच उद्देशाने किंवा जाणिवेने केल्यास जी कृती अपराध ठरेल ती कृती करण्यास अपप्रेरणा देते त्या व्यक्तीने अपराधाचे अपप्रेरण केले असे होते.

**स्पष्टीकरण १.**—अपप्रेरक स्वत: एखादी कृती करण्यास बद्ध नसला तरीही ती कृती अवैधपणे टाळण्यास अपप्रेरणा देणे हा अपराध ठरू शकेल.

**स्पष्टीकरण २.**—अपप्रेरण हे अपराध ठरण्यासाठी अपप्रेरित कृत्य केले गेले पाहिजे किंवा अपराध ठरण्यासाठी आवश्यक तो परिणाम घडवून आणला गेला पाहिजे अशी आवश्यकता नाही.

**उदाहरणे**

(क) 'क' हा 'ख' ला 'ग' चा खून करण्यास चिथावणी देतो. 'क' हा 'ख' ला खून करण्यास अपप्रेरणा दिल्याबद्दल दोषी आहे.

(ख) 'क' हा 'ख' ला 'घ' चा खून करण्यास चिथावणी देतो. 'ख' हा चिथावणीप्रमाणे 'घ' ला भोसकतो. 'घ' ची जखम बरी होते. 'क' हा 'ख' ला खून करण्यास चिथावणी दिल्याबद्दल दोषी आहे.

**स्पष्टीकरण ३.**—अपप्रेरित व्यक्तीकडे अपराध करण्याची विधित: क्षमता असली पाहिजे अथवा तिच्या ठायी अपप्रेरकाचाच गुन्हेगारी उद्देश किंवा जाणीव अगर कोणताही गुन्हेगारी उद्देश किंवा जाणीव असली पाहिजे अशी आवश्यकता नाही.

### उदाहरणे

(क) अपराध करण्याची विधित: क्षमता असणाऱ्या आणि 'क' सारखा उद्देश असणाऱ्या व्यक्तीने जी कृती केल्यास अपराध होईल ती कृती करण्यास 'क' हा गुन्हेगारी उद्देशाने एखाद्या बालकाला किंवा वेड्याला अपप्रेरणा देतो. येथे कृती करण्यात येवो वा न येवो–'क' हा अपराधास अपप्रेरणा दिल्याबद्दल दोषी आहे.

(ख) 'क' हा 'य' चा खून करण्याच्या उद्देशाने, 'य' च्या मृत्यूस कारणीभूत होईल अशी कृती करण्यास 'ख' या सात वर्षे वयाखालील मुलाला चिथावणी देतो. चिथावणीचा परिणाम म्हणून 'क' च्या अनुपस्थितीत 'ख' ती कृती करतो आणि त्यामुळे 'य' च्या मृत्यूला कारण होतो. येथे, 'ख' कडे अपराध करण्याची विधित: क्षमता नव्हती तरी जणू काही 'ख' कडे अपराध करण्याची विधित: क्षमता असावी आणि त्याने खून केलेला असावा अशा प्रकारे त्याच रीतीने शिक्षा होण्यास 'क' पात्र आहे आणि म्हणून तो मृत्यूच्या शिक्षेस पात्र आहे.

(ग) 'क' हा 'ख' ला एका राहत्या घराला आग लावण्यास चिथावणी देतो. 'ख' त्याच्या मनोविकलतेमुळे त्या कृतीचे स्वरूप काय आहे हे किंवा आपण चुकीची किंवा कायद्याविरुद्ध असलेली गोष्ट करत आहोत हे जाणण्यास असमर्थ असून, 'क' च्या चिथावणीचा परिणाम म्हणून घराला आग लावतो. 'ख' ने कोणताही अपराध केलेला नाही, परंतु 'क' हा राहत्या घराला आग लावण्याच्या अपराधाला अपप्रेरणा देण्याबद्दल दोषी आहे, आणि त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या शिक्षेस पात्र आहे.

(घ) 'क' हा चोरी करण्याच्या उद्देशाने 'य' च्या मालकीची मालमत्ता 'य' च्या कब्जातून काढून घेण्यास 'ख' ला चिथावणी देतो. 'क' ती मालमत्ता 'क' च्या मालकीची आहे असा 'ख' चा समज करून देतो. ती मालमत्ता 'क' ची आहे असे खरोखर समजून 'ख' ती मालमत्ता 'य' च्या कब्जातून काढून घेतो. 'य' चुकीच्या समजुतीने कृती करत असल्यामुळे, त्याने ती मालमत्ता अप्रामाणिकपणाने काढून घेतली असे होत नाही, आणि म्हणून त्याने चोरी केली असे होत नाही. परंतु 'क' हा चोरीस अपप्रेरणा देण्याबद्दल दोषी आहे व तो जणू काही 'ख' ने चोरी केलेली असावी त्याप्रमाणे त्याच शिक्षेला पात्र आहे.

**स्पष्टीकरण ४.**—अपराधास अपप्रेरणा देणे हा अपराध असल्यामुळे अशा अपप्रेरणास अपप्रेरणा देणे हा देखील अपराध आहे.

### उदाहरण

'य' चा खून करण्यास 'ग' ला चिथावणी देण्यासाठी 'क' हा 'ख' ला चिथावणी देतो. त्याप्रमाणे 'ख' हा 'य' चा खून करण्यास 'ग' ला चिथावणी देतो आणि 'ख' च्या चिथावणीच्या परिणामी 'ग' तो अपराध करतो. 'ख' हा त्याच्या अपराधाबद्दल खुनाची शिक्षा होण्यास पात्र आहे, आणि, 'क' ने 'ख' ला अपराध करण्यास चिथावणी दिलेली असल्यामुळे 'क' देखील त्याच शिक्षेला पात्र आहे.

**स्पष्टीकरण ५.**—कट करून अपप्रेरणा देण्याचा अपराध घडण्यासाठी, जी व्यक्ती अपराध करते त्या व्यक्तीशी अपप्रेरकाचा एकविचार झाला पाहिजे अशी आवश्यकता नाही. ज्या कटाच्या अनुरोधाने अपराध करण्यात आला त्यामध्ये तो सामील असला तरी पुरेसे आहे.

### उदाहरणे

'क' हा 'ख' शी एकविचाराने 'य' वर विषप्रयोग करण्याची योजना आखतो. 'क' ने विष द्यावयाचे याबद्दल एकमत होते. नंतर 'ख' हा एका तिऱ्हाईत व्यक्तीने विष द्यावयाचे आहे असे सांगून पण 'क' चा उल्लेख न करता 'ग' ला ती योजना समजावून सांगतो. 'ग' विष पैदा करण्याचे कबूल करतो आणि सांगितलेल्या पद्धतीने त्याचा वापर करण्यासाठी ते पैदा करून 'ख' कडे सुपूर्द करतो. 'क' विष देतो. परिणामी 'य' मरतो. येथे 'क' आणि 'ग' यांनी मिळून कट केलेला नसला तरी ज्याच्या अनुरोधाने 'य' चा खून झाला त्या कटामध्ये 'ग' सामील झालेला आहे. म्हणून, या कलमामध्ये व्याख्या केलेला अपराध 'ग' ने केलेला आहे, आणि तो खुनाबद्दलच्या शिक्षेस पात्र आहे.

भारताबाहेरील अपराधांचे भारतात अपप्रेरण.

[1][१०८क. जी कोणतीही कृती [2][भारतात] केली गेली तर अपराध ठरेल ती कृती [2][भारताबाहेर] आणि त्याच्या पलिकडे करण्यास जी व्यक्ती [2][भारतात] असताना अपप्रेरणा देते ती व्यक्ती या संहितेच्या अर्थानुसार अपराध करते.

**उदाहरण**

भारतात असताना 'क' हा गोव्यामधील 'ख' या विदेशी व्यक्तीला गोव्यामध्ये खून करण्यास चिथावणी देतो. 'क' हा खुनाला अपप्रेरणा दिल्याबद्दल दोषी आहे.]

अपप्रेरणामुळे परिणामतः अपप्रेरित कृती घडली असून, त्या अपप्रेरणाकरता शिक्षेचा कोणताही उपबंध केलेला नसल्यास त्याबद्दल शिक्षा.

१०९. जो कोणी एखाद्या अपराधाला अपप्रेरणा देईल त्याला, जर अपप्रेरणाचा परिणाम म्हणून अपप्रेरित कृती घडली आणि तशा अपप्रेरणाकरता या संहितेद्वारे शिक्षेचा कोणताही स्पष्ट उपबंध केलेला नसेल तर, त्या अपराधाकरता उपबंधित केलेली शिक्षा होईल.

स्पष्टीकरण.—एखादी कृती किंवा अपराध अपप्रेरणाला घटकभूत अशा चिथावणीचा परिणाम म्हणून किंवा अशा कटाला अनुसरून किंवा अशा साहाय्यनिशी घडतो तेव्हा, ते अपप्रेरणाचा परिणाम म्हणून घडले असे म्हटले जाते.

**उदाहरणे**

(क) 'क' हा 'ख' या लोक सेवकाला तो आपले पदीय कार्याधिकार बजावत असताना 'क' वर मेहेरबानी करण्यासाठी बक्षीस म्हणून लाच देऊ करतो. 'ख' लाच स्वीकारतो. कलम १६१ मध्ये व्याख्या केलेल्या अपराधाला 'क' ने अपप्रेरणा दिली आहे.

(ख) 'क' हा 'ख' ला खोटा पुरावा देण्यास चिथावणी देतो. चिथावणीच्या परिणामी 'ख' अपराध करतो. त्या अपराधाला अपप्रेरणा दिल्याबद्दल 'क' दोषी आहे आणि 'ख' प्रमाणे त्याच शिक्षेला पात्र आहे.

(ग) 'क' व 'ख' हे 'य' ला विषप्रयोग करण्याचा कट करतात. कटानुसार 'क' विष पैदा करतो आणि 'ख' ने ते विष 'य' ला द्यावे म्हणून ते 'ख' कडे सुपूर्द करतो. कटानुसार, 'क' च्या अनुपस्थितीत 'ख' ते विष 'य' ला देतो आणि त्याद्वारे 'य' चा मृत्यू घडवून आणतो. याबाबतीत 'ख' खुनाबद्दल दोषी आहे. 'क' हा कट करून त्या अपराधास अपप्रेरणा देण्याबद्दल दोषी आहे, आणि खुनाबद्दलच्या शिक्षेस पात्र आहे.

अपप्रेरित व्यक्तीने अपप्रेरकाच्यापेक्षा वेगळ्या उद्देशाने कृती केल्यास अपप्रेरणाबद्दल शिक्षा.

११०. जर कोणी अपराध करण्यास अपप्रेरणा दिली असून अपप्रेरित व्यक्तीने अपप्रेरकाच्यापेक्षा वेगळ्या उद्देशाने किंवा जाणिवेने ती कृती केली असेल तर, अपप्रेरकाला अपप्रेरकासारख्याच उद्देशाने किंवा जाणिवेने—अन्य कोणत्याही नव्हे—ती कृती केली गेली असती तर जो अपराध घडला असता त्याकरता उपबंधित केलेली शिक्षा मिळेल.

जेव्हा एका कृतीला अपप्रेरणा दिली जाऊन निराळी कृती केली जाते तेव्हा अपप्रेरकाचे दायित्व.

१११. जेव्हा एखाद्या कृतीस अपप्रेरणा दिली जाऊन निराळी कृती केली जाते तेव्हा, घडलेल्या कृतीबद्दल अपप्रेरक जणू काही त्याने तिला प्रत्यक्षपणे त्यासाठीच अपप्रेरणा दिलेली असावी त्याप्रमाणे त्याच रीतीने व त्याच व्याप्तीपर्यंत दायी असतो :

परंतु, घडलेली कृती हा अपप्रेरणाचा संभाव्य परिणाम असला पाहिजे, आणि अपप्रेरणाला घटकभूत अशा चिथावणीच्या प्रभावामुळे किंवा अशा साहाय्यामुळे किंवा अशा कटानुसार ती घडलेली असली पाहिजे.

**उदाहरणे**

(क) 'क' एका बालकाला 'य' च्या अन्नात विष घालण्यास चिथावणी देतो, आणि त्यासाठी त्याच्याकडे विष देतो. चिथावणीचा परिणाम म्हणून ते बालक 'य' च्या अन्नाजवळ असलेल्या 'म' च्या अन्नात भूलचुकीने विष घालते. याबाबतीत जर ते बालक 'क' च्या चिथावणीच्या प्रभावामुळे तसे वागले असेल, आणि घडलेली कृती ही त्या परिस्थितीत अपप्रेरणाचा संभाव्य परिणाम असेल तर, 'क' हा जणू काही त्याने त्या बालकाला 'य' च्या अन्नात विष घालण्यास चिथावणी दिलेली असावी त्याप्रमाणे त्याच रीतीने व त्या व्याप्तीपर्यंत दायी आहे.

(ख) 'क' हा 'ख' ला 'य' चे घर जाळण्यास चिथावणी देतो. 'ख' घराला आग लावतो आणि त्याचवेळी तेथील मालमत्तेची चोरी करतो. 'क' हा घराला आग लावण्यास अपप्रेरणा दिल्याबद्दल दोषी असला तरीही, चोरीस अपप्रेरणा दिल्याबद्दल दोषी नाही; कारण चोरी ही भिन्न कृती असून तो आगीचा संभाव्य परिणाम नाही.

---

१. १८९८ चा अधिनियम ४-कलम ३ द्वारे जादा दाखल केले.

२. क्रमशः अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३ कलम-३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

(ग) जबरी चोरी करण्यासाठी मध्यरात्री एक वस्ती असलेले घर फोडण्यास 'क' हा 'ख' व 'ग' यांना चिथावणी देतो, आणि त्या प्रयोजनासाठी त्यांना शस्त्रे पुरवतो. 'ख' व 'ग' घरात घुसतात आणि आत राहणाऱ्यांपैकी 'य' ने प्रतिकार केल्यामुळे ते त्याचा खून करतात. याबाबतीत, तो खून जर अपप्रेरणाचा संभाव्य परिणाम असेल तर, खुनासाठी उपबंधित केलेल्या शिक्षेस 'क' पात्र आहे.

अपप्रेरित कृतीबद्दल व केलेल्या कृतीबद्दल अपप्रेरक समुच्चयी शिक्षेस केव्हा पात्र असतो.

११२. ज्याबद्दल अपप्रेरक लगतपूर्व कलमाखाली शिक्षापात्र होतो ती कृती अपप्रेरित कृतीच्या जोडीला करण्यात आली असून तिच्यामुळे भिन्न अपराध घडत असेल तर, अपप्रेरक त्यांपैकी प्रत्येक अपराधाबद्दल शिक्षेस पात्र असतो.

उदाहरण

लोक सेवकाकडून होणाऱ्या अटकावणीस बळाने प्रतिकार करण्यास 'क' हा 'ख' ला चिथावणी देतो 'ख' परिणामी त्या अटकावणीस प्रतिकार करतो. प्रतिकार करताना 'ख' अटकावणी बजावण्याची कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्याला इच्छापूर्वक जबर दुखापत करतो. 'ख' ने अटकावणीला प्रतिकार करण्याचा व इच्छापूर्वक जबर दुखापत करण्याचा असे दोन्ही अपराध केलेले असल्यामुळे, 'ख' या दोन्ही अपराधांबद्दलच्या शिक्षेस पात्र आहे; आणि जर अटकावणीस प्रतिकार करताना 'ख' इच्छापूर्वक जबर दुखापत करण्याचा संभव आहे याची 'क' ला जाणीव होती असे असेल तर, 'क' सुद्धा त्यांपैकी प्रत्येक अपराधाबद्दल शिक्षेस पात्र होईल.

अपप्रेरित कृतीमुळे घडून आलेल्या, पण अपप्रेरकाला उद्देशित असलेल्या कृतीहून भिन्न अशा परिणामाबद्दल अपप्रेरकाचे दायित्व.

११३. जेव्हा एखादा विशिष्ट परिणाम घडवून आणण्याचा अपप्रेरकाचा उद्देश असताना एखाद्या कृतीस अपप्रेरणा दिली जाते आणि अपप्रेरणाचा परिणाम म्हणून ज्या कृतीबद्दल अपप्रेरक दायी होतो तिच्यामुळे अपप्रेरकाला उद्देशित असलेल्यापेक्षा भिन्न परिणाम घडून येतो तेव्हा, अपप्रेरित कृतीमुळे तो परिणाम घडून येणे संभवनीय आहे याची अपप्रेरकाला जाणीव होती असे असल्यास, घडून आलेल्या परिणामाबद्दल, जणू काही तो परिणाम घडवून आणण्याच्या उद्देशानेच त्याने त्या कृतीस अपप्रेरणा दिली असावी त्याप्रमाणे त्याच रीतीने व त्याच व्याप्तीपर्यंत तो दायी होतो.

उदाहरण

'य' ला जबर दुखापत करण्यास 'क' हा 'ख' ला चिथावणी देतो. चिथावणीचा परिणाम म्हणून 'ख' हा 'य' ला जबर दुखापत करतो. परिणामी 'य' मरण पावतो. याबाबतीत, जबर दुखापतीच्या अपप्रेरित कृतीमुळे मृत्यू घडून येणे संभवनीय आहे याची 'क' ला जाणीव होती असे असेल तर, 'क' हा खुनासाठी उपबंधित केलेल्या शिक्षेस पात्र आहे.

अपराध घडला तेव्हा अपप्रेरक उपस्थित असणे.

११४. जी व्यक्ती अनुपस्थित असती तर अपप्रेरक म्हणून शिक्षापात्र झाली असती ती व्यक्ती अपप्रेरणाचा परिणाम म्हणून ज्याबद्दल शिक्षापात्र होऊ शकते ती कृती किंवा तो अपराध घडतेवेळी ती उपस्थित आहे असे जेव्हा केव्हा होईल तेव्हा, अशी कृती किंवा अपराध तिने केला असल्याचे मानण्यात येईल.

मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाचे अपप्रेरण-अपराध न घडल्यास.

११५. जो कोणी मृत्यूच्या किंवा [1][आजीव कारावासाच्या] शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यास अपप्रेरणा देईल त्यास, जर अशा अपप्रेरणाचा परिणाम म्हणून तो अपराध घडला नाही, आणि अशा अपप्रेरणाबद्दल शिक्षा देण्याकरता स्पष्ट उपबंध केलेला नसेल तर, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल;

परिणामी अपाय करणारी कृती केली गेल्यास.

आणि, अपप्रेरणाचा परिणाम म्हणून ज्याबद्दल अपप्रेरक दायी होतो, व ज्यामुळे कोणत्याही व्यक्तीला दुखापत होते अशी कोणतीही कृती करण्यात आली तर, अपप्रेरक चौदा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

उदाहरण

'य' चा खून करण्यास 'क' हा 'ख' ला चिथावणी देतो. अपराध केला जात नाही. 'ख' ने 'य' चा खून केला असता तर तो मृत्यूच्या किंवा [1][आजीव कारावासाच्या] शिक्षेस पात्र झाला असता. म्हणून 'क' सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडासही पात्र आहे; आणि जर अपप्रेरणाचा परिणाम म्हणून 'ख' ला कोणतीही दुखापत झाली तर, 'क' चौदा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि द्रव्यदंडासही पात्र होईल.

---

१. १९५५चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाचे अपप्रेरण—अपराध न घडल्यास.

११६. जो कोणी कारावासाच्या शिक्षेस पात्र अशा एखाद्या अपराधास अपप्रेरणा देईल त्यास, जर त्या अपप्रेरणाचा परिणाम म्हणून अपराध घडला नसेल आणि अशा अपप्रेरणाबद्दल शिक्षा देण्याकरता स्पष्ट उपबंध केलेला नसेल तर, त्याला त्या अपराधाकरता उपबंधित केलेल्या सर्वाधिक मुदतीच्या निम्म्या-पर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा त्या अपराधाकरता उपबंधित केलेल्या अशा द्रव्यदंडाची, किंवा अशा दोन्ही शिक्षा होतील.

अपप्रेरक किंवा अपप्रेरित व्यक्ती ही अपराध घडण्यास प्रतिबंध करणे हे ज्याचे कर्तव्य आहे असा लोकसेवक असल्यास.

आणि जर अपप्रेरक किंवा अपप्रेरित व्यक्ती ही लोकसेवक असून अशा अपराध घडण्यास प्रतिबंध करणे हे त्याचे कर्तव्य असेल तर, अपप्रेरकास त्या अपराधाकरता उपबंधित केलेली शिक्षा होईल.

**उदाहरणे**

(क) 'ख' हा लोकसेवक आपले पदीय कार्याधिकार बजावत असताना त्याने 'क' वर मेहेरबानी करावी या बद्दल बक्षीस म्हणून 'क' हा 'ख' लाच देऊ करतो. 'ख' लाच स्वीकारण्यास नकार देतो. 'क' या कलमाखाली शिक्षेस पात्र आहे.

(ख) 'क' हा 'ख' ला खोटा पुरावा देण्यास चिथावणी देतो. याबाबतीत, 'ख' ने खोटा पुरावा दिला नाही तरीही, या कलमामध्ये व्याख्या केलेला अपराध 'क' ने केलेला आहे, आणि तदनुसार तो शिक्षेस पात्र आहे.

(ग) 'क' हा पोलीस अधिकारी असून जबरी चोरीला प्रतिबंध करणे हे त्याचे कर्तव्य आहे व तो जबरी चोरी करण्यास अपप्रेरणा देतो. जबरी चोरी घडली नाही तरीही, याबाबतीत 'क' त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या कारावासाच्या सर्वाधिक मुदतीच्या निम्म्या कारावासास व द्रव्यदंडास देखील पात्र आहे.

(घ) 'क' हा पोलीस अधिकारी असून जबरी चोरीला प्रतिबंध करणे हे त्याचे कर्तव्य असताना 'ख' हा जबरी चोरी करण्यास त्याला अपप्रेरणा देतो. जबरी चोरी घडली नाही तरीही या बाबतीत 'ख' हा जबरी चोरीच्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या कारावासाच्या सर्वाधिक मुदतीच्या निम्म्या कारावासास आणि द्रव्यदंडासदेखील पात्र आहे.

जनतेकडून किंवा दहाहून जास्त व्यक्तींकडून अपराध घडून येण्यास अपप्रेरणा देणे.

११७. जो कोणी, आम जनतेकडून किंवा दहाहून जास्त अशा कितीही व्यक्तींकडून किंवा अशा कोणत्याही वर्गाच्या व्यक्तींकडून अपराध घडून येण्यास अपप्रेरणा देईल त्यास, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**उदाहरण**

दहाहून जास्त सभासद असणाऱ्या एका पंथाला, विरुद्ध पंथाचे सभासद मिरवणुकीने जात असता त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी विवक्षित वेळी व स्थळी सभा घेण्यास चिथावणी देणारा घोषणाफलक 'क' सार्वजनिक ठिकाणी लावतो. 'क' ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केलेला आहे.

मृत्यूच्या किंवा आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्याचा बेत लपवणे.

११८. कोणतीही कृती किंवा अवैध अकृती करून त्याद्वारे, मृत्यूच्या किंवा [1][आजीव कारावासाच्या] शिक्षेस पात्र असलेला अपराध घडणे सुकर करण्याच्या उद्देशाने किंवा त्यामुळे ते सुकर होण्याचा संभव असल्याची जाणीव असताना जो कोणी असा अपराध करण्याचा बेत अस्तित्वात असल्याचे इच्छापूर्वक लपवील किंवा अशा बेतासंबंधी जे खोटे असल्याचे स्वतःला माहीत आहे असे कोणतेही अभिवेदन करील त्याला,

अपराध घडल्यास; अपराध न घडल्यास.

जर तो अपराध घडला तर, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, अथवा जर तो अपराध घडला नाही तर, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल; आणि दोन्ही बाबतींत, तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**उदाहरण**

'ख' या ठिकाणी दरवडा घातला जाणार आहे हे माहीत असताना विरुद्ध दिशेला असलेल्या 'ग' या ठिकाणी दरोडा घालण्यात येणार आहे असे 'क' दंडाधिकाऱ्याला खोटे कळवतो, आणि त्याद्वारे तो अपराध सुकर करण्याच्या उद्देशाने दंडाधिकाऱ्याची दिशाभूल करतो. रचलेल्या बेतानुसार 'ख' येथे दरोडा घातला जातो. 'क' या कलमाखाली शिक्षेस पात्र आहे.

ज्यास प्रतिबंध करणे हे आपले कर्तव्य आहे तो अपराध करण्याचा बेत लोक सेवकाने लपवणे.

११९. लोकसेवक असलेला जो कोणी असा लोकसेवक म्हणून ज्या अपराधास प्रतिबंध करणे हे त्याचे कर्तव्य आहे तो अपराध घडणे सुकर करण्याच्या उद्देशाने किंवा त्यामुळे ते सुकर होण्याचा संभव असल्याची जाणीव असताना,

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

असा अपराध केला जाण्याचा बेत अस्तित्वात असल्याचे कोणत्याही कृतीच्या किंवा अवैध अकृतीच्या द्वारे इच्छापूर्वक लपवील किंवा अशा बेतासंबंधी जे खोटे असल्याचे स्वत:ला माहीत आहे असे कोणतेही अभिवेदन करील त्याला,—

तो अपराध घडला तर, त्या अपराधाकरिता उपबंधित केलेल्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाची —त्याची मुदत अशा कारावासाच्या सर्वाधिक मुदतीच्या निम्म्यापर्यंत असू शकेल, किंवा अपराधाकरिता उपबंधित केलेल्या अशा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील; अपराध घडल्यास.

अथवा, अपराध मृत्यूच्या किंवा [1][आजीव कारावासाच्या] शिक्षेस पात्र असेल तर, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल; मृत्यू, इत्यादी शिक्षेस अपराध पात्र असल्यास.

किंवा, जर अपराध घडला नाही तर, त्या अपराधाकरिता उपबंधित केलेल्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाची—त्याची मुदत अशा कारावासाच्या सर्वाधिक मुदतीच्या एक-चतुर्थांशापर्यंत असू शकेल—किंवा त्या अपराधाकरिता उपबंधित केलेल्या अशा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. अपराध न घडल्यास.

उदाहरण

जबरी चोरी करण्याबद्दलचे जे जे बेत आपणांस माहीत होतील त्या सर्वांची माहिती देण्यास स्वतः विधितः बद्ध असून आणि 'ख' ने जबरी चोरी करण्याचा बेत रचला आहे हे माहीत असूनही 'क' हा पोलीस अधिकारी तो अपराध घडणे सुकर करण्याच्या उद्देशाने तशी माहिती देण्याचे चुकवतो. याबाबतीत, 'क' ने अवैध अकृतीद्वारे 'ख' च्या बेताचे अस्तित्व लपवले आहे, आणि या कलमाच्या उपबंधांनुसार तो शिक्षेस पात्र आहे.

१२०. कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध घडणे सुकर करण्याच्या उद्देशाने किंवा त्यामुळे ते सुकर होण्याचा संभव असल्याची जाणीव असताना, जो कोणी असा अपराध करण्याचा बेत अस्तित्वात असल्याचे कोणत्याही कृतीच्या किंवा अवैध अकृतीच्या द्वारे लपवील किंवा अशा बेतासंबंधी जे खोटे असल्याचे स्वत:ला माहीत आहे असे कोणतेही अभिवेदन करील त्याला— कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्याचा बेत लपवणे—

जर तो अपराध घडला तर, त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, —त्याची मुदत अशा कारावासाच्या सर्वाधिक मुदतीच्या एक-चतुर्थांशापर्यंत असू शकेल— आणि जर तो अपराध घडला नाही तर, सदर मुदतीच्या एक-अष्टमांशापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या अशा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. अपराध घडल्यास. अपराध न घडल्यास.

## [2][प्रकरण ५ वे-क

## फौजदारीपात्र कट

१२०क. जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती मिळून— "फौजदारीपात्र कट" याची व्याख्या.

(१) एखादी अवैध कृती, किंवा

(२) एखादी अवैध नसलेली कृती अवैध साधनांनिशी

करण्याचा किंवा करवण्याचा करार करतात तेव्हा, त्या करारास "फौजदारीपात्र कट" असे संबोधले जाते :

परंतु, अपराध करण्याचा करार खेरीजकरून कोणताही करार, अशा कराराच्या पक्षांपैकी एकाने किंवा अधिकांनी त्यानुसार अशा कराराव्यतिरिक्त आणखी एखादी कृती केली असल्याशिवाय 'फौजदारी-पात्र कट' या सदरात मोडणार नाही.

**स्पष्टीकरण.**—ती अवैध कृती हे अशा कराराचे अंतिम उद्दिष्ट आहे की त्या उद्दिष्टास ती नुसती आनुषंगिक आहे हे बिनमहत्त्वाचे आहे.

१२०ख. (१) जो कोणी मृत्यूच्या, [1][आजीव कारावासाच्या] अथवा दोन वर्षे किंवा त्याहून अधिक मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असा अपराध करण्याच्या फौजदारीपात्र कटातील पक्ष असेल त्याला, अशा कटाबद्दलच्या शिक्षेकरता या संहितेत स्पष्ट उपबंध केलेला नसेल तेव्हा, त्याने जणू काही अशा अपराधास अपप्रेरणा दिलेली असावी त्याप्रमाणे शिक्षा होईल. फौजदारीपात्र कटा-बद्दल शिक्षा.

---

१. १९५५ चा अधिनियम १६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १९१३ चा अधिनियम ८-कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(२) जो कोणी पूर्वोक्तानुसार शिक्षापात्र असलेला अपराध करण्याच्या फौजदारीपात्र कटाहून अन्य अशा एखाद्या फौजदारीपात्र कटातील पक्ष असेल त्याला जास्तीत जास्त सहा महिने इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

## प्रकरण ६ वे

## देशविरोधी अपराधांविषयी

**भारत सरकारविरुद्ध युद्ध करणे किंवा युद्ध करण्याचा प्रयत्न करणे किंवा युद्ध करण्यास अपप्रेरणा देणे.**

**१२१.** जो कोणी [१][भारत सरकार] विरुद्ध युद्ध करील, किंवा असे युद्ध करण्याचा प्रयत्न करील, किंवा असे युद्ध करण्यास अपप्रेरणा देईल त्याला, मृत्यूची, किंवा [२][आजीव कारावासाची] शिक्षा होईल [३][आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल].

[४][उदाहरण]

[५]* * * 'क' [१][भारत सरकार] विरोधी उठावात सामील होतो. या कलमात व्याख्या केलेला अपराध 'क' ने केला आहे.

[६]* * * * * * *

**कलम १२१ अन्वये शिक्षापात्र असे अपराध करण्याचा कट.**

[७][**१२१क.** जो कोणी कलम १२१ अन्वये शिक्षापात्र असलेल्यांपैकी कोणताही अपराध करण्याचा [८]* * * कट [९][भारताच्या] आत किंवा बाहेर करील, अथवा [१०][केंद्र शासनास किंवा कोणत्याही [११][राज्य] शासनास [१२]* * * ] फौजदारीपात्र बलप्रयोगाद्वारे किंवा फौजदारीपात्र बलप्रदर्शनाद्वारे दहशत घालण्याचा कट करील त्याला [२][आजीव कारावासाची] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, [१३][आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल].

**स्पष्टीकरण.**—कटाचा अपराध घडण्याकरिता, त्याला अनुसरून एखादी कृती किंवा अवैध अकृती घडून आली पाहिजे अशी या कलमाखाली आवश्यकता नाही.]

**भारत सरकारविरुद्ध युद्ध करण्याच्या उद्देशाने शस्त्रे, इत्यादी गोळा करणे.**

**१२२.** जो कोणी [१][भारत सरकार] विरुद्ध युद्ध करण्याच्या किंवा युद्ध करण्यासाठी पूर्वतयारी करण्याच्या उद्देशाने माणसे, शस्त्रे किंवा दारूगोळा गोळा करील अथवा अन्यथा युद्धाची पूर्वतयारी करील त्याला [२][आजीव कारावासाची] किंवा जास्तीत जास्त दहा वर्षांइतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल [१३][आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल].

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'क्वीन' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ आणि अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

३. १९२१ चा अधिनियम १६-कलम २ द्वारे "आणि त्याला आपली सर्व संपत्ती गमावावी लागेल" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

४. १९५७ चा अधिनियम ३६-कलम ३ व २ री अनुसूची यांद्वारे "उदाहरणे" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

५. कित्ता–कलम ३ व २ री अनुसूची यांद्वारे "(क)" हे अक्षर वगळण्यात आले.

६. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे उदाहरण (ख) वगळण्यात आले.

७. १८७० चा अधिनियम २७-कलम ४ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

८. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "किंवा प्रांतांच्या अथवा त्यांच्या कोणत्याही भागांच्या सार्वभौमतेपासून क्वीनला वंचित करण्याचा" हा मजकूर वगळण्यात आला.

९. क्रमश: अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' याऐवजी वरील शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

१०. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "भारत सरकारास किंवा कोणत्याही स्थानिक शासनास" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

११. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

१२. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे "किंवा बर्मा शासनास" हे शब्द गाळले.

१३. १९२१ चा अधिनियम १६–कलम ३ द्वारे घातले.

१२३. जर कोणी [१][भारत सरकार] विरुद्ध युद्ध करण्याचा बेत अस्तित्वात असल्याचे लपविले आणि अशा लपवणुकीद्वारे असे युद्ध सुकर करण्याचा त्याचा उद्देश असेल किंवा त्यामुळे तसे होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव असेल तर, त्याला दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**युद्ध करण्याचा बेत ते सुकर करण्याच्या उद्देशाने लपवणे.**

१२४. जो कोणी भारताचा [२][राष्ट्रपती], किंवा कोणत्याही [३][राज्याचा] [४][राज्यपाल [५] * * *] याला, असा राष्ट्रपती किंवा राज्यपाल [६] * * * [७] * * * [८] * * * म्हणून असलेल्यांपैकी कोणतेही कायदेशीर अधिकार कोणत्याही रीतीने वापरण्यास किंवा वापरण्याचे टाळण्यास त्याला प्रवृत्त करण्याच्या किंवा भाग पाडण्याच्या उद्देशाने, असा [९] [राष्ट्रपती किंवा [४][राज्यपाल [५] ***]] यांच्यावर हमला करील, अथवा त्याला गैरपणे निरुद्ध करील अथवा गैरपणे निरुद्ध करण्याचा प्रयत्न करील अथवा फौजदारीपात्र बलप्रयोग करून किंवा फौजदारीपात्र बलप्रदर्शन करून त्याला दहशत घालील अथवा याप्रमाणे दहशत घालण्याचा प्रयत्न करील, त्याला सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**कोणताही कायदेशीर अधिकार वापरण्यास भाग पाडण्याच्या किंवा निरुद्ध करण्याच्या उद्देशाने राष्ट्रपती, राज्यपाल इत्यादींवर हमला करणे.**

[१०][१२४क. जो कोणी [११] * * * [१२][भारतात] [१३] * * * विधित: संस्थापित झालेल्या शासनाबद्दल एकतर तोंडी किंवा लेखी शब्दांद्वारे अथवा खुणांद्वारे अथवा दृश्य प्रतिरूपणाद्वारे अथवा अन्य प्रकारे द्वेषाची किंवा तुच्छतेची भावना निर्माण करील किंवा निर्माण करण्याचा प्रयत्न करील अथवा अप्रीतीची भावना चेतवील अथवा चेतवण्याचा प्रयत्न करील त्याला, [१४] [आजीव कारावासाची] शिक्षा होईल व तिच्या जोडीला त्याच्यावर द्रव्यदंड लादता येईल अथवा तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व तिच्या जोडीला त्याच्यावर द्रव्यदंड लादता येईल अथवा नुसती द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**प्रजाक्षोभन.**

**स्पष्टीकरण १.**—"अप्रीति" या शब्दप्रयोगात द्रोहभावनेचा व शत्रुत्वाच्या भावनांचा समावेश आहे.

**स्पष्टीकरण २.**—शासनाच्या उपाययोजनांमध्ये कायदेशीर मार्गांनी फेरबदल घडवून आणण्याच्या दृष्टीने, द्वेषाची, तुच्छतेची किंवा अप्रीतीची भावना न चेतवता किंवा चेतवण्याचा प्रयत्न न करता त्यांच्याबद्दल नापसंती व्यक्त करण्यासाठी केलेली टीका या कलमाखाली अपराध ठरत नाही.

**स्पष्टीकरण ३.**—द्वेषाची, तुच्छतेची किंवा अप्रीतीची भावना न चेतवता किंवा चेतवण्याचा प्रयत्न न करता शासनाच्या प्रशासकीय किंवा अन्य कारवाईबद्दल नापसंती व्यक्त करण्यासाठी केलेली टीका या कलमाखाली अपराध ठरत नाही.]

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'क्वीन' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'गव्हर्नर जनरल' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

३ अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांताचा" याऐवजी हे दाखल करण्यात आले. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "प्रेसिडेन्सीचा" याऐवजी "प्रांताचा" हा शब्द दाखल करण्यात आला होता.

४. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'गव्हर्नर' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

५. अनुकूलन आदेश, १९५६ द्वारे "किंवा राजप्रमुख" हे शब्द वगळण्यात आले.

६. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "किंवा लेफ्टनंट गव्हर्नर" हे शब्द वगळण्यात आले.

७. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे "किंवा भारताच्या गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलचा सदस्य" हा मजकूर वगळण्यात आला.

८. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "किंवा कोणत्याही प्रेसिडेन्सीच्या कौन्सिलचा" हा मजकूर वगळण्यात आला.

९. क्रमशः अनुकूलन आदेश, १९३७, अनुकूलन आदेश, १९४८ आणि अनुकूलन आदेश, १९५० यांद्वारे, "गव्हनर जनरल, गव्हर्नर, लेफ्टनंट गव्हर्नर किंवा कौन्सिलचा सदस्य" हे मूळ शब्द वरीलप्रमाणे विशोधित करण्यात आले आहेत.

१०. १८९८ चा अधिनियम ४–कलम ४ द्वारे मूळ कलम १२४क ऐवजी हे दाखल करण्यात आले. हे मूळ कलम १२४क १८७० चा अधिनियम २७–कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले होते.

११. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "हर मॅजेस्टीबद्दल किंवा" हे शब्द वगळण्यात आले. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "मॅजेस्टीबद्दल" यानंतर समाविष्ट करण्यात आलेले "किंवा क्राउन रिप्रेझेंटेटिव्ह-बद्दल" हे शब्द अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे वगळण्यात आले होते.

१२. क्रमश: अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे किंवा 'ब्रिटिश इंडियात' याऐवजी वरील शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

१३. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे घातलेले "किंवा ब्रिटिशमध्ये" हे शब्द अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे वगळण्यात आले.

१४. १९५५ चा अधिनियम २६–कलम ११७ व अनुसूची यांद्वारे "जन्मठेप काळ्या पाण्याची किंवा कोणत्याही कमी मुदतीच्या काळ्या पाण्याची" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

भारत सरकारशी सख्याचे संबंध असलेल्या, कोणत्याही आशियायी सत्ते- विरुद्ध युद्ध करणे.

**१२५.** जो कोणी [1][भारत सरकारशी] सख्याचे किंवा शांततेचे संबंध असलेल्या कोणत्याही आशियायी सत्तेच्या शासनाविरुद्ध युद्ध करील किंवा असे युद्ध करण्याचा प्रयत्न करील किंवा असे युद्ध करण्यास अपप्रेरणा देईल त्याला, [2][आजीव कारावासाची] शिक्षा होईल व तिच्या जोडीला त्याच्यावर द्रव्यदंड लादता येईल, किंवा सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल व तिच्या जोडीला त्याच्यावर द्रव्यदंड लादता येईल, किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

भारत सरकारशी शांततेचे संबंध असलेल्या कोणत्याही सत्तेच्या राज्यक्षेत्रांत लूटमार करणे.

**१२६.** जो कोणी [1][भारत सरकारशी] मैत्रीचे किंवा शांततेचे संबंध असलेल्या कोणत्याही सत्तेच्या राज्यक्षेत्रांमध्ये लूटमार करील किंवा लूटमार करण्याची तयारी करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल आणि द्रव्यदंड व अशी लूटमार करताना वापरलेल्या किंवा वापरण्याचे योजलेल्या अथवा अशा लूटमारीत मिळालेल्या कोणत्याही मालमत्तेचे समपहरण यांसदेखील तो पात्र असेल.

१२५ व १२६ या कलमांमध्ये उल्लेखिल्याप्रमाणे युद्धात किंवा लूट- मारीत हस्तगत झालेली मालमत्ता स्वीकारणे.

**१२७.** जो कोणी एखादी मालमत्ता १२५ व १२६ या कलमांमध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणताही अपराध करताना हस्तगत करण्यात आलेली आहे हे माहीत असताना ती स्वीकारील त्यास, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि द्रव्यदंड व याप्रमाणे स्वीकारलेल्या मालमत्तेचे समपहरण यांनाही तो पात्र होईल.

राज्यकैद्याला किंवा युद्धकैद्याला पळून जाण्यास लोक सेवकाने इच्छापूर्वक मुभा देणे.

**१२८.** जो कोणी लोक सेवक असून आणि स्वत:कडे कोणत्याही राज्यकैद्याची किंवा युद्धकैद्याची हवालत असताना, जेथे अशा कैद्याला बंदिवासात ठेवले असेल अशा कोणत्याही ठिकाणाहून अशा कैद्याला पळून जाण्यास इच्छापूर्वक मुभा देईल त्यास, [2][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

लोक सेवकाने हयगयीने अशा कैद्याला पळून जाऊ देणे.

**१२९.** जो कोणी लोक सेवक असून आणि स्वत:कडे कोणत्याही राज्यकैद्याची किंवा युद्धकैद्याची हवालत असताना, जेथे अशा कैद्याला बंदिवासात ठेवले असेल अशा कोणत्याही बंदिवासाच्या ठिकाणाहून अशा कैद्याला हयगयीने पळून जाऊ देईल त्यास, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची साध्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

अशा कैद्याला पळून जाण्यास मदत करणे किंवा अवैधपणे सोडवणे किंवा आसरा देणे.

**१३०.** जो कोणी जाणीवपूर्वक कोणत्याही राज्यकैद्याला किंवा युद्धकैद्याला कायदेशीर हवालतीतून पळून जाण्यास मदत करील किंवा सहाय्य देईल, अथवा अशा कोणत्याही कैद्याला अवैधपणे सोडवील किंवा सोडवण्याचा प्रयत्न करील, अथवा कायदेशीर हवालतीतून पळालेल्या अशा कोणत्याही कैद्यास आसरा देईल किंवा लपवील, अथवा असा कैदी पुन्हा गिरफदार होत असता त्यास प्रतिकार करील किंवा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करील त्यास, [2][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**—ज्याला [3][भारतात] विवक्षित सीमांच्या आत मुक्त संचारासाठी पारोलवर परवानगी देण्यात आली आहे तो राज्यकैदी किंवा युद्धकैदी जर त्याला ज्या सीमांच्या आत मुक्त संचाराची मुभा आहे त्यांच्या पलिकडे गेला तर, तो कायदेशीर हवालतीतून पळाला असे म्हटले जाते.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'क्वीन' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. १९५५ चा अधिनियम, २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

३. क्रमश: अनुकूलन आदेश, १९४८, अनकूलन आदेश, १९५० व १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' हा शब्दोल्लेख वरीलप्रमाणे विशोधित केला.

## प्रकरण ७ वे

## भूसेना, [1][नौसेना आणि वायुसेना] यांसंबंधीच्या अपराधांविषयी

१३१. जो कोणी [2][भारत सरकारच्या] भूसेनेतील [1][, नौसेनेतील किंवा वायुसेनेतील]अधिकाऱ्याला, भूसैनिकाला, [1][नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला] बंड करण्यास अपप्रेरणा देईल अथवा अशा कोणत्याही अधिकाऱ्याला, भूसैनिकाला, [1][नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला] त्याच्या निष्ठेपासून किंवा त्याच्या कर्तव्यापासून विचलित करण्याचा प्रयत्न करील त्याला, [3][आजीव कारावासाची] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल. **लष्करी बंडास अपप्रेरणा देणे अथवा भूसैनिक, नौसैनिक किंवा वायुसैनिक याला त्याच्या कर्तव्यापासून विचलित करण्याचा प्रयत्न करणे.**

[4][**स्पष्टीकरण.**—या कलमांमध्ये, "अधिकारी" [1][, "भूसैनिक", [5]["नौसैनिक"] आणि "वायुसैनिक"] या शब्दांमध्ये, प्रकरणपरत्वे, [6][भूसेना अधिनियम,] [7]['भूसेना अधिनियम, १९५०' (१९५० चा ४६)], [5]['नौसेना अनुशासन अधिनियम'], [8]** [5]['भारतीय नौसेना (अनुशासन) अधिनियम, १९३४' (१९३४ चा ३४) [9] [10]**** [11]['वायुसेना अधिनियम' किंवा [12]['वायुसेना अधिनियम, १९५०' (१९५० चा ४५)] ] यास अधीन असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.]

१३२. जो कोणी [13][भारत सरकारच्या] भूसेनेतील [1][, नौसेनेतील किंवा वायुसेनेतील] अधिकाऱ्याला, भूसैनिकाला, [1][नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला] बंड करण्यास अपप्रेरणा देईल त्याला, त्या अपप्रेरणाचा परिणाम म्हणून बंड करण्यात आले तर, मृत्यूची किंवा [3][आजीव कारावासाची] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल. **लष्करी बंडाचे अपप्रेरण—त्याच्या परिणामी बंड घडून आल्यास.**

१३३. जो कोणी [2][भारत सरकारच्या] भूसेनेतील [1][, नौसेनेतील किंवा वायुसेनेतील] अधिकाऱ्याला, भूसैनिकाला, [1][नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला] कोणताही वरिष्ठ अधिकारी आपले पदकार्य बजावत असताना त्याच्यावर हमला करण्यास अपप्रेरणा देईल त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल. **भूसैनिकाला, नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला, त्याचा वरिष्ठ अधिकारी आपले पदकार्य बजावत असताना त्याच्यावर हमला करण्यास अपप्रेरणा देणे.**

---

१. १९२७ चा अधिनियम १०-कलम २ व १ ली अनुसूची यांद्वारे मूळ मजकुराऐवजी हे दाखल करण्यात आले.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'क्वीन' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

३. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

४. १८७०चा अधिनियम २७-कलम ६ द्वारे समाविष्ट केले.

५. १९३४ चा अधिनियम ३५-कलम २ व अनुसूची यांद्वारे समाविष्ट केले.

६. १९२७ चा अधिनियम १०-कलम २ व १ ली अनुसूची यांद्वारे "हर मॅजेस्टीच्या भूसेनेचे अधिक चांगले नियमन करण्यासाठी असलेली युद्ध नियमावली किंवा १८६९ चा अधिनियम क्रमांक ५ यामध्ये अंतर्भूत असलेली युद्ध नियमावली" याऐवजी हे दाखल केले.

७. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भारतीय भूसेना अधिनियम, १९११" याऐवजी हे दाखल केले.

८. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "किंवा" हा शब्द वगळण्यात आला.

९. आता नौसेना अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६२) पहा.

१०. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "याद्वारे विशोधित केलेला तो अधिनियम" हा मजकूर वगळण्यात आला.

११. १९३२ चा अधिनियम १४-कलम १३० व अनुसूची यांद्वारे "किंवा वायुसेना अधिनियम" याऐवजी दाखल करण्यात आले.

१२. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भारतीय वायुसेना अधिनियम, १९३२" याऐवजी दाखल करण्यात आले.

१३. क्रमशः अनुकलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० व १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' हा शब्दोल्लेख वरीलप्रमाणे विशोधित केला.

असा हमला करण्याचे अपप्रेरण— हमला घडून आल्यास.

१३४. जो कोणी [१][भारत सरकारच्या] भूसेनेतील [२][, नौसेनेतील किंवा वायुसेनेतील] अधिकाऱ्याला, भूसैनिकाला [२][, नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला] कोणताही वरिष्ठ अधिकारी आपले पदकार्य बजावत असताना त्याच्यावर हमला करण्यास अपप्रेरणा देईल त्याला, त्या अपप्रेरणाच्या परिणामी हमला करण्यात आला तर, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

भूसैनिकाला, नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला चाकरी सोडून पळून जाण्यास अपप्रेरणा देणे.

१३५. जो कोणी [१][भारत सरकारच्या] भूसेनेतील [२][, नौसेनेतील किंवा वायुसेनेतील] कोणत्याही अधिकाऱ्याला, भूसैनिकाला [२][, नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला] चाकरी सोडून पळून जाण्यास अपप्रेरणा देईल त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

पलायिताला आसरा देणे.

१३६. [१][भारत सरकारच्या] भूसेनेतील [२][, नौसेनेतील किंवा वायुसेनेतील] एखादा अधिकारी, भूसैनिक [२][, नौसैनिक किंवा वायुसैनिक] पळून आलेला आहे हे माहीत असताना किंवा तसे समजण्यास कारण असताना, यात यापुढे नमूद केलेल्या अपवादाव्यतिरिक्त एरव्ही जो कोणी अशा अधिकाऱ्याला, भूसैनिकाला [२][, नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला] आसरा देईल त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

अपवाद.—पत्नीने तिच्या पतीला आसरा दिलेला असेल त्या प्रकरणाला हा उपबंध लागू होत नाही.

व्यापारी जलयानावर नौकाधिपतीच्या हयगयीमुळे पलायित इसम लपून रहाणे.

१३७. [१][भारत सरकारच्या] भूसेनेतील [२][, नौसेनेतील किंवा वायुसेनेतील] कोणताही पलायित इसम ज्या व्यापारी जलयानावर लपलेला असेल त्याचा नौकाधिपती किंवा हुकूमतदार व्यक्ती हे अशा लपून राहण्याबाबत अज्ञानी असले तरी, असा नौकाधिपती किंवा हुकूमतदार म्हणून असलेल्या आपल्या कर्तव्यात काही हलगर्जीपणा झाला नसता किंवा जलयानावर अनुशासनाची काही उणीव राहून गेली नसती तर त्यांना अशा लपून राहण्याचे वृत्त कळले असते असे असल्यास, तो/ती जास्तीत जास्त पाचशे रुपये इतक्या दंडास पात्र होईल.

भूसैनिकाच्या, नौसैनिकाच्या किंवा वायुसैनिकाच्या शिरजोरीच्या कृतीस अपप्रेरणा देणे.

१३८. जो कोणी [१][भारत सरकारच्या] भूसेनेतील [२][, नौसेनेतील किंवा वायुसेनेतील] कोणत्याही अधिकाऱ्याला, भूसैनिकाला [२][, नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला] जी कृती शिरजोरीची ठरेल हे स्वतःला माहीत असून अशी कृती करण्यास अपप्रेरणा देईल त्याला, त्या अपप्रेरणेच्या परिणामी अशी शिरजोरीची कृती करण्यात आली तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

१३८क. [पूर्ववर्ती कलमे भारतीय सागरी सेवेला लागू होणे]. 'विशोधन अधिनियम, १९३४' (१९३४ चा ३५)-कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

विवक्षित अधिनियमांना अधीन असलेल्या व्यक्ती.

१३९. [३][भूसेना अधिनियम, [४]['भूसेना अधिनियम, १९५०' (१९५० चा ४६)], 'नौसेना अनुशासन अधिनियम', [५][ [६]* * * [७]['भारतीय नौसेना (अनुशासन) अधिनियम, १९३४' (१९३४ चा ३४)] [८]* * * [९]['वायुसेना अधिनियम' किंवा [१०]['वायुसेना अधिनियम, १९५०' (१९५० चा ४५)]]] यास अधीन असलेली कोणतीही व्यक्ती या प्रकरणात व्याख्या केलेल्यांपैकी कोणत्याही अपराधांबद्दल या संहितेखाली शिक्षेस पात्र होत नाही.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'क्वीन' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. १९२७ चा अधिनियम १०-कलम २ व १ ली अनुसूची याद्वारे मूळ मजकुराऐवजी हे दाखल करण्यात आले.

३. १९२७ चा अधिनियम १०-कलम २ व १ली अनुसूची यांद्वारे "क्वीनच्या भूसेनेसाठी किंवा नौसेनेसाठी असलेली अथवा अशा भूसेनेच्या किंवा नौसेनेच्या कोणत्याही भागासाठी असलेली कोणतीही सेना नियमावली" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

४. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भारतीय भूसेना अधिनियम, १९११" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

५. १९३४ चा अधिनियम ३५-कलम २ व अनुसूची यांद्वारे समाविष्ट करण्यात आले.

६. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "किंवा" हा शब्द वगळण्यात आला.

७. आता, नौसेना अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६२) पहा.

८. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "याद्वारे विशोधित केलेला तो अधिनियम" हा मजकूर वगळण्यात आला.

९. १९३२ चा अधिनियम १४-कलम १३० व अनुसूची यांद्वारे "किंवा वायुसेना अधिनियम" हा मजकूर वगळण्यात आला.

१०. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भारतीय वायुसेना अधिनियम, १९३२" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

१४०. स्वत: [1][भारत सरकारच्या] भूसैनिकी [2][,नौसैनिकी किंवा वायुसैनिकी] सेवेतील भूसैनिक [3][, नौसैनिक किंवा वायुसैनिक] नसताना आपण असा भूसैनिक [3][, नौसैनिक किंवा वायुसैनिक] आहोत असा समज व्हावा या उद्देशाने जो कोणी असा भूसैनिक [3][, नौसैनिक किंवा वायुसैनिक] बापरतो तशासारखी कोणतीही वर्दी परिधान करील अथवा तशासारखे कोणतेही ओळखचिन्ह जवळ बाळगील त्याला, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. भूसैनिक, नौसैनिक किंवा वायुसैनिक वापरतो तशी वर्दी परिधान करणे अथवा तसे ओळखचिन्ह जवळ बाळगणे.

## प्रकरण ८ वे

## सार्वजनिक प्रशांततेच्या विरोधी अपराधांविषयी

१४१. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र जमल्या असून त्या जमावातील घटकव्यक्तींचे समान उद्दिष्ट पुढीलप्रमाणे असेल तर, त्या जमावास "बेकायदेशीर जमाव" असे संबोधण्यात येते, ते असे :— बेकायदेशीर जमाव.

**पहिले.**—[4][केंद्रीय किंवा कोणतेही राज्य शासन अथवा संसद किंवा कोणत्याही राज्याचे विधानमंडळ] यास अथवा कोणताही लोक सेवक असा लोक सेवक म्हणून आपल्या कायदेशीर अधिकाराचा वापर करत असता त्यास फौजदारीपात्र बलप्रयोगाद्वारे किंवा फौजदारीपात्र बलप्रदर्शनाद्वारे दहशत घालणे; किंवा

**दुसरे.**—कोणत्याही कायद्याच्या किंवा कोणत्याही वैध आदेशिकेच्या अंमलबजावणीला प्रतिकार करणे; किंवा

**तिसरे.**—कोणतीही आगळीक किंवा फौजदारीपात्र अतिक्रमण किंवा अन्य अपराध करणे; किंवा

**चवथे.**—एखाद्या व्यक्तीबाबत फौजदारीपात्र बलप्रयोग करून किंवा फौजदारीपात्र बलप्रदर्शन करून त्याद्वारे, तिच्याकडे ज्या मालमत्तेचा कब्जा असेल तिचा कब्जा तिच्याकडून काढून घेणे किंवा मिळवणे अथवा तिला असलेला किंवा ती उपभोगत असलेला मार्गाधिकार किंवा पाणी-वापराचा हक्क किंवा अन्य अमूर्त हक्क यापासून तिला वंचित करणे अथवा कोणताही हक्क किंवा मानीव हक्क बजावणे; किंवा

**पाचवे.**—फौजदारीपात्र बलप्रयोग करून किंवा फौजदारीपात्र बलप्रदर्शन करून त्याद्वारे, कोणत्याही व्यक्तीला ती जे करण्यास विधित: बद्ध नाही ते करण्यास अथवा ती जे करण्यास विधित: हक्कदार आहे ते टाळण्यास भाग पाडणे.

**स्पष्टीकरण.**—जो जमाव, तो जमला त्यावेळेस बेकायदेशीर नव्हता तो मागाहून बेकायदेशीर जमाव होऊ शकतो.

१४२. ज्यांमुळे कोणताही जमाव बेकायदेशीर जमाव ठरतो त्या तथ्यांची जाणीव असताना जो कोणी उद्देशपूर्वक त्या जमावात सामील होतो किंवा त्यात थांबून राहतो तो बेकायदेशीर जमावाचा घटक असल्याचे म्हटले जाते. बेकायदेशीर जमावाचा घटक असणे.

१४३. जो कोणी बेकायदेशीर जमावाचा घटक होईल त्यास, सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. शिक्षा.

१४४. कोणतेही प्राणघातक हत्यार किंवा जी वस्तू हल्ल्याचे हत्यार म्हणून वापरली असता मृत्यूस कारण होणे संभवनीय आहे अशी कोणतीही वस्तू यानिशी सज्ज होऊन जो कोणी बेकायदेशीर जमावाचा घटक होईल त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होऊन बेकायदेशीर जमावात सामील होणे.

१४५. एखाद्या बेकायदेशीर जमावास पांगण्याचा आदेश विधित: विहित केलेल्या रीतीने देण्यात आला आहे हे माहीत असताना जो कोणी त्यात सामील होईल किंवा त्यात थांबून राहील त्यास, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. बेकायदेशीर जमावाला पांगण्याचा आदेश झाला असल्याचे माहीत असूनही त्यात सामील होणे किंवा थांबून राहणे.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'क्वीन' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. १९२७ चा अधिनियम १०-कलम २ व पहिली अनुसूची यांद्वारे मूळ मजकुराऐवजी हे दाखल करण्यात आले.

३. किता—कलम २ व पहिली अनुसूची यांद्वारे समाविष्ट करण्यात आले.

४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "केंद्रीय किंवा कोणतेही प्रांतिक शासन किंवा विधानमंडळ" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

दंगा करणे.

१४६. जेव्हा केव्हा बेकायदेशीर जमावाकडून किंवा त्याच्या कोणत्याही घटकाकडून अशा जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी बलप्रयोग किंवा हिंसाचार होतो तेव्हा, अशा जमावाचा प्रत्येक घटक दंग्याच्या अपराधाबद्दल दोषी असतो.

दंगा करण्याबद्दल शिक्षा.

१४७. जो कोणी दंगा करण्याबद्दल दोषी असेल त्यास दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होऊन दंगा करणे.

१४८. एखाद्या प्राणघातक हत्यारानिशी किंवा जी वस्तू हल्ल्याचे हत्यार म्हणून वापरली असता मृत्यूस कारण होणे संभवनीय आहे अशा कोणत्याही वस्तूःनिशी सज्ज होऊन दंगा केल्याबद्दल जो कोणी दोषी असेल त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

समान उद्दिष्ट साधण्यासाठी केलेल्या अपराधाबद्दल बेकायदेशीर जमावाचा प्रत्येक घटक दोषी असणे.

१४९. बेकायदेशीर जमावाच्या कोणत्याही घटकाकडून त्या जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी एखादा अपराध किंवा ते उद्दिष्ट साधण्यासाठी जो अपराध घडणे संभवनीय असल्याची त्या जमावातील घटकव्यक्तींना जाणीव होती असा एखादा अपराध घडला तर, तो अपराध घडण्याच्या वेळी जी जी व्यक्ती त्या जमावाचा घटक होती अशी प्रत्येक व्यक्ती त्या अपराधाबद्दल दोषी असते.

बेकायदेशीर जमावात सामील होण्यासाठी भाडोत्री व्यक्ती गोळा करणे किंवा भाडोत्री व्यक्ती गोळा करण्याकडे काणाडोळा करणे.

१५०. जो कोणी एखाद्या व्यक्तीला बेकायदेशीर जमावात सामील होण्यासाठी किंवा त्याचा घटक होण्यासाठी भाड्याने घेईल, त्यासाठी बांधून घेईल किंवा त्या कामी लावील अथवा असे भाड्याने घेणे किंवा बांधून घेणे किंवा कामी लावणे यास प्रोत्साहन देईल किंवा त्याकडे काणाडोळा करील तो अशा बेकायदेशीर जमावाचा घटक म्हणून आणि याप्रमाणे भाड्याने घेतल्यामुळे, बांधून घेतल्यामुळे किंवा कामी लावल्यामुळे त्याला अनुसरून अशी कोणतीही व्यक्ती अशा बेकायदेशीर जमावाचा घटक म्हणून जो कोणताही अपराध करील असा अपराध त्याने स्वतःच केलेला असावा त्याप्रमाणे त्याबद्दल शिक्षापात्र होईल.

पाच किंवा अधिक व्यक्तींच्या जमावाला पांगण्याचा आदेश मिळाल्यानंतर जाणीवपूर्वक त्यात सामील होणे किंवा थांबून राहणे.

१५१. ज्यामुळे सार्वजनिक शांतता बिघडणे संभवनीय आहे अशा, पाच किंवा अधिक व्यक्तींच्या कोणत्याही जमावाला पांगण्याबाबत विधितः आदेश मिळाल्यानंतर जो कोणी अशा जमावात जाणीवपूर्वक सामील होईल किंवा त्यातच थांबून राहील त्याला, सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरण.**—जर तो जमाव कलम १४१ च्या अर्थानुसार बेकायदेशीर जमाव असेल तर, अपराधी कलम १४५ खाली शिक्षापात्र होईल.

लोक सेवक दंगा इ. शमवीत असताना त्याच्यावर हमला करणे किंवा त्याला अटकाव करणे.

१५२. एखादा लोक सेवक बेकायदेशीर जमाव पांगवण्याचा अथवा दंगा किंवा दंगल शमवण्याचा प्रयास करून असा लोक सेवक म्हणून आपले कर्तव्य पार पाडत असताना, जो कोणी त्याच्यावर हमला करील किंवा हमला करण्याची धमकी देईल, अथवा अटकाव करील किंवा अटकाव करण्याचा प्रयत्न करील, अथवा अशा लोकसेवकाबाबत फौजदारीपात्र बलप्रयोग करील, किंवा करण्याची धमकी देईल, किंवा तसा प्रयत्न करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या करावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

दंगा घडवून आणण्याच्या उद्देशाने बेछूटपणे प्रक्षोभन करणे—दंगा घडून आल्यास; दंगा घडून न आल्यास

१५३. जी अवैध आहे अशी कोणतीही गोष्ट करून जेव्हा कोणी एखाद्या व्यक्तीला प्रक्षोभित करील आणि अशा प्रक्षोभनामुळे दंग्याचा अपराध घडावा असा त्याचा उद्देश असेल किंवा तसे घडणे संभवनीय असल्याची त्याला जाणीव असेल तेव्हा, अशा प्रक्षोभनाचा परिणाम म्हणून दंग्याचा अपराध घडला तर, त्याला एक वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील ; आणि जर दंग्याचा अपराध घडला नाही तर त्याला सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

धर्म, वंश, जन्मस्थान, निवास, भाषा, इ. कारणांवरून निरनिराळ्या गटां-मध्ये शत्रुत्व वाढवणे आणि एकोपा टिकण्यास बाधक अशा कृती करणे.

[1][१५३क. (१) जर कोणी,—

(क) तोंडी किंवा लेखी शब्दांद्वारे अथवा खुणांद्वारे अथवा दृश्य प्रतिरूपणांद्वारे अथवा अन्यप्रकारे, धर्म, वंश, जन्मस्थान, निवास, भाषा, जात किंवा जनसमाज यांच्या किंवा अन्य कोणत्याही कारणावरून निरनिराळे धार्मिक, वांशिक, भाषिक किंवा प्रादेशिक गट अगर जाती अगर जनसमाज यांच्यामध्ये तेढ अथवा शत्रुत्वाच्या, द्वेषाच्या किंवा दुष्टाव्याच्या भावना वाढवल्या किंवा वाढवण्याचे प्रयत्न केले तर, अथवा

---

१. १९६९ चा अधिनियम ३५-कलम २द्वारे पूर्वीच्या कलमाऐवजी हे दाखल करण्यात आले.

(ख) निरनिराळे धार्मिक, वांशिक, भाषिक किंवा प्रादेशिक गट अगर जाती अगर जनसमाज यांच्यामध्ये एकोपा टिकण्यास बाधक अशी आणि ज्यामुळे सार्वजनिक प्रशांतता बिघडते किंवा बिघडणे संभवनीय असते अशी कोणतीही कृती केली तर, [१][अथवा]

[१][(ग) कोणतेही अभ्यसन, हालचाल, कवाईत किंवा अन्य तत्सम क्रियाव्यापार यांचे संयोजन केले आणि अशा क्रियाव्यापारात भाग घेणाऱ्या व्यक्तींनी कोणत्याही धार्मिक, वांशिक, भाषिक किंवा प्रादेशिक गट अगर जात अगर जनसमाज यांच्याविरुद्ध फौजदारीपात्र बलप्रयोग किंवा हिंसाचार करावा अगर त्या कामी त्या शिकून तयार व्हाव्यात असा त्याचा उद्देश असेल अगर अशा क्रियाव्यापारात भाग घेणाऱ्या व्यक्ती त्याप्रमाणे त्यांच्याविरुद्ध फौजदारीपात्र बलप्रयोग किंवा हिंसाचार करतील किंवा त्या कामी त्या शिकून तयार होतील अशी त्याला जाणीव असेल तर, अथवा त्याप्रमाणे त्यांच्याविरुद्ध फौजदारीपात्र बलप्रयोग किंवा हिंसाचार करण्याच्या किंवा त्या कामी शिकून तयार होण्याच्या उद्देशाने किंवा अशा क्रियाव्यापारात भाग घेणाऱ्या व्यक्ती त्याप्रमाणे त्यांच्याविरुद्ध फौजदारीपात्र बलप्रयोग किंवा हिंसाचार करतील असा संभव असल्याच्या जाणिवेने अशा क्रियाव्यापारात भाग घेतला आणि कोणत्याही कारणास्तव का होईना, अशा क्रियाव्यापारामुळे असा धार्मिक, वांशिक, भाषिक किंवा प्रादेशिक गट अगर जात अगर जनसमाज याच्या सदस्यांमध्ये भीती किंवा घबराट किंवा असुरक्षिततेची भावना निर्माण झाली किंवा निर्माण होणे संभवनीय असेल तर,]

त्याला तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

(२) जो कोणी पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला एखादा अपराध एखाद्या उपासनास्थानी अथवा धार्मिक उपासना किंवा धार्मिक संस्कारविधी करण्यात गुंतलेल्या एखाद्या जमावामध्ये करील त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.] (उपासनास्थान, इ. ठिकाणी केलेला अपराध.)

[१][**१५३ख.** (१) तोंडी किंवा लेखी शब्दांद्वारे अथवा खुणांद्वारे अथवा दृश्य प्रतिरूपणांद्वारे अथवा अन्यप्रकारे जर कोणी,— (राष्ट्रीय एकात्मतेला बाधक असे अभ्यारोप, प्रपादने.)

(क) एखाद्या वर्गातील व्यक्ती एखाद्या धार्मिक, वांशिक, भाषिक किंवा प्रादेशिक गटाच्या अगर जातीच्या अगर जनसमाजाच्या सदस्य असल्याकारणाने त्या व्यक्ती कायद्याद्वारे प्रस्थापित झालेल्या अशा भारतीय संविधानाबाबत खरी श्रद्धा व निष्ठा बाळगू शकत नाहीत अथवा भारताची सार्वभौमता व एकात्मता उन्नत राखू शकत नाहीत असा अभ्यारोप केला किंवा प्रकाशित केला तर, अथवा

(ख) एखाद्या वर्गातील व्यक्ती एखाद्या धार्मिक, वांशिक, भाषिक किंवा प्रादेशिक गटाच्या अगर जातीच्या अगर जनसमाजाच्या सदस्य असल्याकारणाने त्यांना भारताचे नागरिक म्हणून त्यांचे हक्क नाकारले जावेत किंवा त्यांपासून त्यांना वंचित करावे असे प्रपादन केले, असा सल्ला दिला, उपदेश केला, प्रचार केला किंवा असे प्रकाशित केले तर, अथवा

(ग) एखाद्या वर्गातील व्यक्ती एखाद्या धार्मिक, वांशिक, भाषिक किंवा प्रादेशिक गटाच्या अगर जातीच्या अगर जनसमाजाच्या सदस्य असल्याकारणाने त्यांच्यावर असलेल्या आबंधना-संबंधी कोणतेही प्रपादन, सल्ला, युक्तिवाद किंवा आवाहन केले किंवा प्रकाशित केले, आणि असे प्रपादन, सल्ला, युक्तिवाद किंवा आवाहन यांमुळे असे सदस्य व इतर व्यक्ती यांच्या दरम्यान तेढ अथवा शत्रुत्वाच्या किंवा द्वेषाच्या किंवा दुष्टाव्याच्या भावना निर्माण झाल्या किंवा निर्माण होणे संभवनीय असले तर,

त्याला तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

(२) जो कोणी पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला असा एखादा अपराध कोणत्याही उपासनास्थानी अथवा धार्मिक उपासना किंवा धार्मिक संस्कारविधी करण्यात गुंतलेल्या एखाद्या जमावा-मध्ये करील त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.]

**१५४.** जेव्हाकेव्हा कोणताही बेकायदेशीर जमाव जमेल किंवा दंगा होईल तेव्हा, ज्या जमिनीवर असा जमाव जमला असेल किंवा दंगा झाला असेल तिचा मालक किंवा ताबाधारक आणि अशा जमिनीत हितसंबंध असलेला किंवा हितसंबंध असल्याचा दावा सांगणारा इसम यांना जर अशा अपराध घडत आहे किंवा घडलेला आहे हे माहीत असून किंवा तो घडणे संभवनीय आहे असे समजण्यास कारण असताना त्याने किंवा त्याचा अभिकर्ता किंवा व्यवस्थापक यांनी त्याच्या किंवा त्यांच्या शक्तीनुसार लवकरात लवकर सर्वांत जवळच्या पोलीस-ठाण्यावरील प्रधान अधिकाऱ्याला त्याची दखल दिली नाही आणि तो घडण्याच्या बेतात आहे असे समजण्यास त्याला किंवा त्यांना कारण असेल त्या (जेथे बेकायदेशीर जमाव जमतो त्या जमिनीचा मालक किंवा ताबाधारक.)

---

१. १९७२ चा अधिनियम ३१-कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

बाबतीत, त्याला प्रतिबंध करण्यासाठी त्याच्या किंवा त्यांच्या शक्तीनुसार सगळ्या कायदेशीर साधनांचा अवलंब केला नाही आणि तो घडून आला असता, दंगा शमवण्यासाठी किंवा बेकायदेशीर जमाव पांगवण्यासाठी त्याच्या किंवा त्यांच्या शक्तीनुसार सगळ्या कायदेशीर साधनांचा अवलंब केला नाही तर, ते जास्तीत जास्त एक हजार रुपये इतक्या द्रव्यदंडास पात्र होतील.

जिच्या हितार्थ दंगा घडवून आणला असेल त्या इसमाची शिक्षापात्रता.

१५५. ज्या जमिनीबाबत दंगा होतो अशा कोणत्याही जमिनीचा मालक किंवा ताबाधारक असलेल्या अशा अथवा अशा जमिनीत किंवा ज्यामुळे दंगा झाला अशा कोणत्याही तंटयाच्या विषयवस्तूत कोणताही हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या अथवा त्यापासून कोणताही फायदा स्वीकारणाऱ्या किंवा मिळणाऱ्या अशा कोणत्याही इसमाच्या हितासाठी किंवा त्याच्या वतीने जेव्हाकेव्हा दंगा होईल तेव्हा असा इसम, जर असा दंगा होणे संभवनीय आहे किंवा ज्याने असा दंगा केला तो बेकायदेशीर जमाव जमणे संभवनीय आहे असे समजण्यास कारण असताना त्याने किंवा त्याचा अभिकर्ता किंवा व्यवस्थापक यांनी अनुक्रमे असा जमाव जमण्याला किंवा दंगा होण्याला प्रतिबंध करण्यासाठी आणि तो दंगा शमविण्यासाठी व जमाव पांगवण्यासाठी त्याच्या किंवा त्यांच्या शक्तीनुसार सर्व कायदेशीर साधनांचा अवलंब केला नाही तर, द्रव्यदंडास पात्र होईल.

ज्याच्या हितार्थ दंगा घडवून आणला त्या मालकाच्या किंवा ताबाधारकाच्या अभिकर्त्याची शिक्षापात्रता.

१५६. ज्या जमिनीबाबत दंगा होतो अशा कोणत्याही जमिनीचा मालक किंवा ताबाधारक असलेल्या अशा अथवा अशा जमिनीत किंवा ज्यामुळे दंगा झाला अशा कोणत्याही तंटयाच्या विषयवस्तूत कोणताही हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या अथवा त्यापासून कोणताही फायदा स्वीकारणाऱ्या किंवा मिळणाऱ्या अशा कोणत्याही इसमाच्या हितासाठी किंवा त्याच्या वतीने जेव्हाकेव्हा दंगा होईल तेव्हा,

अशा इसमाचा अभिकर्ता किंवा व्यवस्थापक, जर असा दंगा होणे संभवनीय आहे किंवा ज्याने असा दंगा केला तो बेकायदेशीर जमाव जमणे संभवनीय आहे असे समजण्यास कारण असताना अशा अभिकर्त्याने किंवा व्यवस्थापकाने असा जमाव जमण्याला किंवा दंगा होण्याला प्रतिबंध करण्यासाठी आणि तो दंगा शमवण्यासाठी व जमाव पांगवण्यासाठी त्याच्या शक्तीनुसार सर्व कायदेशीर साधनांचा अवलंब केला नाही तर, द्रव्यदंडास पात्र होईल.

बेकायदेशीर जमावासाठी गोळा केलेल्या भाडोत्री व्यक्तींना आसरा देणे.

१५७. जो कोणी स्वतःच्या भोगवटयातील किंवा अभिरक्षेतील किंवा स्वतःच्या नियंत्रणाखालील कोणत्याही घरात किंवा वास्तूत कोणाही व्यक्तींना, अशा व्यक्ती एखाद्या बेकायदेशीर जमावात सामील होण्यासाठी किंवा त्या जमावातील घटक होण्यासाठी भाडयाने घेतलेल्या आहेत, बांधून घेतलेल्या आहेत किंवा त्याकामी लावलेल्या आहेत अथवा भाडयाने घेतल्या जाण्याच्या, बांधून घेतल्या जाण्याच्या किंवा त्याकामी लावल्या जाण्याच्या बेतात आहेत हे माहीत असताना आश्रय देईल, त्यांचे स्वागत करील किंवा त्यांना जमवील त्याला, सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

बेकायदेशीर जमावात किंवा दंग्यात सहभागी होण्यासाठी भाडोत्री होणे;
किंवा शस्त्र-सज्ज होऊन जाणे.

१५८. जो कोणी कलम १४१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणतीही कृती करण्यासाठी किंवा कृती करण्याच्या कामी साहाय्य करण्यासाठी स्वतःला बांधून घेईल किंवा भाडयाने घेतला जाईल अथवा त्यासाठी भाडोत्री म्हणून जाण्याची किंवा स्वतःला बांधून घेण्याची तयारी दर्शवील किंवा तसा प्रयत्न करील त्याला, सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील,

आणि जो कोणी पूर्वोक्ताप्रमाणे बांधला गेला किंवा भाडयाने घेतला गेला असून, कोणत्याही प्राणघातक हत्यारानिशी किंवा हल्ल्याचे हत्यार म्हणून वापरली असता मृत्यूस कारण होण्याचा संभव आहे अशा कोणत्याही वस्तूनिशी सज्ज होऊन जाईल अथवा तसे सज्ज होऊन जाण्यास स्वतःला बांधून घेईल किंवा त्यास तयारी दर्शवील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

दंगल.

१५९. जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी मारामारी करून सार्वजनिक शांतता बिघडवतात तेव्हा, त्यांनी "दंगल केली" असे म्हटले जाते.

दंगल करण्याबद्दल शिक्षा.

१६०. जो कोणी दंगल करील त्याला एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

## प्रकरण ९ वे

## लोक सेवकांकडून किंवा त्यांच्यासंबंधी घडणाऱ्या अपराधांविषयी

लोक सेवकाने पदीय कार्याच्या बाबतीत वैध पारिश्रमिकाहून अन्य परितोषण घेणे.

१६१. लोकसेवक असलेला किंवा होणे अपेक्षित असलेला जो कोणी, कोणतेही पदीय कार्य करण्याबद्दल किंवा करण्यापासून परावृत्त राहण्याबद्दल अथवा आपले पदीय कार्याधिकार वापरताना कोणत्याही व्यक्तीवर कृपा किंवा अवकृपा करण्याबद्दल किंवा करण्यापासून परावृत्त राहण्याबद्दल अथवा [1][केंद्रीय किंवा कोणतेही राज्य शासन किंवा संसद किंवा कोणत्याही राज्याचे विधानमंडळ] यांच्या संबंधात, [2][अगर कलम २१ मध्ये निर्देशिलेले कोणतेही स्थानिक प्राधिकरण, निगम किंवा सरकारी

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "केंद्रीय किंवा कोणतेही प्रांतिक शासन किंवा विधान मंडळ" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

२. १९६४ चा अधिनियम ४०-कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

कंपनी] यांच्या संबंधात, अगर लोक सेवक या नात्याने कोणताही लोक सेवक यांच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीवर कसलाही उपकार किंवा अपकार करण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षिसी म्हणून वैध पारिश्रमिकाहून अन्य कोणत्याही प्रकारचे परितोषण स्वतःकरता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरता कोणत्याही व्यक्तीकडून स्वीकारील किंवा मिळवील अथवा स्वीकारण्याचे कबूल करील किंवा मिळवण्याचा प्रयत्न करील त्यास, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरणे.**—"लोकसेवक होणे अपेक्षित असलेला." अधिकारपदावर येणे अपेक्षित नसलेल्या एखाद्या व्यक्तीने जर इतरांची, आपण अधिकारपदावर येण्याच्या बेतात आहोत आणि त्यानंतर आपण त्यांची सेवा करणार आहोत अशी भ्रामक समजूत करून देऊन परितोषण मिळवले तर, ती व्यक्ती ठकवणूक केल्याबद्दल दोषी होऊ शकेल, पण ती या कलमात व्याख्या केलेल्या अपराधाबद्दल दोषी नाही.

"परितोषण." "परितोषण" हा शब्द, आर्थिक परितोषणापुरता किंवा पैशात मूल्य करता येण्यासारख्या परितोषणापुरता मर्यादित नाही.

"वैध पारिश्रमिक." "वैध पारिश्रमिक" हे शब्द, लोक सेवक कायदेशीरपणे मागू शकतो अशा पारिश्रमिकापुरते मर्यादित नाहीत, तर त्यांत, तो ज्या शासनाची सेवा करत आहे त्याने त्याला जे स्वीकारण्यास परवानगी दिली असेल त्या सर्व पारिश्रमिकाचा समावेश होतो.

"करण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षिशी." जे करणे आपल्याला उद्देशित नाही किंवा आपण करण्याच्या स्थितीत नाही किंवा आपण केलेले नाही त्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षिशी म्हणून परितोषण स्वीकारणारी व्यक्ती या शब्दांच्या कक्षेत येते.

**उदाहरणे**

(क) 'क' हा मुन्सफ 'य' या बँकव्यवसायीच्या बाजूने कज्जाचा निकाल दिल्याबद्दल बक्षिशी म्हणून 'य'कडून 'य'च्या बँकेत आपल्या भावासाठी एक पद मिळवतो. 'क' ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केला आहे.

(ख) [1][परकीय देशातील वाणिज्यदूताचे] पद धारण करणारा 'क' [2][त्या देशाच्या] प्रतिनिधीकडून एक लाख रुपये स्वीकारतो. कोणतेही विशिष्ट पदकार्य करण्याबद्दल किंवा करण्यापासून परावृत्त राहण्याबद्दल, अथवा [3][भारत सरकारच्या] संबंधात [2][त्या देशावर] कोणताही विशिष्ट उपकार करण्याबद्दल किंवा करण्याचा प्रयत्न करण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षिशी म्हणून 'क' ने ही रक्कम स्वीकारली असे दिसत नाही. पण आपले पदीय कार्याधिकार वापरताना [2][त्या देशावर] सर्वसाधारणपणे कृपा करण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षिशी म्हणून 'क' ने ती रक्कम स्वीकारली असे खचितच दिसते. 'क' ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केला आहे.

(ग) सरकारकडे 'क'चा वशिला असल्यामुळे 'य'ला किताब प्राप्त झाला असा 'क' हा लोक सेवक 'य'चा चुकीचा समज करून देतो आणि अशा प्रकारे या सेवेबद्दलची बक्षिशी म्हणून आपणांस पैसे देण्यास 'य'ला प्रवृत्त करतो. 'क' ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केला आहे.

**लोक सेवकावर प्रभाव पाडण्यासाठी भ्रष्ट किंवा अवैध मार्गाने परितोषण घेणे.**

१६२. एखाद्या लोक सेवकाला कोणतेही पदीय कार्य करण्यास किंवा करण्यापासून परावृत्त राहण्यास अथवा असा लोक सेवक म्हणून पदीय कार्याधिकार वापरताना कोणत्याही व्यक्तीवर कृपा किंवा अवकृपा करण्यास अथवा [4][केंद्रीय किंवा कोणतेही राज्य शासन किंवा संसद किंवा कोणत्याही राज्याचे विधानमंडळ] यांच्या संबंधात, [5][अगर कलम २१ मध्ये निर्देशिलेले कोणतेही स्थानिक प्राधिकरण, निगम किंवा सरकारी कंपनी] यांच्या संबंधात अगर लोकसेवक या नात्याने कोणताही लोकसेवक याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीवर कसलाही उपकार किंवा अपकार करण्यास भ्रष्ट किंवा अवैध मार्गाने प्रवृत्त करण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षिशी म्हणून कोणत्याही प्रकारचे परितोषण जो कोणी स्वतःकरता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरता कोणत्याही व्यक्तीकडून स्वीकारील किंवा मिळवील अथवा स्वीकारण्याचे कबूल करील किंवा मिळवण्याचा प्रयत्न करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्या तरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**लोक सेवकावर वैयक्तिक प्रभाव पाडण्यासाठी परितोषण घेणे.**

१६३. एखाद्या लोक सेवकाला कोणतेही पदीय कार्य करण्यास किंवा करण्यापासून परावृत्त राहण्यास अथवा असा लोक सेवक म्हणून पदीय कार्याधिकार वापरताना कोणत्याही व्यक्तीवर कृपा किंवा अवकृपा करण्यास अथवा [4][केंद्रीय किंवा कोणतेही राज्य शासन किंवा संसद किंवा कोणत्याही राज्याचे विधानमंडळ] यांच्या संबंधात [5][अगर कलम २१ मध्ये निर्देशिलेले कोणतेही स्थानिक प्राधिकरण, निगम किंवा सरकारी कंपनी] यांच्या संबंधात अगर लोक सेवक या नात्याने कोणताही लोक सेवक याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीवर कसलाही उपकार किंवा अपकार करण्यास वैयक्तिक प्रभाव पाडून प्रवृत्त करण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षिशी म्हणून कोणत्याही प्रकारचे परितोषण जो कोणी स्वतःकरता किंवा अन्य

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "दुय्यम सत्तेच्या कोर्टातील रेसिडेंटचे" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

२. कित्ता—द्वारे 'ती सत्ता' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

३. कित्ता—द्वारे 'ब्रिटिश सरकार' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "केंद्रीय किंवा कोणतेही प्रांतिक शासन किंवा विधानमंडळ" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

५. १९६४ चा अधिनियम ४०-कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

कोणत्याही व्यक्तीकरता कोणत्याही व्यक्तीकडून स्वीकारील त्यास, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची साध्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

### उदाहरण

न्यायाधीशासमोर एखादी बाजू मांडण्याबद्दल फी स्वीकारणारा अधिवक्ता; विज्ञापनकर्त्यांच्या सेवा व मागण्या प्रस्तुत करण्यासाठी शासनास उद्देशून लिहिलेल्या विज्ञापनाची मांडणी व दुरुस्ती करण्याबद्दल मेहेनताना घेणारी व्यक्ती शिक्षा ठोठावण्यात आलेल्या गुन्हेगाराच्या बाबतीत, त्याला शिक्षा ठोठावणे अन्यायाचे होते हे दाखवून देण्याकडे ज्यांचा रोख आहे अशी कथने शासनापुढे ठेवण्याबद्दल मेहनताना घेणारा अभिकर्ता—हे या कलमाच्या कक्षेत येत नाहीत, कारण ते वैयक्तिक प्रभाव पाडत नाहीत किंवा पाडल्याचे भासवत नाहीत.

कलम १६२ किंवा १६३ मध्ये व्याख्या केलेल्या अपराधांस लोक सेवकाने अपप्रेरण दिल्याबद्दल शिक्षा.

**१६४.** लगतपूर्वीच्या दोन कलमांत व्याख्या केलेल्यांपैकी कोणतातरी अपराध ज्याच्या संबंधात करण्यात आला आहे असा लोकसेवक असून जो कोणी त्या अपराधाला अपप्रेरणा देईल त्यास, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

### उदाहरण

'क' हा एक लोक सेवक आहे. एका विशिष्ट व्यक्तीला एक अधिकारपद मिळवून देण्यासाठी 'क' चा अनुनय करण्याबद्दल प्रलोभन म्हणून 'क' ची पत्नी 'ख' ही एक भेटवस्तू स्वीकारते. 'क' तिला तसे करण्यास अपप्रेरणा देतो. 'ख' ही जास्तीत जास्त एक वर्ष इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र आहे. 'क' हा तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र आहे.

लोक सेवकाने केलेल्या कार्यवाहीत किंवा व्यवहारात निबद्ध असलेल्या व्यक्तीकडून अशा लोक सेवकाने प्रतिफलाविना मूल्यवान् वस्तू मिळवणे.

**१६५.** जो कोणी लोक सेवक असून, त्याने जी कोणतीही कार्यवाही किंवा व्यवहार केला आहे किंवा तसे करण्याच्या बेतात तो आहे त्यात जी व्यक्ती निबद्ध होती किंवा आहे किंवा होण्याचा संभव आहे हे त्यास माहीत असेल,

अथवा, त्यांच्या स्वतःच्या किंवा तो ज्यास दुय्यम आहे अशा कोणत्याही लोक सेवकाच्या पदीय कार्याधिकारांशी जिचा संबंध असेल,

अथवा, याप्रमाणे निबद्ध असलेल्या व्यक्तीशी जी कोणतीही व्यक्ती हितसंबधित किंवा तिच्या नात्याची असल्याचे त्यास माहीत असेल,

तिच्याकडून कोणतीही मूल्यवान् वस्तू प्रतिफलाविना किंवा जे अपर्याप्त असल्याचे त्यास माहीत आहे अशा प्रतिफलादाखल स्वतःकरता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरता स्वीकारील किंवा मिळवील अथवा स्वीकारण्याचे कबूल करील किंवा मिळवण्याचा प्रयत्न करील,

त्यास [1][तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची,] किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

### उदाहरणे

(क्) 'क' हा जिल्हाधिकारी, ज्याचे जमाबंदीचे प्रकरण त्याच्यापुढे प्रलंबित आहे त्या 'य'चे घर भाड्याने घेतो. 'क' दरमहा पन्नास रुपये देईल असा करार होतो. सौदा जर सद्भावपूर्वक झाला असता तर दरमहा दोनशे रुपये देणे 'क' ला भाग पडले असते अशा प्रकारचे ते घर होते. 'क' ने पर्याप्त प्रतिफलाविना मूल्यवान् वस्तू मिळवली आहे.

(ख्) 'क' हा न्यायाधीश, ज्याचा कज्जा 'क' च्या न्यायालयात प्रलंबित आहे अशा 'य' कडून काही सरकारी वचनचिठ्ठ्या बाजारात त्या अधिमूल्याने विकल्या जात असताना अवमूल्याने विकत घेतो. 'क' ने पर्याप्त प्रतिफलाविना 'य' कडून मूल्यवान् वस्तू मिळवली आहे.

(ग्) खोटी साक्ष दिल्याच्या दोषारोपावरून 'य' च्या भावाला गिरफदार करण्यात येऊन त्याला 'क' या न्यायाधीशासमोर नेण्यात येते. 'क' हा बँकेतील भागपत्रे, बाजारात ती अवमूल्याने विकली जात असताना 'य' ला अधिमूल्याने विकतो. 'य' हा 'क' ला भागपत्रांबद्दल त्याप्रमाणे पैसे देतो. याप्रमाणे 'क' ने मिळवलेला पैसा म्हणजे त्याने पर्याप्त प्रतिफलाविना मिळवलेली मूल्यवान् वस्तू आहे.

---

१. १९५२ चा अधिनियम, ४६-कलम २ द्वारे "दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची साध्या करावासाची" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

[1][१६५क. कलम १६१ किंवा कलम १६५ खाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधास जो कोणी अपप्रेरणा देईल त्याला---मग त्या अपप्रेरणाचा परिणाम म्हणून अपराध घडो वा न घडो---तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.]

कलम १६१ किंवा कलम १६५ मध्ये व्याख्या केलेल्या अपराधांना अपप्रेरणा देण्याबद्दल शिक्षा.

१६६. जर कोणी लोक सेवक असून असा लोक सेवक म्हणून त्याने स्वत: कशाप्रकारे आचरण करावे याबाबतच्या कोणत्याही विधि निदेशाची जाणीवपूर्वक अवज्ञा केली असेल आणि अशा अवज्ञेमुळे कोणत्याही व्यक्तीला क्षती पोचवणे त्याला उद्देशित असेल किंवा तसे होण्यास आपण कारण होऊ याची त्यास जाणीव असेल तर, त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची साध्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

कोणत्याही व्यक्तीला क्षती पोचवण्याच्या उद्देशाने लोक सेवकाने कायद्याची अवज्ञा करणे.

### उदाहरण

'क' या अधिकाऱ्याला न्यायालयाने 'य' च्या बाजूने अधिघोषित केलेल्या हुकूमनाम्याची पूर्ती करण्यासाठी त्याची अंमलबजावणी म्हणून मालमत्ता ताब्यात घेण्यास विधित: निदेशित करण्यात आले असून, त्या विधि निदेशाची अवज्ञा झाल्यास आपणांकडून 'य' ला क्षती पोचणे संभवनीय असल्याचे माहीत असता 'क' जाणीवपूर्वक अवज्ञा करतो. 'क' ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केलेला आहे.

१६७. जर कोणी लोक सेवक असून आणि असा लोक सेवक म्हणून कोणताही दस्तऐवज तयार करण्याची किंवा त्याचा अनुवाद करण्याची जबाबदारी त्याच्यावर असून, जी रीत चुकीची असल्याचे त्याला माहीत आहे किंवा तसे तो समजतो तशा रीतीने त्या दस्तऐवजाची मांडणी करील किंवा त्याचा अनुवाद करील आणि त्याद्वारे कोणत्याही व्यक्तीला क्षती पोचावी असा त्याचा उद्देश असेल किंवा तशी क्षती त्यामुळे आपणांकडून पोचणे संभवनीय असल्याची त्याला जाणीव असेल तर, त्यास तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

क्षती पोचवण्याच्या उद्देशाने लोक सेवकाने चुकीच्या दस्त-ऐवजाची मांडणी करणे.

१६८. जो कोणी लोकसेवक असून आणि असा लोकसेवक म्हणून व्यापारधंदा न करण्यास तो विधित: बद्ध असताना व्यापारधंदा करील त्यास, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

लोक सेवकाने बेकायदेशीरपणे व्यापारधंदा करणे.

१६९. जो कोणी लोक सेवक असून आणि असा लोक सेवक म्हणून विवक्षित मालमत्ता खरेदी न करण्यास किंवा तीसाठी बोली न देण्यास विधित: बद्ध असून, स्वत:च्या नावाने किंवा अन्य व्यक्तीच्या नावाने अथवा इतरांसह संयुक्तपणे किंवा भागीत ती खरेदी करील किंवा तीसाठी बोली देईल त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची साध्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील; आणि मालमत्ता खरेदी केली असल्यास, ती अधिहरण केली जाईल.

लोक सेवकाने बेकायदेशीरपणे मालमत्ता विकत घेणे किंवा तीसाठी बोली देणे.

१७०. जो कोणी आपण लोक सेवक म्हणून कोणतेही विशिष्ट अधिकारपद धारण करत नाही हे माहीत असताना असे अधिकारपद धारण करण्याचा बहाणा करील अथवा असे अधिकारपद धारण करणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीची बतावणी करून तोतयेगिरी करील आणि अशा बनावट भूमिकेत असताना अशा पदाधिकाराच्या मिषाने कोणतीही कृती करील किंवा करण्याचा प्रयत्न करील त्यास, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

लोक सेवकाची बतावणी करून तोतयेगिरी करणे.

१७१. स्वत: लोक सेवकांच्या विवक्षित वर्गापैकी नसताना, आपण लोक सेवकांच्या त्या वर्गापैकी आहोत असा समज व्हावा या उद्देशाने किंवा तसा समज होणे संभवनीय आहे याची जाणीव असून जो कोणी, त्या वर्गातील लोक सेवक वापरतात तशासारखी वर्दी परिधान करील किंवा तशासारखे ओळखचिन्ह जवळ बाळगील त्याला, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

लोक सेवक वापरतो तशी वर्दी किंवा तसे ओळखचिन्ह कपटी उद्देशाने परिधान करणे किंवा जवळ बाळगणे.

## [2][प्रकरण ९ वे-क]

## निवडणुकींसंबंधीच्या अपराधांविषयी

१७१क. या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी---

[3][(क) "उमेदवार" याचा अर्थ, ज्या व्यक्तीला कोणत्याही निवडणुकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेले आहे ती व्यक्ती असा आहे;]

"उमेदवार," "निवडणूकविषयक हक्क" यांच्या व्याख्या.

---

१. १९५२ चा अधिनियम ४६-कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. १९२० चा अधिनियम ३९-कलम २ द्वारे प्रकरण ९ वे-क समाविष्ट करण्यात आले.

३. १९७५ चा अधिनियम ४०-कलम ९ द्वारे मूळ खंड (क) ऐवजी हे दाखल करण्यात आले.

(ख) "निवडणूकविषयक हक्क" याचा अर्थ, निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहण्याचा किंवा उभे न राहण्याचा अथवा आपली उमेदवारी मागे घेण्याचा अथवा मतदान करण्याचा किंवा मतदान करण्यापासून परावृत्त राहण्याचा एखाद्या व्यक्तीचा हक्क असा आहे.

लाचलुचपत.

**१७१ ख.** (१) जो कोणी—

(एक) कोणत्याही व्यक्तीला कोणताही निवडणूकविषयक हक्क वापरण्यासाठी तिला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करण्याच्या अथवा असा कोणताही हक्क वापरण्याबद्दल कोणत्याही व्यक्तीला बक्षिशी देण्याच्या हेतूने परितोषण देतो; अथवा,

(दोन) असा कोणताही हक्क वापरण्याबद्दल अथवा असा कोणताही हक्क वापरण्यासाठी अन्य कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करण्याबद्दल किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करण्याबद्दल बक्षिशी म्हणून कोणतेही परितोषण स्वत:करता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरता स्वीकारतो,

त्याने लाचलुचपतीचा अपराध केला असे होते :

परंतु, लोकधोरण जाहीर करणे किंवा लोकोपयोगी कारवाईचे वचन देणे हा या कलमाखाली अपराध होणार नाही.

(२) जी व्यक्ती एखादे परितोषण देऊ करील, किंवा देण्याचे कबूल करील, अथवा ते मिळवून देण्याची तयारी दर्शवील, किंवा तसा प्रयत्न करील ती परितोषण देते असे मानले जाईल.

(३) जी व्यक्ती एखादे परितोषण मिळवील किंवा स्वीकारण्याचे कबूल करील किंवा मिळवण्याचा प्रयत्न करील ती परितोषण स्वीकारते असे मानले जाईल, आणि जी व्यक्ती आपणांस जे करणे उद्दिष्ट नाही त्यासाठी प्रलोभन म्हणून किंवा आपण जे केलेले नाही त्याबद्दल बक्षिशी म्हणून एखादे परितोषण स्वीकारते तिने बक्षिशी म्हणून ते परितोषण स्वीकारले आहे असे मानले जाईल.

निवडणुकांमध्ये गैरवाजवी प्रभाव पाडणे.

**१७१ ग.** (१) कोणत्याही निवडणूकविषयक हक्काच्या मुक्त वापरास जो कोणी इच्छापूर्वक अडथळा करील किंवा अडथळा करण्याचा प्रयत्न करील त्याने निवडणुकीत गैरवाजवी प्रभाव पाडण्याचा अपराध केला असे होते.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधांच्या व्यापकतेला बाध न येता, जो कोणी—

(क) कोणत्याही उमेदवाराला किंवा मतदाराला अथवा उमेदवार किंवा मतदार जिच्यामध्ये हितसंबंधित आहे अशा कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकारची क्षती पोचवण्याची धमकी देईल, अथवा

(ख) उमेदवाराला किंवा मतदाराला, तो किंवा जिच्यामध्ये तो हितसंबंधित आहे अशी कोणतीही व्यक्ती दैवी प्रकोपाचा किंवा पारमार्थिक दूषणाचा विषय होईल किंवा केली जाईल असा समज करून घेण्यास प्रवृत्त करील किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील,

तो अशा उमेदवाराच्या किंवा मतदाराच्या निवडणूकविषयक हक्काच्या मुक्त वापरास पोटकलम (१) च्या अर्थानुसार अडथळा करतो असे मानले जाईल.

(३) लोकधोरण जाहीर करणे किंवा लोकोपयोगी कारवाईचे वचन देणे किंवा निवडणूकविषयक हक्कास अडथळा करण्याचा उद्देश नसताना वैध हक्काचा नुसता वापर करणे हा या कलमाच्या अर्थानुसार अडथळा असल्याचे मानले जाणार नाही.

निवडणुकांमध्ये तोतयेगिरी करणे.

**१७१ घ.** जो कोणी अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावाने—मग ती हयात असो वा मृत असो—किंवा कल्पित नावाने निवडणुकीमध्ये मतपत्रिका मागतो किंवा मतदान करतो अथवा अशा निवडणुकीत एकदा मतदान केले असता जो त्याच निवडणुकीत स्वत:च्या नावाने मतपत्रिका मागतो, आणि जो कोणी कोणत्याही व्यक्तीकडून अशा प्रकारे मतदान होण्यास अपप्रेरणा देतो किंवा तसे योजून आणतो किंवा योजून आणण्याचा प्रयत्न करतो त्याने निवडणुकीत तोतयेगिरी करण्याचा अपराध केला असे होते.

लाचलुचपतीबद्दल **शिक्षा.**

**१७१ ङ.** जो कोणी लाचलुचपतीचा अपराध करील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील :

परंतु, सरबराईद्वारे लाचलुचपतीचा अपराध करण्याबद्दल फक्त द्रव्यदंडच ठोठावण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—"सरबराई" याचा अर्थ, ज्या बाबतीत खाद्य, पेये, करमणूक किंवा सामग्रीपुरवठा या रूपात परितोषण दिले जाते त्या प्रकारची लाचलुचपत असा आहे.

१७१च. जो कोणी निवडणुकीत गैरवाजवी प्रभाव पाडण्याचा किंवा तोतयेगिरी करण्याचा अपराध करील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

निवडणुकीत गैरवाजवी प्रभाव पाडण्याबद्दल किंवा तोतयेगिरी करण्याबद्दल शिक्षा.

१७१ छ. निवडणुकीच्या निकालावर परिणाम करण्याच्या उद्देशाने जो कोणी, कोणत्याही उमेदवाराचे व्यक्तिगत चारित्र्य किंवा वर्तन यासंबंधात वस्तुस्थिति-कथन वाटणारे असे जे कथन खोटे असून आणि ते खोटे असल्याचे आपणांस माहीत असून किंवा तसे आपण समजत असून अगर ते खरे आहे असे आपण समजत नसताना असे कोणतेही कथन करील किंवा प्रकाशित करील त्याला, द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

निवडणुकीच्या संबंधात खोटे कथन.

१७१ज. उमेदवाराकडून सर्वसाधारण किंवा विशेष लेखी प्राधिकार नसताना जो कोणी, अशा उमेदवाराच्या निवडणुकीला चालना देण्याकरता किंवा त्यास निवडून आणण्याकरता कोणतीही सार्वजनिक सभा भरवण्याखातर अथवा कोणतीही जाहिरात, परिपत्रक किंवा प्रकाशन यावर अथवा अन्य कोणत्याही प्रकारे खर्च करील किंवा त्यास प्राधिकृती देईल त्याला, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल :

परंतु, जर कोणत्याही व्यक्तीने प्राधिकार नसताना जास्तीत जास्त दहा रुपयांपर्यंत काही रक्कम अशा रीतीने खर्च केल्यानंतर, असा खर्च केल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत त्या खर्चास उमेदवाराची लेखी मान्यता मिळवली तर, तिने उमेदवाराच्या प्राधिकारानिशी असा खर्च केला असल्याचे समजण्यात येईल.

निवडणुकीच्या संबंधात अवैधपणे पैसे खर्च करणे.

१७१झ. निवडणुकीमध्ये किंवा तिच्या संबंधात होणाऱ्या खर्चाचे आपण हिशेब ठेवणे त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार किंवा कायद्याप्रमाणे प्रभावी असलेल्या कोणत्याही नियमानुसार आवश्यक असताना जो कोणी असे हिशेब ठेवण्यास चुकेल त्याला, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

निवडणुकीचे हिशेब ठेवण्यास चुकणे.

## प्रकरण १० वे

## लोक सेवकांच्या कायदेशीर प्राधिकाराच्या अवमानांविषयी

१७२. लोक सेवक म्हणून समन्स, नोटीस किंवा आदेश काढण्यास विधितः सक्षम असलेल्या अशा कोणत्याही लोक सेवकाकडून निघालेले असे समन्स, नोटीस किंवा आदेश याची आपल्यावर होणारी बजावणी टाळण्यासाठी जो कोणी फरारी होईल त्याला, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील;

किंवा, जर ते समन्स किंवा नोटीस किंवा आदेश न्यायालयात जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर राहण्याविषयी अथवा एखादा दस्तऐवज किंवा अन्य वस्तू हजर करण्याविषयी असेल तर त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

समन्सची बजावणी किंवा इतर कार्यवाही टाळण्यासाठी फरारी होणे.

१७३. लोक सेवक म्हणून समन्स, नोटीस अगर आदेश काढण्यास विधितः सक्षम असलेल्या अशा कोणत्याही लोक सेवकाकडून निघालेले असे समन्स, नोटीस अगर आदेश याची स्वतःवर किंवा इतर कोणत्याही व्यक्तीवर बजावणी होण्यास जो कोणी कोणत्याही प्रकारे उद्देशपूर्वक प्रतिबंध करील,

किंवा असे कोणतेही समन्स, नोटीस अगर आदेश कोणत्याही जागी कायदेशीरपणे लावण्यास उद्देशपूर्वक प्रतिबंध करील,

किंवा असे कोणतेही समन्स, नोटीस अगर आदेश जेथे ते कायदेशीरपणे लावलेले असेल त्या जागेतून उद्देशपूर्वक काढून टाकील,

किंवा लोक सेवक म्हणून कोणताही जाहीरनामा काढण्याचा निदेश देण्यास विधितः सक्षम असलेल्या अशा कोणत्याही लोक सेवकाच्या प्राधिकारान्वये असा कोणताही जाहीरनामा कायदेशीरपणे काढण्याला उद्देशपूर्वक प्रतिबंध करील,

त्याला एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या करावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील;

समन्सची बजावणी किंवा इतर कार्यवाही यास प्रतिबंध करणे किंवा त्याच्या प्रकाशनाला प्रतिबंध करणे.

किंवा, जर समन्स, नोटीस, आदेश अगर जाहीरनामा, न्यायालयात जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर राहण्याविषयी अथवा दस्तऐवज किंवा अन्य वस्तू हजर करण्याविषयी असेल तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

लोक सेवकाने दिलेल्या आदेशानुसार उपस्थित न राहणे.

**१७४.** लोकसेवक म्हणून समन्स, नोटीस, आदेश अगर जाहीरनामा काढण्यास विधित: सक्षम असलेल्या अशा कोणत्याही लोकसेवकाकडून ते निघाले असता त्याच्या अनुपालनार्थ विवक्षित स्थळी आणि वेळी जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर राहण्यास विधित: बद्ध असलेला जो कोणी,

त्या स्थळी किंवा वेळी हजर राहण्याचे उद्देशपूर्वक टाळील किंवा ज्या ठिकाणी हजर राहण्यास तो बद्ध आहे तेथून ज्या वेळी त्याने निघून जाणे कायदेशीर आहे त्या वेळेपूर्वी तेथून निघून जाईल,

त्याला एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील;

किंवा जर समन्स, नोटीस, आदेश अगर जाहीरनामा न्यायालयात जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर राहण्याविषयी असेल तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**उदाहरणे**

(क) कलकत्ता येथील [१][उच्च न्यायालयाने] काढलेल्या साक्षीसमन्साच्या अनुपालनार्थ त्या न्यायालयासमोर उपस्थित होण्यास विधित: बद्ध असलेला 'क' उपस्थित होण्याचे उद्देशपूर्वक टाळतो. 'क' ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केलेला आहे.

(ख) [२][जिल्हा न्यायाधीशाने] काढलेल्या समन्सच्या अनुपालनार्थ साक्षीदार म्हणून त्या [२][जिल्हा न्यायाधीशासमोर] उपस्थित होण्यास विधित: बद्ध असलेला 'क' उपस्थित होण्याचे उद्देशपूर्वक टाळतो. 'क' ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केलेला आहे.

लोक सेवकाकडे दस्तऐवज हजर करण्यास बद्ध असलेल्या व्यक्तीने तो हजर करण्याचे टाळणे.

**१७५.** लोक सेवक म्हणून एखाद्याकडे कोणताही दस्तऐवज किंवा अन्य वस्तू हजर करण्यास किंवा स्वाधीन करण्यास विधित: बद्ध असून जो कोणी ते हजर करण्याचे किंवा स्वाधीन करण्याचे टाळील त्याला, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील;

किंवा, जर दस्तऐवज किंवा अन्य वस्तू न्यायालयाकडे हजर करावयाची किंवा स्वाधीन करावयाची असेल तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**उदाहरणे**

[२][जिल्हा न्यायालयासमोर] दस्तऐवज हजर करण्यास विधित: बद्ध असलेला 'क' तो दस्तऐवज सादर करण्याचे उद्देशपूर्वक टाळतो. 'क' ने या कलमामध्ये व्याख्या करण्यात आलेला अपराध केलेला आहे.

लोक सेवकाला दखल किंवा माहिती देण्यास विधित: बद्ध असलेल्या व्यक्तीने ती देण्याचे टाळणे.

**१७६.** लोक सेवक म्हणून एखाद्याला एखाद्या विषयासंबंधी कोणतीही दखल देण्यास किंवा माहिती पुरवण्यास विधित: बद्ध असून जो कोणी कायद्याद्वारे आवश्यक केलेल्या अशा रीतीने व तशा वेळी अशी दखल देण्याचे किंवा माहिती पुरवण्याचे उद्देशपूर्वक टाळील त्याला, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील;

किंवा, जी दखल किंवा माहिती देणे आवश्यक आहे ती अपराध घडण्यासंबंधीची असेल, अथवा, अपराध घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी किंवा अपराध्याला गिरफदार करण्यासाठी आवश्यक असेल तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील;

[३][किंवा जी दखल किंवा माहिती देणे आवश्यक आहे ती 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८'* (१८९८ चा ५)-कलम ५६५-पोटकलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशानुसार आवश्यक असेल तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.]

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "सर्वोच्च न्यायालयाने" या ऐवजी हे दाखल करण्यात आले.

२. कित्ता—द्वारे "जिल्हा न्यायाधीश" याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

३. १९३९ चा अधिनियम २२-कलम २ द्वारे जादा दाखल केले.

* आता 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) पहा.

खोटी माहिती पुरवणे.

१७७. लोक सेवक म्हणून एखाद्याला कोणत्याही विषयासंबंधी माहिती पुरविण्यास विधित: बद्ध असलेला जो कोणी त्या विषयासंबंधीची जी माहिती खोटी असल्याचे आपणांस माहीत आहे किंवा तसे समजण्यास आपणांस कारण आहे अशी माहिती खरी म्हणून पुरवील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील;

किंवा, जी माहिती देण्यास तो विधित: बद्ध आहे ती अपराध घडण्याविषयी असेल, अथवा अपराध घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी किंवा अपराध्याला गिरफदार करण्यासाठी आवश्यक असेल तर, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**उदाहरणे**

(क्) 'क.' हा जमीनधारक त्याच्या जमिनीच्या हद्दींच्या आत एखाद्याचा खून घडल्याचे माहित असताना, साप चावल्याच्या परिणामी अपघाताने त्याचा मृत्यू झालेला आहे अशी चुकीची माहोती जिल्ह्याच्या दंडाधिकाऱ्याला बुद्धिपुरस्सर देतो. 'क' या कलमात व्याख्या केलेल्या अपराधाबद्दल दोषी आहे.

(ख्) 'क' हा गावाचा राखणदार रामोशी असून शेजारच्या गावात राहणारा श्रीमंत व्यापारी 'य' याच्या घरामध्ये दरवडा घालण्यासाठी अनोळखी माणसांची एक टोळी जाताना त्याच्या गावामधून गेलेली आहे हे माहीत असताना आणि सर्वात नजीकच्या पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याकडे वरील गोष्टींची माहिती त्वरित व वेळच्या वेळी देण्यास तो 'बंगाल विधि संहिता' [1]विनियम ३ रा, १८२१-कलम ७ चे-खंड ५ याअन्वये बद्ध असताना पोलीस अधिकाऱ्याला बुद्धिपुरस्सर अशी चुकीची माहिती देतो की, वेगळ्याच दिशेला असलेल्या एका विवक्षित दूरच्या ठिकाणी दरवडा घालण्यासाठी संशयास्पद इसमांची एक टोळी गावामधून गेलेली आहे. या बाबतीत 'क' या कलमाच्या उत्तर भागामध्ये व्याख्या करण्यात आलेल्या अपराधाबद्दल दोषी आहे.

[2][**स्पष्टीकरण.**—कलम १७६ मध्ये आणि या कलमामध्ये "अपराध" या शब्दात, [3][भारता-बाहेरील] कोणत्याही ठिकाणी करण्यात आलेली जी कृती [3][भारतात] केली गेली असती तर पुढील म्हणजेच ३०२, ३०४, ३८२, ३९२, ३९३, ३९४, ३९५, ३९६, ३९७, ३९८, ३९९, ४०२, ४३५, ४३६, ४४९, ४५०, ४५७, ४५८, ४५९ व ४६० यांपैकी कोणत्याही कलमाखाली शिक्षापात्र ठरली असती अशा कोणत्याही कृतीचा समावेश आहे; आणि "अपराधी" या शब्दात, अशी कोणतीही कृती केल्याबद्दल जी दोषी असल्याचे अभिकथन करण्यात आले आहे अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे.]

शपथ घेण्यास किंवा दृढकथन करण्यास लोकसेवकाने रीतसर फर्मावले असता त्यास नकार देणे.

१७८. जो कोणी, त्याने सत्य कथन करण्यासाठी स्वत:ला शपथेने [4][किंवा दृढकथनाने] बांधून घ्यावे असे फर्मावण्यास विधित: सक्षम असलेल्या लोक सेवकाने याप्रमाणे बांधून घेण्यास फर्मावले असता त्याप्रमाणे स्वत:ला बांधून घेण्यास नकार देईल त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

प्रश्न विचारण्यास प्राधिकृत असलेल्या लोक सेवकाला उत्तर देण्यास नकार देणे.

१७९. कोणत्याही लोक सेवकाला कोणत्याही विषयासंबंधी सत्य कथन करण्यास स्वत: विधित: बद्ध असून जो कोणी त्याला अशा लोक सेवकाने असा लोक सेवक म्हणून आपल्या वैध अधिकारांचा वापर करून त्या विषयासंबंधी विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाला उत्तर देण्यास नकार देईल त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

कथन स्वाक्षरित करण्यास नकार देणे.

१८०. जो कोणी स्वत: केलेले कोणतेही कथन, त्याने ते स्वाक्षरित करावे असे फर्मावण्यास विधित: सक्षम असलेल्या लोक सेवकाने तसे करण्यात फर्मावले असता स्वाक्षरित करण्यास नकार देईल त्याला, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

---

१. १८६२ चा अधिनियम १७ द्वारे निरसित.

२. १८९४ चा अधिनियम ३-कलम ५ द्वारे भर घातली.

३. क्रमश:, अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' याऐवजी वरील शब्दोल्लेख घातला.

४. १८७३ चा अधिनियम १० कलम १५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

शपथ घेववण्यास किंवा दृढकथन करून घेण्यास प्राधिकृत असलेला लोक सेवक किंवा अन्य व्यक्ती यांच्यासमोर शपथ घेऊन किंवा दृढकथन करून खोटे कथन करणे.

१८१. शपथ घेववण्यास [1][किंवा दृढकथन] करून घेण्यास विधितः प्राधिकृत असा कोणताही लोक सेवक किंवा अन्य व्यक्ती यांच्यासमोर कोणत्याही विषयासंबंधी सत्य कथन करण्यास स्वतः अशा शपथेने [1][किंवा दृढकथनाने] विधितः बद्ध असून जो कोणी त्या विषयासंबंधी जे खोटे आहे अथवा जे खोटे असल्याचे त्याला माहीत आहे किंवा तसे तो समजत आहे अथवा जे खरे आहे असे तो समजत नाही असे कोणतेही कथन पूर्वोक्त अशा लोक सेवक किंवा अन्य व्यक्ती यांच्यासमोर करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

लोक सेवकाला आपल्या कायदेशीर अधिकाराचा वापर दुसऱ्या व्यक्तीला क्षती पोचेल अशा-प्रकारे करायला लावण्याच्या उद्देशाने खोटी माहिती देणे.

[2][१८२. जी माहिती खोटी असल्याचे स्वतःला माहीत आहे किंवा तसे स्वतः समजत आहे अशी कोणतीही माहिती जर कोणी एखाद्या लोकसेवकाला दिली आणि त्यामुळे अशा लोक सेवकाला—

(क) ज्याबाबत अशी माहिती देण्यात आली आहे त्याबाबतची खरी वस्तुस्थिती त्याला ज्ञात असता जे अशा लोक सेवकाने करता कामा नये किंवा करण्याचे टाळले पाहिजे असे काहीही करणे किंवा टाळणे, किंवा

(ख) अशा लोक सेवकाला असलेला कायदेशीर अधिकार एखाद्या व्यक्तीला क्षती पोचेल किंवा त्रास होईल अशाप्रकारे वापरणे,

हे भाग पडावे असा त्याचा उद्देश असेल किंवा त्यामुळे तसे घडण्यास आपण कारण होण्याचा संभव आहे याची जाणीव असेल तर, त्याला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**उदाहरणे**

(क) 'क' एका दंडाधिकाऱ्याला, अशा दंडाधिकाऱ्याच्या हाताखालील एक पोलीस अधिकारी 'य' हा कर्तव्याची उपेक्षा करण्याबद्दल किंवा गैरवर्तनाबद्दल दोषी आहे अशी माहिती, ती खोटी असल्याचे माहीत असूनही आणि त्या माहितीमुळे 'य' ला पदच्युत करणे दंडाधिकाऱ्याला भाग पडेल असा संभव असल्याची जाणीव असूनही देतो. 'क' ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केला आहे.

(ख) 'क' एका लोक सेवकाला, 'य' पाशी प्रतिषिद्ध मीठ असून ते गुप्त ठिकाणी ठेवले आहे अशी खोटी माहिती, ती खोटी असल्याचे माहीत असूनही आणि त्या माहितीच्या परिणामी 'य' च्या जागेची झडती घेतली जाऊन 'य' ला त्रास होण्याचा संभव आहे याची जाणीव असूनही देतो. 'क'-ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केला आहे.

(ग) एका विशिष्ट गावाच्या आसपासच्या भागात आपल्यावर हल्ला होऊन जबरी चोरी करण्यात आली अशी खोटी माहिती 'क' एका पोलिसाला देतो. आपल्यावर हल्ला करणाऱ्यांपैकी म्हणून तो कोणाचेही नाव सांगत नाही, पण या माहितीचा परिणाम म्हणून पोलीस चौकशी चालवून झडत्या घेण्यास सुरुवात करतील व त्यायोगे गावकऱ्यांना किंवा त्यांच्यापैकी काहींना त्रास होण्याचा संभव आहे याची त्याला जाणीव आहे. 'क' ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केला आहे.]

लोक सेवकाच्या कायदेशीर प्राधिकारान्वये मालमत्ता ताब्यात घेतली जाण्यास प्रतिकार करणे.

१८३. कोणत्याही लोक सेवकाच्या कायदेशीर प्राधिकारान्वये मालमत्ता ताब्यात घेतली जात असता तो असा लोक सेवक आहे हे माहीत असून किंवा तसे समजण्यास कारण असून जो कोणी कोणत्याही प्रकारे प्रतिकार करील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

लोक सेवकाच्या प्राधिकारान्वये विक्रीस काढलेल्या मालमत्तेच्या विक्रीला अटकाव करणे.

१८४. लोक सेवक म्हणून एखाद्याला असलेल्या कायदेशीर प्राधिकारान्वये विक्रीस काढलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या विक्रीला जो कोणी उद्देशपूर्वक अटकाव करील त्याला, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

लोक सेवकाच्या प्राधिकारान्वये मालमत्ता विक्रीस काढली असता अवैधपणे ती खरेदी करणे किंवा तीसाठी बोली बोलणे.

१८५. लोक सेवक म्हणून एखाद्याला असलेल्या कायदेशीर प्राधिकारान्वये मालमत्तेचा कोणताही विक्री व्यवहार होत असता जर कोणी, त्या विक्रीच्या वेळी ती मालमत्ता विकत घेण्यास जी विधितः अक्षम असल्याचे त्यास माहीत आहे—मग ती व्यक्ती म्हणजे तो स्वतःच असो वा अन्य कोणी असो—अशा कोणत्याही व्यक्तीकरता ती खरेदी केली अथवा अशा मालमत्तेकरता बोली बोलला व अशी बोली बोलल्यामुळे तो स्वतःवर जी आबंधने लादून घेतो ती पाळण्याचा त्याचा उद्देश नसेल तर, त्याला एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

---

१. १८७३ चा अधिनियम १०-कलम १५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.
२. १८९५ चा अधिनियम ३-कलम १ द्वारे मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

१८६. कोणताही लोक सेवक आपली सार्वजनिक कार्ये पार पाडीत असता जो कोणी इच्छापूर्वक त्यास अटकाव करील त्याला, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. लोक सेवक सार्वजनिक कार्ये पार पाडीत असता त्याला अटकाव करणे.

१८७. कोणत्याही लोक सेवकाला त्याचे सार्वजनिक कर्तव्य बजावण्याच्या कामी साहाय्य करण्यास किंवा पुरवण्यास विधितः बद्ध असून जो कोणी असे साहाय्य देण्याचे उद्देशपूर्वक टाळील त्याला, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील; लोक सेवकाला साहाय्य देणे विधितः बंधनकारक असताना साहाय्य देण्याचे टाळणे.

आणि जर न्यायालयाने कायदेशीरपणे काढलेल्या कोणत्याही आदेशिकेची अंमलबजावणी करण्याच्या अथवा अपराध घडण्यास प्रतिबंध करण्याच्या अथवा दंगा किंवा दंगल शमवण्याच्या अथवा अपराध केल्याचा दोषारोप असलेल्या अगर त्याबद्दल किंवा कायदेशीर हवालतीतून पळून गेल्याबद्दल दोषी असलेल्या व्यक्तीला गिरफदार करण्याच्या प्रयोजनार्थ साहाय्य मागण्यास विधितः सक्षम असलेल्या लोक सेवकाने त्याच्याकडे असे साहाय्य मागितले असेल तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

१८८. एखादा आदेश जारी करण्यास कायदेशीरपणे अधिकार प्रदान झालेल्या लोक सेवकाने जारी केलेल्या अशा आदेशाद्वारे, विवक्षित कृती करण्यापासून परावृत्त राहण्याचा अथवा स्वतःच्या कब्जातील किंवा स्वतःच्या व्यवस्थापनाखालील विवक्षित मालमत्तेबाबत विवक्षित बंदोबस्त करण्याचा आपणास निदेश मिळाला आहे हे माहीत असून जो कोणी अशा निदेशाची अवज्ञा करील त्याला,— लोक सेवकाने रीतसर जारी केलेल्या आदेशाची अवज्ञा.

जर कायदेशीरपणे नियुक्त झालेल्या एखाद्या व्यक्तीला अशा अवज्ञेमुळे अटकाव, त्रास किंवा क्षती झाली अथवा अटकाव, त्रास किंवा क्षती यांचा धोका उत्पन्न झाला अथवा ते होण्याकडे त्या अवज्ञेचा रोख असेल तर, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील;

आणि जर अशा अवज्ञेमुळे मानवी जीवित, आरोग्य, किंवा सुरक्षितता यांना धोका पोचला किंवा पोचण्याकडे तिचा रोख असेल अथवा तीमुळे दंगा किंवा दंगल घडून आली किंवा घडून येण्याकडे तिचा रोख असेल तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरण.**—अपाय घडवून आणणे अपराध्याला उद्देशित असले पाहिजे किंवा आपण अवज्ञा केल्याने अपाय घडणे संभवनीय आहे याची त्याला पूर्वकल्पना असली पाहिजे अशी आवश्यकता नाही. तो ज्याची अवज्ञा करतो त्या आदेशाची त्याला माहिती होती, आणि त्याच्या अवज्ञेमुळे अपाय घडला किंवा घडणे संभवनीय आहे, एवढे पुरेसे आहे.

**उदाहरण**

एका विशिष्ट रस्त्यावरून धार्मिक मिरवणूक जाता कामा नये असा आदेश जारी करण्यास कायदेशीरपणे अधिकार प्रदान झालेल्या लोक सेवकाने असा आदेश जारी केला आहे. 'क' जाणीवपूर्वक त्या आदेशाची अवज्ञा करतो, आणि त्यामुळे दंग्याचा धोका उत्पन्न होतो. 'क' ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केला आहे.

१८९. आपल्या सार्वजनिक कार्याधिकारांच्या वापराशी निगडित अशी कोणतीही कृती करण्याबद्दल किंवा अशी कोणतीही कृती करण्यापासून परावृत्त राहण्याबद्दल, किंवा तिला विलंब लावण्याबद्दल कोणत्याही लोक सेवकाचे मन वळवण्यासाठी जो कोणी अशा लोक सेवकाला अगर तो लोक सेवक आपल्या समजुतीप्रमाणे जिच्यामध्ये हितसंबंधित आहे अशा कोणत्याही व्यक्तीला क्षती पोचवण्याचा त्याला धाक घालील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. लोक सेवकाला क्षती पोचवण्याचा धाक.

१९०. कोणत्याही क्षतीपासून संरक्षण देण्यास किंवा असे संरक्षण देववण्यास विधितः अधिकार प्रदान झालेल्या कोणत्याही लोक सेवकाकडे अशा संरक्षणासाठी कायदेशीर अर्ज करण्यापासून परावृत्त राहण्याबद्दल किंवा निवृत्त होण्याबद्दल एखाद्या व्यक्तीचे मन वळवण्यासाठी जो कोणी त्या व्यक्तीला क्षती पोचवण्याचा धाक दाखवील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. लोक सेवकाकडे संरक्षणासाठी अर्ज करण्यापासून एखाद्या व्यक्तीला परावृत्त राहण्याबद्दल मन वळवण्याकरता क्षती पोचवण्याचा धाक.

## प्रकरण ११ वे

## खोटा पुरावा आणि सार्वजनिक न्यायाच्या विरोधी अपराध यांविषयी

खोटा पुरावा देणे.

**१९१.** स्वतः सत्य कथन करण्यास शपथेमुळे किंवा कायद्याच्या एखाद्या स्पष्ट उपबंधामुळे विधितः बद्ध असून अथवा कोणत्याही विषयासंबंधी एखादे अधिकथन करण्यास विधितः बद्ध असून जर कोणी जे खोटे आहे अगर जे खोटे असल्याचे त्यास माहीत आहे किंवा तसे तो समजतो असे अगर जे खरे आहे असे तो समजत नाही असे कोणतेही कथन केले तर, त्याने खोटा पुरावा दिला असे म्हटले जाईल.

**स्पष्टीकरण १.**—कथन शब्दरूपाने केलेले असो वा अन्यथा केलेले असो, ते या कलमाच्या अर्थकक्षेत येते.

**स्पष्टीकरण २.**—साक्षांकन करणाऱ्या व्यक्तीचे आपल्या समजुतीबाबतचे खोटे कथन हे या कलमाच्या अर्थकक्षेत येते, आणि ज्या गोष्टीवर आपला विश्वास नाही ती तशी असल्याचे आपण समजतो असे कथन करण्याने, तसेच जी गोष्ट आपल्याला माहीत नाही ती आपणांस माहीत आहे असे कथन करण्यानेही एखादी व्यक्ती खोटा पुरावा दिल्याबद्दल दोषी होऊ शकेल.

### उदाहरणे

(क) 'ख' ला 'य' विरुद्ध एक हजार रुपयांबाबत जो न्याय्य मागणीहक्क आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी संपरीक्षेच्या वेळी 'क' हा, 'ख' च्या हक्काचा न्याय्यपणा 'य' कबूल करत असताना आपण ते ऐकले असे शपथेवर खोटे सांगतो. 'क' ने खोटा पुरावा दिलेला आहे.

(ख) सत्य कथन करण्यास शपथेने बद्ध असून 'क' हा, विवक्षित स्वाक्षरी ही 'य' च्या हस्ताक्षरात आहे असे तो समजत नसताना ते 'य' चे हस्ताक्षर आहे असे आपण समजतो असे कथन करतो. या बाबतीत, 'क' स्वतःला जे खोटे असल्याचे माहीत आहे ते कथन करतो, आणि म्हणून त्याने खोटा पुरावा दिलेला आहे.

(ग) 'य' च्या हस्ताक्षराचे एकंदर वळण माहीत असताना 'क' हा, विवक्षित स्वाक्षरी 'य' च्या हस्ताक्षरात आहे अशा प्रामाणिक समजुतीने, ती 'य' च्या हस्ताक्षरात असल्याचे आपण समजतो असे कथन करतो. याबाबतीत, 'क' चे कथन हे फक्त त्याच्या समजुतीसंबंधी आहे आणि त्याच्या समजुतीपुरतेच सत्य आहे, आणि म्हणून ती स्वाक्षरी जरी 'य' च्या हस्ताक्षरातील नसली तरीही, 'क' ने खोटा पुरावा दिलेला नाही.

(घ) सत्य कथन करण्यास शपथेने बद्ध असताना व त्याविषयी काही माहिती नसताना 'क' हा, विशिष्ट दिवशी 'य' विशिष्ट ठिकाणी होता हे आपणांस माहीत आहे असे कथन करतो. 'य' हा निर्दिष्ट दिवशी आणि त्या ठिकाणी असो वा नसो—'क' ने खोटा पुरावा दिलेला आहे.

(ङ) अर्थविवरणकार किंवा भाषांतरकार 'क' ज्याचे यथार्थ अर्थविवरण किंवा भाषांतर करण्यास तो शपथेने बद्ध आहे त्या कथनाचे किंवा दस्तऐवजाचे जे अर्थविवरण किंवा भाषांतर खरे नसून जे खरे आहे असे तो समजत नाही ते अर्थविवरण किंवा भाषांतर यथातथ्य म्हणून देतो किंवा प्रमाणित करतो. 'क' ने खोटा पुरावा दिलेला आहे.

खोटा पुरावा रचणे.

**१९२.** जर कोणी एखादी विशिष्ट परिस्थिती घडवून आणली, अथवा कोणत्याही पुस्तकात किंवा अभिलेखात खोटी नोंद केली, अथवा खोटे कथन अंतर्भूत असणारा कोणताही दस्तऐवज केला आणि त्यामागे असा परिस्थितिविशेष, खोटी नोंद किंवा खोटे कथन एखाद्या न्यायिक कार्यवाहीमधील अथवा एखाद्या लोक सेवकासमोर त्या नात्याने किंवा लवादासमोर आणलेल्या कार्यवाहीतील पुराव्यामध्ये यावे आणि असा परिस्थितिविशेष, खोटी नोंद किंवा खोटे कथन याप्रमाणे पुराव्यात येण्यामुळे त्या कार्यवाहीत ज्या व्यक्तीने त्या पुराव्यावरून आपले मत बनवावयाचे असेल तिला अशा कार्यवाहीच्या निकालाच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा कोणत्याही मुद्यासंबंधी एखादे चुकीचे मत बनवणे भाग पडावे असा त्याचा उद्देश असेल तर, त्याने "खोटा पुरावा रचला" असे म्हटले जाते.

### उदाहरणे

(क) 'क' हा 'य' च्या पेटीमध्ये रत्ने ठेवतो, उद्देश हा की, तो त्या पेटीत सापडावीत, आणि त्या विशिष्ट परिस्थितीमुळे 'य' हा चोरीबद्दल सिद्धदोष ठरावा. 'क' ने खोटा पुरावा रचलेला आहे.

(ख) 'क' आपल्या दुकानाच्या हिशेबवहीत खोटी नोंद करतो, प्रयोजन असे की, न्यायालयात ती परिपोषक पुरावा म्हणून वापरता यावी. 'क' ने खोटा पुरावा रचलेला आहे.

(ग) फौजदारीपात्र कटाबद्दल 'य' ची दोषसिद्धी घडवावी या उद्देशाने 'क' हा 'य' च्या हस्ताक्षराची नक्कल करून, फौजदारीपात्र कटातील सहअपराध्यास उद्देशून लिहिले असल्याचे दिसणारे असे एक पत्र लिहितो, आणि ते पत्र पोलीस अधिकारी जेथे झडती घेण्याचा संभव आहे याची त्याला जाणीव आहे त्या जागी ठेवतो. 'क' ने खोटा पुरावा रचलेला आहे.

१९३. जो कोणी, न्यायिक कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्याला उद्देशपूर्वक खोटा पुरावा देईल किंवा न्यायिक कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्याला वापरला जावा यासाठी खोटा पुरावा रचील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र असेल ; खोट्या पुराव्या-बद्दल शिक्षा.

आणि जो कोणी अन्य कोणत्याही बाबतीत, उद्देशपूर्वक खोटा पुरावा देईल किंवा रचील त्याला तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र असेल.

**स्पष्टीकरण १.**—लष्करी न्यायालयापुढील [1]* * * * संपरीक्षा ही न्यायिक कार्यवाही होय.

**स्पष्टीकरण २.**—न्यायालयीन कार्यवाहीपूर्वी करावयाचे म्हणून विधित: विहित केलेले अन्वेषण हे जरी न्यायालयाच्या पुढे होत नसले तरीही, तो न्यायिक कार्यवाहीतील टप्पा होय.

**उदाहरण**

'य' यास संपरीक्षार्थ सुपूर्द करण्यात यावे किंवा कसे हे विनिश्चित करण्यासाठी दंडाधिकाऱ्यासमोर चाललेल्या चौकशीमुळे 'क' जे कथन खोटे असल्याचे आपणांस माहीत आहे ते शपथपूर्वक करतो. ही चौकशी न्यायिक कार्यवाहीतील टप्पा असल्यामुळे 'क' ने खोटा पुरावा दिला असे दिसते.

**स्पष्टीकरण ३.**—जे अन्वेषण करण्याविषयी न्यायालयाने कायद्यानुसार निदेश दिलेला असून न्यायालयाच्या प्राधिकारान्वये चालवले जाईल ते जरी न्यायालयापुढे होत नसले तरीही, तो न्यायिक कार्यवाहीतील टप्पा होय.

**उदाहरण**

जमिनीच्या सीमारेषा जागच्या जागी विनिश्चित करण्यासाठी न्यायालयाने प्रतिनियुक्त केलेल्या अधिकाऱ्यापुढील चौकशीमध्ये 'क' जे कथन खोटे असल्याचे आपणांस माहीत आहे ते शपथपूर्वक करतो. ही चौकशी न्यायिक कार्यवाहीतील टप्पा असल्यामुळे 'क' ने खोटा पुरावा दिला असे होते.

१९४. जर कोणी खोटा पुरावा दिला किंवा रचला आणि त्यायोगे, [2][[3][भारतात] त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार] जो अपराध देहांतदंडच आहे त्या अपराधाबद्दल कोणत्याही व्यक्तीला सिद्धदोष ठरवण्यात यावे असा त्याचा उद्देश असेल किंवा त्यायोगे तशी दोषसिद्धी होण्यास आपण कारण होणे संभवनीय असल्याची त्यास जाणीव असेल तर, त्याला [4][आजीव कारावासाची] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल ; देहांतदंडच अपराधाबद्दल दोषसिद्धी घडवून आणण्याच्या उद्देशाने खोटा पुरावा देणे किंवा रचणे.

आणि जर अशा खोट्या पुराव्यामुळे एखादी निरपराध व्यक्ती सिद्धदोष ठरली आणि फाशी गेली तर, ज्या व्यक्तीने खोटा पुरावा दिला तिला मृत्यूची किंवा यात यापूर्वी वर्णन केलेली शिक्षा होईल. जर त्यायोगे निरपराध व्यक्ती सिद्धदोष ठरली आणि फाशी गेली तर.

१९५. जर कोणी खोटा पुरावा दिला किंवा रचला आणि त्यायोगे, [2][[3][भारतात] त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार] जो अपराध देहांतदंडच नाही, पण [4][आजीव कारावासाच्या] किंवा सात वर्षे अगर त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र आहे अशा अपराधाबद्दल कोणत्याही व्यक्तीला सिद्धदोष ठरवण्यात यावे असा त्याचा उद्देश असेल किंवा त्यायोगे तशी दोषसिद्धी होण्यास आपण कारण होणे संभवनीय असल्याची त्यास जाणीव असेल तर, त्याला त्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरलेली व्यक्ती जशाप्रकारे शिक्षा होण्यास पात्र होऊ शकेल तशाप्रकारे शिक्षा होईल. आजीव कारावासाच्या किंवा कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषसिद्धी घडवून आणण्याच्या उद्देशाने खोटा पुरावा देणे किंवा रचणे.

**उदाहरण**

'क' न्यायालयापुढे खोटा पुरावा देतो. उद्देश असा की, त्यायोगे 'य' हा दरवडयाबद्दल सिद्धदोष ठरावा. दरवडयाला [4][आजीव कारावासाची] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाची शिक्षा द्रव्यदंडासहित किंवा त्याविना नेमलेली आहे. म्हणून 'क' [4][आजीव कारावासाच्या] किंवा कारावासाच्या शिक्षेस द्रव्यदंडासहित किंवा त्याविना पात्र आहे.

---

१. १८८९ चा अधिनियम १३-कलम २ व अनुसूची यांद्वारे "किंवा मिलिटरी कोर्ट ऑफ रिक्वेस्टपुढील" हे शब्द वगळण्यात आले.

२. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे "ब्रिटिश इंडियाच्या किंवा इंग्लंडच्या कायद्यानुसार" याऐवजी दाखल करण्यात आले.

३. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे "राज्ये" याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

४. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप/काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

खोटा असल्याचे माहीत असलेला पुरावा वापरणे.

१९६. जर कोणी जो खोटा किंवा रचलेला असल्याचे स्वतःस माहीत आहे असा कोणताही पुरावा खरा किंवा अस्सल पुरावा म्हणून भ्रष्टतापूर्वक वापरला किंवा वापरण्याचा प्रयत्न केला तर त्याला, जणू काही त्यानेच खोटा पुरावा दिलेला किंवा रचलेला असावा त्याप्रमाणे त्याच रीतीने शिक्षा होईल.

खोटे प्रमाणपत्र देणे किंवा स्वाक्षरित करणे.

१९७. जे प्रमाणपत्र देणे किंवा स्वाक्षरित करणे विधितः आवश्यक आहे अथवा जे एखाद्या तथ्याबद्दल पुरावा म्हणून स्वीकार्य असल्याने त्याच्याशी संबंधित आहे असे कोणतेही प्रमाणपत्र, ते एखाद्या महत्त्वाच्या मुद्याबाबत खोटे आहे हे स्वतःला माहीत असताना किंवा तसे स्वतः समजत असताना, जो कोणी देईल किंवा स्वाक्षरित करील त्याला, जणू काही त्याने खोटा पुरावा दिलेला असावा त्याप्रमाणे त्याच रीतीने शिक्षा होईल.

खोटे असल्याचे माहीत असलेले प्रमाणपत्र खरे म्हणून वापरणे.

१९८. असे कोणतेही प्रमाणपत्र, ते एखाद्या महत्त्वाच्या मुद्याबाबत खोटे असल्याचे माहीत असताना खरे प्रमाणपत्र म्हणून जो कोणी भ्रष्टतापूर्वक वापरील किंवा वापरण्याचा प्रयत्न करील त्याला, जणू काही त्यानेच खोटा पुरावा दिलेला असावा त्याप्रमाणे त्याच रीतीने शिक्षा होईल.

जे अधिकथन विधितः पुरावा म्हणून स्वीकार्य आहे त्यात केलेले खोटे कथन.

१९९. जे अधिकथन कोणत्याही तथ्याचा पुरावा म्हणून स्वीकारण्यास विधितः कोणतेही न्यायालय, किंवा कोणीही लोकसेवक किंवा कोणीही व्यक्ती बद्ध किंवा प्राधिकृत असेल असे कोणतेही अधिकथन करून किंवा स्वाक्षरित करून जर कोणी, ज्यासाठी ते अधिकथन करण्यात किंवा वापरण्यात आले त्या उद्दिष्टाच्या दृष्टीने एखाद्या महत्त्वाच्या मुद्याबाबत जे खोटे आहे अथवा जे खोटे असल्याचे स्वतःला माहीत आहे किंवा तसे स्वतः समजतो किंवा जे खरे आहे असे स्वतः समजत नाही असे कोणतेही कथन त्यात केले तर त्याला, जणू काही त्याने खोटा पुरावा दिलेला असावा त्याप्रमाणे त्याच रीतीने शिक्षा होईल.

असे अधिकथन खोटे असल्याचे माहीत असताना ते खरे म्हणून वापरणे.

२००. जो कोणी असे कोणतेही अधिकथन एखाद्या महत्त्वाच्या मुद्याबाबत खोटे असल्याचे माहीत असताना ते खरे म्हणून भ्रष्टतापूर्वक वापरील किंवा वापरण्याचा प्रयत्न करील त्याला, जणू काही त्यानेच खोटा पुरावा दिलेला असावा त्याप्रमाणे त्याच रीतीने शिक्षा होईल.

**स्पष्टीकरण :**—केवळ काही उपचाराची उणीव असल्याच्या कारणावरून जे अस्वीकार्य असते ते अधिकथन कलमे १९९ व २०० यांच्या अर्थानुसार अधिकथन आहे.

अपराध्याला वाचवण्यासाठी अपराधाचा पुरावा नाहीसा होण्याची तजवीज करणे किंवा खोटी माहिती देणे.

२०१. जो कोणी अपराध घडला आहे हे माहीत असून किंवा तसे समजण्यास कारण असून अपराध्याला वैध शिक्षेपासून वाचवण्याच्या उद्देशाने तो अपराध करण्यात आल्याचा कोणताही पुरावा नाहीसा होण्याची तजवीज करील अथवा त्या उद्देशाने, जी खोटी असल्याचे स्वतःस माहीत आहे किंवा तसे स्वतः समजतो अशी त्या अपराधाविषयी खोटी माहिती देईल त्याला,

अपराध देहांतदंडाच असल्यास;

जो अपराध घडल्याचे त्यास माहीत आहे किंवा तसे तो समजतो तो अपराध मृत्यूच्या शिक्षेस पात्र असेल तर, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, अणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल;

आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास;

आणि अपराध जर [1][आजीव कारावासाच्या] शिक्षेस, किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास पात्र असेल तर, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल;

दहा वर्षांहून कमी कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास.

आणि अपराध जर दहा वर्षेपर्यंत नसलेल्या इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल तर, त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या शिक्षेच्या सर्वाधिक मुदतीच्या एक-चतुर्थांशापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**उदाहरण**

'ख' ने 'य' चा खून केला आहे हे माहीत असून 'ख' ला शिक्षेपासून वाचवण्याच्या उद्देशाने 'क' हा 'ख' ला तो मृतदेह लपवण्याच्या कामी मदत करतो. 'क' सात वर्षे मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासास आणि द्रव्यदंडासही पात्र आहे.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप/काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२०२. अपराध घडला आहे हे माहीत असून, किंवा तसे समजण्यास कारण असून, जो कोणी त्या अपराधाविषयी जी माहिती देण्यास तो विधितः बद्ध आहे अशी कोणतीही माहिती देण्याचे उद्देश-पूर्वक टाळील त्याला, सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

अपराधाची माहिती देण्यास विधितः बद्ध असलेल्या व्यक्तीने माहिती देण्याचे उद्देशपूर्वक टाळण.

२०३. अपराध घडला आहे हे माहीत असून किंवा तसे समजण्यास कारण असून, जो कोणी त्या अपराधाविषयी जी माहिती खोटी असल्याचे त्याला माहीत आहे किंवा तसे तो समजतो अशी कोणतीही माहिती देईल त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

घडलेल्या अपराधाबाबत खोटी माहिती देणे.

[1][**स्पष्टीकरण.**—कलमे २०१ व २०२ आणि हे कलम यांमधील "अपराध" या शब्दामध्ये, [2][भारताबाहेरील] कोणत्याही ठिकाणी करण्यात आलेली जी कोणतीही कृती [2][भारतात] केली तर पुढीलपैकी कोणत्याही कलमाखाली शिक्षेस पात्र ठरू शकेल, त्या कृतीचा समावेश आहे ती कलमे अशी—

३०२, ३०४, ३८२, ३९२, ३९३, ३९४, ३९५, ३९६, ३९७, ३९८, ३९९, ४०२, ४३५, ४३६, ४४९, ४५०, ४५७, ४५८, ४५९ आणि ४६०.]

२०४. जो कोणी न्यायालयात, किंवा लोक सेवक म्हणून एखाद्यासमोर कायदेशीरपणे चाललेल्या कोणत्याही कार्यवाहीत जो कोणताही दस्तऐवज पुरावा म्हणून हजर करणे स्वतःला कायदेशीरपणे भाग असेल तो दस्तऐवज पूर्वोक्ताप्रमाणे अशा न्यायालयासमोर किंवा लोक सेवकासमोर अथवा त्या प्रयोजनासाठी स्वतःला कायदेशीरपणे समन्स पाठवण्यात येईल तेव्हा किंवा तो हजर करण्यास फर्मावण्यात येईल तेव्हा पुरावा म्हणून हजर केला जाऊ नये किंवा वापरला जाऊ नये या उद्देशाने, असा दस्तऐवज संपूर्णतः किंवा त्याचा कोणताही भाग दिसेनासा करील किंवा दुर्वाच्य करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

कोणताही दस्तऐवज पुरावा म्हणून हजर केला जाऊ नये यासाठी तो नष्ट करणे.

२०५. जो कोणी कोणत्याही दाव्यात किंवा फौजदारी खटल्यात दुसऱ्याची बतावणी करून तोतये-गिरी करील, आणि अशा बनावट भूमिकेत कोणतीही कबुली देईल किंवा कथन करील, अथवा न्याय-निर्णयास कबुलीजबाब देईल, अथवा कोणतीही आदेशिका काढवील, अथवा जामीनदार बनेल अगर जामीन राहील, अथवा अन्य कोणतीही कृती करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

दाव्यातील किंवा खटल्यातील कोणत्याही कृतीच्या किंवा कामकाजाच्या प्रयोजनार्थ तोतयेगिरी करणे.

२०६. जर कोणी कपटीपणाने एखादी मालमत्ता हलवली, लपवली अगर ती किंवा तिच्यातील हितसंबंध यांचे हस्तांतरण केले किंवा सुपूर्दगी केली आणि त्यायोगे ती मालमत्ता किंवा तिच्यातील हित-संबंध न्यायालय किंवा अन्य सक्षम प्राधिकारी याच्याकडून जो अधिघोषित करण्यात आला आहे किंवा अधिघोषित होणे संभवनीय असल्याची स्वतःला जाणीव आहे अशा एखाद्या न्यायनिर्णयाअन्वये समपहृत म्हणून किंवा द्रव्यदंडाची पूर्ती करण्यासाठी घेतले जाऊ नये अथवा एखाद्या दिवाणी दाव्यात एखाद्या न्यायालयाकडून जो काढण्यात आला आहे किंवा काढला जाणे संभवनीय असल्याची स्वतःला जाणीव आहे अशा हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीत घेतले जाऊ नये असा त्याचा उद्देश असेल तर त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

समपहृत म्हणून किंवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून मालमत्तेचे अभिग्रहण होऊ नये यासाठी ती कपटीपणाने हलवणे किंवा लपवणे.

२०७. जर कोणी एखाद्या मालमत्तेवर किंवा तिच्यातील हितसंबंधावर आपला हक्क किंवा साधिकार मागणीहक्क नाही हे माहीत असून कपटीपणाने ते स्वीकारले, घेतले किंवा त्यावर दावा सांगितला अथवा कोणतीही मालमत्ता किंवा तिच्यातील हितसंबंध यांवरील हक्कासंबंधी कोणत्याही प्रकारे फसवणूक केली आणि त्यायोगे ती मालमत्ता किंवा तिच्यातील हितसंबंध न्यायालय किंवा अन्य सक्षम प्राधिकारी याच्याकडून जो अधिघोषित झाला आहे, किंवा अधिघोषित होणे संभवनीय असल्याची स्वतःला जाणीव आहे अशा एखाद्या न्यायनिर्णयाअन्वये समपहृत म्हणून किंवा द्रव्यदंडाची पूर्ती करण्यासाठी घेतले जाऊ नये अथवा एखाद्या दिवाणी दाव्यात एखाद्या न्यायालयाकडून जो काढण्यात आला आहे किंवा काढला जाणे संभवनीय असल्याची स्वतःला जाणीव आहे अशा हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमल-बजावणीत घेतले जाऊ नये असा त्याचा उद्देश असेल तर, त्याला दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

समपहृत म्हणून किंवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून मालमत्तेचे अभिग्रहण होऊ नये यासाठी कपटीपणाने तिच्यावर दावा सांगणे.

---

१. १८९४ चा अधिनियम ३-कलम ६ द्वारे भर घालण्यात आली.

२. क्रमशः, अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' याऐवजी वरील शब्दोल्लेख दाखल करण्यात आला आहे.

देय नसलेल्या रकमेसाठी कपटी-पणाने हुकूमनामा होऊ देणे.

२०८. एखाद्या व्यक्तीच्या दाव्यामध्ये जो कोणी अशा व्यक्तीला देय नसलेल्या रकमेसाठी किंवा अशा व्यक्तीला देय असलेल्याहून अधिक रकमेसाठी, अथवा ज्या कोणत्याही मालमत्तेला किंवा तिच्यातील ज्या हितसंबंधाला अशी व्यक्ती हक्कदार नाही त्यासाठी स्वत:विरुद्ध कपटीपणाने एखादा हुकूमनामा किंवा आदेश करवील किंवा होऊ देईल, अथवा एखाद्या हुकूमनाम्याची किंवा आदेशाची पूर्ती करण्यात आल्या-नंतर किंवा ज्या संबंधात त्याची पूर्ती करण्यात आली आहे त्या गोष्टीबाबत स्वत:विरुद्ध कपटीपणाने त्या हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करवील किंवा होऊ देईल त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**उदाहरण**

'क' हा 'य' विरुद्ध दावा लावतो. 'क' आपल्याविरुद्ध हुकूमनामा मिळवण्याचा संभव आहे याची जाणीव असताना 'य' स्वत:विरुद्ध ज्याला न्याय्य मागणीहक्क नाही अशा 'ख' च्या दाव्यात कपटीपणाने आपल्याविरुद्ध अधिक मोठ्या रकमेचा न्यायनिर्णय होऊ देतो, जेणेकरून 'क' च्या हुकूमनाम्याअन्वये 'य' च्या मालमत्तेची जी विक्री होईल तिच्यापासूनच्या मिळणाऱ्या उत्पन्नात 'ख' ला स्वत:करता किंवा 'य' च्या फायद्यासाठी हिस्सा घेता यावा. 'य' ने या कलमाखाली अपराध केला आहे.

अप्रामाणिकपणाने न्यायालयात खोटा मागणीहक्क सांगणे.

२०९. एखादा मागणीहक्क खोटा असल्याचे स्वत:ला माहीत असून जो कोणी कपटीपणाने किंवा अप्रामाणिकपणाने अथवा एखाद्या व्यक्तीला क्षती पोचवण्याच्या किंवा त्रास देण्याच्या उद्देशाने न्यायालयामध्ये तो हक्क सांगेल त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

देय नसलेल्या रकमेसाठी कपटीपणाने हुकूमनामा मिळविणे.

२१०. जो कोणी देय नसलेल्या रकमेसाठी, किंवा देय असलेल्याहून अधिक रकमेसाठी, अथवा ज्या कोणत्याही मालमत्तेला किंवा तिच्यातील हितसंबंधाला आपण हक्कदार नाही त्यासाठी एखाद्या व्यक्तीविरुद्ध कपटीपणाने एखादा हुकूमनामा किंवा आदेश मिळवील, अथवा एखाद्या हुकूमनाम्याची किंवा आदेशाची पूर्ती करण्यात आल्यानंतर किंवा ज्या संबंधात त्याची पूर्ती करण्यात आली आहे त्या गोष्टी-बाबत एखाद्या व्यक्तीविरुद्ध कपटीपणाने त्या हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करवील किंवा होऊ देईल, अथवा कपटीपणाने स्वत:च्या नावावर अशी कोणतीही कृती होऊ देईल किंवा त्यास परवानगी देईल त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारा-वासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

क्षती पोचवण्याच्या उद्देशाने अपराधाचा खोटा दोषारोप करणे.

२११. जो कोणी, एखाद्या व्यक्तीला क्षती पोचवण्याच्या उद्देशाने, त्या व्यक्तीविरुद्ध फौजदारी कार्यवाही करण्यास अगर त्या व्यक्तीने अपराध केलेला आहे असा दोषारोप करण्यास न्याय्य किंवा कायदेशीर आधारकारण नाही हे माहीत असून त्या व्यक्तीविरुद्ध अशी कोणतीही कार्यवाही सुरू करील किंवा सुरू करवील, अथवा त्या व्यक्तीवर असा खोटा दोषारोप करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील;

आणि जर मृत्यूच्या, [1][आजीव कारावासाच्या], किंवा सात वर्षे अगर त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र अशा अपराधाच्या खोट्या दोषारोपावरून अशी फौजदारी कार्यवाही सुरू करण्यात आली तर, त्याला सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

अपराध्याला आसरा देणे—

२१२. जेव्हाकेव्हा एखादा अपराध घडला असेल तेव्हा, एखादी व्यक्ती अपराधी आहे हे स्वत:ला माहीत असून किंवा तसे समजण्यास कारण असून तिला वैध शिक्षेपासून वाचवण्यासाठी जो कोणी तिला आसरा देईल किंवा लपवील त्याला,

अपराध देहांतदंडच असल्यास;

जर तो अपराध मृत्यूच्या शिक्षेस पात्र असेल तर, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्या-तरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल;

आजीव कारावासाच्या किंवा कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास.

आणि जर तो अपराध [1][आजीव कारावासाच्या], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या कारावा-साच्या शिक्षेस पात्र असेल तर, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल;

आणि जर तो अपराध एक वर्षापर्यंत असू शकेल पण दहा वर्षेपर्यंत नव्हे इतक्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल तर, त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्यापैकी सर्वाधिक मुदतीच्या एक-चतुर्थांशापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

---

१. १९५६ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप/काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

[1][या कलमामध्ये "अपराध" या शब्दात [2][भारताबाहेरील] कोणत्याही ठिकाणी करण्यात आलेली जी कृती [2][भारतात] केली तर, पुढीलपैकी कोणत्याही कलमाखाली शिक्षेस पात्र ठरू शकेल तिचा समावेश आहे, ती कलमे अशी—३०२, ३०४, ३८२, ३९२, ३९३, ३९४, ३९५, ३९६, ३९७ ३९८, ३९९, ४०२, ४३५, ४३६, ४४९, ४५०, ४५७, ४५८, ४५९ व ४६०; आणि अशी प्रत्येक कृती जणू काही आरोपी व्यक्तीने ती कृती [2][भारतात] केल्याबद्दल तो दोषी असावा त्याप्रमाणे शिक्षेस पात्र, आहे असे या कलमाच्या प्रयोजनार्थ मानले जाईल.]

**अपवाद.**—ज्या प्रकरणात अपराधी व्यक्तीला तिचा पती किंवा पत्नी यांनी आसरा दिलेला असेल किंवा लपवले असेल अशा कोणत्याही प्रकरणात हा उपबंध लागू होणार नाही.

**उदाहरण**

'ख' ने दरवडा घातला आहे हे माहीत असून, 'क' हा 'ख' ला वैध शिक्षेपासून वाचवण्यासाठी जाणीवपूर्वक त्याला लपवतो. याबाबतीत 'ख' [3][आजीव कारावासाच्या] शिक्षेस पात्र असल्याने 'क' जास्तीत जास्त तीन वर्षे इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासास पात्र आहे आणि द्रव्यदंडासही पात्र आहे.

**२१३.** अपराध घडल्याचे आपण लपवून ठेवू किंवा एखाद्या व्यक्तीला कोणत्याही अपराधाबद्दलच्या वैध शिक्षेपासून आपण वाचवू किंवा तिला वैध शिक्षा घडवण्यासाठी तिच्याविरुद्ध करावयाची कार्यवाही आपण करणार नाही या प्रतिफलादाखल जो कोणी स्वतःकरता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरता कोणतेही परितोषण स्वीकारील किंवा मिळवण्याचा प्रयत्न करील, किंवा स्वीकारण्याचे कबूल करील अथवा स्वतःला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला कोणतीही मालमत्ता परत मिळवून घेईल त्याला; *अपराध्याला शिक्षेपासून वाचवण्यासाठी देणगी घेणे, इ.—*

जर अपराध मृत्यूच्या शिक्षेस पात्र असेल तर, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल; *अपराध देहांतदंडय असल्यास;*

आणि जर अपराध [3][आजीव कारावासाच्या] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल तर त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल; *आजीव कारावासाच्या किंवा कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास.*

आणि जर अपराध दहा वर्षेपर्यंत नसलेल्या इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल तर, या अपराधासाठी उपबंधित केलेल्या सर्वाधिक मुदतीच्या कारावासाच्या एक-चतुर्थांशापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**२१४.** एखाद्या व्यक्तीने अपराध घडल्याचे लपवून ठेवावयाचे किंवा तिने आपणांस वैध शिक्षेपासून वाचवावयाचे किंवा आपणांस वैध शिक्षा घडवण्यासाठी आपणांविरुद्ध करावयाची कार्यवाही तिने करावयाची नाही या प्रतिफलादाखल जो कोणी त्या व्यक्तीला कोणतेही परितोषण देईल अगर देववील अथवा देण्याची किंवा देववण्याची तयारी दर्शवील किंवा तसे कबूल करील अथवा कोणत्याही व्यक्तीला कोणतीही मालमत्ता [4][परत करील किंवा परत करवील] त्याला, *अपराध्याला शिक्षेपासून वाचवण्याच्या प्रतिफलादाखल देणगी देऊ करणे किंवा मालमत्ता परत करणे—*

जर अपराध मृत्यूच्या शिक्षेला पात्र असेल तर, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल. *अपराध देहांतदंडय असल्यास;*

आणि जर अपराध [3][आजीव कारावासाच्या] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल तर, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल. *आजीव कारावासाच्या किंवा कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास.*

---

१. १८९४ चा अधिनियम ३-कलम ७ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. क्रमशः, अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' याऐवजी वरील शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

३. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

४. १९५३ चा अधिनियम ४२-कलम ४ व ३ री अनुसूची यांद्वारे "परत करण्याची किंवा परत करवण्याची तयारी दर्शवील किंवा तसे कबूल करील" याऐवजी हे दाखल करण्यात आले.

आणि जर अपराध दहा वर्षेपर्यंत नसलेल्या इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल तर, त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या सर्वाधिक मुदतीच्या कारावासाच्या एक-चतुर्थांशापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

[1][**अपवाद.**—ज्या कोणत्याही बाबतीत अपराध कायदेशीरपणे आपसात मिटवता येतो त्या बाबतीत, २१३ व २१४ या कलमांचे उपबंध लागू होत नाहीत.]

चोरीला गेलेली मालमत्ता परत मिळवण्याच्या कामी मदत करण्याबद्दल देणगी घेणे, इ.

**२१५.** या संहितेखाली शिक्षापात्र असलेल्या एखाद्या अपराधामुळे ज्या कोणत्याही जंगम मालमत्तेपासून एखाद्या व्यक्तीला वंचित व्हावे लागले ती परत मिळवण्याच्या कामी तिला मदत करण्याचे निमित्त करून किंवा मदत करण्याखातर जो कोणी कोणतेही परितोषण घेईल, घेण्याचे कबूल करील किंवा त्यास संमती देईल त्याला, त्याने अपराधी गिरफदार होऊन अपराधाबद्दल सिद्धदोष ठरावा यासाठी आपल्या शक्तीनुसार सर्व साधनांचा अवलंब केला नाही तर, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

[2]* * *

हवालतीतून पळालेल्या किंवा ज्याच्या गिरफदारीचा आदेश देण्यात आला आहे अशा अपराध्याला आसरा देणे—

**२१६.** जेव्हाकेव्हा एखाद्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरलेली किंवा त्याचा दोषारोप असलेली कोणतीही व्यक्ती त्या अपराधाबद्दल कायदेशीर हवालतीत असता अशा हवालतीतून पळून गेली असेल, किंवा जेव्हाकेव्हा एखाद्या लोक सेवकाने अशा लोक सेवकाच्या कायदेशीर अधिकारांचा वापर करून, एखाद्या अपराधाबद्दल एखाद्या विवक्षित व्यक्तीला गिरफदार करण्याचा आदेश दिला असेल तेव्हा, अशा पलायनाची किंवा गिरफदारीच्या आदेशाची माहिती असून जो कोणी ती व्यक्ती गिरफदार होऊ नये या उद्देशाने तिला आसरा देईल किंवा लपवील त्याला पुढीलप्रकारे शिक्षा होईल, म्हणजे—

अपराध देहांतदंडय असल्यास;

ज्या अपराधाबद्दल ती व्यक्ती हवालतीत होती किंवा तिला गिरफदार करण्याचा आदेश देण्यात आला तो अपराध मृत्यूच्या शिक्षेस पात्र असेल तर, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल ;

अपराध आजीव कारावासाच्या, किंवा कारावासाच्या शिक्षेस पात्र असल्यास.

अपराध [3][आजीव कारावासाच्या] किंवा दहा वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल तर, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा द्रव्यदंडासहित किंवा त्याविना, होईल ;

आणि अपराध एक वर्षापर्यंत असू शकेल पण दहा वर्षेपर्यंत नव्हे, इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल तर, त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या सर्वाधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेच्या एक-चतुर्थांशाइतकी त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

[4][या कलमामधील "अपराध" या शब्दात, जी कोणतीही कृती किंवा अकृती [5][भारताबाहेर] केल्याबद्दल एखादी व्यक्ती दोषी असल्याचे अभिकथन करण्यात आले असून ती [5][भारतात] केली असती तर, ती अपराध म्हणून शिक्षापात्र होण्यासारखी असेल तर आणि ज्यासाठी प्रत्यर्पणासंबंधीच्या कोणत्याही कायद्याखाली[6] * * * किंवा एरव्ही ती व्यक्ती त्याबद्दल [5][भारतात] गिरफदार होण्यास किंवा हवालतीत स्थानबद्ध होण्यास पात्र असेल तर, अशी कृती किंवा अकृती देखील समाविष्ट आहे ; आणि अशी प्रत्येक कृती किंवा अकृती या कलमाच्या प्रयोजनार्थ, आरोपी व्यक्ती जणू काही ती [5][भारतात] केल्याबद्दल दोषी असावी त्याप्रमाणे शिक्षेस पात्र असल्याचे मानण्यात येईल.]

**अपवाद.**—ज्या बाबतीत गिरफदार करावयाच्या व्यक्तीचा पती किंवा पत्नी यांनी आसरा दिलेला असेल किंवा लपवलेले असेल त्या बाबतीत, हा उपबंध लागू होत नाही.

लुटारू किंवा दरवडेखोर यांना आसरा दिल्याबद्दल दंड.

[7][२१६क. काही व्यक्ती जबरी चोरी करण्याच्या किंवा दरवडा घालणाच्या बेतात आहेत अथवा त्यांनी अलिकडेच जबरी चोरी केलेली आहे किंवा दरवडा घातलेला आहे हे माहीत असून किंवा तसे समजण्यास कारण असून जो कोणी अशी जबरी चोरी करणे किंवा दरवडा घालणे सुकर करण्याच्या

---

१. १८८२ चा अधिनियम ८-कलम ६ द्वारे मूळ अपवादाऐवजी हे दाखल करण्यात आले.

२. १८८२ चा अधिनियम १०-कलम २ व १ ली अनुसूची यांद्वारे उदाहरणे निरसित करण्यात आली.

३. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची याद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

४. १८८६ चा अधिनियम १०-कलम २३ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

५. क्रमशः, अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम, ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' याऐवजी वरील शब्दोल्लेख दाखल करण्यात आला आहे.

६. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे "किंवा 'पलायित अपराधी अधिनियम, १८८१' याखाली" हा मजकूर वगळण्यात आला.

७. १८९४ चा अधिनियम ३-कलम ८ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

अथवा त्यांना किंवा त्यांच्यापैकी कोणालाही वैध शिक्षेपासून वाचवण्याच्या उद्देशाने त्यांना किंवा त्यांच्या पैकी कोणालाही आसरा देईल त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, जबरी चोरी किंवा दरवडा [1][भारतात] की, [1][भारता बाहेर घडला किंवा घडवण्याचा उद्देश होता हा मुद्दा गौण आहे.

**अपवाद.**—ज्या बाबतीत अपराधी व्यक्तीचा पती किंवा पत्नी यांनी आसरा दिला असेल त्या बाबतीत, हा उपबंध लागू होत नाही.]

[2][२१६ख. [कलमे २१२, २१६ आणि २१६क यामधील "आसरा देणे" याची व्याख्या]. 'भारतीय दंड संहिता (विशोधन) अधिनियम, १९४२' (१९४२ चा ८)-कलम ३ द्वारे निरसित.]

**व्यक्तीला शिक्षेपासून किंवा मालमत्तेला समपहरणापासून वाचवण्याच्या उद्देशाने लोक सेवकाने कायद्याच्या निदेशाची अवज्ञा करणे.**

**२१७.** जर कोणी लोक सेवक असून असा लोक सेवक म्हणून कसे वर्तावे याविषयी कायद्याने दिलेल्या निदेशाची त्याने जाणीवपूर्वक अवज्ञा केली आणि त्यायोगे एखाद्या व्यक्तीला वैध शिक्षेपासून वाचवण्याचा त्याचा उद्देश असेल किंवा त्यायोगे ती वाचण्यास किंवा ती व्यक्ती ज्या शिक्षेला पात्र असेल त्या शिक्षेहून कमी शिक्षेस ती पात्र ठरण्यास आपण कारण होऊ अशी त्यास जाणीव असेल अथवा एखादी मालमत्ता विधितः ज्यास दायी असेल त्या समपहरणापासून किंवा अन्य प्रभारापासून ती वाचवण्याचा त्याचा उद्देश असेल किंवा त्यायोगे ती वाचण्यास आपण कारण होऊ याची त्यास जाणीव असेल तर, त्याला दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**एखाद्या व्यक्तीला शिक्षेपासून किंवा मालमत्तेला समपहरणापासून वाचवण्याच्या उद्देशाने लोक सेवकाने चुकीच्या अभिलेखाची किंवा लेखाची मांडणी करणे.**

**२१८.** जर कोणी लोक सेवक असून आणि असा लोक सेवक म्हणून एखादा अभिलेख किंवा अन्य लेख तयार करण्याची त्याच्यावर जबाबदारी असून, जी रीत चुकीची असल्याचे स्वतःस माहीत आहे त्या रीतीने त्याने त्या अभिलेखाची किंवा लेखाची मांडणी केली आणि त्यायोगे लोकांना किंवा एखाद्या व्यक्तीला हानी किंवा क्षती पोचवण्याचा त्याचा उद्देश असेल अगर ती पोचण्यास आपण कारण होणे संभवनीय असल्याची त्याला जाणीव असेल तर, अथवा त्यायोगे एखाद्या व्यक्तीला वैध शिक्षेपासून वाचवण्याचा त्याचा उद्देश असेल तर अगर ती वाचण्यास आपण कारण होणे संभवनीय असल्याची त्याला जाणीव असेल तर, अथवा त्यायोगे एखादी मालमत्ता विधितः ज्यास दायी असेल त्या समपहरणापासून किंवा अन्य प्रभारापासून ती वाचवण्याचा त्याचा उद्देश असेल किंवा ती वाचण्यास आपण कारण होणे संभवनीय असल्याची त्याला जाणीव असेल तर, त्याला तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**न्यायिक कार्यवाहीत लोक सेवकाने भ्रष्टतापूर्वक बेकायदा अहवाल देणे, इ.**

**२१९.** लोक सेवक असून जो कोणी न्यायिक कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्याला बेकायदा असल्याचे स्वतःस माहीत आहे असा कोणताही अहवाल, आदेश, अधिनिर्णय किंवा निर्णय भ्रष्टतापूर्वक किंवा दुर्भावपूर्वक करील किंवा अधिघोषित करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**प्राधिकार असलेल्या व्यक्तीने आपण बेकायदा वागत असल्याचे माहीत असताना संपरीक्षेसाठी सुपूर्द करणे किंवा बंदिवासात पाठवणे.**

**२२०.** ज्यामुळे व्यक्तींना संपरीक्षेसाठी किंवा बंदिवासात पाठवण्याचा अगर व्यक्तींना बंदिवासात ठेवण्याचा वैध प्राधिकार स्वतःला मिळतो त्या पदावर असताना जो कोणी त्या प्राधिकाराचा वापर करून भ्रष्टतापूर्वक किंवा दुर्भावपूर्वक एखाद्या व्यक्तीला संपरीक्षेसाठी किंवा बंदिवासात पाठवील, किंवा एखाद्या व्यक्तीला बंदिवासात ठेवील, आणि असे करताना आपण बेकायदा वागत आहोत याची त्यास जाणीव असेल तर, त्याला सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**गिरफदार करण्यास बद्ध असलेल्या लोक सेवकाने गिरफदारी करण्याचे उद्देशपूर्वक टाळणे.**

**२२१.** जो कोणी लोक सेवक असून, एखाद्या अपराधाचा दोषारोप असलेल्या किंवा त्याबद्दल गिरफदार होण्यास पात्र असलेल्या व्यक्तीला गिरफदार करण्यास किंवा बंदिवासात ठेवण्यास असा लोक सेवक म्हणून तो विधितः बद्ध असताना, अशा व्यक्तीला गिरफदार करण्याचे उद्देशपूर्वक टाळील अगर उद्देशपूर्वक अशा व्यक्तीला पळून जाऊ देईल अगर उद्देशपूर्वक अशा व्यक्तीला बंदिवासातून पळून जाण्याचा प्रयत्न करण्याच्या कामी मदत करील त्याला, पुढीलप्रमाणे शिक्षा होईल, म्हणजे—

जर बंदिवासातील व्यक्तीवर किंवा जिला गिरफदार करावयास हवे होते अशा व्यक्तीवर मृत्यूच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाचा दोषारोप असेल किंवा तशा अपराधाबद्दल गिरफदार होण्यास ती पात्र असेल तर, त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा द्रव्यदंडासहित किंवा त्याविना, होईल ; किंवा

---

१. क्रमशः अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' याऐवजी वरील शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. हे कलम १८९४ चा अधिनियम, ३-कलम ८ द्वारे समाविष्ट करण्यात आले होते.

जर बंदिवासातील व्यक्तीवर किंवा जिला गिरफदार करावयास हवे होते अशा व्यक्तीवर [1][आजीव कारावासाच्या] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाचा दोषारोप असेल किंवा तशा अपराधाबद्दल गिरफदार होण्यास ती पात्र असेल तर, त्याला तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा, द्रव्यदंडासहित किंवा त्याविना, होईल ; किंवा

जर बंदिवासातील व्यक्तीवर किंवा जिला गिरफदार करावयास हवे होते अशा व्यक्तीवर दहा वर्षांपेक्षा कमी मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाचा दोषारोप असेल किंवा तशा अपराधाबद्दल गिरफदार होण्यास ती पात्र असेल तर, त्याला दोन वर्षेपर्यंत असून शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा, द्रव्यदंडासहित किंवा त्याविना, होईल.

शिक्षादेशाधीन असलेल्या किंवा कायदेशीरपणे हवालतीत पाठवलेल्या व्यक्तीला गिरफदार करण्यास बद्ध असलेल्या लोकसेवकाने गिरफदारी करण्याचे उद्देशपूर्वक टाळणे.

२२२. जो कोणी लोक सेवक असून, एखाद्या अपराधाबद्दल न्यायालयाच्या शिक्षादेशास अधीन असलेल्या [2][किंवा कायदेशीरपणे हवालतीत पाठवलेल्या] एखाद्या व्यक्तीला गिरफदार करण्यास किंवा बंदिवासात ठेवण्यास असा लोक सेवक म्हणून तो विधित: बद्ध असताना, अशा व्यक्तीला गिरफदार करण्याचे उद्देशपूर्वक टाळील, अगर उद्देशपूर्वक अशा व्यक्तीला पळून जाऊ देईल, अगर उद्देशपूर्वक अशा व्यक्तीला बंदिवासातून पळून जाण्याच्या किंवा पळून जाण्याचा प्रयत्न करण्याच्या कामी मदत करील त्याला पुढीलप्रमाणे शिक्षा होईल, म्हणजे :—

जर बंदिवासातील व्यक्ती किंवा जिला गिरफदार करावयास हवे होते अशी व्यक्ती मृत्यूच्या शिक्षादेशास अधीन असेल तर, त्या लोक सेवकाला, [1][आजीव कारावासाची] किंवा चौदा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा द्रव्यदंडासहित किंवा त्याविना, होईल ; किंवा

जर बंदिवासातील व्यक्ती किंवा जिला गिरफदार करावयास हवे होते अशी व्यक्ती न्यायालयाच्या शिक्षादेशानुसार, किंवा अशा शिक्षेच्या परिवर्तनामुळे [1][आजीव कारावासास][3]** [4]** [5]** [6]** किंवा दहा वर्षे अगर त्याहून अधिक मुदतीच्या कारावासास पात्र असेल तर, त्या लोक सेवकाला सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा द्रव्यदंडासहित किंवा त्याविना, होईल ; किंवा

जर बंदिवासातील व्यक्ती किंवा जिला गिरफदार करावयास हवे होते अशी व्यक्ती न्यायालयाच्या शिक्षादेशानुसार दहा वर्षेपर्यंत नसलेल्या इतक्या मुदतीच्या कारावासास अधीन असेल [2][किंवा त्या व्यक्तीला कायदेशीरपणे हवालतीत पाठवण्यात आले असेल] तर, त्या लोक सेवकाला तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील.

लोक सेवकाने हयगयीने बंदिवासातून किंवा हवालतीतून पळून जाऊ देणे.

२२३. जो कोणी लोक सेवक असून, एखाद्या अपराधाचा दोषारोप असलेल्या किंवा त्याबद्दल सिद्धदोष ठरलेल्या [2][किंवा कायदेशीरपणे हवालतीत पाठवण्यात आलेल्या] एखाद्या व्यक्तीला बंदिवासात ठेवण्यास तो असा लोक सेवक म्हणून विधित: बद्ध असताना हयगयीने अशा व्यक्तीला बंदिवासातून पळून जाऊ देईल त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

एखाद्या व्यक्तीने आपल्या कायदेशीर गिरफदारीला प्रतिकार किंवा अटकाव करणे.

२२४. जो कोणी स्वत:वर ज्या अपराधाचा दोषारोप आहे किंवा ज्याबद्दल स्वत: सिद्धदोष ठरला आहे अशा कोणत्याही अपराधाबद्दल आपली कायदेशीर गिरफदारी होण्यास उद्देशपूर्वक कोणत्याही प्रकारे प्रतिकार करील किंवा अवैध अटकाव करील, अथवा अशा एखाद्या अपराधाबद्दल आपणांस कायदेशीरपणे जेथे स्थानबद्ध करण्यात आले आहे अशा कोणत्याही हवालतीतून पळून जाईल किंवा पळून जाण्याचा प्रयत्न करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप/काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १८७० चा अधिनियम २७-कलम ८ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. १९४९ चा अधिनियम १७-कलम २ द्वारे "किंवा आजीव सक्तमजुरीस" हे शब्द वगळण्यात आले (६ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

४. १९५७ चा अधिनियम ३६-कलम ३ व २ री अनुसूची यांद्वारे "अथवा" हा शब्द गाळला.

५. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे "काळ्या पाण्यास" हा मजकूर गाळला. (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

६. १९४९ चा अधिनियम १७-कलम २ द्वारे "किंवा सक्तमजुरीस" हे शब्द गाळले (६ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

स्पष्टीकरण.—या कलमातील शिक्षा ही गिरफदार करावयाची किंवा हवालतीत स्थानबद्ध केलेली व्यक्ती ज्या अपराधाचा तिच्यावर दोषारोप होता किंवा ज्याबद्दल ती सिद्धदोष ठरली त्या अपराधाबद्दल ज्या शिक्षेला पात्र असेल तिच्या व्यतिरिक्त नेमलेली आहे.

**दुसऱ्या व्यक्तीच्या कायदेशीर गिरफदारीला प्रतिकार किंवा अटकाव करणे.**

२२५. जो कोणी इसम एखाद्या अपराधाबद्दल अन्य कोणत्याही व्यक्तीची कायदेशीर गिरफदारी होण्यास उद्देशपूर्वक प्रतिकार किंवा अवैध अटकाव करील, अथवा एखाद्या अपराधाबद्दल अन्य कोणत्याही व्यक्तीला जेथे कायदेशीरपणे स्थानबद्ध करण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीची हवालतीतून अवैधपणे सुटका करील किंवा सुटका करण्याचा प्रयत्न करील त्या इसमाला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील;

किंवा, जर गिरफदार करावयाच्या व्यक्तीवर अथवा जिची अवैधपणे सुटका करण्यात आली किंवा सुटका करण्याचा प्रयत्न करण्यात आला त्या व्यक्तीवर [1][आजीव कारावासाच्या] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र अशा अपराधाचा दोषारोप असेल किंवा तशा अपराधाबद्दल गिरफदार होण्यास ती पात्र असेल तर, त्या इसमाला तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल;

किंवा, जर गिरफदार करावयाच्या व्यक्तीवर अथवा जिची अवैधपणे सुटका करण्यात आली किंवा सुटका करण्याचा प्रयत्न करण्यात आला त्या व्यक्तीवर मृत्यूच्या शिक्षेस पात्र अशा अपराधाचा दोषारोप असेल किंवा तशा अपराधाबद्दल गिरफदार होण्यास ती पात्र असेल तर, त्या इसमाला सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्य-दंडासही पात्र होईल;

किंवा, जर गिरफदार करावयाच्या व्यक्तीवर अथवा जिची अवैधपणे सुटका करण्यात आली किंवा सुटका करण्याचा प्रयत्न करण्यात आला ती व्यक्ती न्यायालयाच्या शिक्षादेशाअन्वये, किंवा अशा शिक्षेच्या परिवर्तनामुळे [1][आजीव कारावास] [2]** [3]** [4]** किंवा दहा वर्षे अगर त्याहून अधिक मुदतीच्या कारावासास पात्र असेल तर, त्या इसमाला सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल;

किंवा, जर गिरफदार करावयाची व्यक्ती अथवा जिची अवैधपणे सुटका करण्यात आली किंवा सुटका करण्याचा प्रयत्न करण्यात आला ती व्यक्ती मृत्यूच्या शिक्षादेशास अधीन असेल तर, त्या इसमाला [1][आजीव कारावासाची] किंवा जास्तीत जास्त दहा वर्षे इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**ज्यांसाठी अन्यथा उपबंध केलेला नाही अशा प्रकरणात, लोक सेवकाने गिरफदारी करण्याचे टाळणे किंवा पळून जाऊ देणे.**

[5][२२५क. जो कोणी लोक सेवक असून, कलम २२१, कलम २२२ किंवा कलम २२३ यामध्ये, किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये ज्यासाठी उपबंध करण्यात आलेला नाही अशा कोणत्याही प्रकरणामध्ये, एखाद्या व्यक्तीला गिरफदार करण्यास किंवा बंदिवासात ठेवण्यास तो असा लोक सेवक म्हणून विधितः बद्ध असताना त्या व्यक्तीला गिरफदार करण्याचे टाळील किंवा तिला बंदिवासातून पळून जाऊ देईल त्याला—

(क) जर त्याने तसे उद्देशपूर्वक केले असेल तर, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील; आणि

(ख) जर त्याने तसे हयगयीने केले असेल तर, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

---

१. १९५५चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप/काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १९५७ चा अधिनियम ३६-कलम ३ व २री अनुसूची यांद्वारे "किंवा" हा शब्द गाळण्यात आला.

३. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे "काळ्या पाण्यास" हे शब्द गाळण्यात आले (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

४. १९४९चा अधिनियम १७-कलम २ द्वारे "सक्तमजुरीस" हे शब्द गाळण्यात आले (६ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

५. १८८६ चा अधिनियम १०-कलम २४(१) द्वारे कलम २२५ क ऐवजी कलमे २२५क व २२५ ख ही दाखल करण्यात आली. मूळ कलम २२५क हे १८७०चा अधिनियम २७-कलम ९ द्वारे समाविष्ट करण्यात आले होते.

ज्यांसाठी अन्यथा उपबंध केलेला नाही अशा प्रकरणांत, कायदेशीर गिरफदारीला प्रतिकार करणे किंवा पळून जाणे किंवा अवैधपणे सुटका करणे.

२२५ख. कलम २२४ किंवा कलम २२५ यामध्ये किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये ज्यासाठी उपबंध केलेला नाही अशा कोणत्याही प्रकरणामध्ये, जो कोणी इसम स्वत:च्या किंवा अन्य एखाद्या व्यक्तीच्या कायदेशीर गिरफदारीला उद्देशपूर्वक प्रतिकार किंवा अवैध अटकाव करील, अथवा त्यास जेथे कायदेशीरपणे स्थानबद्ध करण्यात आले अशा कोणत्याही हवालतीतून पळून जाईल किंवा पळून जाण्याचा प्रयत्न करील, अथवा अन्य एखाद्या व्यक्तीला जेथे कायदेशीरपणे स्थानबद्ध करण्यात आले असेल अशा कोणत्याही हवालतीतून तिची अवैधपणे सुटका करील किंवा सुटका करण्याचा प्रयत्न करील त्या इसमाला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.]

२२६. [काळ्या पाण्यावरून बेकायदेशीरपणे परतणे.] 'फौजदारी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९५५' (१९५५ चा २६)-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे निरसित (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

शिक्षा-माफीच्या शर्तीचा भंग.

२२७. कोणतीही सशर्त शिक्षा-माफी स्वीकारल्यानंतर जो कोणी ज्या शर्तीवर अशी माफी देण्यात आली अशा कोणत्याही शर्तीचा जाणीवपूर्वक भंग करील त्याला मुळात जी शिक्षा देण्यात आली होती ती त्याने त्याआधी अजिबात भोगलेली नसेल तर तेवढी शिक्षा होईल, आणि ती शिक्षा त्याने काही अंशी भोगली असेल तर, त्याने त्याआधी जेवढी शिक्षा भोगलेली नसेल तेवढी शिक्षा होईल.

न्यायिक कार्यवाहीत पीठासीन असलेल्या लोक सेवकाचा उद्देशपूर्वक अपमान करणे किंवा त्याच्या कामात व्यत्यय आणणे.

२२८. एखादा लोक सेवक न्यायिक कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्याला पीठासीन असताना जो कोणी उशापूर्वक अशा लोकसेवकाचा कोणत्याही प्रकारे अपमान करील, किंवा त्याच्या कामात व्यत्यय आणील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

विवक्षित अपराधांना बळी पडलेली व्यक्ती कोण ते उघड करणे, इत्यादी.

[१][२२८क. (१) कलम ३७६, कलम ३७६क, कलम ३७६ख, कलम ३७६ग किंवा कलम ३७६घ याखाली ज्या व्यक्तीविरुद्ध अपराध घडल्याचे अभिकथन करण्यात आले असेल किंवा तसे आढळले असेल ती व्यक्ती कोण (या कलमात यापुढे "बळी पडलेली व्यक्ती" म्हणून निर्दिष्ट) हे ज्यावरून ज्ञात होईल असे नाव किंवा मजकूर जो कोणी मुद्रित किंवा प्रकाशित करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

(२) बळी पडलेली व्यक्ती कोण ते ज्यावरून ज्ञात होऊ शकेल असे नाव किंवा मजकूर याचे मुद्रण किंवा प्रकाशन हे जर,—

(क) पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याने किंवा अशा अपराधाबाबत अन्वेषण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने सद्भावपूर्वक अशा अन्वेषणाच्या प्रयोजनार्थ, अथवा त्याच्या लेखी आदेशानुसार केलेले असेल तर ; अथवा

(ख) बळी पडलेल्या व्यक्तीने किंवा तिच्या लेखी प्राधिकारान्वये केलेले असेल तर ; अथवा

(ग) बळी पडलेली व्यक्ती मरण पावली असेल किंवा अज्ञान असेल किंवा मनोविकल असेल त्याबाबतीत, बळी पडलेल्या व्यक्तीच्या निकट आप्तसंबंधीने अथवा त्याच्या लेखी प्राधिकारान्वये केलेले असेल तर,

अशा मुद्रणाला किंवा प्रकाशनाला पोटकलम (१) मधील काहीही लागू होत नाही :

परंतु, निकट आप्तसंबंधीने असे प्राधिकारपत्र कोणत्याही मान्यताप्राप्त कल्याणकारी संस्थेचा किंवा संघटनेचा अध्यक्ष किंवा सचिव—मग त्यांचे नामाभिधान काहीही असो—याच्याशिवाय अन्य कोणाही व्यक्तीस देता कामा नये.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, "मान्यताप्राप्त कल्याणकारी संस्था किंवा संघटना" म्हणजे केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने याद्वारे मान्यता दिलेली सामाजिक कल्याणकारी संस्था किंवा संघटना होय.

(३) जो कोणी पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अपराधाच्या संबंधात न्यायालयासमोर चाललेल्या कोणत्याही कार्यवाहीबाबत अशा न्यायालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणताही मजकूर मुद्रित किंवा प्रकाशित करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाची कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**—कोणत्याही उच्च न्यायालयाच्या किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचे मुद्रण किंवा प्रकाशन हे या कलमाच्या अर्थानुसार अपराध म्हणून गणले जाणार नाही.]

---

१. फौजदारी विधि (विशोधन) अधिनियम, १९८३ (१९८३ चा ४३)-कलम २ द्वारे समाविष्ट केले (२५ डिसेंबर, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२२९. आपण ज्यूरी-सदस्य किंवा न्यायसहायक म्हणून निवडून येण्यास, नामिकाप्रविष्ट होण्यास किंवा शपथ दिली जाण्यास विधित: हक्कदार नाही हे स्वत:स माहीत असेल अशा कोणत्याही प्रकरणी तोतयेगिरी करून किंवा अन्यथा जो कोणी अशा प्रकारे स्वत: निवडून येण्याची, नामिकाप्रविष्ट होण्याची किंवा स्वत:स शपथ दिली जाण्याची उद्देशपूर्वक व्यवस्था करील अथवा जाणीवपूर्वक तसे होऊ देईल अथवा तो स्वत: अशा रीतीने बेकायदा निवडून आलेला आहे, नामिकाप्रविष्ट झालेला आहे किंवा तशी शपथ दिली गेलेली आहे हे माहीत असून अशा ज्यूरीवर किंवा असा न्यायसहायक म्हणून इच्छापूर्वक काम करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

ज्यूरी-सदस्याची किंवा न्याय-सहायकाची तोतयेगिरी करून किंवा बतावणी करून आपणांस तोतयेगिरी करणे.

## प्रकरण १२ वे

## नाणी व शासकीय मुद्रांक यांसंबंधीच्या अपराधांविषयी

२३०. [१]["नाणे" म्हणजे त्या त्या काळी पैसा म्हणून वापरला जाणारा आणि याप्रमाणे वापरला जावा म्हणून एखाद्या देशाच्या किंवा सार्वभौम सत्तेच्या प्राधिकाराअन्वये छाप मारलेला व चलनात आणलेला धातू होय.]

"नाणे" याची व्याख्या.

[२]["भारतीय नाणे" म्हणजे पैसा म्हणून वापरला जावा यासाठी जो भारत सरकारच्या प्राधिकाराअन्वये छाप मारलेला व चलनात आणलेला असेल तो धातू होय ; आणि अशा रीतीने छाप मारलेला व चलनात आणलेला धातू, तो पैसा म्हणून वापरण्याचे बंद झालेले असले तरी, या प्रकरणाच्या प्रयोजनांपुरता भारतीय नाणे असण्याचे चालू राहील.]

भारतीय नाणे.

### उदाहरणे

(क) कवड्या ही नाणी नव्हेत.

(ख) छाप नसलेले तांब्याचे तुकडे पैसा म्हणून जरी वापरले तरी ती नाणी नव्हेत.

(ग) पदके ही पैसा म्हणून वापरण्याचा उद्देश नसतो, म्हणून ती नाणी नव्हेत.

(घ) ज्या नाण्याला कंपनीचा रुपया असे म्हटले जाते ते [३][भारतीय नाणे] होय.

[४][(ङ) भारत सरकारच्या प्राधिकाराअन्वये पूर्वी जो पैसा म्हणून वापरला जात होता तो 'फरुखाबादी रुपया' हा आता तसा वापरण्यात येत नसला तरी ते [३][भारतीय नाणे] आहे.

२३१. जो कोणी कोणतेही नाणे नकली तयार करील किंवा जाणीवपूर्वक त्याच्या नकलीकरणाच्या प्रक्रियेतील कोणताही भाग पार पाडील त्याला सात वर्षेपर्यन्त असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

नाणे नकली तयार करणे.

**स्पष्टीकरण.**—फसगत करण्याच्या उद्देशाने किंवा त्यामुळे फसगत होणे संभवनीय आहे हे माहीत असताना जी व्यक्ती अस्सल नाणे हे वेगळ्या नाण्यासारखे दिसण्याची व्यवस्था करील ती व्यक्ती हा अपराध करते.

२३२. जो कोणी [३][भारतीय नाणे] नकली तयार करील किंवा जाणीवपूर्वक त्याच्या नकलीकरणाच्या प्रक्रियेतील कोणताही भाग पार पाडील त्याला [५][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

भारतीय नाणे नकली तयार करणे.

२३३. जो कोणी एखादा साचा किंवा साधन हे, नाणे नकली तयार करण्यासाठी त्याचा वापर व्हावा यासाठी किंवा तसा वापर होण्याचे उद्देशित आहे हे माहीत असताना किंवा तसे समजण्यास कारण असताना बनवील किंवा नीट करील अथवा ते बनवण्याच्या किंवा नीट करण्याच्या प्रक्रियेतील कोणताही भाग पार पाडील अथवा ते विकत घेईल, विकेल किंवा त्याची वासलात लावील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

नाणे नकली तयार करण्याचे साधन बनवणे किंवा विकणे.

---

१. १८७२ चा अधिनियम १९-कलम १ द्वारे मूळ पहिल्या परिच्छेदाऐवजी हा परिच्छेद दाखल करण्यात आला.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे पूर्वीच्या परिच्छेदाऐवजी हा परिच्छेद दाखल करण्यात आला.

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'क्वीनचे नाणे' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

४. १८९६ चा अधिनियम ६-कलम १(२) द्वारे या खंडाची भर घालण्यात आली.

५. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची याद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

**भारतीय नाणे नकली तयार करण्याचे साधन बनवणे किंवा विकणे.**

२३४. जो कोणी एखादा साचा किंवा साधन हे, [1][भारतीय नाणे] नकली तयार करण्यासाठी त्याचा वापर व्हावा यासाठी किंवा तसा वापर होण्याचे उद्देशित आहे हे माहीत असताना किंवा तसे समजण्यास कारण असताना बनवील किंवा नीट करील अथवा ते बनवण्याच्या किंवा नीट करण्याच्या प्रक्रियेतील कोणताही भाग पार पाडील अथवा, ते विकत घेईल, विकेल किंवा त्याची वासलात लावील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**नाणे नकली तयार करण्याच्या कामी वापरण्याकरता साधन किंवा सामग्री कब्जात बाळगणे;**

२३५. जो कोणी एखादे साधन किंवा सामग्री नाणे नकली तयार करण्याच्या कामी वापरण्याकरता अथवा त्यांचा तसा वापर होण्याचे उद्देशित आहे हे माहीत असताना किंवा तसे समजण्यास कारण असताना कब्जात बाळगील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल;

**भारतीय नाणे असेल तर.**

आणि नकली तयार करावयाचे नाणे [1][भारतीय नाणे] असेल तर त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**भारताबाहेर नाण्याचे नकलीकरण करण्यास भारतामध्ये अपप्रेरणा देणे.**

२३६. जो कोणी [2][भारतात] असताना [2][भारताबाहेर] नाण्याचे नकलीकरण करण्यास अपप्रेरणा देईल त्याला, जणू काही त्याने [2][भारतात] अशा नाण्याचे नकलीकरण करण्यास अपप्रेरणा दिलेली असावी अशाप्रकारे शिक्षा होईल.

**नकली नाण्याची आयात किंवा निर्यात.**

२३७. जो कोणी कोणतेही नकली नाणे, ते नकली आहे हे माहीत असताना किंवा तसे समजण्यास कारण असताना [2][भारतात] आयात करील अथवा तेथून निर्यात करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**नकली भारतीय नाण्याची आयात किंवा निर्यात.**

२३८. जो कोणी कोणतेही नकली नाणे, ते [1][भारतीय नाण्याची] नक्कल आहे हे माहीत असताना किंवा तसे समजण्यास कारण असताना [2][भारतात] आयात करील अथवा तेथून निर्यात करील त्याला, [3][आजीव कारावासाची] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**कोणतेही नाणे नकली आहे याची जाणीव असताना ते सुपूर्द करणे.**

२३९. स्वत:च्या कब्जात असलेले कोणतेही नकली नाणे ज्यावेळी आपल्या कब्जात आले त्यावेळी ते नकली नाणे असल्याचे माहीत असताना जो कोणी कपटीपणाने किंवा कपट करणे शक्य व्हावे या उद्देशाने कोणत्याही व्यक्तीकडे ते सुपूर्द करील किंवा ते स्वीकारण्यास कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**भारतीय नाणे नकली आहे याची जाणीव असताना ते सुपूर्द करणे.**

२४०. स्वत:च्या कब्जात असलेले कोणतेही [1][भारतीय नाण्याची] नक्कल असलेले नकली नाणे ज्यावेळी आपल्या कब्जात आले त्यावेळी ते [1][भारतीय नाण्याची] नक्कल असल्याचे माहीत असताना जो कोणी कपटीपणाने किंवा कपट करता यावे या उद्देशाने कोणत्याही व्यक्तीकडे ते सुपूर्द करील किंवा ते स्वीकारण्यास कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**एखादे नाणे खरे म्हणून सुपूर्द करणे—ते जेव्हा प्रथम कब्जात आले तेव्हा सुपूर्दकाराला ते नकली असल्याचे माहीत नसल्यास.**

२४१. जे कोणतेही नकली नाणे नकली असल्याचे स्वत:ला माहीत आहे, पण जे आपल्या कब्जात घेतले तेव्हा ते नकली असल्याचे स्वत:ला माहीत नव्हते असे कोणतेही नकली नाणे जो कोणी अन्य कोणत्याही व्यक्तीकडे अस्सल म्हणून सुपूर्द करील किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीस ते अस्सल म्हणून स्वीकारण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा नकलीकरण केलेल्या नाण्याच्या मूल्याच्या दहा पटीपर्यंत असू शकेल इतक्या रकमेच्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'क्वीनचे नाणे' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. क्रमश:, अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० व १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' याऐवजी वरील शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

३. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची याद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

**उदाहरण**

'क' हा माणेकार कंपनीचे नकली रुपये चालवण्यासाठी ते 'ख' या आपल्या सहापराध्याकडे सुपूर्द करतो. 'ख' ते रुपये 'ग' या दुसऱ्या नाणी चालवणाऱ्या माणसाला विकतो व तो ते नकली असल्याचे माहीत असताना विकत घेतो. 'ग' मालाचे पैसे म्हणून ते रुपये 'घ' ला देऊन टाकतो व तो ते नकली असल्याचे माहीत नसताना स्वीकारतो. ते स्वीकारल्यानंतर 'घ' ला ते नकली असल्याचे लक्षात येते आणि ते जणू काही विधिग्राह्य असावेत त्याप्रमाणे तो देऊन टाकतो. या बाबतीत 'घ' फक्त या कलमाखाली शिक्षापात्र आहे, पण 'ख' व 'ग' हे, कलम २३९ किंवा, प्रकरणपरत्वे, २४० खाली शिक्षापात्र आहेत.

एखाद्या व्यक्तीने नकली नाणे कब्जात बाळगणे—ते कब्जात आले तेव्हा ते नकली असल्याचे तिला माहीत असल्यास.

**२४२.** जे नकली नाणे कोणत्याही नाण्याची नक्कल असेल ते कब्जात आले त्या वेळेस ते नकली होते हे स्वत:ला माहीत असून जो कोणी ते नकली नाणे कपटीपणाने किंवा कपट करता यावे या उद्देशाने कब्जात बाळगील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

एखाद्या व्यक्तीने भारतीय नाणे कब्जात बाळगणे—ते कब्जात आले तेव्हा ते नकली असल्याचे तिला माहीत असल्यास.

**२४३.** जे नकली नाणे [१][भारतीय नाण्याची] नक्कल असेल ते कब्जात आले त्यावेळेस ते नकली होते हे स्वत:ला माहीत असून जो कोणी ते नकली नाणे कपटीपणाने किंवा कपट करता यावे या उद्देशाने कब्जात बाळगील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

टाकसाळीत कामाला असलेल्या व्यक्तीने कायद्यानुसार ठरलेल्याहून निराळ्या वजनाचे किंवा मिश्रणाचे नाणे घडवणे.

**२४४.** जो कोणी [२][भारतात] कायदेशीरपणे स्थापन झालेल्या कोणत्याही टाकसाळीत कामाला असून, त्या टाकसाळीतून निघणाऱ्या कोणत्याही नाण्यासाठी कायद्याने ठरलेल्याहून निराळ्या वजनाचे किंवा मिश्रणाचे कोणतेही नाणे घडवण्याच्या उद्देशाने कोणतीही कृती करील किंवा जे करण्यास तो विधित: बद्ध आहे ते करण्याचे टाळील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

नाणी बनवण्याचे साधन बेकायदेशीरपणे टाकसाळीतून घेऊन जाणे.

**२४५.** जो कोणी [२][भारतात] कायदेशीरपणे स्थापन झालेल्या कोणत्याही टाकसाळीतून कोणतेही नाणी बनवण्याचे हत्यार किंवा साधन कायदेशीर प्राधिकाराविना घेऊन जाईल त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

कपटीपणाने किंवा अप्रामाणिकपणाने नाण्याचे वजन कमी करणे किंवा मिश्रण बदलणे.

**२४६.** जो कोणी कपटीपणाने किंवा अप्रामाणिकपणाने कोणत्याही नाण्यावर, जीमुळे त्या नाण्याचे वजन कमी होते किंवा मिश्रण बदलते अशी कोणतीही क्रिया करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**—जी व्यक्ती नाण्याचा एखादा भाग पोखरून त्या पोकळीत अन्य कोणताही पदार्थ भरते तिने त्या नाण्याचे मिश्रण बदलले असे होते.

कपटीपणाने किंवा अप्रामाणिकपणाने भारतीय नाण्याचे वजन कमी करणे किंवा मिश्रण बदलणे.

**२४७.** जो कोणी कपटीपणाने किंवा अप्रामाणिकपणाने [३][कोणत्याही भारतीय नाण्यावर] जीमुळे त्या नाण्याचे वजन कमी होते किंवा मिश्रण बदलते अशी कोणतीही क्रिया करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'क्वीनचे नाणे' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. क्रमश:, अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० व १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' याऐवजी वरील शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "क्वीनच्या नाण्यांपैकी कोणत्याही नाण्यावर" याऐवजी घातले.

एखादे नाणे निराळ्या वर्णनाचे नाणे म्हणून खपून जावे या उद्देशाने त्या नाण्याचे रूप बदलणे.

२४८. जो कोणी कोणत्याही नाण्यावर, उक्त नाणे निराळ्या वर्णनाचे नाणे म्हणून खपून जावे या उद्देशाने त्यावर जीमुळे त्या नाण्याचे रूप बदलेल अशी कोणतीही क्रिया करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

भारतीय नाणे निराळ्या वर्णनाचे नाणे म्हणून खपून जावे या उद्देशाने त्या नाण्याचे रूप बदलणे.

२४९. जो कोणी [1][कोणत्याही भारतीय नाण्यावर], उक्त नाणे निराळ्या वर्णनाचे नाणे म्हणून खपून जावे या उद्देशाने त्यावर जीमुळे त्या नाण्याचे रूप बदलेल अशी कोणतीही क्रिया करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

बदल करण्यात आला आहे हे माहीत असताना कब्जात बाळगलेले नाणे सुपूर्द करणे.

२५०. ज्याच्याबाबत कलम २४६ किंवा २४८ मध्ये व्याख्या केलेला अपराध करण्यात आलेला आहे ते नाणे स्वतःच्या कब्जात असून आणि असे नाणे जेव्हा कब्जात आले तेव्हा त्याबाबत असा अपराध करण्यात आला असल्याचे माहीत असून जो कोणी कपटीपणाने किंवा कपट करता यावे या उद्देशाने असे नाणे अन्य कोणत्याही व्यक्तीकडे सुपूर्द करील किंवा ते स्वीकारण्यास अन्य कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

बदल करण्यात आला आहे हे माहीत असताना कब्जात बाळगलेले भारतीय नाणे सुपूर्द करणे.

२५१. ज्याच्याबाबत कलम २४७ किंवा २४९ मध्ये व्याख्या केलेला अपराध करण्यात आलेला आहे ते नाणे स्वतःच्या कब्जात असून आणि असे नाणे जेव्हा कब्जात आले तेव्हा त्याबाबत असा अपराध करण्यात आला असल्याचे माहीत असून जो कोणी कपटीपणाने किंवा कपट करता यावे या उद्देशाने असे नाणे अन्य कोणत्याही व्यक्तीकडे सुपूर्द करील किंवा ते स्वीकारण्यास अन्य कोणत्याही व्यक्तीस प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

बदल करण्यात आलेले नाणे एखाद्या व्यक्तीने कब्जात बाळगणे—ते नाणे कब्जात आले तेव्हा त्यात बदल केला असल्याचे तिला माहीत असल्यास.

२५२. ज्याच्याबाबत कलम २४६ किंवा २४८ यांपैकी कोणत्याही कलमामध्ये व्याख्या केलेला अपराध करण्यात आला आहे ते नाणे कब्जात आले तेव्हा अशा नाण्याबाबत असा अपराध घडला असल्याचे स्वतःला माहीत असून जो कोणी कपटीपणाने किंवा कपट करता यावे या उद्देशाने ते कब्जात बाळगील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

बदल करण्यात आलेले भारतीय नाणे एखाद्या व्यक्तीने कब्जात बाळगणे—ते नाणे कब्जात आले तेव्हा त्यात बदल केला असल्याचे तिला माहीत असल्यास.

२५३. ज्याच्याबाबत कलम २४७ किंवा २४९ यांपैकी कोणत्याही कलमामध्ये व्याख्या केलेला अपराध करण्यात आला आहे ते नाणे कब्जात आले तेव्हा अशा नाण्याबाबत असा अपराध घडला असल्याचे स्वतःला माहीत असून जो कोणी कपटीपणाने किंवा कपट करता यावे या उद्देशाने ते कब्जात बाळगील त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्या तरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

एखादे नाणे अस्सल म्हणून सुपूर्द करणे— ते नाणे पहिल्यांदा कब्जात आले तेव्हा त्यात बदल करण्यात आल्याचे सुपूर्दकाराला माहीत नसल्यास.

२५४. ज्याच्याबाबत कलम २४६, २४७, २४८ किंवा कलम २४९ मध्ये उल्लेखिलेली अशी कोणतीही क्रिया करण्यात आलेली असल्याचे स्वतःला माहीत आहे, पण जे आपल्या कब्जात घेतले तेव्हा अशी क्रिया केली होती हे स्वतःला माहीत नव्हते असे कोणतेही नाणे जो कोणी अन्य कोणत्याही व्यक्तीकडे अस्सल म्हणून किंवा ते जसे आहे त्याहून निराळ्या वर्णनाचे नाणे म्हणून सुपूर्द करील अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीस ते खरे म्हणून किंवा ते जसे आहे त्याहून निराळ्या प्रकारचे नाणे म्हणून स्वीकारण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा बदललेले नाणे ज्याच्या बदली खपवण्यात आले किंवा खपवण्याचा प्रयत्न करण्यात आला त्या नाण्याच्या मूल्याच्या दहा पटीपर्यंत असू शकेल इतक्या रकमेच्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

शासकीय मुद्रांक नकली तयार करणे.

२५५. जो कोणी महसुलाच्या प्रयोजनार्थ शासनाद्वारे पुरःसृत असा कोणताही मुद्रांक नकली तयार करील किंवा जाणीवपूर्वक त्याच्या नकलीकरणाच्या प्रक्रियेचा कोणताही भाग पार पाडील त्याला, [2][आजीव कारावासाची] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "क्वीनच्या नाण्यांपैकी कोणत्याही नाण्यावर" याऐवजी घातले.

२. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

**स्पष्टीकरण.**—जी व्यक्ती एका अभिधानाचा अस्सल मुद्रांक निराळ्या अभिधानाच्या अस्सल मुद्रांकासारखा दिसेल असे करते ती हा अपराध करते.

२५६. महसुलाच्या प्रयोजनार्थ शासनाद्वारे पुरःसृत असा कोणताही मुद्रांक नकली तयार करण्यासाठी कोणतेही साधन किंवा सामग्री वापरण्याच्या प्रयोजनार्थ अथवा तसा वापर होण्याचे उद्देशित आहे हे माहीत असून किंवा तसे समजण्यास कारण असून जो कोणी ते कब्जात बाळगील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. शासकीय मुद्रांक नकली तयार करण्यासाठी साधन किंवा सामग्री कब्जात बाळगणे.

२५७. महसुलाच्या प्रयोजनार्थ शासनाद्वारे पुरःसृत असा कोणताही मुद्रांक नकली तयार करण्यासाठी कोणतेही साधन वापरण्याच्या प्रयोजनार्थ अथवा तसा वापर होण्याचे उद्देशित आहे हे माहीत असून अथवा तसे समजण्यास कारण असून जो कोणी ते बनवील किंवा बनवण्याच्या प्रक्रियेचा कोणताही भाग पार पाडील किंवा ते विकत घेईल किंवा विकेल किंवा त्याची वासलात लावील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. शासकीय मुद्रांक नकली तयार करण्यासाठी साधन बनवणे किंवा विकणे.

२५८. जो मुद्रांक महसुलाच्या प्रयोजनार्थ शासनाद्वारे पुरःसृत अशा कोणत्याही मुद्रांकाची नक्कल असल्याचे स्वतःला माहीत आहे किंवा तसे समजण्यास कारण आहे असा कोणताही मुद्रांक जो कोणी विकेल किंवा विकत देऊ करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. नकली शासकीय मुद्रांकाची विक्री.

२५९. जो मुद्रांक महसुलाच्या प्रयोजनार्थ शासनाद्वारे पुरःसृत अशा कोणत्याही मुद्रांकाची नक्कल असल्याचे स्वतःला माहीत आहे असा कोणताही मुद्रांक अस्सल मुद्रांक म्हणून वापरण्याच्या किंवा त्याची तशी वासलात लावण्याच्या उद्देशाने अथवा तो अस्सल म्हणून वापरला जावा यासाठी जो कोणी कब्जात बाळगील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. नकली शासकीय मुद्रांक कब्जात बाळगणे.

२६०. कोणताही मुद्रांक महसुलाच्या प्रयोजनार्थ शासनाद्वारे काढलेल्या कोणत्याही मुद्रांकाची नक्कल असल्याचे माहीत असून जो कोणी तो अस्सल म्हणून वापरील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. जो नकली असल्याचे माहीत आहे असा शासकीय मुद्रांक अस्सल म्हणून वापरणे.

२६१. कपटीपणाने किंवा शासनास हानी पोचवण्याच्या उद्देशाने जो कोणी महसुलाच्या प्रयोजनार्थ शासनाद्वारे पुरःसृत असा कोणताही मुद्रांक लावलेल्या कोणत्याही पदार्थावरून ज्याच्यासाठी असा मुद्रांक वापरण्यात आला आहे असा कोणताही लेख किंवा दस्तऐवज काढून टाकील किंवा पुसून टाकील अथवा कोणत्याही लेखासाठी किंवा दस्तऐवजासाठी जो मुद्रांक वापरला असेल तो वेगळ्या लेखासाठी किंवा दस्तऐवजासाठी वापरता यावा म्हणून अशा लेखावरून किंवा दस्तऐवजावरून तो मुद्रांक काढून टाकील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. शासनास हानी पोचवण्याच्या उद्देशाने, शासकीय मुद्रांक लावलेल्या पदार्थावरील लेख पुसून टाकणे किंवा एखाद्या दस्तऐवजासाठी वापरलेला मुद्रांक त्यावरून काढून टाकणे.

२६२. कपटीपणाने किंवा शासनास हानी पोचवण्याच्या उद्देशाने जो कोणी महसुलाच्या प्रयोजनार्थ शासनाद्वारे पुरःसृत असा जो मुद्रांक आधी वापरण्यात आलेला असल्याचे स्वतःला माहीत आहे तो मुद्रांक कोणत्याही प्रयोजनार्थ वापरील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. जो आधी वापरण्यात आलेला असल्याचे माहीत आहे असा शासकीय मुद्रांक वापरणे.

२६३. कपटीपणाने किंवा शासनास हानी पोचवण्याच्या उद्देशाने जो कोणी महसुलाच्या प्रयोजनार्थ शासनाद्वारे पुरःसृत असा मुद्रांक वापरण्यात आलेला आहे हे दर्शवण्यासाठी अशा मुद्रांकावर जी कोणतीही खूण लावली असेल किंवा जिचा ठसा मारला असेल ती त्यावरून खोडून किंवा काढून टाकील अथवा ज्याच्यावरून अशी खूण खोडण्यात किंवा काढून टाकण्यात आलेली आहे असा कोणताही मुद्रांक जाणीवपूर्वक आपल्या कब्जात बाळगील अथवा जो वापरण्यात आला असल्याचे स्वतःला माहीत आहे अशा कोणत्याही मुद्रांकाची विक्री करील किंवा वासलात लावील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. मुद्रांक वापरण्यात आलेला असल्याचे दर्शवणारी खूण खोडून टाकणे.

[1][ २६३क. (१) जो कोणी,—

खोट्या मुद्रांकांना मनाई.

(क्) कोणताही खोटा मुद्रांक बनवील, जाणीवपूर्वक चालवील, त्याचा व्यवहार करील किंवा त्याची विक्री करील, अथवा असा कोणताही खोटा मुद्रांक जाणीवपूर्वक कोणत्याही डाक प्रयोजनार्थ वापरील, किंवा

(ख्) कोणताही खोटा मुद्रांक कायदेशीर सबबीशिवाय आपल्या कब्जात बाळगील, किंवा

(ग्) कोणताही खोटा मुद्रांक बनवण्याचा कोणताही साचा, मुद्रापट्ट, साधन किंवा सामग्री बनवील किंवा कायदेशीर सबबीशिवाय कब्जात बाळगील,

त्याला दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) कोणताही खोटा मुद्रांक बनवण्यासाठी कोणत्याही व्यक्तीने कब्जात बाळगलेला असा कोणताही मुद्रांक, साचा, मुद्रापट्ट, साधन किंवा सामग्री [2][अभिग्रहण करता येईल व अभिग्रहण केले असल्यास] ते समपहृत करण्यात येईल.

(३) या कलमात "खोटा मुद्रांक" याचा अर्थ, जो मुद्रांक टपालाचा दर दर्शवण्यासाठी भारताच्या किंवा एखाद्या परकीय देशाच्या सरकारने पुर:सृत केला असल्याचा खोटा भास निर्माण होतो असा कोणताही मुद्रांक किंवा त्या प्रयोजनार्थ अशा सरकारने पुर:सृत केलेल्या कोणत्याही मुद्रांकाचे कोणतेही प्रतिरूप किंवा अनुकृती किंवा प्रतिरूपण असा आहे—मग ते कागदावरील असो वा अन्य प्रकारचे असो.

(४) या कलमामध्ये व कलमे २५५ ते २६३ (दोन्ही धरून) यांमध्ये, टपालहशीलाचा दर दर्शवण्याच्या प्रयोजनासाठी पुर:सृत केलेल्या कोणत्याही मुद्रांकाच्या संबंधात किंवा त्यास अनुलक्षून "शासन/सरकार" हा शब्द वापरण्यात येईल तेव्हा, कलम १७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी त्या शब्दामध्ये, भारताच्या कोणत्याही भागामध्ये, आणि हर मॅजेस्टीच्या डोमिनिअन्सच्या कोणत्याही भागामध्ये किंवा कोणत्याही परकीय देशामध्येदेखील कार्यकारी शासनाचे प्रशासन करण्यासाठी विधित: प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचा किंवा व्यक्तींचा समावेश असल्याचे मानण्यात येईल.]

## प्रकरण १३ वे

## वजने व मापे यांसंबंधीच्या अपराधांविषयी

वजन करण्यासाठी खोट्या साधनाचा कपटपूर्ण वापर.

२६४. वजन करण्याचे जे कोणतेही साधन खोटे असल्याचे स्वत:ला माहीत आहे ते जो कोणी कपटीपणाने वापरील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

खोटे वजन किंवा माप याचा कपटपूर्ण वापर.

२६५. जो कोणी कपटीपणाने कोणतेही खोटे वजन अगर लांबीरुंदीचे किंवा धारकतेचे खोटे माप वापरील अथवा कोणतेही वजन किंवा कोणतेही लांबीरुंदीचे किंवा धारकतेचे माप ते जसे आहे त्याहून निराळे वजन किंवा माप म्हणून वापरील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

खोटे वजन किंवा माप कब्जात बाळगणे.

२६६. जे कोणतेही तोलण्याचे साधन किंवा कोणतेही वजन किंवा कोणतेही लांबीरुंदीचे अगर धारकतेचे माप खोटे असल्याचे स्वत:ला माहीत आहे [3]* * * ते कपटीपणाने वापरले जावे अशा उद्देशाने जो कोणी ते कब्जात बाळगील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

खोटे वजन किंवा माप बनवणे किंवा विकणे.

२६७. जे कोणतेही तोलण्याचे साधन किंवा कोणतेही वजन किंवा कोणतेही लांबीरुंदीचे अगर धारकतेचे माप खोटे असल्याचे स्वत:ला माहीत आहे ते खरे म्हणून वापरले जावे यासाठी किंवा ते खरे म्हणून वापरले जाणे संभवनीय असल्याची जाणीव असून जो कोणी ते बनवील, विकेल किंवा त्याची वासलात लावील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

---

१. १८९५ चा अधिनियम ३-कलम २ द्वारे या कलमाची भर घालण्यात आली.

२. १९५३ चा अधिनियम ४२-कलम ४ व ३ री अनुसूची यांद्वारे "अभिग्रहण करता येईल व" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. १९५३ चा अधिनियम ४२-कलम ४ व ३ री अनुसूची यांद्वारे "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

प्रकरण १४ वे

## सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता, सोय, सभ्यता व नीतिमत्ता यांना बाधक अशा अपराधांविषयी

२६८. जिच्यामुळे जनतेला अथवा जे आजूबाजूला राहातात किंवा तेथील मालमत्तेच्या ठिकाणी ज्यांची वहिवाट आहे अशा सरसकट सर्व लोकांना सामयिकपणे होणारी क्षती, धोका किंवा त्रास होतो अथवा ज्यांना कोणताही सार्वजनिक हक्क वापरण्याचा प्रसंग येईल त्या व्यक्तींना क्षती, अटकाव, धोका किंवा त्रास होणे अपरिहार्य आहे अशी कोणतीही कृती करणारी किंवा अशा कोणत्याही अवैध अकृतीबद्दल दोषी असणारी व्यक्ती सार्वजनिक उपद्रवाबद्दल दोषी असते. सार्वजनिक उपद्रव.

सामयिक उपद्रवामुळे काही सोय किंवा फायदा होतो या कारणावरून तो माफ होत नाही.

२६९. जिच्यामुळे जीवितास धोकादायक असलेल्या कोणत्याही रोगाचा संसर्ग पसरण्याचा संभव असून ते स्वत:ला माहीत आहे किंवा तसे समजण्यास कारण आहे अशी कोणतीही कृती जो कोणी बेकायदेशीरपणे किंवा हयगयीने करील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्या-तरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. जीवितास धोकादायक असलेल्या रोगाचा संसर्ग पसरवण्याचा संभव असलेली हयगयीची कृती.

२७०. जिच्यामुळे जीवितास धोकादायक असलेल्या कोणत्याही रोगाचा संसर्ग पसरण्याचा संभव असून ते स्वत:ला माहीत आहे किंवा तसे समजण्यास कारण आहे अशी कोणतीही कृती जो कोणी घातकीपणाने करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. जीवितास धोकादायक असलेल्या रोगाचा संसर्ग पसरवण्याचा संभव असलेली घातकी कृती.

२७१. कोणतेही जलयान पृथक्वासस्थितीत ठेवण्यासाठी अथवा पृथक्वासस्थितीतील जलयानांचे किनाऱ्याशी किंवा इतर जलयानांशी जे दळणवळण राहते त्याच्या विनियमनासाठी अथवा ज्या ठिकाणी सांसर्गिक रोग फैलावला आहे ती ठिकाणे आणि इतर ठिकाणे यांच्यामधील दळणवळणाचे विनियमन करण्यासाठी [1][2 * * * * शासनाने [3] * * * *] केलेल्या व जारी केलेल्या कोणत्याही नियमाची जो कोणी जाणीवपूर्वक अवज्ञा करील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. पृथक्वासाच्या नियमाची अवज्ञा.

२७२. जर कोणी कोणताही खाद्यपदार्थ किंवा पेयपदार्थ अन्न किंवा पेय म्हणून अपायकारक होईल अशाप्रकारे अशा पदार्थात भेसळ केली, व असा पदार्थ अन्न किंवा पेय म्हणून विकण्याचा त्याचा उद्देश असेल अथवा तो अन्न किंवा पेय म्हणून विकला जाणे संभवनीय आहे याची त्याला जाणीव असेल तर त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. विक्रीसाठी असलेल्या खाद्य-पदार्थात किंवा पेयात भेसळ.

२७३. जो कोणताही पदार्थ अपायकारक करण्यात आला आहे किंवा झाला आहे अथवा खाण्या-साठी किंवा पिण्यासाठी अयोग्य अशा स्थितीत आहे तो अन्न किंवा पेय म्हणून अपायकारक आहे हे स्वत:ला माहीत असून किंवा तसे समजण्यास कारण असून जो कोणी तो पदार्थ अन्न किंवा पेय म्हणून विकल किंवा विकत देऊ करील किंवा विक्रीसाठी मांडील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. अपायकारक खाद्य-पदार्थाची किंवा पेयाची विक्री.

२७४. जर कोणी कोणतेही औषधिद्रव्य किंवा औषधीय सिद्धपदार्थ याची गुणकारिता कमी होईल किंवा त्याचे कार्य बदलेल अशा रीतीने अशा औषधिद्रव्यात किंवा औषधीय सिद्धपदार्थात भेसळ केली आणि त्यात जणू काही अशी भेसळ झालेली नसावी त्याप्रमाणे कोणत्याही औषधोपचाराच्या प्रयोजना-साठी तो विकला जावा किंवा वापरला जावा असा त्याचा उद्देश असेल अथवा त्यासाठी तो विकला जाणे किंवा वापरला जाणे संभवनीय असल्याची त्याला जाणीव असेल तर त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. औषधिद्रव्यांमध्ये भेसळ.

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "भारत सरकारने किंवा कोणत्याही शासनाने" याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "केंद्रीय किंवा कोणत्याही प्रांतिक" हे शब्द वगळण्यात आले.

३. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे "किंवा क्राऊन रिप्रेझेंटेटिव्हने" हे शब्द वगळण्यात आले.

भेसळयुक्त औषधिद्रव्यांची विक्री.

२७५. कोणतेही औषधिद्रव्य किंवा औषधीय सिद्धपदार्थ याची गुणकारिता कमी होईल किंवा त्याचे कार्य बदलेल किंवा ते अपायकारक होईल अशा रीतीने त्यात भेसळ करण्यात आलेली आहे हे माहीत असून जो कोणी ते विकेल किंवा विकत देऊ करील किंवा विक्रीसाठी मांडील किंवा ते निर्भेळ म्हणून औषधोपचाराच्या प्रयोजनांसाठी एखाद्या दवाखान्यामार्फत देईल किंवा भेसळ झाल्याचे माहीत नसलेल्या एखाद्या व्यक्तीकडून औषधोपचाराच्या प्रयोजनांसाठी त्याचा उपयोग करवील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

एखादे औषधिद्रव्य वेगळे औषधिद्रव्य किंवा सिद्धपदार्थ म्हणून विकणे.

२७६. कोणतेही औषधिद्रव्य किंवा औषधीय सिद्धपदार्थ जो कोणी वेगळे औषधिद्रव्य किंवा सिद्धपदार्थ म्हणून जाणीवपूर्वक विकेल किंवा विकत देऊ करील किंवा विक्रीसाठी मांडील किंवा औषधोपचाराच्या प्रयोजनांसाठी एखाद्या दवाखान्यामार्फत देईल त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

सार्वजनिक झऱ्याचे किंवा जलाशयाचे पाणी घाण करणे.

२७७. कोणत्याही सार्वजनिक झऱ्याचे किंवा जलाशयाचे पाणी सर्वसामान्यपणे ज्यासाठी वापरण्यात येते त्या प्रयोजनार्थ त्याची योग्यता कमी होईल अशा प्रकारे जो कोणी इच्छापूर्वक ते दूषित करील किंवा घाण करील त्याला, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

वातावरण आरोग्यास अपायकारक करणे.

२७८. एखाद्या ठिकाणचे वातावरण आसपास राहणाऱ्या किंवा कामधंदा करणाऱ्या किंवा सार्वजनिक रस्त्यावरून जाणाऱ्या सरसकट सर्व व्यक्तींच्या आरोग्यास अपायकारक होईल अशा प्रकारे जो कोणी इच्छापूर्वक ते दूषित करील त्याला, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

सार्वजनिक रस्त्यावर बेदरकारपणे वाहन हाकणे किंवा सवारी करणे.

२७९. जेणेकरून मानवी जीवित धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने जो कोणी कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावरून एखादे वाहन हाकील किंवा सवारी करील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

जलयान बेदरकारपणे चालवणे.

२८०. जेणेकरून मानवी जीवित धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत किंवा क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने जो कोणी एखादे जलयान चालवील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

फसवा प्रकाश, चिन्ह किंवा बोया दाखवणे.

२८१. जर कोणी कोणताही फसवा प्रकाश, चिन्ह किंवा बोया दाखवला आणि तसे करण्यामागे एखाद्या नाविकाची दिशाभूल व्हावी असा त्याचा उद्देश असेल किंवा तसे होणे संभवनीय असल्याची त्याला जाणीव असेल तर त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

भाडे घेऊन एखाद्या व्यक्तीला असुरक्षित किंवा जादा बोजा लादलेल्या जलयानातून जलमार्गे नेणे.

२८२. जेणेकरून एखाद्या व्यक्तीचे जीवित धोक्यात येईल अशा स्थितीत एखादे जलयान असताना किंवा त्यावर इतका बोजा लादलेला असताना जो कोणी त्या व्यक्तीला भाड्यादाखल त्या जलयानातून जलमार्गे जाणीवपूर्वक किंवा हयगयीने नेईल किंवा नेववील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

सार्वजनिक रस्त्यातील किंवा नौकानयन मार्गातील धोका किंवा अटकाव.

२८३. जो कोणी, एखादी कृती करून अथवा आपल्या कब्जात असलेल्या किंवा हुकूमतीखाली असलेल्या कोणत्याही मालमत्तेचा बंदोबस्त करण्याचे टाळून कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावरील अथवा सार्वजनिक नौकानयन मार्गावरील कोणत्याही व्यक्तीला धोका, अटकाव किंवा इजा करील त्याला, दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

विषारी पदार्थाबाबत हयगयीचे वर्तन.

२८४. जेणेकरून मानवी जीवित धोक्यात येईल अथवा कोणत्याही व्यक्तीला दुखापत किंवा क्षती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने जो कोणी कोणत्याही विषारी पदार्थाबाबत कोणतीही कृती करील,

अथवा आपल्या कब्जातील कोणत्याही विषारी पदार्थामुळे मानवी जीवितास पोचणाऱ्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त अशा विषारी पदार्थाबाबत करण्याचे जाणीवपूर्वक किंवा हयगयीने टाळील,

त्याला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

२८५. जेणेकरून मानवी जीवित धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत किंवा क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने जो कोणी आगीबाबत किंवा कोणत्याही ज्वालाग्राही पदार्थाबाबत कोणतीही कृती करील,

आग किंवा ज्वालाग्राही पदार्थ यांच्याबाबत हयगयीचे वर्तन.

अथवा आपल्या कब्जातील कोणत्याही आगीमुळे किंवा ज्वालाग्राही पदार्थामुळे मानवी जीवितास पोचणाऱ्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त अशा आगीबाबत किंवा ज्वालाग्राही पदार्थाबाबत करण्याचे जाणीवपूर्वक किंवा हयगयीने टाळील,

त्याला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

२८६. जेणेकरून मानवी जीवित धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत किंवा क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने जो कोणी कोणत्याही स्फोटक पदार्थाबाबत कोणतीही कृती करील,

स्फोटक पदार्थांच्याबाबत हयगयीचे वर्तन.

अथवा आपल्या कब्जातील कोणत्याही स्फोटक पदार्थामुळे मानवी जीविताला पोचणाऱ्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त त्या पदार्थाबाबत करण्याचे जाणीवपूर्वक किंवा हयगयीने टाळील,

त्याला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

२८७. जेणेकरून मानवी जीवित धोक्यात येईल किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत किंवा क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने जो कोणी कोणत्याही यंत्रसामग्रीबाबत कोणतीही कृती करील,

यंत्रसामग्रीबाबत हयगयीचे वर्तन.

अथवा आपल्या कब्जातील किंवा देखरेखीखालील कोणत्याही यंत्रसामग्रीमुळे मानवी जीविताला पोचणाऱ्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त अशा यंत्रसामग्रीबाबत करण्याचे जाणीवपूर्वक किंवा हयगयीने टाळील,

त्याला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

२८८. कोणतीही इमारत पाडताना किंवा दुरुस्त करताना जो कोणी ती इमारत किंवा तिचा कोणताही भाग पडण्यामुळे मानवी जीविताला पोचणाऱ्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त त्या इमारतीबाबत करण्याचे जाणीवपूर्वक किंवा हयगयीने टाळील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

इमारती पाडण्याबाबत किंवा दुरुस्त करण्याबाबत हयगयीचे वर्तन.

२८९. जो कोणी आपल्या कब्जातील कोणत्याही प्राण्यामुळे मानवी जीवितास पोचणाऱ्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून किंवा जबर दुखापतीच्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त अशा प्राण्याबाबत करण्याचे जाणीवपूर्वक किंवा हयगयीने टाळील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

प्राण्याबाबत हयगयीचे वर्तन.

२९०. जो कोणी या संहितेअन्वये अन्यथा शिक्षापात्र नसलेल्या प्रकरणी सार्वजनिक उपद्रव करील त्याला, दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

ज्यांबाबत अन्यथा उपबंध केलेला नाही त्या प्रकरणी सार्वजनिक उपद्रवाबद्दल शिक्षा.

२९१ सार्वजनिक उपद्रवाची पुनरावृत्ती न करण्याविषयी किंवा तो चालू न ठेवण्याविषयी व्यादेश काढण्याचा कायदेशीर प्राधिकार असलेल्या कोणत्याही लोक सेवकाने असा व्यादेश दिलेला असता जो कोणी अशा उपद्रवाची पुनरावृत्ती करील किंवा तो चालू ठेवील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची साध्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

उपद्रव थांबवण्याबाबतच्या व्यादेशानंतरही तो चालू ठेवणे.

अश्लील पुस्तके, इ.ची विक्री, इ.

[1][२९२. [2][(१) पोटकलम (२) च्या प्रयोजनार्थ, जर एखादे पुस्तक, पत्रक, कागद, लिखाण, रेखन, रंगचित्र, प्रतिरूपण, आकृती किंवा अन्य कोणतीही वस्तू कामुक असेल अथवा विषयलोलुपतेला आवाहन करत असेल अथवा सर्व संबद्ध परिस्थिती पाहता, ज्या व्यक्ती त्यात अंतर्भूत असलेले किंवा साकारलेले साहित्य वाचण्याचा, पाहण्याचा किंवा ऐकण्याचा संभव आहे त्यांना नीतिभ्रष्ट करण्यास किंवा बिघडवण्यास साधक असा साकल्येकरून त्याचा परिणाम किंवा (ज्यामध्ये दोन किंवा अधिक बाबींचा समावेश असेल त्याबाबतीत) त्यांपैकी कोणत्याही बाबीचा परिणाम असेल तर, ते अश्लील असल्याचे मानले जाईल.]

[2][(२)] जो कोणी—

(क) कोणतेही अश्लील पुस्तक, पत्रक, कागद, लिखाण, रेखन, रंगचित्र, प्रतिरूपण किंवा आकृती किंवा अन्य कोणतीही अश्लील वस्तू विकेल, भाड्याने देईल, वितरित करील, जाहीरपणे प्रदर्शित करील किंवा कोणत्याही रीतीने प्रसृत करील अथवा विक्री, भाड्याने देणे, वितरण, जाहीर प्रदर्शन किंवा प्रसारण या प्रयोजनाकरता ती बनवील, निर्मील किंवा आपल्या कब्जात बाळगील, अथवा

(ख) कोणतीही अश्लील वस्तू पूर्वोक्त अशांपैकी कोणत्याही प्रयोजनाकरता अगर अशी वस्तू विकली जाईल, भाड्याने दिली जाईल, वितरित केली जाईल किंवा जाहीरपणे प्रदर्शित केली जाईल किंवा कोणत्याही रीतीने प्रसृत केली जाईल याची जाणीव असताना किंवा तसे समजण्यास कारण असताना आयात करील, निर्यात करील किंवा तिची ने-आण करील, अथवा

(ग) ज्या धंद्याच्या ओघात अशा कोणत्याही वस्तू पूर्वोक्त अशांपैकी कोणत्याही प्रयोजनाकरता बनवल्या जातात, निर्मिल्या जातात, खरीदल्या जातात, ठेवल्या जातात, आयात केल्या जातात, निर्यात केल्या जातात किंवा त्यांची ने-आण केली जाते, त्या जाहीरपणे प्रदर्शित केल्या जातात किंवा कोणत्याही रीतीने प्रसृत केल्या जातात हे स्वत:ला माहीत आहे किंवा तसे समजण्यास कारण आहे त्या धंद्यात भाग घेईल किंवा त्यातून नफा मिळवील, अथवा

(घ) या कलमाखाली अपराध असलेली कोणतीही कृती करण्यामध्ये एखादी व्यक्ती गुंतलेली आहे किंवा गुंतण्यास तयार आहे अगर अशी कोणतीही अश्लील वस्तू एखाद्या व्यक्तीकडून किंवा तिच्यामार्फत पैदा करता येते अशी जाहिरात करील किंवा कोणत्याही साधनाद्वारे विहित करील, अथवा

(ङ) या कलमाखाली अपराध असलेली कोणतीही कृती करण्याची तयारी दाखवील किंवा करण्याचा प्रयत्न करील,

त्याला [3][पहिल्या दोषसिद्धीअन्ती, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, आणि दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर दोषसिद्धी झाल्यास, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.]

[4][अपवाद.—(क) जे कोणतेही पुस्तक, पत्रक, कागद, लिखाण, रेखन, रंगचित्र, प्रतिरूपण किंवा आकृती—

(एक) शास्त्र, वाङ्मय, कला किंवा विद्या किंवा सर्वसाधारण स्वारस्याचे अन्य विषय यांना उपकारक आहे या कारणावरून असे पुस्तक, पत्रक, कागद, लिखाण, रेखन, रंगचित्र, प्रतिरूपण किंवा आकृती याचे प्रकाशन लोकहितार्थ म्हणून समर्थनीय असल्याचे शाबीत केले जाते ती, किंवा

(दोन) धार्मिक प्रयोजनांकरता सद्भावपूर्वक ठेवली जाते किंवा वापरली जाते ती;

(ख) (एक) 'प्राचीन स्मारके आणि पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष अधिनियम, १९५८' (१९५८ चा २४) याच्या अर्थानुसार जे कोणतेही प्राचीन स्मारक असेल, किंवा

(दोन) कोणतेही मंदिर किंवा मूर्तीची ने-आण करण्यासाठी वापरली जाणारी अथवा कोणत्याही धार्मिक प्रयोजनास्तव ठेवलेली किंवा वापरली जाणारी कोणतीही गाडी,

यावरील किंवा यांमधील शिल्पित, कोरीव, किंवा रंगचित्रित किंवा अन्यथा प्रतिरूपित असे कोणतेही प्रतिरूपण, यास हे कलम लागू होत नाही.]

---

१. १९२५ चा अधिनियम ८-कलम २ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

२. १९६९ चा अधिनियम ३६-कलम २ द्वारे हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले व मूळ कलम २९२ याला त्या कलमाचे पोटकलम (२) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

३ कित्ता—कलम २ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ कित्ता—कलम २ द्वारे मूळ अपवादाऐवजी हा अपवाद दाखल करण्यात आला.

¹[२९३. जो कोणी लगतपूर्व कलमात निर्देशिलेली अशी कोणतीही अश्लील वस्तू वीस वर्षे वयाखालील कोणत्याही व्यक्तीला विकेल, भाड्याने देईल, वितरित करील, प्रदर्शित करील किंवा तिच्याकडे प्रसृत करील त्याला, ²[पहिल्या दोषसिद्धीअन्ती तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, आणि दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, आणि दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर दोषसिद्धी झाल्यास, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाचीही शिक्षा होईल.] ] अश्लील वस्तू तरुण व्यक्तीला विकणे.

³[२९४. जो कोणी, इतरांना त्रास होईल अशा प्रकारे—— अश्लील कृती व गाणी.

(क) कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी कोणतीही अश्लील कृती करील, किंवा

(ख) कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा जवळपास कोणतेही अश्लील गाणे, लावणी, पोवाडा किंवा शब्द गाईल, पाठ म्हणेल किंवा उच्चारील,

त्याला तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.]

⁴[२९४क. जो कोणी, ⁵[ ⁶[राज्य लॉटरी] किंवा ⁷[राज्य] शासनाने प्राधिकृत केलेली अशी लॉटरी सोडून अन्य] कोणत्याही लॉटरीची सोडत काढण्यासाठी कोणतेही कार्यालय किंवा ठिकाण ठेवील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्या तरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. लॉटरी कार्यालय ठेवणे.

आणि जो कोणी, अशा कोणत्याही लॉटरीमध्ये कोणतेही तिकीट, चिठ्ठ्या, क्रमांक किंवा आकडा काढण्याशी संबंधित असलेली किंवा त्यास लागू होणारी कोणतीही घटना किंवा प्रसंग घडल्यास कोणत्याही व्यक्तीच्या फायद्यासाठी कोणतीही रक्कम देण्याचा किंवा कोणताही माल स्वाधीन करण्याचा किंवा कोणतीही गोष्ट करण्याचा किंवा ती गोष्ट करण्यापासून परावृत्त राहण्याचा कोणताही प्रस्ताव प्रकाशित करील त्याला, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.]

## प्रकरण १५ वे

## धर्मसंबंधीच्या अपराधांविषयी

२९५. जर कोणी इसमाने कोणतेही उपासनास्थान किंवा कोणत्याही व्यक्तिवर्गाने पवित्र मानलेली कोणतीही वस्तू नष्ट केली, तिचे नुकसान केले किंवा ती अपवित्र केली व त्यायोगे कोणत्याही व्यक्तिवर्गाच्या धर्माचा अपमान करण्याचा त्याचा उद्देश असेल अथवा याप्रमाणे नाश किंवा नुकसान करणे किंवा अपवित्र करणे हा आपल्या धर्माचा अपमान आहे असे एखाद्या व्यक्तिवर्गाला वाटणे संभवनीय असल्याची त्या इसमाला जाणीव असेल तर, त्याला दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. कोणत्याही वर्गाच्या धर्माचा अपमान करण्याच्या उद्देशाने उपासनास्थानाचे नुकसान करणे किंवा ते अपवित्र करणे.

⁸[२९५क. जो कोणी ⁹[भारताच्या नागरिकांपैकी] कोणत्याही वर्गाच्या धार्मिक भावनांवर अत्याचार करण्याच्या बुद्धिपुरस्सर व दुष्ट उद्देशाने, ¹⁰[तोंडी किंवा लेखी शब्दांनी, अथवा चिन्हांद्वारे अथवा दृश्य प्रतिरूपणांद्वारे किंवा अन्यथा] त्या वर्गाच्या धर्माचा किंवा धार्मिक श्रद्धांचा अपमान करील किंवा अपमान करण्याचा प्रयत्न करील त्याला, ¹¹[तीन वर्षेपर्यंत] असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.] कोणत्याही वर्गाच्या धर्माचा किंवा धार्मिक श्रद्धांचा अपमान करून धार्मिक भावनांवर अत्याचार करण्याच्या उद्देशाने बुद्धिपुरस्सर व दुष्ट उद्देशाने कृती करणे.

---

१. १९२५ चा अधिनियम ८-कलम २ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

२. १९६९ चा अधिनियम ३६-कलम २ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. १८९५ चा अधिनियम ३-कलम ३ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

४. १८७० चा अधिनियम २७-कलम १० द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

५. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "शासनाने प्राधिकृत न केलेल्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे "केंद्र शासनाने किंवा भाग क राज्याच्या अथवा भाग ख राज्याच्या शासनाने आयोजित केलेली लॉटरी" या मजकुराऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

७. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक" याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

८. १९२७ चा अधिनियम २५-कलम २ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

९. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "हिज मॅजेस्टीच्या प्रजाजनांपैकी" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

१०. १९६१ चा अधिनियम ४१-कलम ३ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

११. किता-कलम २ द्वारे 'दोन वर्षे' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

धार्मिक जमावास व्यत्यय आणणे.

२९६. जो कोणी धार्मिक उपासना किंवा धार्मिक संस्कार करण्यात कायदेशीरपणे गुंतलेल्या जमावास व्यत्यय आणील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

पुरण्याच्या जागा, इत्यादी ठिकाणी अतिक्रमण.

२९७. जो कोणी कोणत्याही व्यक्तीच्या भावना दुखावण्याच्या किंवा कोणत्याही व्यक्तीच्या धर्माचा अपमान करण्याच्या उद्देशाने अथवा कोणत्याही व्यक्तीच्या भावना दुखावल्या जाण्याचा संभव आहे किंवा कोणत्याही व्यक्तीच्या धर्माचा अपमान होण्याचा संभव आहे या जाणिवेने,

कोणत्याही उपासनास्थानी किंवा कोणत्याही दफनाच्या जागी किंवा अंत्यसंस्कार पार पाडण्यासाठी अगर मृताच्या अवशेषांचे निक्षेपस्थान म्हणून अलग राखलेल्या कोणत्याही जागी कोणत्याही प्रकारे अतिक्रमण करील किंवा कोणत्याही मानवी शवाची कशाही प्रकारे अप्रतिष्ठा करील किंवा अंत्यसंस्कार पार पाडण्यासाठी जमलेल्या कोणत्याही व्यक्तींना व्यत्यय आणील,

त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

धार्मिक भावना दुखावण्याच्या बुद्धिपुरस्सर उद्देशाने शब्द उच्चारणे इ.

२९८. जो कोणी, कोणत्याही व्यक्तीच्या धार्मिक भावना दुखावण्याच्या बुद्धिपुरस्सर उद्देशाने, त्या व्यक्तीच्या कानावर पडेल अशा तऱ्हेने कोणताही शब्द उच्चारील किंवा कोणताही आवाज काढील अथवा त्या व्यक्तीच्या नजरेस पडेल अशा तऱ्हेने कोणताही हावभाव करील किंवा त्या व्यक्तीच्या नजरेस पडेल अशा तऱ्हेने कोणतीही वस्तू ठेवील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

## प्रकरण १६ वे

## मानवी शरीरास बाधक होणाऱ्या अपराधांविषयी

### जीवितास बाधक होणाऱ्या अपराधांविषयी

सदोष मनुष्यवध.

२९९. मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने अथवा जिच्यामुळे मृत्यू घडून येणे संभवनीय आहे अशी शारीरिक क्षती पोचवण्याच्या उद्देशाने अथवा एखाद्या कृतीमुळे आपण मृत्यूस कारणीभूत होण्याचा संभव आहे याची जाणीव असताना जो कोणी अशी कृती करून मृत्यूस कारणीभूत होतो तो 'सदोष मनुष्यवधा'चा अपराध करतो.

#### उदाहरणे

(क) 'क' एका खड्ड्यावर काड्या व गवत टाकून ठेवतो, त्यायोगे मृत्यू घडवून आणावा असा त्याचा उद्देश आहे किंवा मृत्यू घडून येणे संभवनीय आहे याची त्याला जाणीव आहे. जमीन पक्की आहे असे समजून 'य' त्यावरून चालत जातो आणि त्यात पडून मरतो. 'क'ने सदोष मनुष्यवधाचा अपराध केला आहे.

(ख) 'य' झुडपांच्या मागे असल्याचे 'क'ला माहीत आहे. 'ख'ला ते माहीत नाही. 'य'चा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने किंवा तो घडून येण्याचा संभव आहे याची जाणीव असताना 'क' हा 'ख'ला झुडपावर गोळी झाडण्यास प्रवृत्त करतो. 'ख' गोळी झाडतो व 'य'ला मारतो. याबाबतीत 'ख' हा कोणत्याही अपराधाबद्दल दोषी नसेल, पण 'क'ने मात्र सदोष मनुष्यवधाचा अपराध केला आहे.

(ग) 'क'ने एका पक्ष्याला मारण्याच्या व चोरून नेण्याच्या उद्देशाने गोळी झाडल्यामुळे झुडपाआड असलेला 'ख' मारला जातो. तो तिकडे असल्याचे 'क'ला माहीत नव्हते. याबाबतीत, जर 'क' बेकायदेशीर कृत्य करत असला तरी तो मनुष्यवधाचा दोषी नव्हता, कारण त्याचा 'ख'ला मारण्याचा किंवा ज्यामुळे मृत्यू घडून येण्याचा संभव असल्याचे आपणांस माहीत आहे अशी कृती करून मृत्यू घडवून आणण्याचा त्याचा उद्देश नव्हता.

**स्पष्टीकरण १.**—जी व्यक्ती एखादा विकार, रोग किंवा शारीरिक दुर्बलता यांनी पछाडलेल्या अन्य व्यक्तीला शारीरिक क्षती पोहोचवील, व त्यायोगे त्या अन्य व्यक्तीचा मृत्यू अधिक लवकर घडवून आणील तिने त्या व्यक्तीचा मृत्यू घडवून आणला असे मानले जाईल.

**स्पष्टीकरण २.**—शारीरिक क्षतीमुळे मृत्यू घडून येईल त्याबाबतीत, योग्य इलाज व उपचार-कौशल्य यांचा अवलंब केला असता तर मृत्यू टळला असता असे असले तरी, अशी क्षती पोचवणाऱ्या व्यक्तीने मृत्यू घडवून आणला असे मानले जाईल.

**स्पष्टीकरण ३.**—मातेच्या गर्भातील जीवाचा मृत्यू घडवून आणणे हा मनुष्यवध नाही. पण त्या जीवाचा कोणताही भाग बाहेर काढण्यात आला असेल तर, त्याने श्वासोच्छ्वास केला नसला किंवा तो पूर्णपणे जन्माला आला नसला तरी त्या जिवंत बालकाचा मृत्यू घडवून आणणे हे 'सदोष मनुष्यवध' या सदरात मोडू शकेल.

३००. यात यापुढे वगळलेली प्रकरणे खेरीजकरून एरव्ही,—— खून.

एक :——ज्या कृतीमुळे मृत्यू घडून आला ती कृती मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली असेल तर, किंवा

दोन :——जिला अपाय करण्यात आला त्या व्यक्तीचा जीमुळे मृत्यू घडून येणे संभवनीय असल्याची अपराध्याला जाणीव आहे अशी शारीरिक क्षती पोचवण्याच्या उद्देशाने ती कृती केली असेल तर, किंवा

तीन :——ती कृती कोणत्याही व्यक्तीस शारीरिक क्षती पोचवण्याच्या उद्देशाने केलेली असून जी शारीरिक क्षती पोचवण्याचा उद्देश आहे ती मृत्यू घडवून आणण्यास सामान्य नैसर्गिक क्रमानुसार पुरेशी असेल तर, किंवा

चार :——त्या कृतीमुळे मृत्यू घडून येणे किंवा जीमुळे मृत्यू घडून येण्याचा संभव आहे अशी शारीरिक क्षती पोचणे हे सर्वथा संभवनीय आहे इतकी ती भयंकर धोक्याची आहे याबद्दल कृती करणाऱ्या व्यक्तीला जाणीव असेल आणि मृत्यू किंवा पूर्वोक्त अशी क्षती घडण्याचा धोका ओढवून घेण्यास कोणतेही निमित्त नसताना तिने अशी कृती केली असेल तर,

सदोष मनुष्यवध हा खून असतो.

### उदाहरणे

(क्) 'क' हा 'य' ला मारण्याचा उद्देशाने त्याच्यावर गोळी झाडतो. परिणामी 'य' मरतो. 'क' खून करतो.

(ख्) एखाद्या ठोशाने 'य' चा मृत्यू घडून येण्याचा संभव आहे अशा रोगाने तो पछाडलेला आहे हे माहीत असताना 'क' त्याला शारीरिक क्षती पोचवण्याच्या उद्देशाने ठोसा हाणतो. त्या ठोश्यामुळे 'य' मृत्यू पावतो. सामान्य नैसर्गिक क्रमानुसार तो ठोसा एखाद्या धडधाकट प्रकृतीच्या व्यक्तीचा मृत्यू घडवून आणण्यास पुरेसा नसला तरीही, 'क' हा खुनाबद्दल दोषी आहे. पण जर 'य' हा एखाद्या रोगाने पछाडलेला आहे हे माहीत नसताना 'क' ने सामान्य नैसर्गिक क्रमानुसार ज्यामुळे धडधाकट प्रकृतीच्या व्यक्तीचा मृत्यू घडणार नाही असा ठोसा हाणला आणि अशा बाबतीत मृत्यू किंवा सामान्य नैसर्गिक क्रमानुसार जीमुळे मृत्यू घडून येऊ शकेल अशी शारीरिक क्षती पोचवण्याचा 'क' चा उद्देश नसेल तर, शारीरिक क्षती पोचवण्याचा त्याचा उद्देश असला तरी, तो खुनाबद्दल दोषी होत नाही.

(ग्) सामान्य नैसर्गिक क्रमानुसार माणसाचा मृत्यू घडवून आणण्याइतपत पुरेसे होईल अशा-प्रकारे 'क' हा 'य' वर तलवारीचा वार करतो किंवा त्याला दंडुक्याने जखम करतो. परिणामी 'य' मरण पावतो. या बाबतीत, 'य' चा मृत्यू घडवून आणावा असा 'क' चा उद्देश नसला तरीही तो खुनाबद्दल दोषी आहे.

(घ्) कोणतेही निमित्त नसताना 'क' माणसांच्या समुदायावर भरलेली बंदूक उडवतो व त्यांच्या-पैकी एकजण मारला जातो. कोणत्याही विशिष्ट माणसाला मारावे असा 'क' चा पूर्वसंकल्पित बेत नसला तरीही, तो खुनाबद्दल दोषी आहे.

**अपवाद १.**——गंभीर व आकस्मिक प्रक्षोभकारणामुळे स्वतःवरचा ताबा सुटला असता अपराधी जर, ज्या व्यक्तीने प्रक्षोभित केले तिच्या मृत्यूस कारणीभूत झाला अथवा चुकीने किंवा अपघाताने अन्य कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूस कारणीभूत झाला तर, सदोष मनुष्यवध हा खून होत नाही. सदोष मनुष्यवध हा केव्हा खून नव्हे.

वरील अपवाद हा पुढील परंतुकांना अधीन आहे:——

**पहिले.**——प्रक्षोभकारण हे अपराध्याने एखाद्या व्यक्तीला ठार मारण्यासाठी किंवा तिला अपाय करण्यासाठी निमित्त म्हणून शोधलेले नसावे किंवा इच्छापूर्वक उकरून काढलेले नसावे.

**दुसरे.**——कायद्याचे पालन म्हणून केलेल्या किंवा एखाद्या लोक सेवकाने असा लोक सेवक म्हणून आपल्या अधिकाराचा कायदेशीर वापर करून केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे प्रक्षोभन झालेले नसावे.

**तिसरे.**——खाजगीरीत्या बचाव करण्याच्या हक्काचा कायदेशीर वापर करताना केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे प्रक्षोभन झालेले नसावे.

**स्पष्टीकरण.**——अपराध हा 'खून' या सदरात न मोडण्याइतपत ते प्रक्षोभकारण गंभीर व आकस्मिक होते किंवा काय हा तथ्यविषयक प्रश्न आहे.

### उदाहरणे

(क्) 'य' ने प्रक्षोभित केल्यामुळे संतप्त होऊन क्रोधाच्या भरात 'क' हा 'य' चे मूल 'म' याला उद्देशपूर्वक ठार मारतो. हा खून आहे, कारण मुलाने प्रक्षोभित केलेले नाही, व प्रक्षोभनामुळे उद्भवलेले कृत्य करताना अपघाताने किंवा दुर्दैवाने मुलाचा मृत्यू घडून आलेला नाही.

(ख) 'म' हा 'क' ला गंभीर व आकस्मिक कारणाने प्रक्षोभित करतो. 'क' या प्रक्षोभनामुळे 'म' वर पिस्तूल झाडतो व त्याच्या जवळपास असलेल्या पण नजरेच्या टप्प्याबाहेर असलेल्या 'य' ला मारण्याचा त्याचा उद्देश नसताना, तसेच आपल्या हातून तो मारला जाण्याचा संभव आहे याचीही जाणीव नसताना त्याच्याकडून 'य' मारला जातो. या बाबतीत, 'क' ने खून केलेला नाही, पण फक्त सदोष मनुष्यवध केलेला आहे.

(ग) 'क' ला 'य' या बेलिफाकडून कायदेशीरपणे अटक झाली आहे. 'क' अटकेमुळे आकस्मिकपणे व क्रोधावेगाने संतप्त होऊन 'य' ला ठार मारतो. हा खून आहे, कारण लोक सेवकाने आपल्या अधिकारांचा वापर करताना केलेल्या गोष्टीमुळे प्रक्षोभन झाले होते.

(घ) 'क' हा 'य' ह्या दंडाधिकाऱ्यापुढे साक्षीदार म्हणून उपस्थित होतो. 'य' असे म्हणतो की, "'क'च्या जबानीतील कोणत्याही शब्दावर माझा विश्वास नाही व 'क'ने शपथेवर खोटी साक्ष दिली आहे." या शब्दामुळे 'क' ला आकस्मिकपणे चीड येऊन तो 'य' ला ठार मारतो. हा खून आहे.

(ङ) 'क' हा 'य' चे नाक ओढण्याचा प्रयत्न करतो, तसे करण्यास त्याला प्रतिबंध करण्यासाठी 'य' खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क वापरून 'क' ला पकडीत धरतो. परिणामी, आकस्मिकपणे 'क' ला क्रोधावेग येऊन तो 'य'ला ठार मारतो. हा खून आहे, कारण खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क बजावत असताना केलेल्या गोष्टीमुळे प्रक्षोभन झाले होते.

(च) 'य' हा 'ब' ला तडाखा हाणतो, या प्रक्षोभकारणामुळे 'ख' ला भयंकर संताप येतो. बाजूला उभा असलेला 'क' हा 'ख'च्या संतापाचा फायदा घेऊन त्याच्याकरवी 'य' ला ठार मारण्याच्या उद्देशाने, त्यासाठी 'ख'च्या हातात चाकू देतो. 'ख' हा 'य' ला चाकूने भोसकून ठार मारतो. या बाबतीत 'ख'ने फक्त सदोष मनुष्यवध केला असेल, पण 'क' हा खुनाबद्दल दोषी आहे.

**अपवाद २.**—शरीराचा किंवा मालमत्तेचा खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क सद्भावपूर्वक बजावत असताना जर अपराध्याने आपणांस कायद्याने दिलेल्या अधिकाराचा अतिक्रम केला व जिच्याविरुद्ध तो असा बचावाचा हक्क बजावत आहे तिच्या मृत्यूस तो, तसे पूर्वनियोजित नसताना व अशा बचावासाठी आवश्यक असेल त्याहून अधिक अपाय करण्याचा उद्देश नसताना कारणीभूत झाला तर, सदोष मनुष्यवध हा खून होत नाही.

### उदाहरण

'य' हा 'फ' ला घोड्याच्या चाबकाने मारण्याचा प्रयत्न करतो, पण 'क' ला जबर दुखापत होईल अशा रीतीने नव्हे. 'क' पिस्तूल बाहेर काढतो. 'य' हमला नेटाने चालू ठेवतो. आपण अन्य कोणत्याही मार्गाने चाबकाचा मार चुकवू शकत नाही असे सद्भावपूर्वक समजून 'क' हा 'य' ला गोळी घालून मारतो. 'क' ने खून केलेला नाही, तर नुसता सदोष मनुष्यवध केलेला आहे.

**अपवाद ३.**—सार्वजनिक न्यायाच्या अभिवृद्धीकरता कार्य करणारा असा लोक सेवक म्हणून किंवा अशा लोक सेवकाला साहाय्य करत असताना जर अपराध्याने आपणांस कायद्याने दिलेल्या अधिकारांचा अतिक्रम केला आणि जी कृती कायदेशीर व असा लोक सेवक म्हणून आपले कर्तव्य यथायोग्यपणे पार पाडण्यासाठी आवश्यक आहे असे तो सद्भावपूर्वक समजतो ती कृती केल्याने तो एखाद्या व्यक्तीच्या मृत्यस, तिच्याविषयी दुष्टभाव नसताना कारणीभूत झाला तर, सदोष मनुष्यवध हा खून होत नाही.

**अपवाद ४.**—आकस्मिक भांडणातून संतापाच्या भरात आकस्मिकपणे मारामारी सुरू झाली असता पूर्वनियोजित नसताना व अपराध्याने गैरफायदा घेतलेला नसताना किंवा तो क्रूरपणे व अवाजवी रीतीने वागलेला नसताना सदोष मनुष्यवध झाला तर, तो खून होत नाही.

**स्पष्टीकरण** :—अशा प्रकरणी, कोणत्या पक्षाने प्रक्षोभन केले किंवा कोणी प्रथम हमला केला ही बाब गौण आहे.

**अपवाद ५** :—जिचा मृत्यू घडून आला ती व्यक्ती अठरा वर्षांवरील वयाची असून तिने स्वतःच्या संमतीने मृत्यू पत्करला असेल किंवा मृत्यूचा धोका पत्करला असेल तर, सदोष मनुष्यवध हा खून होत नाही.

### उदाहरण

'क' इच्छापूर्वक १८ वर्षांखालील वयाच्या 'य' ह्या व्यक्तीला चिथावणी देऊन आत्महत्या करायला लावतो. या बाबतीत 'य' अल्पवयीन असल्यामुळे स्वतःच्या मृत्यूला संमती देण्यास तो अक्षम आहे. म्हणून 'क' ने खुनाला अपप्रेरणा दिली असे होते.

ज्या व्यक्तीचा मृत्यू घडवून आणणे उद्देशित होते त्याहून अन्य व्यक्तीचा मृत्यू घडवून आणण्याने सदोष मनुष्यवध.

३०१. जीमुळे मृत्यू घडून यावा असा स्वतःचा उद्देश आहे किंवा तसे संभवनीय असल्याची स्वतःला जाणीव आहे अशी कोणतीही गोष्ट करून जर एखाद्या व्यक्तीने, जिचा मृत्यू घडवून आणणे स्वतःला उद्देशित नाही किंवा आपण त्यास कारण होण्याचा संभव असल्याची स्वतःला जाणीव नाही अशा कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूस कारण होऊन सदोष मनुष्यवध केला तर, अपराध्याने केलेला सदोष मनुष्यवध हा, अपराध्याला जिचा मृत्यू घडवणे उद्देशित होते किंवा आपण त्यास कारण होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव होती तिचा मृत्यू त्याच्याकडून घडला असता तर ज्या वर्णनाचा झाला असता त्या वर्णनाचा तो ठरतो.

३०२. जो कोणी खून करील त्याला, मृत्यूची किंवा [1][आजीव कारावासाची] शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. खुनाबद्दल शिक्षा.

३०३. जो कोणी [1][आजीव कारावासाच्या] शिक्षादेशास अधीन असून खून करील त्याला, मृत्यूची शिक्षा होईल. जन्मठेप कैद्यांनी केलेल्या खुनाबद्दल शिक्षा.

३०४. जो कोणी 'खून' या सदरात न मोडणारा सदोष मनुष्यवध करील त्याला, ज्या कृतीमुळे मृत्यू घडून आला असेल ती कृती मृत्यू घडवून आणण्याच्या किंवा ज्यामुळे मृत्यू घडून येण्याचा संभव आहे अशी शारीरिक क्षती करण्याच्या उद्देशाने केली असेल तर, [1][आजीव कारावासाची] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल; 'खून' या सदरात न मोडणाऱ्या सदोष मनुष्यवधाबद्दल शिक्षा.

किंवा, त्या कृतीमुळे मृत्यू घडून येण्याचा संभव आहे ही जाणीव असून, पण मृत्यू घडवून आणण्याचा किंवा जी मृत्यूला कारण होण्याचा संभव आहे अशी शारीरिक क्षती घडवून आणण्याचा उद्देश नसताना ती कृती केलेली असेल तर, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

[2][३०४क. जो कोणी 'सदोष मनुष्यवध' या सदरात न मोडणारी कोणतीही बेदरकार किंवा हयगयीची कृती करून कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूस कारण होईल त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.] हयगयीने मृत्यूस कारण होणे.

३०५. जर कोणतीही अठरा वर्षांखालील वयाची व्यक्ती, कोणतीही भ्रमिष्ट व्यक्ती, कोणतीही उन्मादवायू झालेली व्यक्ती, कोणतीही निर्बुद्ध व्यक्ती, किंवा कोणतीही नशेच्या अवस्थेतील व्यक्ती हिने आत्महत्या केली तर, ज्या कोणी अशी आत्महत्या करण्यास अपप्रेरणा दिली असेल त्याला मृत्यूची किंवा [1][आजीव कारावासाची], किंवा जास्तीत जास्त दहा वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. बालकाच्या किंवा भ्रमिष्ट व्यक्तीच्या आत्महत्येला अपप्रेरणा देणे.

३०६. जर कोणत्याही व्यक्तीने आत्महत्या केली तर, ज्या कोणी अशी आत्महत्या करण्याला अपप्रेरणा दिली असेल त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल. आत्महत्येला अपप्रेरणा देणे.

३०७. ज्या उद्देशाने किंवा जाणिवेने आणि ज्या परिस्थितीत कोणी एखादी कृती केली असता मृत्यू घडून आला तर तो खुनाबद्दल दोषी ठरेल तशा उद्देशाने किंवा जाणिवेने आणि तशा परिस्थितीत, जो कोणी ती कृती करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल व तो द्रव्यदंडासही पात्र होईल; आणि अशा कृतीमुळे कोणत्याही व्यक्तीला दुखापत झाली तर, अपराधी [1][आजीव कारावासास] किंवा यात यापूर्वी उल्लेखिलेल्या अशा शिक्षेस पात्र होईल. खुनाचा प्रयत्न करणे.

[3][या कलमाखालील अपराध करणारी एखादी व्यक्ती [1][आजीव कारावासाची] शिक्षा भोगत असेल त्या प्रकरणी, जर दुखापत घडून आली तर त्या व्यक्तीला मृत्यूची शिक्षा होऊ शकेल.] जन्मठेप कैद्यांनी सिद्ध केलेले प्रयत्न.

### उदाहरणे

(क) 'क' हा 'य' ला ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्यावर अशा परिस्थितीत गोळी झाडतो की, जर त्यामुळे मृत्यू घडून आला तर 'क' खुनाबद्दल दोषी होऊ शकेल. 'क' या कलमाखालील शिक्षेस पात्र आहे.

(ख) कोवळया वयाच्या बालकाचा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने 'क' त्याला एका निर्जन ठिकाणी उघड्यावर टाकतो. त्यामुळे बालकाचा मृत्यू घडून आला नाही तरी, या कलमाद्वारे व्याख्या करण्यात आलेला अपराध 'क' ने केला आहे.

---

१. १९५५ चा अधिनियम-२६, कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १८७० चा अधिनियम २७-कलम १२ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. किता—कलम ११ द्वारे जादा दाखल केले.

(ग) 'य' चा खून करण्याच्या उद्देशाने 'क' एक बंदूक खरेदी करतो व तीत बार भरतो. 'क' ने अद्याप अपराध केलेला नाही. 'क' हा 'य' वर बंदूक झाडतो. या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध त्याने केलेला आहे, आणि जर अशा गोळीबारात त्याने 'य' ला जखमी केले तर या कलमाच्या [1][पहिल्या परिच्छेदाच्या] नंतरच्या भागाद्वारे उपबंधित केलेल्या शिक्षेस तो पात्र आहे.

(घ) 'क' हा 'य' ला विष देऊन त्याचा खून करण्याच्या उद्देशाने विष खरेदी करून ते अन्नात मिसळतो. ते अन्न 'क' कडे राहते. या कलमामध्ये व्याख्या करण्यात आलेला अपराध 'क' ने अद्याप केलेला नाही. 'क' ते अन्न 'य' च्या टेबलावर ठेवतो किंवा ते 'य' च्या टेबलावर ठेवण्यासाठी 'य' च्या नोकराच्या स्वाधीन करतो. या कलमामध्ये व्याख्या करण्यात आलेला अपराध 'क' ने केलेला आहे.

सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न करणे.

३०८. ज्या उद्देशाने किंवा जाणिवेने आणि ज्या परिस्थितीत कोणी एखादी कृती केली असता मृत्यू घडून आला तर तो 'खून' या सदरात न मोडणाऱ्या सदोष मनुष्यवधाबद्दल दोषी ठरेल तशा उद्देशाने किंवा जाणिवेने आणि तशा परिस्थितीत जो कोणी ती कृती करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील, आणि अशा कृतीमुळे कोणत्याही व्यक्तीला दुखापत झाली तर, त्याला सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**उदाहरण**

'क' गंभीर व आकस्मिक प्रक्षोभकारणामुळे 'य' वर अशा परिस्थितीत पिस्तूल झाडतो की, जर तो त्यामुळे मृत्यूस कारण झाला तर, तो 'खून' या सदरात न मोडणाऱ्या सदोष मनुष्यवधाबद्दल दोषी होऊ शकेल. या कलमामध्ये व्याख्या करण्यात आलेला अपराध 'क' ने केलेला आहे.

आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणे.

३०९. जो कोणी आत्महत्येचा प्रयत्न करील आणि असा अपराध घडण्याच्या दृष्टीने कोणतीही कृती करील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची साध्या कारावासाची, [2][किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील].

ठग.

३१०. खुनाच्या साहाय्याने किंवा खुनासहित जबरी चोरी करण्याचा किंवा मुले चोरून नेण्याचा अपराध करण्यासाठी जो कोणी हा अधिनियम पारित झाल्यानंतर, केव्हाही अन्य कोणत्याही व्यक्तीशी किंवा व्यक्तींशी नेहमी संगत ठेवील तो ठग होय.

शिक्षा.

३११. जो कोणी ठग असेल त्याला [3][आजीव कारावासाची] शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**गर्भस्राव घडवून आणणे, अजात गर्भ जीवांना क्षती पोचवणे, अर्भकांना उघड्यावर टाकणे आणि अपत्यजन्माची लपवणूक करणे**

गर्भस्राव घडवून आणणे.

३१२. जो कोणी इच्छापूर्वक एखाद्या गर्भवती स्त्रीचा गर्भस्राव घडवून आणील त्याला, जर असा गर्भस्राव त्या स्त्रीचा जीव वाचवण्यासाठी सद्भावपूर्वक घडवून आणलेला नसेल तर, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील, आणि जर ती स्त्री स्पंदितगर्भा असेल तर, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**—जी स्त्री स्वतःचा गर्भस्राव घडवून आणते ती या कलमाच्या अर्थकक्षेत येते.

स्त्रीच्या संमतीशिवाय गर्भस्राव घडवून आणणे.

३१३. जो कोणी लगतपूर्व कलमामध्ये व्याख्या करण्यात आलेला अपराध त्या स्त्रीच्या—मग ती स्त्री स्पंदितगर्भा असो वा नसो—संमतीशिवाय करील त्याला, [3][आजीव कारावासाची] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

गर्भस्राव घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेल्या कृतीमुळे मृत्यू घडून येणे.

३१४. जर कोणी एखाद्या गर्भवती स्त्रीचा गर्भस्राव घडवून आणण्याच्या उद्देशाने कोणतीही कृती केली व तिच्यामुळे अशा स्त्रीचा मृत्यू घडून आला तर त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल;

ती कृती स्त्रीच्या संमतीशिवाय केली असल्यास.

आणि जर ती कृती त्या स्त्रीच्या संमतीशिवाय केलेली असेल तर, त्याला एकतर [3][आजीव कारावासाची], किंवा वर नमूद केलेली शिक्षा होईल.

---

१. १८९१ चा अधिनियम १२-कलम २ व अनुसूची दोन यांद्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. १८८२ चा अधिनियम ८-कलम ७ द्वारे "आणि तसेच द्रव्यदंडाचीही शिक्षा होईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

**स्पष्टीकरण.**—या अपराधासाठी, त्या कृतीमुळे मृत्यू घडून येणे हे संभवनीय आहे याची अपराध्याला जाणीव असली पाहिजे अशी आवश्यकता नाही.

३१५. एखाद्या मुलाच्या जन्मापूर्वी, जो कोणी ते मूल जिवंत जन्मण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा त्याच्या जन्मानंतर त्याचा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने कोणतीही कृती करील आणि अशा कृतीमुळे त्या मुलाला जिवंत जन्मण्याला प्रतिबंध करील किंवा त्याच्या जन्मानंतर त्याचा मृत्यू घडवून आणील त्याला, जर ती कृती आईचा जीव वाचविण्यासाठी सद्भावपूर्वक केलेली नसेल तर, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

मूल जिवंत जन्माला येण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा जन्मानंतर त्याचा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली कृती.

३१६. जर कोणी अशा परिस्थितीत एखादी कृती करील की, त्यामुळे जर तो मृत्यूस कारण झाला तर तो सदोष मनुष्यवधाबद्दल दोषी होऊ शकेल, आणि अशा कृतीमुळे, स्पंदन पावणाऱ्या गर्भजीवाचा मृत्यू घडून आला तर त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

'सदोष मनुष्यवध' या सदरात मोडणाऱ्या कृतीद्वारे, स्पंदन पावणाऱ्या अजात गर्भजीवाचा मृत्यू घडवून आणणे.

**उदाहरण**

आपण गर्भवती स्त्रीच्या मृत्यूस कारण होण्याचा संभव आहे याची जाणीव असताना 'क' अशी कृती करतो की, त्यामुळे त्या स्त्रीचा मृत्यू घडून आला तर तो 'सदोष मनुष्यवध' या सदरात मोडेल. त्या स्त्रीला इजा पोहोचते, पण तिचा मृत्यू होत नाही, पण त्यामुळे तिच्या गर्भातील स्पंदन पावणाऱ्या अजात गर्भजीवाचा मृत्यू घडून येतो. 'क' हा या कलमामध्ये व्याख्या करण्यात आलेल्या अपराधाबद्दल दोषी आहे.

३१७. जो कोणी, स्वतः बारा वर्षाखालील मुलाचा बाप किंवा आई असून, किंवा स्वतःकडे अशा मुलाची देखभाल असून, अशा मुलाचा संपूर्णतः परित्याग करण्याच्या उद्देशाने त्या मुलाला कोणत्याही जागी उघड्यावर टाकील किंवा त्याला सोडून देईल त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरण.**—याप्रमाणे उघड्यावर टाकल्याचा परिणाम म्हणून ते मूल मृत्यू पावले तर खुनाबद्दल किंवा प्रकरणपरत्वे, सदोष मनुष्यवधाबद्दल अपराध्याची संपरीक्षा होण्याला प्रतिबंध करण्यासाठी हे कलम योजलेले नाही.

बारा वर्षाखालील मुलाला त्याच्या आई-वा-बापाने किंवा जिच्याकडे त्याची देखभाल आहे त्या व्यक्तीने उघड्यावर टाकणे आणि त्याचा परित्याग करणे.

३१८. एखाद्या मुलाचा मृतदेह—मग ते मूल त्याच्या जन्माच्यापूर्वी मेलेले असो किंवा जन्मानंतर असो किंवा जन्म होत असताना मेलेले असो—गुप्तपणे पुरून किंवा त्याची अन्यप्रकारे विल्हेवाट लावून, जो कोणी अशा मुलाचा जन्म झाल्याचे उद्देशपूर्वक लपवून ठेवील किंवा लपविण्याचा प्रयत्न करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

मृतदेहाची गुप्तपणे विल्हेवाट लावून अपत्यजन्माची लपवणूक करणे.

**दुखापतीविषयी**

३१९. जो कोणी एखाद्या व्यक्तीच्या ठायी शारीरिक वेदना, रोग किंवा विकलता निर्माण करतो तो 'दुखापत पोचवतो' असे म्हणतात.

दुखापत.

३२०. पुढील प्रकारच्या दुखापती यांच फक्त "जबर" म्हणून निर्देशित करण्यात आल्या आहेत :—

जबर दुखापत.

**पहिली.**—पुंस्त्वहरण.

**दुसरी.**—कोणत्याही डोळयाच्या दृक्शक्तीचा कायमचा विच्छेद करणे.

**तिसरी.**—कोणत्याही कानाच्या श्रवणशक्तीचा कायमचा विच्छेद करणे.

**चवथी.**—कोणताही अवयव किंवा सांधा यांपासून विच्छेद करणे.

**पाचवी.**—कोणताही अवयव किंवा सांधा यांच्या शक्तींचा नाश किंवा त्यात कायमचा बिघाड करणे.

**सहावी.**—मस्तक किंवा चेहरा कायमचा विद्रूप करणे.

**सातवी.**—हाड किंवा दात मोडणे, किंवा निखळवणे.

**आठवी.**—ज्या दुखापतीमुळे जीवित धोक्यात येते अथवा पीडित व्यक्तीला वीस दिवस इतका काळ दुःसह शारीरिक वेदना सहन करावी लागते किंवा तिचे नेहमीचे व्यवसाय चालू ठेवणे अशक्य होते अशी कोणतीही दुखापत.

इच्छापूर्वक दुखापत पोचवणे.

३२१. जर कोणी एखादी कृती केली असून तीयोगे कोणत्याही व्यक्तीला दुखापत व्हावी असा त्याचा उद्देश असेल किंवा तीयोगे कोणत्याही व्यक्तीला दुखापत पोचण्यास आपण कारण होण्याचा संभव आहे अशी त्याला जाणीव असेल आणि त्यायोगे कोणत्याही व्यक्तीला दुखापत पोचण्यास तो कारण झाला असेल तर, तो "इच्छापूर्वक दुखापत पोचवतो" असे म्हटले जाते.

इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे.

३२२. जो कोणी इच्छापूर्वक दुखापत पोचवतो त्याचा जी दुखापत करण्याचा उद्देश आहे किंवा जी दुखापत होण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव आहे ती जर जबर दुखापत असेल आणि तो ज्या दुखापतीस कारण होतो ती जबर दुखापत असेल तर, तो "इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवतो" असे म्हटले जाते.

**स्पष्टीकरण.**—ज्या बाबतीत एखादा इसम जबर दुखापत पोचण्यास कारण झाला आहे आणि जबर दुखापत पोचवण्याचा त्याचा उद्देशही आहे किंवा तसे होण्यास आपण कारण होण्याचा संभव आहे याची त्याला जाणीवही आहे या दोन्ही गोष्टी असतील तेवढे खेरीजकरून एरव्ही, तो "इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवतो" असे म्हटले जात नाही. पण जर एका प्रकारची जबर दुखापत करण्याचा स्वतःचा उद्देश असताना किंवा तशी दुखापत होण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची स्वतःला जाणीव असताना प्रत्यक्षात त्याच्या हातून दुसऱ्या प्रकारची जबर दुखापत झाली असेल तर, तो "इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवतो" असे म्हटले जाते.

**उदाहरण**

'य' चा चेहरा कायमचा विद्रूप करण्याच्या उद्देशाने किंवा तसे होण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची स्वतःला जाणीव असताना 'क' हा 'य' ला ठोसा मारतो, त्यामुळे 'य' चा चेहरा कायमचा विद्रूप होत नाही; पण त्याला वीस दिवस इतका काळ दुःसह शारीरिक वेदना सहन कराव्या लागतात. 'क' ने इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवली आहे.

इच्छापूर्वक दुखापत पोचवण्याबद्दल शिक्षा.

३२३. कलम ३३४ मध्ये उपबंधित केलेली बाब खेरीजकरून एरव्ही, जो कोणी इच्छापूर्वक दुखापत पोचवील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे.

३२४. कलम ३३४ मध्ये उपबंधित केलेली बाब खेरीजकरून एरव्ही, गोळी घालण्याचे, भोसकण्याचे किंवा कापण्याचे कोणतेही साधन किंवा हल्ल्याचे हत्यार म्हणून वापरले असता जे मृत्यूस कारण होण्याचा संभव आहे असे कोणतेही साधन याच्या साहाय्याने अथवा आग किंवा कोणताही तप्त पदार्थ याच्या साहाय्याने अथवा कोणतेही विष किंवा कोणताही क्षयकारक पदार्थ याच्या साहाय्याने अथवा कोणत्याही स्फोटक पदार्थाच्या साहाय्याने अथवा जो पदार्थ श्वासाबरोबर आत जाणे, गिळला जाणे किंवा रक्तात पोचणे हे मानवी शरीराला अपायकारक आहे अशा कोणत्याही पदार्थाच्या साहाय्याने अथवा कोणत्याही प्राण्याच्या साहाय्याने जो कोणी इच्छापूर्वक दुखापत पोचवील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवण्याबद्दल शिक्षा.

३२५. कलम ३३५ द्वारे उपबंधित केलेली बाब खेरीजकरून एरव्ही, जो कोणी इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे.

३२६. जो कोणी, कलम ३३५ द्वारे उपबंधित केलेली बाब खेरीजकरून एरव्ही, गोळी घालण्याचे, भोसकण्याचे किंवा कापण्याचे कोणतेही साधन, किंवा हल्ल्याचे हत्यार म्हणून वापरले असता जे मृत्यूस कारण होण्याचा संभव आहे असे कोणतेही साधन याच्या साहाय्याने अथवा आग किंवा कोणताही तप्त पदार्थ याच्या साहाय्याने अथवा कोणतेही विष किंवा कोणताही क्षयकारक पदार्थ याच्या साहाय्याने अथवा कोणत्याही स्फोटक पदार्थाच्या साहाय्याने अथवा जो श्वासाबरोबर आत जाणे, गिळला जाणे किंवा रक्तात पोचणे हे मानवी शरीराला अपायकारक आहे अशा कोणत्याही पदार्थाच्या साहाय्याने अथवा कोणत्याही प्राण्याच्या साहाय्याने इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवील त्याला, [1][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

मालमत्ता जबरीने घेण्यासाठी किंवा अवैध कृती करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे.

३२७. जर कोणी इच्छापूर्वक एखाद्या व्यक्तीला दुखापत पोचवली आणि त्यामागे ती पीडित व्यक्ती किंवा त्या पीडित व्यक्तीमध्ये हितसंबंध असलेली कोणतीही व्यक्ती यांच्याकडून कोणतीही मालमत्ता किंवा मूल्यवान् रोखा जबरीने घेण्याचा अथवा जे अवैध आहे किंवा ज्यामुळे अपराध करणे सुकर होऊ शकेल असे काहीतरी करण्यास पीडित व्यक्तीला किंवा अशा पीडित व्यक्तीमध्ये हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीला जबरीने भाग पाडण्याचा इरादा असेल तर, त्याला दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप/काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

३२८. अपराध करण्याच्या उद्देशाने किंवा अपराध करणे सुकर व्हावे या उद्देशाने किंवा आपण त्यामुळे दुखापतीस कारण होण्याची शक्यता आहे याची जाणीव असताना जो कोणी एखाद्या व्यक्तीला कोणतेही विष किंवा कोणतेही मूर्च्छाकारक, नशाकारक किंवा अपथ्यकारक औषधिद्रव्य किंवा अन्य पदार्थ सेवन करण्यास देईल किंवा सेवन करवील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

अपराध करण्याच्या उद्देशाने विष, इत्यादींच्या साहाय्याने दुखापत पोचवणे.

३२९. जर कोणी इच्छापूर्वक एखाद्या व्यक्तीला जबर दुखापत पोचवली आणि त्यामागे, ती पीडित व्यक्ती किंवा त्या पीडित व्यक्तीमध्ये हितसंबंधित असलेली कोणतीही व्यक्ती यांच्याकडून कोणतीही मालमत्ता किंवा मूल्यवान् रोखा जबरीने घेण्याचा अथवा जे अवैध आहे किंवा ज्यामुळे अपराध करणे सुकर होऊ शकेल असे काहीतरी करण्यास पीडित व्यक्ती किंवा अशा पीडित व्यक्तीमध्ये हितसंबंधित असलेली कोणतीही व्यक्ती यांना जबरीने भाग पाडण्याचा इरादा असेल तर त्याला, [1][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

मालमत्ता जबरीने घेण्यासाठी किंवा अवैध कृती करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे.

३३०. जर कोणी एखाद्या व्यक्तीला इच्छापूर्वक दुखापत पोचवली आणि त्यामागे, एखाद्या अपराधाचा किंवा गैरवर्तणुकीचा ज्यामुळे तलास लागू शकेल असा कोणताही क़बुलीजबाब किंवा माहिती पीडित व्यक्ती किंवा तिच्यामध्ये हितसंबंधित असलेली कोणतीही व्यक्ती यांच्याकडून जबरीने घेण्याचा इरादा असेल अथवा कोणतीही मालमत्ता किंवा मूल्यवान् रोखा परत करण्यास किंवा परत करवण्यास अगर कोणतीही हक्कमागणी किंवा मागणी पूर्ण करण्यास अगर जीमुळे कोणतीही मालमत्ता किंवा मूल्यवान् रोखा परत मिळू शकेल अशी माहिती देण्यास पीडित व्यक्ती किंवा तिच्यामध्ये हितसंबंधित असलेली कोणतीही व्यक्ती यांना जबरीने भाग पाडण्याचा इरादा असेल तर त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

क़बुलीजबाब जबरीने घेण्यासाठी अथवा मालमत्ता परत करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे.

**उदाहरणे**

(क) 'क' हा पोलीस अधिकारी, 'य' ला त्याने अपराध केला असे कबूल करण्यास प्रवृत्त करण्यासाठी त्याचा छळ करतो. 'क' हा या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी आहे.

(ख) 'क' हा पोलीस अधिकारी, विवक्षित चोरीची मालमत्ता कोठे ठेवली आहे हे दाखवून देण्यास 'ख' ला प्रवृत्त करण्याकरिता त्याचा छळ करतो. 'क' हा या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी आहे.

(ग) 'क' हा महसूल अधिकारी, 'य' कडून येणे असलेल्या महसुलाची विवक्षित थकबाकी चुकती करण्यास 'य' ला भाग पाडण्याकरिता त्याचा छळ करतो. 'क' हा या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी आहे.

(घ) 'क' हा जमीनदार, आपला खंड देण्यास भाग पाडण्यासाठी रयताचा छळ करतो. 'क' हा या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी आहे.

३३१. जर कोणी एखाद्या व्यक्तीला इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवली आणि त्यामागे, एखाद्या अपराधाचा किंवा गैरवर्तणुकीचा ज्यामुळे तलास लागू शकेल असा कोणताही कबुलीजबाब किंवा माहिती पीडित व्यक्ती किंवा तिच्यामध्ये हितसंबंधित असलेली कोणतीही व्यक्ती यांच्याकडून जबरीने घेण्याचा इरादा असेल अथवा कोणतीही मालमत्ता किंवा मूल्यवान् रोखा परत करण्यास किंवा परत करवण्यास अगर कोणतीही हक्कमागणी किंवा मागणी पूर्ण करण्यास अगर जीमुळे कोणतीही मालमत्ता किंवा मूल्यवान् रोखा परत मिळू शकेल अशी माहिती देण्यास पीडित व्यक्ती किंवा तिच्यामध्ये हितसंबंधित असलेली कोणतीही व्यक्ती यांना जबरीने भाग पाडण्याचा इरादा असेल तर त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

कबुलीजबाब जबरीने घेण्यासाठी अथवा मालमत्ता परत करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे.

३३२. लोक सेवक असलेली कोणतीही व्यक्ती असा लोक सेवक म्हणून आपले कर्तव्य पार पाडीत असताना अथवा त्या व्यक्तीला किंवा अन्य कोणत्याही लोक सेवकाला असा लोक सेवक म्हणून आपले कर्तव्य पार पाडण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा त्यापासून धाकाने परावृत्त करण्याच्या उद्देशाने अथवा असा लोक सेवक म्हणून आपले कर्तव्य पार पाडताना त्या व्यक्तीने केलेल्या किंवा करण्याचा प्रयत्न केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या परिणामी जो कोणी तिला इच्छापूर्वक दुखापत पोचवील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

लोक सेवकाला त्याच्या कर्तव्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

लोक सेवकाला त्याच्या कर्तव्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवणे.

३३३. लोक सेवक असलेली कोणतीही व्यक्ती असा लोक सेवक म्हणून आपले कर्तव्य पार पाडीत असताना अथवा त्या व्यक्तीला किंवा अन्य कोणत्याही लोक सेवकाला असा लोक सेवक म्हणून आपले कर्तव्य पार पाडण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा त्यापासून धाकाने परावृत्त करण्याच्या उद्देशाने अथवा असा लोक सेवक म्हणून आपले कर्तव्य पार पाडताना त्या व्यक्तीने केलेल्या किंवा करण्याचा प्रयत्न केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या परिणामी, जो कोणी तिला इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

प्रक्षोभकारणामुळे इच्छापूर्वक दुखापत पोचवणे.

३३४. जो कोणी गंभीर व आकस्मिक प्रक्षोभकारणामुळे इच्छापूर्वक दुखापत पोचवील त्याला, ज्या व्यक्तीने प्रक्षोभित केले अशा व्यक्तीहून अन्य कोणत्याही व्यक्तीस दुखापत करण्याचा त्याचा उद्देश नसेल व तसेच, दुखापत होण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव नसेल तर त्याला, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

प्रक्षोभकारणामुळे इच्छापूवक जबर दुखापत पोचवणे.

३३५. जो कोणी गंभीर व आकस्मिक प्रक्षोभकारणामुळे [1][इच्छापूर्वक] जबर दुखापत पोचवील त्याला, ज्या व्यक्तीने प्रक्षोभित केले अशा व्यक्तीहून अन्य कोणत्याही व्यक्तीस, जबर दुखापत पोचवण्याचा त्याचा उद्देश नसेल किंवा जबर दुखापत होण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव नसेल तर त्याला, चार वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरण.**—लगतपूर्वीची दोन कलमेही कलम ३०० च्या अपवाद १ प्रमाणे त्याच परंतुकांस अधीन आहेत.

इतरांचे जीवित किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणारी कृती.

३३६. जो कोणी मानवी जीवित किंवा इतरांची व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने कोणतीही कृती करील त्याला, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची किंवा दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

इतरांचे जीवित किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या कृतीने दुखापत पोचवणे.

३३७. जो कोणी मानवी जीवित किंवा इतरांची व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने कोणतीही कृती करून कोणत्याही व्यक्तीस दुखापत पोचवील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

इतरांचे जीवित किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या कृतीने जबर दुखापत पोचवणे.

३३८. जो कोणी मानवी जीवित किंवा इतरांची व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने एखादी कृती करून कोणत्याही व्यक्तीस जबर दुखापत पोचवील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

## गैर निरोध आणि गैर परिरोध यांविषयी

गैर निरोध.

३३९. कोणत्याही व्यक्तीस ज्या दिशेने जाण्याचा हक्क असेल अशा कोणत्याही दिशेने जाण्यास तिला जो कोणी इच्छापूर्वक अटकाव करतो तो त्या व्यक्तीस "गैरपणे निरुद्ध करतो" असे म्हटले जाते.

**अपवाद.**—जमीन किंवा पाणी यावरील ज्या खाजगी मार्गात असा अटकाव करण्याचा आपणांस कायदेशीर हक्क आहे असे एखादी व्यक्ती सद्भावपूर्वक समजत असेल त्या मार्गामध्ये असा अटकाव करणे हा या कलमाच्या अर्थानुसार अपराध नाही.

**उदाहरण**

'य' ला ज्या मार्गावरून जाण्याचा हक्क आहे तो मार्ग बंद करण्याचा आपणांस हक्क आहे असे 'क' सद्भावपूर्वक समजत नसताना तो मार्ग अडवतो. त्यामुळे 'य' ला त्या मार्गाने जाण्यास प्रतिबंध होतो. 'क' हा 'य' ला गैरपणे निरुद्ध करतो.

गैर परिरोध.

३४०. जो कोणी एखाद्या व्यक्तीस विवक्षित वेढणाऱ्या सीमांच्या पलिकडे जाण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने तिला गैरपणे निरुद्ध करतो तो त्या व्यक्तीस "गैरपणे परिरुद्ध" करतो असे म्हटले जाते.

**उदाहरणे**

(क) 'क' हा 'य' ला भिंतींनी बांधलेल्या आवारात जायला लावतो आणि कुलूप लावून 'य' ला आत कोंडतो. अशा प्रकारे वेढणाऱ्या भिंतींच्या मर्यादेपलिकडे कोणत्याही दिशेने जाण्यास 'य' ला प्रतिबंध होतो. 'क' ने 'य' ला गैरपणे परिरुद्ध केले असे होते.

---

१. १८८२ च्या अधिनियम ८-कलम ८ द्वारे हा शब्द समाविष्ट करण्यांत आला.

(ख्) इमारतीमधून बाहेर पडण्याच्या मार्गावर 'क' दारूगोळा हत्यारांनिशी सज्ज असलेल्या माणसांना उभे करतो आणि 'य'ने इमारतीतून निघून जाण्याचा प्रयत्न केल्यास ती माणसे 'य'वर गोळी झाडतील असे 'य'ला सांगतो. 'क'हा 'य'ला गैरपणे परिरुद्ध करतो.

गैर निरोधाबद्दल शिक्षा.

३४१. जो कोणी कोणत्याही व्यक्तीस गैरपणे निरुद्ध करील त्याला, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची साध्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

गैर परिरोधाबद्दल शिक्षा.

३४२. जो कोणी कोणत्याही व्यक्तीस गैरपणे परिरुद्ध करील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

तीन दिवस किंवा त्याहून अधिक काळ गैर परिरोध.

३४३. जो कोणी कोणत्याही व्यक्तीस तीन दिवस किंवा त्याहून अधिक काळ गैरपणे परिरुद्ध करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

दहा दिवस किंवा त्याहून अधिक काळ गैर परिरोध.

३४४. जो कोणी कोणत्याही व्यक्तीस दहा दिवस किंवा त्याहून अधिक काळ गैरपणे परिरुद्ध करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

जिच्या मुक्ततेसाठी प्राधिलेख काढण्यात आला असेल अशा व्यक्तीस गैरपणे परिरुद्ध करून ठेवणे.

३४५. एखाद्या व्यक्तीच्या मुक्ततेकरिता रीतसर प्राधिलेख काढण्यात आला आहे हे माहीत असून जो कोणी त्या व्यक्तीला गैरपणे परिरुद्ध करून ठेवील त्याला, या प्रकरणातील अन्य कोणत्याही कलमान्वये तो ज्यास पात्र असेल अशा कोणत्याही मुदतीच्या कारावासाव्यतिरिक्त आणखी दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल.

गुप्त स्थळी गैर परिरोध.

३४६. एखाद्या व्यक्तीला परिरुद्ध केल्यास याप्रमाणे परिरुद्ध होणाऱ्या व्यक्तीमध्ये हितसंबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा कोणत्याही लोकसेवकास ते कळू नये अथवा यात यापूर्वी निर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा लोकसेवकास अशा परिरोधाची जागा कळू नये किंवा शोधता येऊ नये असा उद्देश सूचित होईल अशा रीतीने जो कोणी तिला गैरपणे परिरुद्ध करील त्याला, अशा गैर परिरोधाबद्दल तो ज्या अन्य कोणत्याही शिक्षेस पात्र असेल तिच्या व्यतिरिक्त आणखी, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल.

मालमत्ता जबरीने घेण्यासाठी किंवा अवैध कृती करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी गैर परिरोध.

३४७. जर कोणी एखाद्या व्यक्तीस गैरपणे परिरुद्ध केले आणि त्यामागे, त्या परिरुद्ध व्यक्तीकडून किंवा परिरुद्ध व्यक्तीमध्ये हितसंबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही मालमत्ता किंवा मूल्यवान् रोखा जबरीने घेण्याचा अथवा अवैध असे काहीतरी करण्यास किंवा ज्यामुळे अपराध करणे सुकर होऊ शकेल अशी कोणतीही माहिती देण्यास परिरुद्ध व्यक्ती किंवा अशा व्यक्तीमध्ये हितसंबंधित असलेली कोणतीही व्यक्ती यांना जबरीने भाग पाडण्याचा त्याचा इरादा असेल तर, त्याला तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

कबुलीजबाब जबरीने घेण्यासाठी अथवा मालमत्ता परत करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी गैर परिरोध.

३४८. जर कोणी एखाद्या व्यक्तीस गैरपणे परिरुद्ध केले आणि त्यामागे, एखाद्या अपराधाचा किंवा गैरवर्तणुकीचा ज्यामुळे तलास लागू शकेल असा कोणताही कबुलीजबाब किंवा कोणतीही माहिती परिरुद्ध व्यक्ती किंवा परिरुद्ध व्यक्तीमध्ये हितसंबंधित असलेली कोणतीही व्यक्ती यांच्याकडून जबरीने घेण्याचा त्याचा इरादा असेल अथवा कोणतीही मालमत्ता किंवा मूल्यवान् रोखा परत करण्यास किंवा परत करवण्यास अगर कोणतीही हक्कमागणी किंवा मागणी पूर्ण करण्यास अगर जीमुळे कोणतीही मालमत्ता किंवा मूल्यवान् रोखा परत मिळू शकेल अशी माहिती देण्यास परिरुद्ध व्यक्ती किंवा तिच्यामध्ये हितसंबंधित असलेली कोणतीही व्यक्ती यांना जबरीने भाग पाडण्याचा त्याचा इरादा असेल तर, त्याला तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

### फौजदारीपात्र बलप्रयोग आणि हमला यांविषयी

बलप्रयोग.

३४९. एखाद्याने जर अन्य व्यक्तीच्या ठायी गती निर्माण केली किंवा गतिबदल अगर गतिविराम घडवून आणला अथवा ज्यायोगे एखाद्या पदार्थाच्या त्या अन्य व्यक्तीच्या शरीराच्या कोणत्याही भागाशी किंवा त्या अन्य व्यक्तीने परिधान केलेल्या किंवा जवळ बाळगलेल्या कोणत्याही वस्तूशी संपर्क घडेल किंवा अशा संपर्कामुळे त्या अन्य व्यक्तीच्या स्पर्श-संवेदनेवर परिणाम होईल अशाप्रकारे स्थित असलेल्या कोणत्याही वस्तूशी संपर्क घडेल अशा तऱ्हेने त्या पदार्थाच्या ठायी अशी गती निर्माण केली किंवा असा गतिबदल अगर गतिविराम घडवून आणला तर, तो त्या अन्य व्यक्तीच्या बाबतीत फौजदारीपात्र बलप्रयोग करतो असे म्हटले जाते: मात्र, गती निर्माण करणाऱ्या किंवा गतिबदल अगर गतिविराम घडवून

आणणाऱ्या व्यक्तीने, यात यापुढे वर्णन करण्यात आलेल्या तीन प्रकारांपैकी एका प्रकारे गती निर्माण केली असली पाहिजे किंवा गतिबदल अगर गतिविराम घडवून आणला असला पाहिजे.

**एक :** स्वतःचे शारीरिक सामर्थ्य वापरणे.

**दोन :** एखादा पदार्थ अशा स्थितीत ठेवणे की, जेणेकरून स्वतःला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला आणखी काही कृती करावी न लागता गती निर्माण होईल किंवा गतिबदल अगर गतिविराम घडून येईल.

**तीन :** कोणत्याही प्राण्याला गतिमान् होण्यास, गतिबदल करण्यास किंवा गतिविराम करण्यास प्रवृत्त करणे.

फौजदारीपात्र बलप्रयोग.

३५०. जर कोणी कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, त्या व्यक्तीच्या संमतीशिवाय उद्देशपूर्वक बलप्रयोग केला आणि तो कोणताही अपराध करण्याच्या प्रयोजनार्थ असेल अथवा ज्या व्यक्तीच्या बाबतीत बलप्रयोग करण्यात आला त्या व्यक्तीस अशा बलप्रयोगाद्वारे क्षती पोचावी किंवा भीति वाटावी किंवा त्रास व्हावा असा त्याचा उद्देश असेल अथवा अशा बलप्रयोगामुळे तसे होण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव असेल तर, तो त्या अन्य व्यक्तीच्या बाबतीत फौजदारीपात्र बलप्रयोग करतो असे म्हटले जाते.

**उदाहरणे**

(क्) 'य' हा नदीकिनाऱ्याला दोराने बांधून ठेवलेल्या नावेत बसलेला आहे. 'क' दोर सोडून टाकतो आणि अशाप्रकारे उद्देशपूर्वक नावेला प्रवाहामध्ये वाहत जायला लावतो. याबाबतीत 'क' उद्देशपूर्वक 'य' च्या ठायी गती निर्माण करतो, आणि तो पदार्थांना अशा रीतीने विशिष्ट स्थितीत ठेवून ही गोष्ट करतो की, कोणत्याही व्यक्तीला अन्य कोणतीही कृती करावी न लागता गती निर्माण होते. म्हणून 'क' ने 'य' च्या बाबतीत उद्देशपूर्वक बलप्रयोग केला आहे आणि जर कोणताही अपराध करण्यासाठी किंवा या बलप्रयोगामुळे 'य' ला क्षती पोचावी, भीती वाटावी किंवा त्रास व्हावा अशा उद्देशाने किंवा तसे होण्याचा संभव असल्याची जाणीव असताना 'क' ने 'य' च्या संमतीवाचून तसे केले असेल तर, 'क' ने 'य' च्या बाबतीत फौजदारीपात्र बलप्रयोग केलेला आहे.

(ख्) 'य' रथावर आरूढ झाला आहे. 'क' हा 'य' च्या घोड्यांना चाबूक मारतो व त्याद्वारे त्यांना त्यांचा वेग वाढवायला भाग पाडतो. या बाबतीत 'क' ने प्राण्यांना त्यांच्या गतीत बदल करण्यास प्रवृत्त करून 'य' च्या गतीमध्ये बदल घडवला आहे. त्याअर्थी, 'क' ने 'य' वर बलप्रयोग केला आहे आणि जर 'य' ला त्यामुळे क्षती पोचावी, भीती वाटावी किंवा त्रास व्हावा या उद्देशाने किंवा तसे होण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची जाणीव असताना 'क' ने 'य' च्या संमतीवाचून हे केले असेल तर, 'क' ने 'य' च्या बाबतीत फौजदारीपात्र बलप्रयोग केला आहे.

(ग्) 'य' पालखीमधून जात आहे. 'य' ची जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने 'क' पालखीचा दांडा धरतो व पालखी थांबवतो. या बाबतीत 'क' ने 'य' च्या ठायी गतिविराम घडवून आणला असून त्याने हे आपल्या शारीरिक सामर्थ्याने केले आहे. त्याअर्थी, 'क' ने 'य' च्या बाबतीत बलप्रयोग केला आहे आणि 'क' ने अपराध करण्यासाठी उद्देशपूर्वक 'य' च्या संमतीवाचून हे केले असल्यामुळे, 'क' ने 'य' च्या बाबतीत फौजदारीपात्र बलप्रयोग केला आहे.

(घ्) 'क' हा 'य' ला रस्त्यामध्ये उद्देशपूर्वक धक्का मारतो. या बाबतीत 'क' ने स्वतःच्या शारीरिक सामर्थ्याचा वापर करून 'य' शी संपर्क होईल अशाप्रकारे स्वतःच्या शरीराला गती दिली आहे. त्याअर्थी, 'क' ने 'य' च्या बाबतीत उद्देशपूर्वक बलप्रयोग केला आहे, आणि जर त्यामुळे 'य' ला क्षती पोचावी भीती वाटावी किंवा त्रास व्हावा या उद्देशाने किंवा तसे होण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची जाणीव असताना 'क' ने 'य' च्या संमतीवाचून तसे केले असेल तर, त्याने 'य' च्या बाबतीत फौजदारीपात्र बलप्रयोग केला आहे.

(ङ्) 'क' एक दगड फेकतो, त्या दगडाचा अशा प्रकारे 'य' शी किंवा 'य' च्या पोशाखाशी किंवा 'य' ने जवळ बाळगलेल्या कोणत्याही वस्तूशी संपर्क घडावा अथवा किंवा तो दगड पाण्यात पडून 'य' च्या कपड्यांवर किंवा 'य' ने जवळ बाळगलेल्या कोणत्याही वस्तूवर पाणी उडावे असा 'क' चा उद्देश आहे किंवा तसे होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव आहे. याबाबतीत, जर दगडफेकीमुळे परिणामी एखाद्या पदार्थाचा 'य' शी किंवा त्याच्या कपड्यांशी संपर्क घडून आला असेल तर, 'क' ने 'य' च्या बाबतीत बलप्रयोग केला आहे, आणि जर त्यामुळे 'य' ला क्षती पोचावी, भीती वाटावी किंवा त्रास व्हावा अशा उद्देशाने 'क' ने 'य' च्या संमतीवाचून तसे केले असेल तर, 'क' ने 'य' च्या बाबतीत फौजदारीपात्र बलप्रयोग केला आहे.

(च्) 'क' एका स्त्रीचा बुरखा उद्देशपूर्वक ओढतो. याबाबतीत, 'क' तिच्या बाबतीत उद्देशपूर्वक बलप्रयोग करतो, आणि जर त्यामुळे तिला क्षती पोचावी, भीती वाटावी किंवा त्रास व्हावा अशा उद्देशाने किंवा तसे होण्याचा संभव असल्याची जाणीव असताना त्याने तिच्या संमतीवाचून तसे केले असेल तर, त्याने तिच्या बाबतीत फौजदारीपात्र बलप्रयोग केला आहे.

(छ्) 'य' स्नान करीत आहे. 'क' आंघोळीच्या पाण्यामध्ये उकळते पाणी, ते उकळते आहे हे माहीत असून ओततो. याबाबतीत, 'क' उद्देशपूर्वक स्वतःच्या शारीरिक सामर्थ्याने उकळत्या पाण्यामध्ये अशाप्रकारे गती निर्माण करतो की, ज्यामुळे त्या पाण्याचा 'य' शी संपर्क घडतो किंवा अशा संपर्कामुळे 'य' च्या स्पर्श-संवेदनेवर नक्कीच परिणाम होईल अशा ठिकाणी असलेल्या दुसऱ्या पाण्याशी संपर्क घडतो. त्याअर्थी, 'क' ने 'य' च्या बाबतीत उद्देशपूर्वक बलप्रयोग केला आहे, आणि जर त्यामुळे 'य' ला क्षती पोचावी किंवा भीती वाटावी किंवा त्रास व्हावा या उद्देशाने किंवा तसे होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव असताना 'क' ने 'य' च्या संमतीवाचून तसे केले असेल तर, त्याने फौजदारीपात्र बलप्रयोग केला आहे.

(ज्) 'य' च्या संमतीवाचून 'क' हा कुत्र्याला 'य' च्या अंगावर धावून जाण्यास चिथावणी देतो. याबाबतीत, 'य' ला क्षती पोचावी, भीती वाटावी किंवा त्रास व्हावा असा 'क' चा उद्देश असेल तर, तो 'य' च्या बाबतीत फौजदारीपात्र बलप्रयोग करतो.

**हमला.**

३५१. जर कोणी कोणताही हावभाव किंवा कसलीही तयारी केली आणि असा हावभाव किंवा तयारी यामुळे, जो कोणी तो हावभाव किंवा तयारी करील तो समक्ष हजर असलेल्या व्यक्तीच्या बाबतीत फौजदारीपात्र स्वरूपाचा बलप्रयोग करण्याच्या बेतात आहे अशी धास्ती त्या व्यक्तीच्या मनात निर्माण व्हावी असा त्यामागे त्याचा उद्देश असेल किंवा तसे होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव असेल तर, तो हमला करतो असे म्हटले जाते.

**स्पष्टीकरण.**—केवळ उच्चारलेले शब्द हे 'हमला' या सदरात मोडत नाहीत. पण एखादी व्यक्ती जे शब्द उच्चारील त्यांमुळे, ज्यायोगे तिचे हावभाव किंवा तयारी ही हमला म्हणून गणता येईल अशा प्रकारचा अर्थ त्या हावभावांना किंवा तयारीला प्राप्त होऊ शकेल.

### उदाहरणे

(क्) 'क' हा 'य' वर मूठ उगारतो, 'क' हा 'य'वर प्रहार करण्याच्या बेतात आहे अशी त्यामुळे 'य'ची समजूत व्हावी असा 'क'चा उद्देश आहे किंवा तसे होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव आहे. 'क'ने हमला केला आहे.

(ख्) 'क' एका चावऱ्या कुत्र्याची मुसकी सोडू लागतो, 'क' हा कुत्र्याला 'य'वर हल्ला चढवायला लावण्याच्या बेतात आहे अशी त्यामुळे 'य'ची समजूत व्हावी असा 'क'चा उद्देश आहे किंवा तसे होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव आहे. 'क'ने 'य'वर हमला केला आहे.

(ग्) "मी आता तुला झोडपून काढीन" असे 'य'ला म्हणत असता 'क' हातात काठी घेतो. याबाबतीत, काही झाले तरी 'क' ने उच्चारलेल्या नुसत्या शब्दांची गणना हमल्यामध्ये होऊ शकली नसती आणि अन्य कोणत्याही परिस्थितिविशेषाच्या अभावी नुसत्या हावभावाची गणना हमल्यामध्ये होऊ शकली नसती तरीही, उच्चारलेल्या शब्दांनी ज्याचा खुलासा झाला तो हावभाव 'हमला' या सदरात मोडू शकेल.

**गंभीर प्रक्षोभकारण नसताना एरव्ही हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करण्याबद्दल शिक्षा.**

३५२. एखाद्या व्यक्तीकडून गंभीर व आकस्मिक प्रक्षोभकारण घडले नसताना एरव्ही, जो कोणी तिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करील त्याला, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरण.**—प्रक्षोभकारण हे अपराध्याने अपराधासाठी निमित्त म्हणून शोधलेले किंवा इच्छापूर्वक उकरून काढलेले असेल तर, किंवा

कायद्याचे पालन म्हणून केलेल्या किंवा एखाद्या लोकसेवकाने असा लोकसेवक म्हणून आपल्या अधिकाराचा कायदेशीर वापर करून केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे प्रक्षोभन झालेले असेल तर, किंवा

खाजगीरीत्या बचाव करण्याच्या हक्काचा कायदेशीर वापर करताना केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे प्रक्षोभन झालेले असेल तर,

गंभीर व आकस्मिक प्रक्षोभकारणामुळे या कलमाखालील अपराधाची शिक्षा सौम्य होणार नाही.

प्रक्षोभकारण हे अपराध सौम्य ठरवण्याइतपत गंभीर व आकस्मिक होते किंवा कसे हा तथ्यविषयक प्रश्न आहे.

**लोकसेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे.**

३५३. लोकसेवक असलेली कोणतीही व्यक्ती असा लोक सेवक म्हणून आपले कर्तव्य बजावत असताना अथवा असा लोकसेवक म्हणून आपले कर्तव्य पार पाडण्यास त्या व्यक्तीला प्रतिबंध करण्याच्या किंवा त्यापासून धाकाने परावृत्त करण्याच्या उद्देशाने अथवा असा लोक सेवक म्हणून आपले कर्तव्य कायदेशीरपणे पार पाडीत असताना अशा व्यक्तीने केलेल्या किंवा करण्याचा प्रयत्न केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या परिणामी, जो कोणी तिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे.

३५४. जर कोणी कोणत्याही स्त्रीवर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग केला आणि तिचा विनयभंग करण्याचा त्यामागे उद्देश असेल किंवा त्यामुळे आपल्याकडून तसा विनयभंग होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव असेल तर त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

गंभीर प्रक्षोभकारण नसताना एरव्ही एखाद्या व्यक्तीची मानहानी करण्याच्या उद्देशाने हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे.

३५५. एखाद्या व्यक्तीकडून गंभीर आणि आकस्मिक प्रक्षोभकारण घडले नसताना एरव्ही, जर कोणी तिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग केला व त्यायोगे त्या व्यक्तीची मानहानी करण्याचा त्याचा उद्देश असेल तर त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

एखाद्या व्यक्तीने जवळ बाळगलेल्या मालमत्तेची चोरी करण्याचा प्रयत्न करताना हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे.

३५६. कोणत्याही व्यक्तीने त्या त्या वेळी परिधान केलेल्या किंवा जवळ बाळगलेल्या कोणत्याही मालमत्तेची चोरी करण्याचा प्रयत्न करताना जो कोणी तिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

एखाद्या व्यक्तीला गैरपणे परिरुद्ध करण्याचा प्रयत्न करताना हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे.

३५७. कोणत्याही व्यक्तीला गैरपणे परिरुद्ध करण्याचा प्रयत्न करताना जो कोणी तिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

गंभीर प्रक्षोभकारणावरून हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे.

३५८. कोणत्याही व्यक्तीकडून गंभीर व आकस्मिक प्रक्षोभकारण घडल्यामुळे जो कोणी तिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करील त्याला, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची साध्या कारावासाची, किंवा दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरण.**—लगतपूर्व कलम हे कलम ३५२ प्रमाणे त्याच स्पष्टीकरणास अधीन आहे.

## अपनयन, अपहरण, गुलामगिरी व वेठबिगार यांविषयी

अपनयन.

३५९. अपनयन दोन प्रकारचे असते. [१][भारतातून] अपनयन करणे आणि कायदेशीर पालकाच्या ताब्यातून अपनयन करणे.

भारतातून अपनयन करणे.

३६०. जो कोणी कोणत्याही व्यक्तीस तिच्या, किंवा त्या व्यक्तीच्या वतीने संमती देण्यास विधितः प्राधिकृत असलेल्या व्यक्तीच्या संमतीवाचून [१][भारताच्या] सीमेबाहेर नेतो तो त्या व्यक्तीचे [१][भारतातून] अपनयन करतो असे म्हटले जाते.

कायदेशीर पालकाच्या ताब्यातून अपनयन करणे.

३६१. जी अज्ञान व्यक्ती पुरुष असल्यास [२][सोळा] वर्षे वयाखालील असेल किंवा ती स्त्री असल्यास [३][अठरा] वर्षे वयाखालील असेल तिला अथवा कोणत्याही मनोविकल व्यक्तीला जो कोणी अशा अज्ञान व्यक्तीच्या किंवा मनोविकल व्यक्तीच्या कायदेशीर पालकाच्या ताब्यातून अशा पालकाच्या संमतीवाचून घेऊन जाईल किंवा भुरळ पाडून नेईल तो अशा अज्ञान किंवा मनोविकल व्यक्तीचे कायदेशीर पालकाच्या ताब्यातून अपनयन करतो असे म्हटले जाते.

**स्पष्टीकरण.**—या कलमातील "कायदेशीर पालक" या शब्दप्रयोगात, जिच्याकडे अशा अज्ञान व्यक्तीची किंवा अन्य व्यक्तीची देखभाल किंवा अभिरक्षा आहे अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.

**अपवाद.**—जी कोणतीही व्यक्ती आपण एखाद्या अनौरस बालकाचा पिता असल्याचे सद्भावपूर्वक समजत असेल किंवा अशा बालकाच्या कायदेशीर अभिरक्षेला आपण हक्कदार असल्याचे सद्भावपूर्वक समजत असेल तिने केलेली कोणतीही कृती जर अनैतिक व अवैध प्रयोजनार्थ करण्यात आलेली नसेल तर, अशा कृतीला हे कलम लागू होत नाही.

---

१. क्रमशः, अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' याऐवजी वरील शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. १९४९ चा अधिनियम ४२-कलम २ द्वारे "चौदा" याऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३. कित्ता-कलम २ द्वारे "सोळा" याऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३६२. जो कोणी कोणत्याही व्यक्तीस, एखाद्या ठिकाणाहून दूर जाण्यास बलप्रयोगाने भाग पाडतो अथवा तसे करण्यास कोणत्याही फसवणुकीच्या उपायांनी प्रवृत्त करतो तो त्या व्यक्तीचे अपहरण करतो असे म्हटले जाते, अपहरण.

३६३. जो कोणी कोणत्याही व्यक्तीचे [1][भारतातून] किंवा कायदेशीर पालकाच्या ताब्यातून अपनयन करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. अपनयनाबद्दल शिक्षा.

[2][३६३क. (१) कोणत्याही अज्ञान व्यक्तीस भीक मागण्याच्या कामी नेमता यावे किंवा त्यासाठी तिचा वापर करता यावा याकरिता जो कोणी अशा अज्ञान व्यक्तीचे अपनयन करील किंवा आपण अज्ञान व्यक्तीचा कायदेशीर पालक नसताना त्या अज्ञान व्यक्तीची अभिरक्षा मिळवील तो, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. भीक मागण्यासाठी अज्ञान व्यक्तीचे अपनयन करणे किंवा तिला विकलांग करणे.

(२) कोणत्याही अज्ञान व्यक्तीस भीक मागण्याच्या कामी नेमता यावे किंवा त्यासाठी तिचा वापर करता यावा याकरिता जो कोणी अशा अज्ञान व्यक्तीला विकलांग करील तो आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

(३) आपण एखाद्या अज्ञान व्यक्तीचा कायदेशीर पालक नसताना जर कोणी भीक मागण्याच्या कामी अशा अज्ञान व्यक्तीची नेमणूक केली किंवा त्यासाठी तिचा वापर केला तर त्याबाबतीत, विरुद्ध शाबीत न झाल्यास, त्या अज्ञान व्यक्तीला भीक मागण्यासाठी नेमता यावे किंवा त्यासाठी तिचा वापर करता यावा याकरिता त्याने अज्ञान व्यक्तीचे अपनयन केले किंवा अन्यथा तिची अभिरक्षा मिळवली असे गृहीत धरण्यात येईल.

(४) या कलमात,—

(क) "भीक मागणे" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) गाण्याचा, नाच करण्याचा, भविष्य सांगण्याचा, करामती करून दाखवण्याचा किंवा वस्तूची विक्री करण्याचा किंवा अन्य प्रकारचा बहाणा करून सार्वजनिक ठिकाणी भिकेची याचना करणे किंवा ती स्वीकारणे ;

(दोन) भिकेची याचना करण्यासाठी किंवा भीक स्वीकारण्यासाठी कोणत्याही खाजगी परिवास्तूमध्ये प्रवेश करणे ;

(तीन) भीक मिळवण्याच्या किंवा उकळण्याच्या उद्देशाने, स्वतःचे किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीचे किंवा एखाद्या प्राण्याचे कोणतेही क्षत, जखम, इजा, विद्रूपता किंवा रोग उघडा करणे किंवा त्याचे प्रदर्शन करणे ;

(चार) भिकेची याचना करणे किंवा भीक मिळवणे यासाठी प्रदर्शनीय वस्तू म्हणून अज्ञान व्यक्तीचा वापर करणे ;

(ख) "अज्ञान व्यक्ती" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) पुरुषाच्या बाबतीत, सोळा वर्षे वयाखालील व्यक्ती ; आणि

(दोन) स्त्रीच्या बाबतीत, अठरा वर्षे वयाखालील व्यक्ती.]

३६४. एखाद्या व्यक्तीचा खून करता यावा किंवा खून होण्याच्या संकटात ती व्यक्ती सापडेल अशा प्रकारे तिची वासलात लावता यावी म्हणून जो कोणी अशा व्यक्तीचे अपनयन किंवा अपहरण करील त्याला, [3][आजीव कारावासाची] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. खून करण्यासाठी अपनयन करणे किंवा अपहरण करणे.

**उदाहरणे**

(क) 'य' ला एका मूर्तीसमोर बळी देण्याच्या उद्देशाने किंवा तसे होण्याचा संभव असल्याची जाणीव असताना 'क' हा 'य' [1][भारतातून] अपनयन करतो. 'क' ने या कलमामध्ये व्याख्या करण्यात आलेला अपराध केला आहे.

(ख) 'ख' चा खून करता यावा म्हणून 'क' हा 'ख' ला बळजबरीने त्याच्या घरापासून दूर घेऊन जातो किंवा त्याला भुरळ पाडून नेतो. 'क' ने या कलमामध्ये व्याख्या करण्यात आलेला अपराध केला आहे.

---

१. क्रमशः, अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० आणि १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे "ब्रिटिश इंडिया" याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. १९५९ चा अधिनियम ५२-कलम २ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले (१५ जानेवारी, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

**गुप्तपणे व गैरपणे एखाद्या व्यक्तीला परिरुद्ध करण्याकरिता तिचे अपनयन किंवा अपहरण करणे.**

३६५. एखादी व्यक्ती गुप्तपणे व गैरपणे परिरुद्ध व्हावी या उद्देशाने जो कोणी त्या व्यक्तीचे अपनयन किंवा अपहरण करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**विवाह, इत्यादीची सक्ती करण्यासाठी स्त्रीचे अपनयन किंवा अपहरण करणे किंवा तिला प्रलोभित करणे.**

३६६. कोणत्याही स्त्रीला तिच्या इच्छेविरुद्ध कोणत्याही व्यक्तीशी विवाह करण्याची सक्ती करता यावी या उद्देशाने किंवा तिच्यावर तशी सक्ती होईल असा संभव असल्याची स्वत:ला जाणीव असताना, अथवा विधिनिषिद्ध संभोगाकरिता तिच्यावर बळजबरी करता यावी किंवा तिला तशी फूस लावता यावी या उद्देशाने अगर विधिनिषिद्ध संभोगाकरता तिच्यावर बळजबरी होईल किंवा तिला तशी फूस लावण्यात येईल असा संभव असल्याची स्वत:ला जाणीव असताना जो कोणी तिचे अपनयन किंवा अपहरण करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल; [१][आणि या संहितेमध्ये व्याख्या करण्यात आल्यानुसार फौजदारीपात्र धाकदपटशाच्या मार्गाने किंवा सत्तेचा दुरुपयोग करून किंवा सक्तीच्या अन्य कोणत्याही उपायाने जो कोणी एखाद्या स्त्रीला दुसऱ्या व्यक्तीशी विधिनिषिद्ध संभोग करण्याची तिच्यावर बळजबरी करता यावी किंवा तिला फूस लावता यावी या उद्देशाने अथवा त्याकरता तिच्यावर बळजबरी होईल किंवा तिला त्यासाठी फूस लावण्यात येईल याची जाणीव असताना एखाद्या ठिकाणाहून दूर जाण्यास प्रवृत्त करील तोदेखील पूर्वोक्ताप्रमाणे शिक्षेस पात्र असेल.]

**अज्ञान मुलगी अनैतिक कृत्यासाठी मिळवणे.**

[२][३६६क. अठरा वर्षे वयाखालील कोणत्याही अज्ञान मुलीवर दुसऱ्या व्यक्तीशी विधिनिषिद्ध संभोग करण्याची बळजबरी करता यावी किंवा त्यासाठी तिला फूस लावता यावी या उद्देशाने अथवा तिच्यावर तशी बळजबरी होईल किंवा तिला त्यासाठी फूस लावण्यात येईल असा संभव असल्याची स्वत:ला जाणीव असताना, कोणत्याही उपायांनी जो कोणी अशा मुलीला एखाद्या ठिकाणाहून दूर जाण्यास किंवा कोणतीही कृती करण्यास प्रवृत्त करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**परकीय देशातून मुलीची आयात करणे.**

३६६ख. एकवीस वर्षे वयाखालील कोणत्याही मुलीवर दुसऱ्या व्यक्तीशी विधिनिषिद्ध संभोग करण्याची बळजबरी करता यावी किंवा त्यासाठी तिला फूस लावता यावी या उद्देशाने अथवा तिच्यावर तशी बळजबरी होईल किंवा तिला त्यासाठी फूस लावण्यात येईल असा संभव असल्याची स्वत:ला जाणीव असताना, [३] * * * जो कोणी भारताच्या बाहेरील कोणत्याही देशातून [४][किंवा जम्मू व काश्मीर या राज्यातून] [५][भारतात] तिची आयात करील त्याला दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.]

**एखाद्या व्यक्तीला जबर दुखापत पोचवणे, तिला गुलाम बनवणे, इत्यादींसाठी तिचे अपनयन किंवा अपहरण करणे.**

३६७. कोणतीही व्यक्ती जबर दुखापत किंवा गुलामगिरी किंवा एखाद्या व्यक्तीची अनैसर्गिक कामतृष्णा यांना बळी पडावी अथवा ती अशा प्रकारच्या संकटात पडेल अशी तिची वासलात लावता यावी म्हणून अथवा अशी व्यक्ती याप्रमाणे बळी पडेल किंवा तशी तिची वासलात लागेल असा संभव असल्याची स्वत:ला जाणीव असताना जो कोणी अशा व्यक्तीचे अपनयन किंवा अपहरण करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**अपनयन किंवा अपहरण केलेल्या व्यक्तीला गैरपणे लपवणे किंवा परिरुद्ध करून ठेवणे.**

३६८. कोणत्याही व्यक्तीचे अपनयन किंवा अपहरण करण्यात आले आहे हे माहीत असून जो कोणी अशा व्यक्तीला गैरपणे लपवील किंवा परिरुद्ध करील त्याला, ज्या उद्देशाने किंवा ज्या जाणिवेने किंवा ज्या प्रयोजनासाठी तो अशा व्यक्तीला लपवीत असेल किंवा परिरुद्ध करून ठेवत असेल त्याच उद्देशाने किंवा त्याच जाणिवेने किंवा त्याच प्रयोजनासाठी जणू काही त्याने अशा व्यक्तीचे अपनयन किंवा अपहरण केलेले असावे अशा प्रकारे शिक्षा होईल.

---

१. १९२३ चा अधिनियम २०-कलम २ द्वारे या मजकुराची भर घालण्यात आली.

२. कित्ता–कलम ३ द्वारे कलमे ३६६ क व ३६६ ख ही समाविष्ट करण्यात आली.

३. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे विवक्षित शब्द वगळण्यात आले.

४. कित्ता–कलम ३ व अनुसूची यांद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. क्रमश:, अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५० व १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

३६९. दहा वर्षांखालील कोणत्याही बालकाच्या अंगावरील कोणतीही जंगम मालमत्ता अप्रामाणिकपणाने हिरावून घेण्याच्या उद्देशाने जो कोणी अशा बालकाचे अपनयन किंवा अपहरण करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. दहा वर्षांखालील बालकाच्या अंगावरील मालमत्ता चोरण्याच्या उद्देशाने त्याचे अपनयन किंवा अपहरण करणे.

३७०. जो कोणी एखाद्या व्यक्तीला गुलाम म्हणून आयात करील, निर्यात करील, अन्य जागी नेईल, खरेदी करील, विकेल किंवा तिची वासलात लावील अथवा कोणत्याही व्यक्तीला तिच्या इच्छेविरुद्ध गुलाम म्हणून स्वीकारील, घेईल किंवा अडकवून ठेवील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. गुलाम म्हणून कोणत्याही व्यक्तीची खरेदी करणे किंवा वासलात लावणे.

३७१. जो कोणी नित्यशः गुलामांची आयात करील, निर्यात करील, त्यांना अन्य जागी नेईल, त्यांची खरेदी, विक्री, व्यापार किंवा व्यवहार करील त्याला, [१][आजीव कारावासाची], किंवा जास्तीत जास्त दहा वर्षे इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. गुलामांचा नित्यशः व्यवहार करणे.

३७२. कोणत्याही [२][अठरा वर्षे वयाखालील व्यक्तीला, वेश्याव्यवसायाच्या किंवा कोणत्याही व्यक्तीशी विधिनिषिद्ध संभोग करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा कोणत्याही बेकायदेशीर आणि अनैतिक प्रयोजनार्थ कोणत्याही वयाला कामी लावले जावे किंवा त्यासाठी तिचा वापर केला जावा या उद्देशाने अथवा अशी व्यक्ती अशा कोणत्याही प्रयोजनार्थ कोणत्याही वयाला कामी लावण्यात येईल किंवा त्यासाठी तिचा वापर करण्यात येईल असा संभव असल्याची स्वतःला जाणीव असताना] जो कोणी अशा व्यक्तीची विक्री करील, तिला भाड्याने देईल किंवा तिची अन्यप्रकारे वासलात लावील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. वेश्याव्यवसाय, इत्यादी प्रयोजनार्थ अज्ञान व्यक्तीची विक्री करणे.

[३][**स्पष्टीकरण एक.**—अठरा वर्षे वयाखालील स्त्री एखाद्या वेश्येला किंवा वेश्यागृह बाळगणाऱ्या किंवा त्याची व्यवस्था पाहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला विकली जाईल, भाड्याने दिली जाईल किंवा तिची अन्यथा वासलात लावली जाईल त्याबाबतीत, अशा स्त्रीची अशा प्रकारे वासलात लावणाऱ्या व्यक्तीने, त्या स्त्रीचा वेश्याव्यवसायासाठी वापर करण्यात यावा या उद्देशाने तिची वासलात लावली असे, त्याविरुद्ध शाबीत करण्यात येईपर्यंत, गृहीत धरले जाईल.

**स्पष्टीकरण दोन.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ "विधिनिषिद्ध संभोग" याचा अर्थ, ज्या व्यक्ती विवाहाद्वारे किंवा 'विवाह' या सदरात जमा होण्यासारखे नसले तरी ज्याला, त्या व्यक्ती ज्या समाजातील आहेत त्या समाजाचा किंवा त्या व्यक्ती निरनिराळ्या समाजातील असतील तर अशा दोन्ही समाजांचा व्यक्तिविषयक कायदा किंवा रूढी यांनी ज्यास त्यांच्यामधील दांपत्यवत् संबंध म्हणून मान्यता दिली आहे असा कोणताही संयोग किंवा बंधन याद्वारे एकत्र आलेल्या नसतील त्या व्यक्तींमधील लैंगिक संभोग असा आहे.]

३७३. कोणत्याही [२][अठरा वर्षे वयाखालील व्यक्तीला वेश्याव्यवसायाच्या किंवा कोणत्याही व्यक्तीशी विधिनिषिद्ध संभोग करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा कोणत्याही बेकायदेशीर आणि अनैतिक प्रयोजनार्थ कोणत्याही वयाला कामी लावले जावे किंवा त्यासाठी तिचा वापर केला जावा या उद्देशाने अथवा अशी व्यक्ती अशा कोणत्याही प्रयोजनार्थ कोणत्याही वयाला कामी लावण्यात येईल किंवा त्यासाठी तिचा वापर करण्यात येईल असा संभव असल्याची स्वतःला जाणीव असताना] जो कोणी अशा व्यक्तीची खरेदी करील, तिला भाड्याने घेईल किंवा तिचा अन्यथा कब्जा मिळवील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. वेश्याव्यवसाय, इ. प्रयोजनार्थ अज्ञान व्यक्तीची खरेदी करणे.

[३][**स्पष्टीकरण एक.**—जी कोणतीही वेश्या व्यक्ती किंवा वेश्यागृह बाळगणारी किंवा त्याची व्यवस्था पाहणारी कोणतीही व्यक्ती अठरा वर्षे वयाखालील स्त्रीची खरेदी करील, तिला भाड्याने घेईल किंवा तिचा अन्यथा कब्जा मिळवील त्या व्यक्तीने, वेश्याव्यवसायासाठी अशा स्त्रीचा उपयोग केला जावा अशा उद्देशाने तिचा कब्जा मिळवला असे, त्याविरुद्ध शाबीत करण्यात येईपर्यंत, गृहीत धरण्यात येईल.

**स्पष्टीकरण दोन.**—"विधिनिषिद्ध संभोग" याला कलम ३७२ मध्ये दिल्याप्रमाणे तोच अर्थ असेल.]

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची याद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १९२४ चा अधिनियम १८-कलम २ द्वारे विवक्षित मूळ शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. कित्ता–कलम ३ द्वारे ही स्पष्टीकरणे समाविष्ट करण्यात आली.

बेकायदेशीर वेठबिगारी. ३७४. जो कोणी बेकायदेशीरपणे कोणत्याही व्यक्तीवर, तिच्या इच्छेविरुद्ध श्रम करण्याची सक्ती करील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

[1][लैंगिक अपराधांविषयी

बलात्कार. ३७५. यात यापुढे दिलेल्या अपवादाचे प्रकरण वगळता एरव्ही, जो पुरुष पुढील सहापैकी कोणत्याही वर्णनाच्या परिस्थितीत एखाद्या स्त्रीशी लैंगिक संभोग करतो तो "बलात्कार" करतो असे म्हटले जाते, ते असे :—

एक.—तिच्या इच्छेविरुद्ध.

दोन.—तिच्या संमतीवाचून.

तीन.—तिला किंवा ज्या माणसाबद्दल तिला आस्था वाटते अशा कोणत्याही माणसाला मृत्यूचे किंवा दुखापतीचे भय दाखवून तिची संमती मिळवण्यात आली असेल त्याबाबतीत, तिच्या संमतीने.

चार.—आपण तिचा पती नाही आणि ती ज्याच्याशी कायदेशीरपणे विवाहबद्ध झाली आहे किंवा तसे ती समजते असा अन्य पुरुष म्हणजे आपणच होय असे ती समजून चालली असल्याने तिने संमती दिली आहे हे जेव्हा त्या पुरुषाला माहीत असते तेव्हा, तिच्या संमतीने.

पाच.—अशी संमती देतेवेळी मनोविकलता किंवा नशा यामुळे अगर त्या पुरुषाने व्यक्तिशः किंवा दुसऱ्या व्यक्तीमार्फत गुंगीकारक किंवा अपथ्यकारक पदार्थ सेवन करण्यास दिल्यामुळे आपण ज्याला संमती देत आहोत त्याचे परिणाम समजून घेणे तिला अशक्य झाले असेल अशा बाबतीत, तिच्या संमतीने.

सहा.—ती सोळा वर्षांहून लहान वयाची असेल त्याबाबतीत, तिच्या संमतीने किंवा संमतीवाचून.

स्पष्टीकरण.—बलात्काराच्या अपराधाकरिता आवश्यक तो संभोग घडण्यास योनिप्रवेश पुरेसा आहे.

अपवाद.—एखाद्या पुरुषाने पंधरा वर्षांहून लहान वय नसलेल्या अशा, स्वतःच्या पत्नीशी केलेला लैंगिक संभोग म्हणजे बलात्कार नव्हे.

बलात्काराबद्दल शिक्षा. ३७६. (१) जो कोणी बलात्कार करील त्याला, पोटकलम (२) द्वारे तरतूद केलेली प्रकरणे वगळता एरव्ही, कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल—कारावासाची मुदत सात वर्षांपेक्षा कमी असणार नाही, पण ती आजीव असू शकेल किंवा ती मुदत दहा वर्षेपर्यंत असू शकेल, आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल—मात्र बलात्कार झालेली स्त्री त्याची पत्नी असेल आणि ती बारा वर्षांहून लहान वयाची नसेल तर त्याबाबतीत, त्याला दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील :

परंतु न्यायालय न्यायनिर्णयात पुरेशी व विशेष कारणे नमूद करून, सात वर्षांपेक्षा कमी मुदतीच्या कारावासाची शिक्षा ठोठावू शकेल.

(२) जो कोणी—

(क) स्वतः पोलीस अधिकारी असून—

(एक) जेथे तो नियुक्त झालेला आहे त्या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये; किंवा

(दोन) कोणत्याही ठाणेघराच्या वास्तूमध्ये—मग जेथे तो नियुक्त झालेला आहे त्या पोलीस ठाण्यात ती वास्तू असो वा नसो—; किंवा

(तीन) आपल्या हवालतीत असलेल्या किंवा आपणांस दुय्यम असलेल्या पोलीस अधिकाऱ्याच्या हवालतीत असलेल्या स्त्रीवर,

बलात्कार करील; अथवा

(ख) स्वतः लोकसेवक असून आपल्या अधिकृत स्थानाचा फायदा घेऊन आणि असा लोक सेवक या नात्याने आपल्या हवालतीत किंवा आपणांस दुय्यम असलेल्या लोक सेवकाच्या हवालतीत एखादी स्त्री असताना तिच्यावर बलात्कार करील ; अथवा

(ग) स्वतः त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्या अन्वये स्थापन झालेला तुरुंग, सुधारगृह किंवा हवालतीचे अन्य ठिकाण अगर एखादी स्त्रियांची किंवा बालकांची संस्था यांच्या व्यवस्थापक-वर्गापैकी किंवा कर्मचारीवर्गापैकी असताना, आपल्या अधिकृत स्थानाचा फायदा घेऊन असा तुरुंग, सुधारगृह, ठिकाण किंवा संस्था यामधील अंतर्वासीवर बलात्कार करील; अथवा

---

१. १९८३ चा अधिनियम ४३-कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२५ डिसेंबर, १९८३ रोजी व तेव्हापासून).

(घ) स्वत: एखाद्या रुग्णालयाच्या व्यवस्थापकवर्गापैकी किंवा कर्मचारीवर्गापैकी असताना, आपल्या अधिकृत स्थानाचा फायदा घेऊन त्या रुग्णालयातील स्त्रीवर बलात्कार करील; अथवा

(ङ) एखादी स्त्री गरोदर असल्याचे माहीत असताना तिच्यावर बलात्कार करील; अथवा

(च) बारा वर्षांहून लहान वय असलेल्या स्त्रीवर बलात्कार करील; अथवा

(छ) टोळीनिशी बलात्कार करील;

तो सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र होईल.

त्या कारावासाची मुदत दहा वर्षांपेक्षा कमी असणार नाही, पण ती आजीव असू शकेल आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल :

परंतु, न्यायालय न्यायनिर्णयात पुरेशी व विशेष कारणे नमूद करून, दहा वर्षांपेक्षा कमी मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा ठोठावू शकेल.

**स्पष्टीकरण १.**—जेव्हा आपल्या समान उद्देशाच्या परिपूर्तीसाठी कामगिरी करीत असताना, व्यक्तिसमूहापैकी एकाने किंवा अनेकांनी एखाद्या स्त्रीवर बलात्कार केलेला असेल तेव्हा, त्यांच्यापैकी प्रत्येक व्यक्तीने या पोटकलमाच्या अर्थानुसार 'टोळीनिशी बलात्कार' केला असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण २.**—"स्त्रियांची किंवा बालकांची संस्था" याचा अर्थ, जी संस्था स्त्रिया किंवा बालके यांना दाखल करून घेण्यासाठी व त्यांची देखभाल करण्यासाठी स्थापन झालेली व चालवलेली आहे ती संस्था असा आहे—मग त्या संस्थेस 'अनाथालय', 'उपेक्षित महिलांसाठी किंवा बालकांसाठी गृह' अगर 'विधवागृह' म्हणून किंवा इतर कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो.

**स्पष्टीकरण ३.**—"रुग्णालय" याचा अर्थ रुग्णालयाचे आवार असा आहे आणि त्या संज्ञेमध्ये आजारातून बरे होत असतानाच्या काळात रुग्ण व्यक्तींना अथवा वैद्यकीय निगराणीची किंवा पुनर्वसनाची गरज असलेल्या व्यक्तींना दाखल करून घेण्यासाठी व त्यांच्यावर उपचार करण्यासाठी असलेल्या कोणत्याही संस्थेचे आवार याचाही अंतर्भाव होतो.

**३७६ क.** जो कोणी फारकतीच्या हुकूमनाम्यानुसार अथवा कोणत्याही रूढीनुसार किंवा परिपाठानुसार आपणांपासून विभक्त राहात असलेल्या आपल्या पत्नीशी तिच्या संमतीवाचून संभोग करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

फारकतीच्या कालावधीत एखाद्या पुरुषाने आपल्या पत्नीशी संभोग करणे.

**३७६ ख.** स्वत: लोक सेवक असताना आपल्या अधिकृत स्थानाचा फायदा घेऊन जर कोणी असा लोक सेवक म्हणून त्याच्या किंवा त्याला दुय्यम असणाऱ्या लोक सेवकाच्या हवालतीत असलेल्या स्त्रीला लैंगिक संभोगासाठी प्रवृत्त केले किंवा तशी फूस लावली व असा लैंगिक संभोग 'बलात्काराचा अपराध' या सदरात मोडत नसेल तर त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल. व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

लोक सेवकाने आपल्या हवालतीत असलेल्या स्त्रीशी संभोग करणे.

**३७६ ग.** स्वत: त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये किंवा त्याखाली स्थापन झालेला तुरुंग, सुधारगृह किंवा हवालतीचे अन्य ठिकाण अथवा स्त्रियांची किंवा बालकांची संस्था याचा अधीक्षक किंवा व्यवस्थापक असताना जो कोणी आपल्या अधिकृत स्थानाचा फायदा घेऊन असा तुरुंग, सुधारगृह किंवा ठिकाण किंवा संस्था यातील कोणत्याही स्त्री-अंतर्वासीला संभोग करण्यास प्रवृत्त करील किंवा तशी फूस लावील त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

तुरुंग, सुधारगृह, इत्यादींच्या अधीक्षकाने संभोग करणे.

**स्पष्टीकरण १.**—तुरुंग, सुधारगृह किंवा हवालतीचे अन्य ठिकाण अथवा स्त्रियांची किंवा मुलांची संस्था या संबंधात "अधीक्षक" या संज्ञेत, असा तुरुंग, सुधारगृह किंवा ठिकाण किंवा संस्था यामध्ये अन्य कोणतेही पद धारण करणारी जी व्यक्ती त्या पदाच्या आधारे तेथील अंतर्वासींवर कोणत्याही प्रकारे हुकूमत किंवा नियंत्रण गाजवू शकते त्या व्यक्तीचा अंतर्भाव आहे.

**स्पष्टीकरण २.**—"स्त्रियांची किंवा बालकांची संस्था" याला कलम ३७६ मधील पोटकलम (२) च्या स्पष्टीकरण २ मध्ये दिल्याप्रमाणे तोच अर्थ असेल.

**३७६ घ.** स्वत: एखाद्या रुग्णालयाच्या व्यवस्थापकवर्गापैकी किंवा कर्मचारीवर्गापैकी एक असताना जर कोणी आपल्या अधिकृत स्थानाचा फायदा घेऊन, त्या रुग्णालयातील स्त्रीशी लैंगिक संभोग केला व असा लैंगिक संभोग 'बलात्काराचा अपराध' या सदरात मोडत नसेल तर त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**—"रुग्णालय" याला कलम ३७६ मधील पोटकलम (२) च्या स्पष्टीकरण ३ मध्ये दिल्याप्रमाणे तोच अर्थ असेल.]

एखाद्या रुग्णालयाच्या व्यवस्थापकवर्गापैकी किंवा कर्मचारीवर्गापैकी कोणाही व्यक्तीने त्या रुग्णालयातील कोणत्याही स्त्रीशी संभोग करणे.

### अनैसर्गिक अपराधांविषयी

अनैसर्गिक अपराध.

३७७. जो कोणी, निसर्गक्रमाविरुद्ध कोणत्याही पुरुषाशी किंवा स्त्रीशी किंवा प्राण्याशी इच्छापूर्वक शरीरसंभोग करील त्याला, [1][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमामध्ये वर्णन केलेल्या अपराधाकरिता आवश्यक तो शरीरसंभोग घडण्यास योनिप्रवेश पुरेसा आहे.

## प्रकरण १७ वे

## मालमत्तेच्या विरोधी अपराधांविषयी

### चोरीविषयी

चोरी.

३७८. जो कोणी कोणत्याही व्यक्तीच्या कब्जातून कोणतीही जंगम मालमत्ता, त्या व्यक्तीच्या संमतीवाचून अप्रामाणिकपणे घेऊन जाण्याचा उद्देशाने, तशी ती घेता यावी यासाठी स्थानभ्रष्ट करतो, तो "चोरी करतो" असे म्हटले जाते.

**स्पष्टीकरण १.**—जंगम मालमत्ता नसलेली एखादी वस्तू भूमीशी संलग्न असेतोपर्यंत चोरीची विषयवस्तू नसते; पण ती भूमीपासून विलग करण्यात आली की लगेच चोरीची विषयवस्तू होऊ शकते.

**स्पष्टीकरण २.**—ज्या कृतीमुळे विलगीकरण होईल तीयोगे घडणारी स्थानभ्रष्टता ही चोरी असू शकेल.

**स्पष्टीकरण ३.**—एखाद्या व्यक्तीने एखादी वस्तू स्थानभ्रष्ट होण्यास प्रतिबंध करणारा अडथळा दूर केल्यास किंवा ती अन्य कोणत्याही वस्तूपासून वेगळी केल्यास व त्याचप्रमाणे ती प्रत्यक्षपणे हलवल्यास त्यामुळे ती वस्तू स्थानभ्रष्ट होण्यास ती व्यक्ती कारण झाली असे म्हटले जाते.

**स्पष्टीकरण ४.**—जी व्यक्ती कोणत्याही साधनाद्वारे एखाद्या प्राण्यास स्थानभ्रष्ट करते ती त्या प्राण्यास स्थानभ्रष्ट करते; व अशाप्रकारे निर्माण झालेल्या गतीच्या परिणामी त्या प्राण्याकडून जी वस्तू हलवि- ण्यात येते त्या प्रत्येक वस्तूला ती व्यक्ती स्थानभ्रष्ट करते असे म्हटले जाते.

**स्पष्टीकरण ५.**—व्याख्येमध्ये निर्दिष्ट केलेली संमती स्पष्ट किंवा उपलक्षित असू शकेल, आणि ज्या व्यक्तीकडे कब्जा असेल ती व्यक्ती किंवा त्या प्रयोजनार्थ स्पष्ट किंवा उपलक्षित प्राधिकार असलेली कोणतीही व्यक्ती ती संमती देऊ शकेल.

### उदाहरणे

(क्) 'य'च्या जमिनीतील झाड 'य'च्या संमतीवाचून अप्रामाणिकपणे 'य'च्या कब्जातून घेऊन जाण्याच्या उद्देशाने 'क' ते झाड तोडतो. याबाबतीत, झाड अशाप्रकारे नेता यावे यासाठी 'क' ने ते तोडले की, लगेच 'क'ने चोरी केली असे होते.

(ख्) कुत्र्यांना आमिष दाखवण्यासाठी 'क' स्वतःच्या खिशात काही वस्तू ठेवतो, व अशाप्रकारे 'य'च्या कुत्र्याला मागोमाग येण्यास प्रवृत्त करतो. या बाबतीत 'य'च्या संमतीवाचून अप्रामाणिकपणाने 'य'च्या कब्जातून कुत्रा घेऊन जाण्याचा 'क'चा उद्देश असल्यास, 'य'चा कुत्रा 'क'च्या मागोमाग जाऊ लागला की, 'क'ने चोरी केली असे होते.

(ग्) 'क'ला ऐवजाने भरलेली पेटी वाहून नेत असलेला बैल दिसतो, तो ऐवज अप्रामाणिकपणाने घेऊन जाण्यासाठी तो त्या बैलाला विशिष्ट दिशेने हाकतो. बैल चालू लागला की, 'क'ने ऐवजाची चोरी केली असे होते.

(घ्) 'क'हा 'य'चा नोकर असून 'य'ची मूल्यवान् भांडी सांभाळण्याचे काम 'य'ने 'क'कडे सोपावले असून, 'क'हा 'य'च्या संमतीवाचून अप्रामाणिकपणाने मूल्यवान् भांडी घेऊन पळून जातो. 'क'ने चोरी केली आहे.

(ङ्) 'य' प्रवासाला निघाला असून, तो 'क'या वखारपालकाकडे आपली मूल्यवान् भांडी आपण प्रवासाहून परत येईपर्यंत सांभाळण्यासाठी देतो. 'य' ती मुल्यवान् भांडी सोनाराकडे नेऊन विकतो. याबाबतीत, ती मूल्यवान् भांडी 'य'च्या कब्जात नव्हती. त्याअर्थी ती 'य'च्या कब्जातून घेतली जाण्याची शक्यता नव्हती आणि म्हणून 'क'ने फौजदारीपात्र न्यासभंग केलेला असला तरी चोरी केली असे होत नाही.

(च्) 'क'ला 'य'च्या ताब्यातील घरामध्ये टेबलावर 'य'ची आंगठी मिळते. याबाबतीत आंगठी 'य'च्या कब्जात आहे आणि 'क'ने ती अप्रामाणिकपणाने हलवली असेल तर, 'क'ने चोरी केली असे होते.

(छ्) 'क'ला भर रस्त्यावर कुणाच्याही कब्जात नसलेली आंगठी पडलेली मिळते. ती 'क'ने घेतल्यामुळे त्याने मालमत्तेच्या फौजदारीपात्र अपहार केलेला असला तरी त्याने चोरी केली असे होत नाही.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळेपाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

(ज) 'य'च्या घरामध्ये 'य'ची आंगठी टेबलावर असल्याचे 'क' पहातो. आपली झडती घेतली गेल्यास आपण सापडू या भीतीने 'क'ला आंगठीचा ताबडतोब अपहार करण्याचे धाडस न झाल्यामुळे तो ती आंगठी अशा ठिकाणी लपवतो की ती 'य' ला केव्हाही सापडणे अत्यंत असंभवनीय आहे. उद्देश हा की, ती हरवल्याचा विसर पडल्यानंतर आंगठी जेथे लपविली त्या जागेमधून ती आंगठी काढून विकावी. या बाबतीत 'क'ने आंगठी प्रथम ज्यावेळी हलवली त्यावेळी त्याने चोरी केली असे होते.

(झ) 'क' या 'य' ह्या जवाहिऱ्याकडे आपले घडयाळ नियमित करण्यासाठी देतो. 'य' ते आपल्या दुकानात नेतो. ज्याबद्दल जवाहिऱ्याला तारण म्हणून ते घडयाळ कायदेशीरपणे ठेवून घेता येईल अशा-प्रकारे कोणतेही ऋण 'क' कडून देय नसून तो दुकानात उघडपणे शिरतो व 'य'च्या हातातून घडयाळ हिसकावून घेऊन निघून जातो. याबाबतीत, 'क'ने फौजदारपात्र अतिक्रमण व हमला केलेला असला तरी त्याने चोरी केली असे होत नाही, कारण त्याने जे काही केले ते अप्रामाणिकपणाने केलेले नाही.

(ञ) घडयाळाची दुरुस्ती केल्याबद्दल 'क' हा 'य' चे काही पैसे देणे लागत असून 'य'ने त्या ऋणाबद्दल तारण म्हणून कायदेशीरपणे घडयाळ ठेऊन घेतले व आपल्या ऋणाबद्दलचे तारण म्हणून असलेली मालमत्ता 'य' कडून काढून घेण्याच्या उद्देशाने 'क'ने ते घडयाळ घेतले तर, 'क'ने चोरी केली असे होते, कारण ते त्याने अप्रामाणिकपणे घेतले आहे.

(ट) तसेच 'क'ने आपले घडयाळ 'य'कडे हडप म्हणून ठेवलेले असताना, त्या घडयाळचावर त्याने जे पैसे उसने घेतलेले होते ते चुकते न करता, जर त्याने 'य'च्या संमतीवाचून ते घडयाळ त्याच्या कब्जा-तून काढून घेतले तर, ते घडयाळ ही 'क'ची स्वतःची मालमत्ता असली तरी, त्याने घडयाळाची चोरी केली आहे, कारण ते त्याने अप्रामाणिकपणाने घेतले आहे.

(ठ) 'क' हा 'य'ची वस्तू 'य'च्या कब्जातून त्याच्या संमतीवाचून घेतो, ती परत करण्याबद्दल बक्षीस म्हणून 'य'कडून पैसे मिळेपर्यंत ती ठेवून घेण्याचा त्याचा उद्देश आहे. याबाबतीत, 'क' ती वस्तू अप्रामाणिकपणाने घेतो, त्याअर्थी 'क'ने चोरी केली आहे.

(ड) 'क'चे 'य'शी मैत्रीचे संबंध असल्याने 'क' हा 'य'च्या अनुपस्थितीत 'य'च्या ग्रंथालयात जातो आणि एक पुस्तक नुसते वाचून परत करण्याच्या उद्देशाने 'क' हा 'य'ने स्पष्टपणे संमती दिलेली नसताना ते पुस्तक नेतो. याबाबतीत 'य'चे पुस्तक वापरण्याकरिता 'य'ची उपलक्षित संमती आहे अशी 'क'ने कल्पना केलेली असावी अशी शक्यता आहे. 'क' ची अशी समजूत झालेली असेल तर 'क'ने चोरी केली असे होत नाही.

(ढ) 'क' हा 'य'च्या पत्नीकडे भिक्षा मागतो. ती 'क'ला पैसे, अन्न, वस्त्र देते. ते तिचा पती 'य' याचे आहे हे 'क'ला माहीत आहे. याबाबतीत, 'य'च्या पत्नीला भिक्षा देण्याची मुखत्यारी आहे अशी 'क'ने कल्पना केलेली असावी अशी शक्यता आहे. 'क'ची अशी समजूत असल्यास त्याने चोरी केली असे होत नाही.

(ण) 'क' हा 'य'च्या पत्नीचा यार आहे. जी मौल्यवान् मालमत्ता तिचा पती 'य' याची असल्याचे आणि जी देण्याची मुखत्यारी तिला 'य' कडून मिळालेली नसल्याचे 'क'ला माहीत आहे अशी मालमत्ता ती 'क'ला देते. 'क'ने ती मालमत्ता अप्रामाणिकपणाने घेतल्यास, तो चोरी करतो असे होते.

(त) 'य'ची मालमत्ता ही स्वतःची मालमत्ता असल्याचे सद्भावपूर्वक समजून 'क' ती 'ख'च्या कब्जातून घेतो. या बाबतीत 'क'ने ती मालमत्ता अप्रामाणिकपणाने घेतली नसल्याने तो चोरी करतो असे होत नाही.

**चोरीबद्दल शिक्षा.**

**३७९.** जो कोणी चोरी करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**राहाते घर, इत्यादींतील चोरी.**

**३८०.** जी कोणतीही इमारत, तंबू किंवा जलयान मानवी वसतिस्थान म्हणून वापरण्यात येत असेल किंवा मालमत्तेच्या अभिरक्षेसाठी वापरण्यात येत असेल त्या इमारतीमध्ये, तंबूमध्ये किंवा जलयानामध्ये जो कोणी चोरी करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**कारकुनाने किंवा चाकराने मालकाच्या कब्जातील मालमत्तेची चोरी करणे.**

**३८१.** जो कोणी स्वतः कारकून किंवा चाकर असताना अथवा कारकून किंवा चाकर या नात्याने कामावर लावलेला असताना, त्याच्या मालकाच्या किंवा नियोक्त्याच्या कब्जातील कोणत्याही मालमत्तेच्या संबंधात चोरी करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**चोरी करण्यासाठी मृत्यू, दुखापत किंवा निरोध घडवून आणण्याची पूर्वतयारी करून चोरी करणे.**

**३८२.** जो कोणी, चोरी करण्यासाठी किंवा अशी चोरी केल्यानंतर पळून जाणे सुकर व्हावे यासाठी किंवा अशा चोरीमध्ये चोरलेली मालमत्ता ठेवून घेण्यासाठी, कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत मृत्यू किंवा दुखापत किंवा निरोध घडवून आणण्याची अथवा मृत्यूचे, दुखापतीचे अथवा निरोधाचे भय निर्माण करण्याची पूर्वतयारी करून चोरी करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

उदाहरणे

(क) 'क' हा 'य' च्या कब्जातील मालमत्तेची चोरी करतो, आणि, ही चोरी करताना, 'य' ने प्रतिकार केल्यास त्याला दुखापत करावी यासाठी एक भरलेले पिस्तूल घेऊन ते तो आपल्या अंगरख्याआड ठेवतो. 'क' ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केलेला आहे.

(ख) 'क' हा 'य' चा खिसा कापतो त्यावेळी, काय चालले आहे ते कळून 'य' ने प्रतिकार केला किंवा 'क' ला पकडण्याचा प्रयत्न केला तर त्याला अडवता यावे म्हणून 'य' ने आपले अनेक साथीदार आपल्या आसपास उभे केले होते. 'क' ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केलेला आहे.

## बलाद्ग्रहणाविषयी

बलाद्ग्रहण.

३८३. एखाद्या व्यक्तीला जो कोणी खुद्द तिला किंवा कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकारे क्षती पोचवण्याची भीती घालून त्याद्वारे, कोणतीही मालमत्ता किंवा मूल्यवान् रोखा अथवा मूल्यवान् रोख्यांमध्ये रूपान्तरित करता येईल अशी स्वाक्षरित किंवा मुद्रांकित केलेली कोणतीही चीज सुपूर्द करण्यास अशा प्रकारे भीती घातलेल्या व्यक्तीला अप्रामाणिकपणाने प्रवृत्त करतो तो "बलाद्ग्रहण" करतो.

उदाहरणे

(क) 'य' ने 'क' ला पैसे दिले नाहीत तर 'य' च्यासंबंधी अब्रूनुकसानकारक अपलेख प्रसिद्ध करण्याची 'क' हा 'य' ला धमकी देतो. तो अशा प्रकारे आपणांस पैसे देण्याकरिता 'य' ला प्रवृत्त करतो. 'क' ने बलाद्ग्रहण केले आहे.

(ख) 'य' ला 'क' ने विवक्षित रक्कम देणे बंधनकारक करणाऱ्या वचनचिट्ठीवर 'य' ने सही करून ती चिट्ठी 'क' ला सुपूर्द केली नाही तर 'य' च्या मुलाला आपण गैरपणे परिरुद्ध करू अशी 'क' हा 'य' ला धमकी देतो. 'य' त्या चिट्ठीवर सही करून ती सुपूर्द करतो. 'क' ने बलाद्ग्रहण केले आहे.

(ग) 'य' हा शेतीचे विवक्षित उत्पन्न 'ख' ला देईल, अन्यथा दंड भरील असे स्वतःवर बंधन घालणारे बंधपत्र 'य' ने स्वाक्षरित करून ते 'ख' कडे सुपूर्द केले नाही तर, 'य' च्या शेतावर नांगर फिरवण्यासाठी दंडुकेधारी माणसे पाठवण्यात येतील अशी 'क' हा 'य' ला धमकी देतो व त्याद्वारे तो 'य' ला ते बंधपत्र करून सुपूर्द करण्यास प्रवृत्त करतो. 'क' ने बलाद्ग्रहण केले आहे.

(घ) 'य' ला जबर दुखापत करण्याची भीती घालून 'क' हा 'य' ने कोऱ्या कागदावर सही करून किंवा आपला शिक्का मारून तो 'क' कडे सुपूर्द करावा म्हणून त्याला अप्रामाणिकपणाने प्रवृत्त करतो. 'य' हा कागदावर सही करून ती 'क' कडे सुपूर्द करतो. याबाबतीत, अशा प्रकारे सही केलेल्या कोऱ्या कागदाचे मूल्यवान् रोख्यामध्ये रूपान्तर होऊ शकत असल्यामुळे, 'क' ने बलाद्ग्रहण केले आहे.

बलाद्ग्रहणाबद्दल शिक्षा.

३८४. जो कोणी बलाद्ग्रहण करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

बलाद्ग्रहण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला क्षती पोचवण्याची भीती घालणे.

३८५. जो कोणी, बलाद्ग्रहण करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकारे क्षती पोचवण्याची भीती घालील किंवा कोणत्याही व्यक्तीला तशी भीती घालण्याचा प्रयत्न करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

एखाद्या व्यक्तीस मृत्यू किंवा जबर दुखापत यांची भीती घालून बलाद्ग्रहण करणे.

३८६. एखाद्या व्यक्तीस जो कोणी खुद्द तिचा किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू घडवून आणण्याची किंवा तिला जबर दुखापत करण्याची भीती घालून बलाद्ग्रहण करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

बलाद्ग्रहण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला मृत्यू किंवा जबर दुखापत यांची भीती घालणे.

३८७. बलाद्ग्रहण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला जो कोणी खुद्द तिचा किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू घडवून आणण्याची किंवा तिला जबर दुखापत करण्याची भीती घालील किंवा भीती घालण्याचा प्रयत्न करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

३८८. एखाद्या व्यक्तीला जो कोणी तिने किंवा अन्य कोणाही व्यक्तीने मृत्यू किंवा [1][आजीव कारावास], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास अशा शिक्षेस पात्र असलेला कोणताही अपराध केल्याचा किंवा करण्याचा प्रयत्न केल्याचा किंवा असा अपराध करण्यास अन्य कोणत्याही इसमाला प्रवृत्त केल्याचा आरोप तिच्याविरुद्ध किंवा त्या अन्य व्यक्तीविरुद्ध करण्याची भीती घालून बलाद्ग्रहण करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल ; व तो द्रव्यदंडासही पात्र होईल ; आणि जर तो अपराध या संहितेच्या कलम ३७७ खाली शिक्षापात्र असलेला असा अपराध असेल तर, [1][आजीव कारावासाची] शिक्षा होऊ शकेल. मृत्यू किंवा आजीव कारावास, इत्यादी शिक्षांस पात्र अशा अपराधाचा आरोप करण्याची धमकी देऊन बलाद्ग्रहण करणे.

३८९. बलाद्ग्रहण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीस जो कोणी तिने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने मृत्यू किंवा [1][आजीव कारावास], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास अशा शिक्षेस पात्र असलेला अपराध केल्याचा किंवा करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्या व्यक्तीविरुद्ध किंवा त्या अन्य व्यक्तीविरुद्ध करण्याची भीती घालील किंवा भीती घालण्याचा प्रयत्न करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल ; आणि जर तो अपराध या संहितेच्या कलम ३७७ खाली शिक्षापात्र असलेला असा अपराध असेल तर, [1][आजीव कारावासाची] शिक्षा होऊ शकेल. बलाद्ग्रहण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला तिने अपराध केल्याचा आरोप करण्याची भीती घालणे.

## जबरी चोरी व दरवडा

३९०. सर्व प्रकारच्या जबरी चोरीमध्ये एकतर चोरी किंवा बलाद्ग्रहण यांचा समावेश होतो. जबरी चोरी.

जर, चोरी करण्यासाठी अथवा चोरी करताना अथवा चोरीमध्ये मिळालेली मालमत्ता पळवून नेताना किंवा नेण्याच्या प्रयत्नात असताना अपराध्याने त्या उद्दिष्टाकरिता इच्छापूर्वक कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, मृत्यू किंवा दुखापत किंवा गैर निरोध घडवून आणला किंवा तसे घडवून आणण्याचा प्रयत्न केला अथवा तात्काळ मृत्यूची किंवा तात्काळ दुखापतीची किंवा तात्काळ गैर निरोधाची भीती निर्माण केली किंवा तसे करण्याचा प्रयत्न केला तर, चोरी ही "जबरी चोरी" ठरते. चोरी ही जबरी चोरी केव्हा ठरते.

बलाद्ग्रहण करण्याच्या वेळी जर अपराधी ज्या व्यक्तीला भीती घालण्यात आली असेल त्या व्यक्तीच्या समक्ष उपस्थित असून त्या व्यक्तीला त्याने त्या व्यक्तीच्या किंवा अन्य एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत, तात्काळ मृत्यू किंवा तात्काळ दुखापत किंवा तात्काळ गैर निरोध यांची भीती घालून बलाद्ग्रहण केले आणि अशी भीती घालून त्याने बलाद्ग्रहण करावयाची वस्तू तेथल्या तेथे स्वाधीन करण्यास त्या भीती घातलेल्या व्यक्तीला प्रवृत्त केले तर, ते बलाद्ग्रहण ही "जबरी चोरी" ठरते. बलाद्ग्रहण हे केव्हा जबरी चोरी ठरते.

**स्पष्टीकरण.**—अपराधी जर, त्या अन्य व्यक्तीला तात्काळ मृत्यू किंवा तात्काळ दुखापत किंवा तात्काळ गैर निरोध यांची भीती घालू शकण्याइतपत जवळपास असेल तर, तो समक्ष उपस्थित आहे असे म्हटले जाते.

### उदाहरणे

(क) 'क' हा 'य' ला खाली पाडून धरतो, व 'य' च्या संमतीवाचून कपटीपणाने 'य' च्या अंगरख्यामधून 'य' चे पैसे व रत्ने काढून घेतो. या बाबतीत, 'क' ने चोरी केली आहे आणि ती चोरी करता यावी यासाठी त्याने इच्छापूर्वक 'य' ला गैरपणे निरुद्ध केले आहे. त्याअर्थी, 'क' ने जबरी चोरी केली आहे.

(ख) 'क' हा 'य' ला भर रस्त्यावर गाठतो, पिस्तूल दाखवतो, आणि 'य' ची पैशांची थैली मागतो. परिणामी, 'य' आपली थैली स्वाधीन करतो. याबाबतीत, 'क' ने 'य' ला तात्काळ दुखापतीची भीती घालून 'य' कडून ती थैली जबरीने घेतली आहे, व बलाद्ग्रहण करण्याच्या वेळी तो 'य' च्या समक्ष उपस्थित आहे. त्याअर्थी, 'क' ने जबरी चोरी केली आहे.

(ग) 'क' हा 'य' ला व 'य' च्या मुलाला भर रस्त्यावर गाठतो. 'क' त्या मुलाला हिसकावून घेतो, आणि 'य' ने आपली पैशाची थैली स्वाधीन केली नाही तर आपण त्या मुलाला कड्यावरून खाली फेकून देऊ अशी धमकी देतो. परिणामी, 'य' आपली थैली स्वाधीन करतो. या बाबतीत, तेथे समक्ष उपस्थित असलेल्या मुलाला तात्काळ दुखापत केली जाईल अशी 'य' ला भीती घालून, 'क' ने 'य' कडून पैशांची थैली जबरीने घेतली आहे. त्याअर्थी, 'क' ने 'य' ची जबरी चोरी केली आहे.

(घ) "तुझे मूल माझ्या टोळीच्या हाती आहे, व तू आमच्याकडे दहा हजार रुपये पाठवले नाहीस तर, त्याचा मृत्यू घडवून आणण्यात येईल." असे म्हणून 'क' हा 'य' कडून मालमत्ता मिळवतो. हे बलाद्ग्रहण आहे, व बलाद्ग्रहण म्हणून शिक्षापात्र आहे. पण 'य' ला 'य' च्या मुलाला तात्काळ मृत्यू घडवून आणण्याची भीती घातलेली नसेल तर, ती जबरी चोरी नव्हे.

३९१. जेव्हा पाच किंवा त्याहून अधिक व्यक्ती संयुक्तपणे दरवडा घालतात किंवा घालण्याचा प्रयत्न करतात, अथवा संयुक्तपणे दरवडा घालणाऱ्या किंवा घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्ती आणि तेथे उपस्थित राहून अशा दरवडा घालण्याच्या कामी किंवा प्रयत्नामध्ये मदत करणाऱ्या व्यक्ती मिळून एकूण संख्या पाच किंवा त्याहून अधिक असेल तेव्हा, याप्रमाणे दरवडा घालणारी, प्रयत्न करणारी, किंवा मदत करणारी प्रत्येक व्यक्ती "दरवडा घालते" असे म्हटले जाते. दरवडा.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळेपाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

जबरी चोरीबद्दल शिक्षा.

३९२. जो कोणी जबरी चोरी करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल, आणि जर जबरी चोरी ही हमरस्त्यावर सूर्यास्त व सूर्योदय यांच्या दरम्यान करण्यात आली तर, कारावासाची मुदत चौदा वर्षेपर्यंत वाढविता येईल.

जबरी चोरी करण्याचा प्रयत्न करणे.

३९३. जो कोणी जबरी चोरी करण्याचा प्रयत्न करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

जबरी चोरी करताना इच्छापूर्वक दुखापत करणे.

३९४. जर कोणत्याही व्यक्तीने जबरी चोरी करताना किंवा करण्याच्या प्रयत्नात असताना इच्छापूर्वक दुखापत केली तर, अशी व्यक्ती आणि अशी जबरी चोरी करण्याच्या कामी किंवा जबरी चोरी करण्याच्या प्रयत्नात तिच्या जोडीने निबद्ध असलेली अन्य कोणतीही व्यक्ती यांना [1][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा होईल, व त्या द्रव्यदंडासही पात्र होतील.

दरवड्याबद्दल शिक्षा.

३९५. जो कोणी दरवडा घालील त्याला, [1][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

खुनासहित दरवडा.

३९६. संयुक्तपणे दरवडा घालणाऱ्या पाच किंवा अधिक व्यक्तींपैकी कोणत्याही व्यक्तीने जर याप्रमाणे दरवडा घालताना खून केला तर, त्यांच्यापैकी प्रत्येक व्यक्तीला, मृत्यूची किंवा [1][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा होईल, व ती द्रव्यदंडासही पात्र होईल.

मृत्यू किंवा जबर दुखापत घडवून आणण्याच्या प्रयत्नासहित जबरी चोरी किंवा दरवडा.

३९७. जबरी चोरी करण्याच्या किंवा दरवडा घालण्याच्या वेळी जर अपराध्याने कोणत्याही प्राणघातक हत्याराचा उपयोग केला, अथवा कोणत्याही व्यक्तीस जबर दुखापत केली, अथवा कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू घडवून आणण्याचा किंवा तिला जबर दुखापत करण्याचा प्रयत्न केला तर, अशा अपराध्याला ज्या कारावासाची शिक्षा होईल त्याची मुदत सात वर्षांपेक्षा कमी असणार नाही.

प्राणघातक हत्यारानिशी सज्ज असताना जबरी चोरी करण्याचा किंवा दरवडा घालण्याचा प्रयत्न करणे.

३९८. जबरी चोरी करण्याचा किंवा दरवडा घालण्याचा प्रयत्न करण्याच्या वेळी अपराधी कोणत्याही प्राणघातक हत्यारानिशी सज्ज असेल तर, अशा अपराध्याला ज्या कारावासाची शिक्षा होईल तो सात वर्षांपेक्षा कमी असणार नाही.

दरवडा घालण्याची पूर्वतयारी करणे.

३९९. जो कोणी दरवडा घालण्यासाठी कोणत्याही प्रकारे पूर्वतयारी करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

दरवडेखोरांच्या टोळीपैकी असल्याबद्दल शिक्षा.

४००. हा अधिनियम संमत झाल्यानंतर कोणत्याही वेळी, जो कोणी नित्यशः दरवडे घालण्यासाठी संघटित झालेल्या व्यक्तींच्या टोळीपैकी असेल त्याला, [1][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

चोरांच्या टोळीपैकी असल्याबद्दल शिक्षा.

४०१. हा अधिनियम संमत झाल्यानंतर कोणत्याही वेळी, जो कोणी नित्यशः चोरी किंवा जबरी चोरी करण्यासाठी संघटित झालेल्या व्यक्तींचा कोणत्याही भटक्या किंवा अन्य प्रकारच्या टोळीपैकी —ठग किंवा दरवडेखोर यांची टोळी नव्हे— असेल त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

दरवडा घालण्यासाठी एकत्र जमणे.

४०२. हा अधिनियम संमत झाल्यानंतर कोणत्याही वेळी, जो कोणी दरवडा घालण्यासाठी जमलेल्या पाच किंवा अधिक व्यक्तींपैकी एक असेल त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

### मालमत्तेच्या फौजदारीपात्र अपहाराविषयी

मालमत्तेचा अप्रामाणिक अपहार.

४०३. जो कोणी कोणत्याही जंगम मालमत्तेचा अप्रामाणिकपणाने अपहार करील किंवा आपल्या उपयोगासाठी स्वतःची म्हणून ती वापरील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळेपाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

उदाहरणे

(क्) 'क' हा 'य'ची मालमत्ता 'य'च्या कब्जातून घेतो व मालमत्ता अशा प्रकारे घेताना ती मालमत्ता त्याची स्वत:चीच आहे असे तो सद्भावपूर्वक समजतो. 'क' चोरीबद्दल दोषी नाही, पण जर आपली चूक त्याला कळून आल्यानंतर, त्याने ती अप्रामाणिकपणाने आपल्या उपयोगासाठी स्वत:ची म्हणून वापरली तर, तो या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी आहे.

(ख्) 'क' चे 'य' बरोबर मैत्रीचे संबंध असून, 'य' च्या अनुपस्थितीत तो त्याच्या ग्रंथालयात जातो व 'य' च्या स्पष्ट संमतीवाचून एक पुस्तक घेऊन जातो. याबाबतीत, वाचण्यासाठी पुस्तक घेण्याची आपणास 'य' ची उपलक्षित संमती आहे अशी 'क' ची धारणा असल्यास 'क' ने चोरी केली असे होत नाही. पण 'क' ने नंतर त्याच्या स्वत:च्या फायद्यासाठी पुस्तकाची विक्री केली तर, तो या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी आहे.

(ग्) 'क' आणि 'ख' हे एका घोड्याचे संयुक्त मालक असून, घोडा वापरण्याच्या उद्देशाने 'क' तो 'ख' च्या कब्जामधून घेऊन जातो. याबाबतीत, 'क' ला त्या घोड्याचा वापर करण्याचा हक्क असल्याने 'क' ने त्या घोड्याचा अप्रामाणिकपणाने अपहार केला असे होत नाही. पण जर 'क' ने घोड्याची विक्री केली आणि विक्रीपासून मिळालेली सर्व आवक स्वत:च्या उपयोगासाठी वापरली तर, तो या कलमान्वये अपराधाबद्दल दोषी आहे.

**स्पष्टीकरण१.**—काही विशिष्ट काळापुरता केलेला अप्रामाणिक अपहार हा या कलमाच्या अर्थानुसार 'अपहार' आहे.

**उदाहरणे**

'क' ला कोरे पृष्ठांकन असलेली 'य' ची सरकारी वचनचिठ्ठी सापडते. ती वचनचिठ्ठी 'य' ची आहे हे माहीत असून 'क' ती एका बँकव्यवसायीकडे कर्जाचे तारण म्हणून गहाण ठेवतो, असे करताना पुढे केव्हातरी ती वचनचिठ्ठी 'य' ला परत देण्याचा त्याचा उद्देश आहे. तरीही 'क' ने या कलमाखालील अपराध केला आहे.

**स्पष्टीकरण २.**—जी व्यक्ती आपणास अन्य कोणाही व्यक्तीच्या कब्जात नसलेली मालमत्ता गवसली असता, मालकाकरता ती जपून ठेवण्यासाठी किंवा त्याला ती परत करण्यासाठी अशी मालमत्ता घेईल ती व्यक्ती अप्रामाणिकपणाने ती मालमत्ता घेत नाही किंवा तिचा अपहार करीत नाही व ती अपराधाबद्दल दोषी होत नाही, पण तिला त्या मालमत्तेचा मालक माहीत असून किंवा शोधण्याचे साधन तिला उपलब्ध असून, अथवा तिने मालकाला शोधून काढण्यासाठी आणि त्याला नोटीस देण्यासाठी वाजवी साधनांचा अवलंब केला असून मालकाला त्या मालमत्तेची मागणी करणे शक्य होण्याइतपत वाजवी मुदतीपर्यंत तिने ती ठेवून घेतली आहे असे होण्यापूर्वी जर तिने आपल्या उपयोगाकरता स्वत:ची म्हणून वापरली तर, ती वर व्याख्या केलेल्या अपराधाबद्दल दोषी होते.

वाजवी साधने कोणती किंवा वाजवी मुदत कोणती हा अशा प्रकरणी तथ्यविषयक प्रश्न असतो.

मालमत्तेचा मालक कोण आहे किंवा अमुक एक विशिष्ट व्यक्ती मालमत्तेची मालक आहे हे गवेषकाला माहीत असले पाहिजे अशी आवश्यकता नाही; ती स्वत:ची म्हणून वापरताना तो, ती स्वत:ची मालमत्ता असे समजत नाही किंवा मालमत्तेचा खरा मालक सापडू शकत नाही असे तो सद्भावपूर्वक समजत नाही एवढे पुरेसे आहे.

उदाहरणे

(क) 'क' ला भर रस्त्यावर एक रुपया सापडतो, तो रुपया कोणाचा आहे हे त्याला माहीत नाही. 'क' तो रुपया उचलतो. याबाबतीत, 'क' ने या कलमामध्ये व्याख्या करण्यात आलेला अपराध केलेला नाही.

(ख्) 'क' ला बँक-नोट अंतर्भूत असलेले एक पत्र रस्त्यात सापडते. पत्रातील सूचना व मजकूर वाचून ती बँक-नोट कोणाची आहे हे त्याला समजते. तो ती नोट स्वत:ची म्हणून वापरतो. 'क' या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी आहे.

(ग्) धारणकर्त्याला प्रदेय असलेला एक धनादेश 'क' ला सापडतो. तो धनादेश कोणाकडून गहाळ झाला असावा याविषयी त्याला अंदाज बांधता येत नाही. पण, ज्याने तो धनादेश काढला त्याचे नाव त्यावर दिसते. धनादेश कोणाच्या नावे काढण्यात आला होता हे ती व्यक्ती आपणास सांगू शकेल हे 'क' ला माहीत आहे. मालकाचा शोध घेण्याचा प्रयत्न न करता 'क' तो धनादेश स्वत:चा म्हणून वापरतो. 'क' या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी आहे.

(घ्) 'य' चे पैशांनी भरलेले पाकीट खाली पडताना 'क' पाहतो. 'य' ला परत देण्याच्या उद्देशाने 'क' ते पाकीट उचलतो, पण नंतर ते स्वत:च्या उपयोगाकरिता स्वत:चे म्हणून वापरतो. 'क' ने या कलमाखालील अपराध केला आहे.

(ङ्) 'क' ला पैशांनी भरलेले पाकीट सापडते, ते कोणाचे आहे हे त्याला माहीत नाही. ते पाकीट 'य' चे आहे असे त्याला नंतर समजते, आणि तो ते आपल्या उपयोगाकरता स्वत:चे म्हणून वापरतो. **'क' या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी आहे.**

(च) 'क' ला मूल्यवान् आंगठी सापडते. ती कोणाची आहे हे त्याला माहीत नाही. मालकाचा शोध घेण्याचा प्रयत्न न करता 'क' ती आंगठी ताबडतोब विकतो. 'क' या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी आहे.

मृत व्यक्तीच्या मृत्युसमयी तिच्या कब्जात असलेल्या मालमत्तेचा अप्रामाणिकपणाने अपहार.

४०४. मृत व्यक्तीच्या कब्जात कोणतीही मालमत्ता तिच्या मृत्यूच्या वेळी होती आणि असा कब्जा घेण्यास विधित: हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात त्यानंतर ती नाही हे माहीत असून जो कोणी अशा मालमत्तेचा अप्रामाणिकपणाने अपहार करील किंवा आपल्या उपयोगासाठी ती स्वत:ची म्हणून वापरील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल, आणि जर अशा व्यक्तीच्या मृत्यूच्या वेळी, अपराधी हा कारकून किंवा चाकर म्हणून तिच्या नोकरीत असेल तर, कारावास सात वर्षेपर्यंत असू शकेल.

### उदाहरण

काही फर्निचर व पैसा कब्जात असताना 'य' चा मृत्यू होतो. 'क' हा त्याचा चाकर असा कब्जा घेण्यास हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या कब्जामध्ये पैसा जाण्यापूर्वीच त्या पैशांचा अप्रामाणिकपणाने अपहार करतो. 'क' ने या कलमामध्ये व्यांख्या करण्यात आलेला अपराध केला आहे.

### फौजदारीपात्र न्यासभंगाविषयी

फौजदारीपात्र न्यासभंग.

४०५. जो कोणी कोणत्याही प्रकारे स्वत:कडे मालमत्ता किंवा तिच्यावरील कसलीही हुकूमत विश्वासाने सोपवण्यात आलेली असताना, त्या मालमत्तेचा अपहार करतो अथवा आपल्या उपयोगासाठी ती स्वत:ची म्हणून वापरतो अथवा असा न्यास कोणत्या पद्धतीने पार पाडावा ते विहित करणारा कोणताही विधिनिदेश अगर असा न्यास पार पाडण्याच्या संबंधात त्याने स्वत: केलेली कोणतीही स्पष्ट किंवा उपलक्षित वैध संविदा यांचा भंग करून अप्रामाणिकपणाने त्या मालमत्तेचा वापर करतो किंवा तिची वासलात लावतो किंवा बुद्धिपुरस्सर अन्य कोणत्याही व्यक्तीला तसे करू देतो तो "फौजदारीपात्र न्यासभंग" करतो.

[1][**स्पष्टीकरण** [2][१].—जी व्यक्ती स्वत: एखादा नियोक्ता असून, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे स्थापन करण्यात आलेल्या भविष्य निधीमध्ये किंवा कुटुंब वेतन निधीमध्ये जमा करण्यासाठी, कर्मचाऱ्याला प्रदेय असलेल्या वेतनामधून कर्मचाऱ्यांचे अंशदान कापून घेते त्या व्यक्तीकडे, तिने अशा रीतीने कापून घेतलेली अंशदानाची रक्कम विश्वासाने सोपवण्यात आलेली असल्याचे मानण्यात येईल आणि उक्त अधिनियमाचा भंग करून, तिने उक्त निधीमध्ये अशा अंशदानाचा भरणा करण्यात कसूर केली तर, पूर्वोक्ताप्रमाणे विधिनिदेशाचा भंग करून उक्त अंशदानाच्या रकमेचा तिने अप्रामाणिकपणाने वापर केला असल्याचे मानण्यात येईल.]

[2][**स्पष्टीकरण** २.—जी व्यक्ती स्वत: एखादा नियोक्ता असून, 'कर्मचारी राज्य विमा अधिनियम' १९४८' (१९४८ चा ३४) याखाली स्थापन करण्यात आलेला जो 'कर्मचारी राज्य विमा निधी' कर्मचारी राज्य विमा महामंडळाने धारण केलेला असतो व त्यांच्याकडून ज्याचा कारभार पाहिला जातो त्या निधीमध्ये जमा करण्यासाठी, कर्मचाऱ्याला प्रदेय असलेल्या वेतनामधून कर्मचाऱ्याचे अंशदान कापून घेते त्या व्यक्तीकडे, तिने अशा रीतीने कापून घेतलेली अंशदानाची रक्कम विश्वासाने सोपवण्यात आलेली असल्याचे मानण्यात येईल आणि उक्त अधिनियमाचा भंग करून तिने उक्त निधीमध्ये अशा अंशदानाचा भरणा करण्यात कसूर केली तर, पूर्वोक्ताप्रमाणे विधिनिदेशाचा भंग करून उक्त अंशदानाच्या रकमेचा तिने अप्रामाणिकपणाने वापर केला असल्याचे मानण्यात येईल.]

### उदाहरणे

(क) 'क' हा मृत व्यक्तीच्या मृत्युपत्राचा मृत्युपत्रव्यवस्थापक असून, मृत्युपत्रानुसार त्याने जायदादीची विभागणी करावी असे निर्देशित करणाऱ्या कायद्याची तो अप्रामाणिकपणाने अवज्ञा करतो व आपल्या उपयोगासाठी ती स्वत:ची म्हणून वापरतो. 'क' ने फौजदारीपात्र न्यासभंग केला आहे.

(ख) 'क' हा वखारपाल आहे. 'य' प्रवासाला निघालेला असून तो आपले फर्निचर, वखारीतील खोलीकरिता ठराविक रक्कम चुकती करण्यात आल्यानंतर ते परत करण्यात येईल अशा संविदेअन्वये 'क'कडे विश्वासाने सोपवतो. 'क' अप्रामाणिकपणाने त्या वस्तू विकतो. 'क' ने फौजदारीपात्र न्यासभंग केला आहे.

---

१. १९७३ चा अधिनियम ४०-कलम ९ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. १९७५ चा अधिनियम ३८-कलम ९ द्वारे मूळ स्पष्टीकरणाला स्पष्टीकरण १ असा क्रमांक देण्यात आला व स्पष्टीकरण २ समाविष्ट करण्यात आले.

(ग्) कलकत्त्यात राहणारा 'क' हा दिल्लीमध्ये राहणाऱ्या 'य'चा अभिकर्ता आहे. 'य'कडून 'क' ला पाठवल्या जाणाऱ्या सर्व रकमा 'य' च्या निदेशानुसार 'क' ने गुंतवाव्यात असा स्पष्ट किंवा उपलक्षित करार 'क' आणि 'य' यांच्यामध्ये झालेला आहे. 'य' हा 'क' ला एक लाख रुपये 'क' ने ते कंपनीच्या रोख्यांमध्ये गुंतवावेत असा निदेश देऊन पाठवतो. 'क' अप्रामाणिकपणाने निदेशाची अवज्ञा करतो व त्याच्या स्वतःच्या धंद्यात ते पैसे घालतो. 'क' ने फौजदारीपात्र न्यासभंग केलेला आहे.

(घ्) लगतपूर्व उदाहरणातील 'क' ने जर, बँक ऑफ बेंगॉलमधील शेअर्स घेतल्याने ते 'य' ला अधिक फायदेशीर ठरेल असे समजून, अप्रामाणिकपणाने नव्हे तर सद्भावपूर्वक 'य' च्या निदेशांची अवज्ञा केली आणि 'य' करिता कंपनीचे रोखे विकत घेण्याऐवजी बँक ऑफ बेंगॉलचे शेअर्स खरेदी केले तर त्याबाबतीत, जरी 'य' ला तोटा सोसावा लागला आणि त्या तोटयाबद्दल त्याला 'क' विरुद्ध दिवाणी कारवाई करण्याचा हक्क मिळाला तरीसुद्धा 'क' अप्रामाणिकपणाने वागलेला नसल्यामुळे त्याने फौजदारी-पात्र न्यासभंग केलेला नाही.

(ङ्) 'क' या महसूल अधिकाऱ्याकडे सरकारी पैसे विश्वासाने सोपवण्यात आलेले आहेत व त्याच्याकडे असेल तो सर्व सरकारी पैसा त्याने विवक्षित कोषागारात भरावा असा त्याला कायद्याद्वारे निदेश देण्यात आलेला आहे अथवा शासनाशी झालेल्या स्पष्ट किंवा उपलक्षित संविदेअन्वये तसे करण्यास तो बांधलेला आहे. 'क' अप्रामाणिकपणाने तो पैसा स्वतःचा म्हणून वापरतो. 'क' ने फौजदारीपात्र न्यासभंग केलेला आहे.

(च्) खुष्कीमार्गे किंवा जलमार्गे न्यावयाची मालमत्ता 'क' या परिवाहकाकडे 'य' ने विश्वासाने सोपवली आहे. 'क' अप्रामाणिकपणाने त्या मालमत्तेचा अपहार करतो. 'क' ने फौजदारीपात्र न्यासभंग केलेला आहे.

फौजदारीपात्र न्यासभंगाबद्दल शिक्षा.

**४०६.** जो कोणी फौजदारीपात्र न्यासभंग करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

परिवाहक, इत्यादींनी केलेला फौजदारी पात्र न्यासभंग.

**४०७.** परिवाहक, मालधक्कावाला किंवा वखारपाल म्हणून स्वतःकडे मालमत्ता विश्वासाने सोपवण्यात आलेली असताना जो कोणी अशा मालमत्तेच्या संबंधात फौजदारीपात्र न्यासभंग करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

कारकुनाने किंवा चाकराने केलेला फौजदारीपात्र न्यासभंग.

**४०८.** स्वतः कारकून किंवा चाकर असून अथवा कारकून किंवा चाकर या नात्याने नोकरी करीत असून, आणि अशा नात्याने स्वतःकडे मालमत्ता किंवा मालमत्तेवरील कसलीही हुकूमत कोणत्याही रीतीने सोपवण्यात आली असताना जो कोणी त्या मालमत्तेच्या बाबतीत फौजदारीपात्र न्यासभंग करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

लोक सेवकाने अथवा बँकव्यवसायी, व्यापारी किंवा अभिकर्ता याने केलेला फौजदारीपात्र न्यासभंग.

**४०९.** लोक सेवक या नात्याने अथवा बँकव्यवसायी, व्यापारी, अडत्या, दलाल, मुखत्यार किंवा अभिकर्ता म्हणून आपल्या धंद्याच्या ओघात स्वतःकडे एखादी मालमत्ता किंवा मालमत्तेवरील कसलीही हुकूमत कोणत्याही रीतीने सोपवण्यात आली असताना जो कोणी त्या मालमत्तेच्या बाबतीत फौजदारीपात्र न्यासभंग करील त्याला, [१][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**चोरीची मालमत्ता स्वीकारण्याविषयी**

चोरीची मालमत्ता.

**४१०.** चोरी किंवा बलाद्ग्रहण किंवा जबरी चोरी यामुळे जिचा कब्जा हस्तांतरित झाला आहे ती मालमत्ता आणि जिचा फौजदारीपात्र अपहार झाला आहे किंवा जिच्या बाबतीत [२][फौजदारीपात्र न्यासभंग] करण्यात आला आहे अशी मालमत्ता "चोरीची मालमत्ता" म्हणून संबोधण्यात येते [३][—मग [४][भारतात] वा [४][भारताबाहेर] कोठेही ते हस्तांतरण झालेले असो, अथवा तो अपहार किंवा न्यासभंग कोठेही करण्यात येवो—]. पण अशी मालमत्ता त्यानंतर जर, तिचा कब्जा घेण्यास विधितः हक्कदार असलेल्या व्यक्तीच्या कब्जात आली तर, ती चोरीची मालमत्ता असण्याचे बंद होते.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची याद्वारे 'जन्मठेप काळेपाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १८९१ चा अधिनियम १२-कलम २ व १ ली अनुसूची आणि १८८२ चा अधिनियम ८-कलम ९ यांद्वारे "फौजदारीपात्र न्यासभंगाचा अपराध" याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

३. १८८२ चा अधिनियम ८-कलम ९ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. क्रमशः, अनुकूलन आदेश, १९४८, अनुकूलन आदेश, १९५०, १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'ब्रिटिश इंडिया' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

अप्रामाणिकपणाने चोरीची मालमत्ता स्वीकारणे.

४११. कोणतीही चोरीची मालमत्ता, ती चोरीची मालमत्ता आहे हे माहीत असताना किंवा तसे समजण्यास कारण असताना जो कोणी अप्रामाणिकपणाने ती स्वीकारील किंवा ठेवून घेईल त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

दरवडा घालताना चोरलेली मालमत्ता अप्रामाणिकपणाने स्वीकारणे.

४१२. जो कोणी दरवडा घातल्याने जिचा कब्जा हस्तांतरित झाला असल्याचे स्वत:ला माहीत असेल किंवा तसे समजण्यास स्वत:ला कारण असेल अशी कोणतीही चोरीची मालमत्ता अप्रामाणिकपणाने स्वीकारील किंवा ठेवून घेईल अथवा जी चोरीस गेल्याचे स्वत:ला माहीत असेल किंवा तसे समजण्यास स्वत:ला कारण असेल अशी मालमत्ता, जी व्यक्ती दरवडेखोरांच्या टोळीपैकी असल्याचे स्वत:ला माहीत असेल किंवा तसे समजण्यास स्वत:ला कारण असेल अशा व्यक्तीकडून अप्रामाणिकपणाने स्वीकारील त्याला, [1][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

चोरीच्या मालमत्तेचा नित्यश: व्यवहार करणे.

४१३. जी चोरीची मालमत्ता असल्याचे स्वत:ला माहीत असेल किंवा तसे समजण्यास स्वत:ला कारण असेल अशी मालमत्ता जो कोणी नित्यश: स्वीकारील किंवा तिचा व्यवहार करील त्याला, [1][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

चोरीची मालमत्ता लपवून ठेवण्याच्या कामी साहाय्य करणे.

४१४. जी चोरीची मालमत्ता असल्याचे स्वत:ला माहीत असेल किंवा तसे समजण्यास स्वत:ला कारण असेल अशी मालमत्ता लपवून ठेवण्याच्या किंवा तिची वासलात लावण्याच्या किंवा ती पळवून नेण्याच्या कामी जो कोणी इच्छापूर्वक साहाय्य करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**ठकवणुकीविषयी**

ठकवणूक.

४१५. जो कोणी कोणत्याही व्यक्तीची दिशाभूल करून, याप्रमाणे फसवल्या गेलेल्या व्यक्तीला एखाद्या इसमाकडे एखादी मालमत्ता सुपूर्द करण्यास, किंवा एखाद्या इसमाने एखादी मालमत्ता ठेवून घ्यावी या गोष्टीला संमती देण्यास कपटीपणाने किंवा अप्रामाणिकपणाने प्रवृत्त करतो अथवा याप्रमाणे दिशाभूल झालेल्या व्यक्तीची याप्रमाणे दिशाभूल झाली नसती तर तिने जी गोष्ट केली नसती किंवा टाळली नसती आणि ज्या कृत किंवा अकृत गोष्टीमुळे कोणत्याही इसमास त्याचे स्वत:चे शरीर, मन, लौकिक किंवा मालमत्ता यांच्या संबंधात नुकसान किंवा अपहानी पोचते किंवा पोचण्याचा संभव असतो अशी कोणतीही गोष्ट करण्यास किंवा न करण्यास प्रथमोक्त व्यक्तीला उद्देशपूर्वक प्रवृत्त करतो, तो "ठकवणूक करतो" असे म्हटले जाते.

स्पष्टीकरण.---अप्रामाणिकपणाने तथ्य लपवून ठेवणे, ही या कलमाच्या अर्थानुसार फसवणूक होय.

**उदाहरणे**

(क) आपण मुलकी सेवेत असल्याचा बहाणा करून 'क' उद्देशपूर्वक 'य' ची दिशाभूल करतो, आणि अशा रीतीने 'य' ने त्याला उधारीवर माल घेऊ द्यावा म्हणून 'य' ला अप्रामाणिकपणाने प्रवृत्त करतो. या मालाबद्दल पैसे देण्याचा त्याचा विचार नाही. 'क' ठकवणूक करतो.

(ख) एक वस्तू एका विवक्षित प्रख्यात निर्माणकाने तयार केली अशी 'य' ची समजूत व्हावी म्हणून 'क' त्या वस्तूवर नकली चिन्ह लावून 'य' ची उद्देशपूर्वक दिशाभूल करतो, आणि अशा रीतीने 'य' ला ती वस्तू खरेदी करण्यास व तिचे पैसे देण्यास प्रवृत्त करतो. 'क' ठकवणूक करतो.

(ग) एक वस्तू एका नमुन्याशी मिळतीजुळती आहे अशी 'य' ची समजूत व्हावी म्हणून 'क' त्या वस्तूचा खोटा नमुना दाखवून 'य' ची उद्देशपूर्वक दिशाभूल करतो, आणि त्याद्वारे 'य' ला ती वस्तू खरेदी करण्यास व तिचे पैसे देण्यास प्रवृत्त करतो. 'क' ठकवणूक करतो.

(घ) 'क' एका वस्तूच्या किंमतीदाखल एका पेढीवर हुंडी करून देतो ; या पेढीकडे 'क' पैसे ठेवत नाही आणि यामुळे हुंडी नाकारली जाईल अशी 'क' ची अपेक्षा असल्यामुळे तो 'य' ची उद्देशपूर्वक दिशाभूल करतो आणि त्याद्वारे, त्या वस्तूबद्दल पैसे न देण्याच्या इरादाने ती वस्तू आपल्या स्वाधीन करण्यास 'य' ला अप्रामाणिकपणाने प्रवृत्त करतो. 'क' ठकवणूक करतो.

(ङ) ज्या जिनसा हिरे नसल्याचे आपणांस माहीत आहे त्या जिनसा हिरे म्हणून तारण देऊन 'क' हा 'य' ची उद्देशपूर्वक दिशाभूल करतो आणि त्याद्वारे, पैसे उसने देण्यास 'य' ला अप्रामाणिकपणाने प्रवृत्त करतो. 'क' ठकवणूक करतो.

(च) 'य' हा 'क' ला उसने देईल अशा कोणत्याही पैशाची परतफेड 'क' करणार आहे अशी 'य' ची समजूत व्हावी अशाप्रकारे 'क' हा 'य' ची उद्देशपूर्वक दिशाभूल करतो आणि त्याद्वारे, पैसे उसने देण्यास 'य' ला अप्रामाणिकपणाने प्रवृत्त करतो. परतफेड करण्याचा 'क' चा उद्देश नाही. 'क' ठकवणूक करतो.

(छ) निळीची ठराविक इतकी रोपे 'य' च्या स्वाधीन करण्याचा आपला इरादा नसतानाही 'क' हा ती रोपे 'य' च्या स्वाधीन करण्याचा आपला इरादा आहे, अशी 'य' ची समजूत व्हावी अशाप्रकारे 'क' हा 'य' ची उद्देशपूर्वक दिशाभूल करतो, आणि रोपे अशा रीतीने स्वाधीन करण्यात

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

येतील या भरवशावर पैसे देण्यास तो 'य' ला अप्रामाणिकपणाने प्रवृत्त करतो. 'क' ठकवणूक करतो; परंतु, पैसे घेतेवेळी निळीची रोपे स्वाधीन करण्याचा 'क' चा इरादा असेल आणि नंतर त्याने त्याच्या संविदेचा भंग केला व निळीची रोपे स्वाधीन केली नाहीत तर, त्याने ठकवणूक केली असे होणार नाही, मात्र संविदा-भंगाबद्दलच्या दिवाणी कारवाईसच केवळ तो पात्र असेल.

(ज्) 'क' ने 'य' बरोबर केलेल्या संविदेमधील 'क' चा भाग त्याने पार पाडलेला नसतानाही तो त्याने पार पाडलेला आहे अशी 'य' ची समजूत व्हावी अशा प्रकारे 'क' हा 'य' ची उद्देश-पूर्वक दिशाभूल करतो, आणि त्याद्वारे 'य' ला पैसे देण्यास अप्रामाणिकपणाने प्रवृत्त करतो. 'क' ठकवणूक करतो.

(झ) 'क' एक संपदा 'ख' ला विकतो व अभिहस्तांतरित करतो. अशी विक्री केल्यामुळे त्या मालमत्तेवर आपणांला हक्क नाही हे माहीत असताना 'क' हा आपण अगोदर 'ख' ला केलेली विक्री व अभिहस्तांतरण यांबद्दलची वस्तुस्थिती उघड न करता ती 'य' ला विकतो किंवा त्याच्याकडे गहाण ठेवतो व 'य' कडून खरेदीचे किंवा गहाणावर दिलेले पैसे स्वीकारतो. 'क' ठकवणूक करतो.

४१६. जर एखाद्या व्यक्तीने आपण दुसराच एखादा इसम असल्याचा बहाणा करून, अथवा जाणीवपूर्वक एखाद्या इसमाऐवजी दुसरा एखादा इसम उभा करून, अथवा आपण किंवा अन्य कोणतीही व्यक्ती म्हणजे वस्तुतः जी व्यक्ती आहे तिच्याहून अन्य कोणताही इसम म्हणजे आपण स्वतः किंवा अशी अन्य व्यक्ती होय असे अभिवेदन करून ठकवणूक केली तर, ती व्यक्ती "तोतयेगिरी करून ठकवणूक करते" असे म्हटले जाते. *तोतयेगिरी करून ठकवणूक.*

**स्पष्टीकरण**.—ज्या इसमाचा बहाणा करून तोतयेगिरी केली गेली तो इसम ही खरीखुरी व्यक्ती असली वा कल्पित व्यक्ती असली तरी अपराध घडतो.

**उदाहरणे**

(क्) 'क' हा, त्याच्याच नावाचा विवक्षित श्रीमंत सावकार म्हणजे आपणच असल्याचा बहाणा करून ठकवणूक करतो. 'क' हा तोतयेगिरी करून ठकवणूक करतो.

(ख्) 'क' हा, आपण म्हणजे 'ख' ही व्यक्ती असल्याचा बहाणा करून ठकवणूक करतो. ती व्यक्ती मृत आहे. 'क' हा तोतयेगिरी करून ठकवणूक करतो.

४१७. जो कोणी ठकवणूक करील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. *ठकवणूक करण्याबद्दल शिक्षा.*

४१८. जर कोणी ठकवणूक केली आणि ठकवणूक ज्याच्याशी संबंधित आहे त्या संव्यवहारातील ज्या व्यक्तीच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यास तो विधितः किंवा वैध संविदेनुसार बद्ध होता त्या व्यक्तीला त्यायोगे गैर हानी पोचण्यास आपण कारण होण्याचा संभव आहे याची त्याला जाणीव असेल तर त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. *जिच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यास अपराधी बद्ध आहे अशा व्यक्तीला परिणामी गैर हानी पोचू शकेल अशा जाणिवेने ठकवणूक करणे.*

४१९. जो कोणी तोतयेगिरी करून ठकवणूक करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. *तोतयेगिरी करून ठकवणूक करण्याबद्दल शिक्षा.*

४२०. जो कोणी ठकवणूक करील आणि त्यायोगे, एखाद्या इसमाकडे एखादी मालमत्ता सुपूर्द करण्यास, अथवा एखादा मूल्यवान् रोखा संपूर्णपणे किंवा त्याचा कोणताही भाग अगर जी स्वाक्षरित किंवा मुद्रांकित आहे व मूल्यवान् रोख्यात रूपांतरित करता येण्यासारखी आहे अशी कोणतीही वस्तू बनवण्यास, तीत फेरबदल करण्यास किंवा ती नष्ट करण्यास याप्रमाणे फसवल्या गेलेल्या व्यक्तीला अप्रामाणिकपणाने प्रवृत्त करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. *ठकवणूक करणे आणि मालमत्तेची सुपूर्दगी करण्यास अप्रामाणिकपणाने प्रवृत्त करणे.*

**मालमत्तेचे कपटपूर्ण विलेख आणि विल्हेवाटी यांविषयी**

४२१. जर कोणी एखादी मालमत्ता अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने हलविली, लपवून ठेवली किंवा एखाद्या व्यक्तीकडे सुपूर्द केली, अथवा पर्याप्त प्रतिफलाविना कोणत्याही व्यक्तीकडे हस्तांतरित केली किंवा हस्तांतरित करवली आणि त्यायोगे आपल्या धनकोंमध्ये किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या धनकों-मध्ये कायद्यानुसार त्या मालमत्तेची विभागणी होण्यास प्रतिबंध करण्याचा त्याचा उद्देश असेल किंवा त्यामुळे तसा प्रतिबंध होण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव असेल तर, त्याला दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. *मालमत्तेची धनकोंमध्ये विभागणी होण्यास प्रतिबंध करण्यासाठी ती अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने हलविणे किंवा लपविणे.*

**धनकोंना ऋण उपलब्ध होऊ देण्यास अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने प्रतिबंध करणे.**

४२२. जो कोणी स्वतःला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला येणे असलेले कोणतेही ऋण किंवा मागणी रक्कम आपल्या ऋणांच्या किंवा अशा अन्य व्यक्तीच्या ऋणांच्या फेडीसाठी कायद्यानुसार उपलब्ध होऊ देण्यास अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने प्रतिबंध करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**प्रतिफलाबाबतचे खोटे कथन अंतर्भूत असणारे हस्तांतरणपत्र अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने निष्पादित करणे.**

४२३. ज्याद्वारे कोणतीही मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध हस्तांतरित झाल्याचे किंवा ते एखाद्या प्रभारास अधीन झाल्याचे दिसते आणि ज्यामध्ये असे हस्तांतरण किंवा प्रभार यांच्या प्रतिफलासंबंधी किंवा ज्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या उपयोगासाठी किंवा फायद्यासाठी त्याचे प्रवर्तन होणे वस्तुतः उद्देशित आहे त्यांच्यासंबंधी ज्यामध्ये कोणतेही खोटे कथन अंतर्भूत आहे असा कोणताही विलेख किंवा संलेख जो कोणी अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने स्वाक्षरित करील, निष्पादित करील किंवा त्यास पक्ष होईल त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**मालमत्ता अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने हलविणे किंवा लपवून ठेवणे.**

४२४. जो कोणी अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने आपली किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीची कोणतीही मालमत्ता लपवून ठेवील किंवा हलवील, अथवा ती लपवण्याच्या किंवा हलवण्याच्या कामी अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने साहाय्य करील अथवा ज्यास आपण हक्कदार आहोत अशी कोणतीही येणे रक्कम किंवा हक्कमागणी अप्रामाणिकपणाने सोडून देईल त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

## आगळिकीविषयी

**आगळीक.**

४२५. जनतेला किंवा कोणत्याही व्यक्तीला गैर हानी किंवा नुकसान पोचण्याच्या उद्देशाने किंवा पोचण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची जाणीव असताना जो कोणी कोणत्याही मालमत्तेचा नाश घडवून आणतो अथवा ज्यामुळे कोणत्याही मालमत्तेचे मूल्य किंवा उपयुक्तता नष्ट होईल किंवा कमी होईल किंवा त्यावर क्षतिकारक परिणाम होईल असा कोणताही बदल त्या मालमत्तेत किंवा तिच्या स्थितिस्थानात घडवतो तो "आगळीक" करतो.

**स्पष्टीकरण १.**—आगळिकीचा अपराध घडण्याच्या बाबतीत, अपराध्याने क्षती पोचलेल्या किंवा नष्ट झालेल्या मालमत्तेच्या मालकास हानी किंवा नुकसान पोचवण्याचा अपराध्याचा उद्देश असावयास पाहिजे हे अत्यावश्यक नाही. जर कोणत्याही मालमत्तेला क्षती पोचवून कोणत्याही व्यक्तीला गैर हानी किंवा नुकसान पोचवण्याचा त्याचा उद्देश असला अथवा पोचण्यास आपण कारण होण्याचा संभव आहे याची त्याला जाणीव असली तरी तेवढे पुरेसे आहे—मग ती मालमत्ता त्या व्यक्तीच्या मालकीची असो वा नसो.

**स्पष्टीकरण २.**—आगळिकीची कृती करणाऱ्या व्यक्तीच्या किंवा ती व्यक्ती आणि इतर व्यक्ती यांच्या संयुक्त मालकीच्या मालमत्तेवर परिणाम करणाऱ्या कृतीद्वारे आगळीक करता येईल.

## उदाहरणे

(क्) 'य' ला गैर हानी पोचवण्याच्या उद्देशाने 'क' इच्छापूर्वक 'य' चा मूल्यवान् रोखा जाळतो. 'क' ने आगळीक केली आहे.

(ख्) 'य' ला गैर हानी पोचवण्याच्या उद्देशाने 'क' हा 'य' च्या बर्फगृहात पाणी सोडतो आणि त्यामुळे बर्फ वितळू लागते. 'क' ने आगळीक केली आहे.

(ग्) 'क' इच्छापूर्वक 'य' ची एक अंगठी नदीमध्ये फेकतो, त्यायोगे 'य' ला गैर हानी पोचावी असा त्याचा उद्देश आहे. 'क' ने आगळीक केली आहे.

(घ्) आपणांकडून 'य' ला देणे असलेले ऋण फेडण्यासाठी दरखास्त-कार्यवाहीत आपली जायदाद घेतली जाण्याच्या बेतात आहे याची जाणीव असताना 'क' ती जायदाद नष्ट करतो आणि त्यायोगे 'य' ला ऋणाची फेड मिळू नये आणि त्यामुळे 'य' चे नुकसान व्हावे असा 'क' चा उद्देश आहे. 'क' ने आगळीक केली आहे.

(ङ्) जहाजाचा विमा उतरवलेला असता हमीदारांना नुकसान पोचवण्याच्या उद्देशाने इच्छा-पूर्वक 'क' ते जहाज टाकून देण्याची व्यवस्था करतो. 'क' ने आगळीक केली आहे.

(च्) 'क' एक जहाज टाकून देण्याची व्यवस्था करतो, ज्याने त्या जहाजाच्या तारणावर पैसे कर्जाऊ दिले आहेत अशा 'य' ला नुकसान पोचावे असा त्यामागे त्याचा उद्देश आहे. 'क' ने आगळीक केली आहे.

(छ्) एका घोड्यावर 'य' च्या जोडीला 'क' चा संयुक्त मालकीहक्क असून, 'क' तो घोडा गोळी घालून मारतो आणि त्यामुळे 'य' ला गैर हानी पोचावी असा 'क' चा उद्देश आहे. 'क' ने आगळीक केली आहे.

(ज्) 'य' च्या पिकाचे नुकसान करण्याच्या उद्देशाने आणि तसे होण्यास आपण कारण होण्याचा संभव आहे याची स्वतःला जाणीव असताना 'क' हा 'य' च्या शेतामध्ये गुरेढोरे घुसवतो. 'क'-ने आगळीक केली आहे.

४२६. जो कोणी आगळीक करील त्याला, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

आगळिकीबद्दल शिक्षा.

४२७. जो कोणी आगळीक करील आणि त्यायोगे पन्नास रुपये किंवा त्याहून अधिक रकमेपर्यंत हानी अथवा नुकसान घडवून आणील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

पन्नास रुपये इतक्या रकमेचे नुकसान करून आगळीक करणे.

४२८. जो कोणी दहा रुपये किंवा त्याहून अधिक किंमतीचे एखादे जनावर किंवा जनावरे यांना ठार मारून, विषप्रयोग करून, विकलांग करून किंवा निरुपयोगी करून आगळीक करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

दहा रुपये किंमतीच्या जनावरास ठार मारून किंवा विकलांग करून आगळीक करणे.

४२९. जो कोणी एखादा हत्ती, उंट, घोडा, खेचर, म्हैस, वळू, गाय किंवा बैल—मग त्यांची किंमत कितीही असो—अथवा पन्नास रुपये किंवा त्याहून अधिक किंमतीचे अन्य कोणतेही जनावर याला ठार मारून, विषप्रयोग करून, विकलांग करून किंवा निरुपयोगी करून आगळीक करील त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

कितीही किंमतीची गुरेढोरे, इत्यादींना किंवा पन्नास रुपये किंमतीच्या जनावरास ठार मारून किंवा विकलांग करून आगळीक करणे.

४३०. शेतीच्या प्रयोजनासाठी, अथवा माणसांना किंवा जी मालमत्ता असतील अशा जनावरांच्या खुराकासाठी किंवा त्यांना पिण्यासाठी, अथवा स्वच्छतेसाठी, अथवा कोणतीही वस्तुनिर्मिती चालू ठेवण्यासाठी लागणाऱ्या पाण्याच्या पुरवठ्यामध्ये ज्या कृतीमुळे घट होते किंवा जिच्यामुळे तशी घट होण्याचा संभव असल्याची स्वतःला जाणीव आहे अशी कोणतीही कृती करून जो कोणी आगळीक करील त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

पाटबंधाऱ्यांच्या कामाची खराबी करून किंवा गैरपणे पाण्याची दिशा बदलून आगळीक करणे.

४३१. ज्या कृतीमुळे कोणताही सार्वजनिक रस्ता, पूल, नाव्य नदी अथवा नैसर्गिक किंवा कृत्रिम नाव्य नहर प्रवास करण्याच्या किंवा मालमत्तेची ने-आण करण्याच्या दृष्टीने दुस्तर होतो किंवा त्या दृष्टीने त्याची सुरक्षितता कमी होते किंवा जिच्यामुळे तसे होण्याचा संभव असल्याची स्वतःला जाणीव आहे अशी कोणतीही कृती करून जो कोणी आगळीक करील त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

सार्वजनिक रस्ता, पूल, नदी किंवा कालवा याची खराबी करून आगळीक करणे.

४३२. जिच्यामुळे कोणतेही सार्वजनिक निचरा-गटार त्याला क्षती किंवा नुकसान पोचेल अशाप्रकारे भरून वाहते किंवा त्यात अडथळा निर्माण होतो अशी किंवा जिच्यामुळे तसे होण्याचा संभव असल्याची स्वतःला जाणीव आहे अशी कोणतीही कृती करून जो कोणी आगळीक करील त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

सार्वजनिक निचरा-गटारे नुकसानकारक होईल अशाप्रकारे भरून वाहू देऊन किंवा त्यांत अडथळा निर्माण करून आगळीक करणे.

४३३. कोणतेही दीपगृह किंवा सागरी धोक्याची निशाणी म्हणून वापरला जाणारा अन्य दीप किंवा कोणतीही सागरी धोक्याची निशाणी किंवा बोया किंवा नाविकांना मार्गदर्शक म्हणून ठेवलेली अन्य वस्तू नष्ट करून किंवा हलवून अथवा जिच्यामुळे असे कोणतेही दीपगृह, सागरी धोक्याची निशाणी, बोया किंवा अशी पूर्वोक्त अन्य वस्तू नाविकांना मार्गदर्शक म्हणून कमी उपयुक्त ठरते अशी कोणतीही कृती करून जो कोणी आगळीक करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

दीपगृह किंवा सागरी धोक्याची निशाणी नष्ट करून, ती हलवून किंवा त्याची उपयुक्तता कमी करून आगळीक करणे.

४३४. लोकसेवकाच्या प्राधिकाराव्दारे लावण्यात आलेले कोणतेही सीमाचिन्ह नष्ट करून किंवा हलवून अथवा जिच्यामुळे एक सीमाचिन्ह म्हणून अशा सीमाचिन्हाची उपयुक्तता कमी होईल अशी कोणतीही कृती करून जो कोणी आगळीक करील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

सार्वजनिक प्राधिकरणाने लावलेले सीमाचिन्ह नष्ट करून, हलवून इत्यादी प्रकारे आगळीक करणे.

शंभर रुपयांच्या मर्यादेपर्यंत अथवा (शेतमालाच्या बाबतीत) दहा रुपयांच्या मर्यादेपर्यंत नुकसान करण्याच्या उद्देशाने विस्तव किंवा स्फोटक पदार्थ याद्वारे आगळीक करणे.

४३५. जर कोणी विस्तव किंवा कोणताही स्फोटक पदार्थ याच्या द्वारे आगळीक केली आणि त्यामागे शंभर रुपये किंवा त्याहून अधिक रकमेपर्यंत [1][अथवा (मालमत्ता ही शेतमाल असेल त्या बाबतीत) दहा रुपये किंवा त्याहून अधिक रकमेपर्यंत] कोणत्याही मालमत्तेचे नुकसान करण्याचा त्याचा उद्देश असेल अथवा त्यायोगे तसे नुकसान होण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव असेल तर त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

घर, इ. नष्ट करण्याच्या उद्देशाने विस्तव किंवा स्फोटक पदार्थ याद्वारे आगळीक करणे.

४३६. जर कोणीही विस्तव किंवा कोणताही स्फोटक पदार्थ याच्याद्वारे आगळीक केली आणि त्यामागे, सामान्यत: उपासनास्थान म्हणून किंवा माणसांचे वसतिस्थान म्हणून किंवा मालमत्तेच्या अभिरक्षेचे स्थान म्हणून वापरली जाणारी कोणतीही इमारत नष्ट करण्याचा त्याचा उद्देश असेल अथवा त्यायोगे तसे होण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव असेल तर, त्याला [2][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

मजली जलयान किंवा २० टन बारदान भरलेले जलयान नष्ट करण्याच्या अथवा असुरक्षित करण्याच्या उद्देशाने आगळीक करणे.

४३७. जर कोणी कोणतेही मजली जलयान अथवा २० टन किंवा त्याहून अधिक बारदान भरलेले कोणतेही जलयान यांच्याबाबत आगळीक केली आणि त्यामागे ते नष्ट करण्याचा किंवा असुरक्षित करण्याचा त्याचा उद्देश असेल अथवा त्यायोगे ते नष्ट होण्यास किंवा असुरक्षित होण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव असेल तर, त्याला दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

विस्तव किंवा स्फोटक पदार्थ याद्वारे केलेल्या कलम ४३७ मध्ये वर्णन केलेल्या, आगळिकीबद्दल शिक्षा.

४३८. जो कोणी, विस्तव किंवा कोणताही स्फोटक पदार्थ याच्याद्वारे, लगतपूर्व कलमामध्ये वर्णन केलेली अशी आगळीक करील किंवा अशी आगळीक करण्याचा प्रयत्न करील त्याला, [2][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

चोरी, इ. करण्याच्या उद्देशाने जलयान उथळ पाणी असलेल्या जमिनीत किंवा किनाऱ्यावर उद्देशपूर्वक घुसवण्याबद्दल शिक्षा.

४३९. जो कोणी एका जलयानामध्ये असलेल्या कोणत्याही मालमत्तेची चोरी करण्याच्या किंवा अशा कोणत्याही मालमत्तेचा अप्रामाणिकपणाने अपहार करण्याच्या उद्देशाने अथवा मालमत्तेची अशी चोरी किंवा अपहार करता यावा अशा हेतूने उद्देशपूर्वक ते जलयान उथळ पाणी असलेल्या जमिनीत किंवा किनाऱ्यावर घुसवील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

मृत्यू किंवा दुखापत घडवून आणण्याची पूर्वतयारी करून केलेली आगळीक.

४४०. कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू किंवा तिला दुखापत घडवून आणण्याच्या किंवा तिला गैर निरोध करण्याच्या अथवा तिला मृत्यूची किंवा दुखापतीची किंवा गैर निरोधाची भीती निर्माण करण्याच्या उद्देशाने तयारी करून जो कोणी आगळीक करील त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

### फौजदारीपात्र अतिक्रमणाविषयी

फौजदारीपात्र अतिक्रमण.

४४१. जो कोणी दुसऱ्याच्या कब्जात असलेल्या मालमत्तेच्या जागेत किंवा जागेवर, अपराध करण्याच्या अथवा अशी मालमत्ता जिच्या कब्जात असेल अशा कोणत्याही व्यक्तीला धाकदपटशा दाखवण्याच्या, तिचा अपमान करण्याच्या किंवा तिला त्रास देण्याच्या उद्देशाने प्रवेश करतो, किंवा

---

१. १८८२ चा अधिनियम ८-कलम १० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची द्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

अशा मालमत्तेच्या जागेत किंवा जागेवर कायदेशीरपणे प्रवेश केल्यानंतर, अशा कोणत्याही व्यक्तीला धाकदपटशा दाखवण्याच्या, तिचा अपमान करण्याच्या किंवा तिला त्रास देण्याच्या उद्देशाने अथवा एखादा अपराध करण्याच्या उद्देशाने तेथे बेकायदेशीरपणे थांबून राहतो तो फौजदारीपात्र अतिक्रमण करतो असे म्हटले जाते.

४४२. माणसांचे वसतिस्थान म्हणून वापरली जाणारी कोणतीही इमारत, तंबू किंवा जलयान अथवा उपासनास्थान म्हणून किंवा मालमत्तेच्या अभिरक्षेचे स्थान म्हणून वापरली जाणारी कोणतीही इमारत यामध्ये प्रवेश करून किंवा तेथे थांबून जो कोणी फौजदारीपात्र अतिक्रमण करतो तो "गृह-अतिक्रमण करतो" असे म्हटले जाते. गृह-अतिक्रमण करणे.

**स्पष्टीकरण.**—फौजदारीपात्र अतिक्रमण करणारा माणूस प्रवेश करत असताना त्याच्या शरीराचा कोणताही भाग आत शिरला की, गृह-अतिक्रमण घडण्यास तेवढे पुरेसे होते.

४४३. अतिक्रमणाचा विषय असलेल्या अशा इमारतीमधून, तंबूमधून किंवा जलयानामधून अतिक्रमणी व्यक्तीला अपवर्जित करण्याचा किंवा हुसकावून लावण्याचा हक्क ज्या व्यक्तीला आहे अशा व्यक्तीपासून गृह-अतिक्रमण लपवून ठेवण्याची खबरदारी घेऊन जो कोणी असे गृह-अतिक्रमण करील त्याने "चोरटे गृह-अतिक्रमण" केले असे म्हटले जाते. चोरटे गृह-अतिक्रमण.

४४४. जो कोणी सूर्यास्तानंतर व सूर्योदयापूर्वी चोरटे गृह अतिक्रमण करील त्याने "रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण" केले असे म्हटले जाते. रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण करणे.

४४५. गृह-अतिक्रमण करणाऱ्या इसमाने, यात यापुढे वर्णन केलेल्या सहा प्रकारांपैकी कोणत्याही एका प्रकारे घरामध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये आपला शिरकाव करून घेतला; अथवा स्वत: अपराध करण्याच्या उद्देशाने घरामध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये असून किंवा त्यामध्ये अपराध केलेला असून, अशा सहा प्रकारांपैकी कोणत्याही एका प्रकारे घर सोडून जाऊन गृह-अतिक्रमण केले तर, त्या इसमाने "घरफोडी" केली असे म्हटले जाते, ते सहा प्रकार पुढीलप्रमाणे :— घरफोडी.

**पहिला.**—गृह-अतिक्रमण करण्यासाठी जर तो, त्याने स्वत: किंवा गृह-अतिक्रमणाला अपप्रेरणा देणाऱ्या कोणत्याही इसमाने तयार केलेल्या मार्गाने प्रवेश करील किंवा निघून जाईल तर.

**दुसरा.**—तो स्वतः किंवा अपराधाला अपप्रेरणा देणारा यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही मनुष्यव्यक्तीने ज्या मार्गाने प्रवेश करावा असे अभिप्रेत नाही त्या मार्गाने; अथवा कोणत्याही भिंतीवर किंवा इमारतीवर शिडीने किंवा नुसते वर चढून त्याने जेथे प्रवेश मिळवलेला असेल अशा कोणत्याही मार्गाने जर तो प्रवेश करील किंवा निघून जाईल तर.

**तिसरा.**—गृह-अतिक्रमण करण्यासाठी जर तो, त्याने स्वत: किंवा गृह-अतिक्रमणाला अपप्रेरणा देणाऱ्या कोणत्याही इसमाने, एखादा मार्ग ज्या साधनांच्या साहाय्याने खुला करण्याचे घराच्या ताबाधारकाला अभिप्रेत नव्हते अशा कोणत्याही साधनाच्या साहाय्याने खुल्या केलेल्या त्य मार्गाने प्रवेश करील किंवा निघून जाईल तर.

**चौथा.**—गृह-अतिक्रमण करण्यासाठी किंवा गृह-अतिक्रमणानंतर घर सोडून जाण्यासाठी जर तो कोणतेही कुलूप उघडून प्रवेश करील किंवा निघून जाईल तर.

**पाचवा.**—फौजदारीपात्र बलप्रयोग करून किंवा हमला करून किंवा कोणत्याही व्यक्तीला करण्याची धमकी देऊन जर तो आपला शिरकाव करून घेईल किंवा निर्गमन करील तर.

**सहावा.**—जो कोणताही मार्ग, यातून प्रवेश किंवा निर्गमन होऊ नये म्हणून बंद करून ठेवण्यात आलेला असल्याचे आणि त्याने स्वत: किंवा गृह-अतिक्रमणाला अपप्रेरणा देणाऱ्या व्यक्तीने तो उघडलेला असल्याचे तिला माहीत असेल त्या मार्गाने जर तो प्रवेश करील किंवा निघून जाईल तर.

**स्पष्टीकरण.**—घराच्या जोडीला ताब्यात असलेले आणि ज्याच्यामध्ये व अशा घरामध्ये थेट अंतर्गत संधान असेल असे कोणतेही उपगृह किंवा इमारत ही या कलमाच्या अर्थानुसार घराचा भाग असते.

**उदाहरणे**

(क) 'य'च्या घराच्या भिंतीला भोक पाडून व त्या भोकातून आपला हात आत घालून 'क' गृह-अतिक्रमण करतो. ही घरफोडी आहे.

(ख) नौतलांमधील पोर्टहोलमधून जलयानावर हळूच शिरकाव करून 'क' गृह-अतिक्रमण करतो. ही घरफोडी आहे.

(ग) खिडकीमधून 'य'च्या घरामध्ये प्रवेश करून 'क' गृह-अतिक्रमण करतो. ही घरफोडी आहे.

(घ) बंद करण्यात आलेले दार उघडून त्या दारामधून 'य'च्या घरात प्रवेश करून 'क' गृह-अतिक्रमण करतो. ही घरफोडी आहे.

(ङ) दारामधील छिद्रातून तार आत घालून तिच्या साहाय्याने कडी उचलून त्या दारातून 'य'च्या घरात प्रवेश करून 'क' गृह-अतिक्रमण करतो. ही घरफोडी आहे.

(च) 'य'च्या घराच्या दाराची किल्ली 'य'कडून हरवली, ती 'क'ला सापडते आणि त्या किल्लीने दार उघडल्यानंतर 'य'च्या घरात शिरून 'क' गृह-अतिक्रमण करतो. ही घरफोडी आहे.

(छ) 'य'त्याच्या दारात उभा आहे. 'य'ला खाली पाडून 'क' जबरदस्तीने वाट करून घेतो आणि घरात प्रवेश करून गृह-अतिक्रमण करतो. ही घरफोडी आहे.

(ज्) 'य'चा द्वाररक्षक 'म'हा 'य'च्या दारात उभा आहे. 'क'हा 'म'ला मारहाण करण्याची धमकी देऊन आपणास प्रतिकार करण्यापासून त्याला परावृत्त करतो व घरात प्रवेश करून गृह-अतिक्रमण करतो. ही घरफोडी आहे.

रात्रीच्या वेळी घरफोडी करणे.

४४६. जो कोणी सूर्यास्तानंतर आणि सूर्योदयापूर्वी घरफोडी करतो तो "रात्रीच्या वेळी घरफोडी" करतो असे म्हटले जाते.

फौजदारीपात्र अतिक्रमणाबद्दल शिक्षा.

४४७. जो कोणी फौजदारीपात्र अतिक्रमण करील त्याला, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

गृह-अतिक्रमणाबद्दल शिक्षा.

४४८. जो कोणी गृह-अतिक्रमण करील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

मृत्यूच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी गृह-अतिक्रमण.

४४९. जो कोणी, मृत्यूच्या शिक्षेस पात्र असलेला कोणताही अपराध करण्यासाठी गृह-अतिक्रमण करील त्याला, [1][आजीव कारावासाची] किंवा जास्तीत जास्त दहा वर्षे इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी गृह-अतिक्रमण.

४५०. जो कोणी [1][आजीव कारावासाच्या] शिक्षेस पात्र असा कोणताही अपराध करण्यासाठी गृह-अतिक्रमण करील त्याला, जास्तीत जास्त दहा वर्षे इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी गृह-अतिक्रमण.

४५१. जो कोणी कारावासाच्या शिक्षेस पात्र असा कोणताही अपराध करण्यासाठी गृह-अतिक्रमण करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल; आणि जो अपराध करण्याचा त्याचा उद्देश असेल तो अपराध म्हणजे चोरी असेल तर, कारावासाची मुदत सात वर्षेपर्यंत वाढवता येईल.

दुखापत, हमला किंवा गैर निरोध करण्याची पूर्वतयारी करून नंतर गृह-अतिक्रमण.

४५२. कोणत्याही व्यक्तीला दुखापत करण्याची किंवा कोणत्याही व्यक्तीवर हमला करण्याची किंवा कोणत्याही व्यक्तीला गैरपणे निरुद्ध करण्याची किंवा कोणत्याही व्यक्तीला दुखापतीची, हमल्याची अगर गैर निरोधाची भीती घालण्याची पूर्वतयारी करून नंतर जो कोणी गृह-अतिक्रमण करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

४५३. जो कोणी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. चोरट्या गृह-अतिक्रमणाबद्दल किंवा घरफोडी-बद्दल शिक्षा.

४५४. जो कोणी कारावासाच्या शिक्षेस पात्र असा कोणताही अपराध करण्यासाठी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल; आणि जो अपराध करण्याचा याचा उद्देश असेल तो अपराध म्हणजे चोरी असेल तर, कारावासाची मुदत दहा वर्षेपर्यंत वाढवता येईल. कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी चोरटे गृह अति-क्रमण किंवा घरफोडी.

४५५. कोणत्याही व्यक्तीला दुखापत करण्याची किंवा कोणत्याही व्यक्तीवर हमला करण्याची किंवा कोणत्याही व्यक्तीला गैरपणे निरुद्ध करण्याची किंवा कोणत्याही व्यक्तीला दुखापतीची, हमल्याची किंवा गैर निरोधाची भीती घालण्याची पूर्वतयारी करून नंतर जो कोणी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. दुखापत, हमला किंवा गैर निरोध करण्याची पूर्व-तयारी करून नंतर चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी.

४५६. जो कोणी रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण करील किंवा रात्रीच्या वेळी घरफोडी करील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. रात्रीच्या वेळी केलेल्या चोरट्या गृह-अतिक्रमणा-बद्दल किंवा घरफोडीबद्दल शिक्षा.

४५७. जो कोणी कारावासाच्या शिक्षेस पात्र असा कोणताही अपराध करण्यासाठी रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण करील किंवा रात्रीच्या वेळी घरफोडी करील त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल; आणि, जो अपराध करण्याचा त्याचा उद्देश असेल तो अपराध म्हणजे चोरी असेल तर, कारावासाची मुदत चौदा वर्षेपर्यंत वाढवता येईल. कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अति-क्रमण किंवा घरफोडी.

४५८ कोणत्याही व्यक्तीला दुखापत करण्याची, किंवा कोणत्याही व्यक्तीवर हमला करण्याची किंवा कोणत्याही व्यक्तीला गैरपणे निरुद्ध करण्याची किंवा कोणत्याही व्यक्तीला दुखापतीची अगर हमल्याची अगर गैर निरोधाची भीती घालण्याची पूर्वतयारी करून नंतर जो कोणी रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण करील किंवा रात्रीच्या वेळी घरफोडी करील त्याला, चौदा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. दुखापत, हमला किंवा गैर निरोध करण्याची पूर्व-तयारी करून नंतर रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी.

४५९. जो कोणी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी करताना कोणत्याही व्यक्तीला जबर दुखापत करील अगर कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू घडवून आणण्याचा किंवा तिला जबर दुखापत करण्याचा प्रयत्न करील त्याला, [1][ आजीव कारावासाची ] किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी करताना जबर दुखापत करणे.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळेपाणी' याऐवजी दहा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा घरफोडी करण्यात संयुक्तपणे निबद्ध असलेल्यांपैकी एका व्यक्तीने मृत्यू घडवून आणल्यास किंवा जबर दुखापत केल्यास त्याबाबतीत सर्व व्यक्ती शिक्षापात्र.

**४६०.** रात्रीच्या वेळी चोरटे गृह-अतिक्रमण किंवा रात्रीच्या वेळी घरफोडी करताना अशा अपराधाबद्दल दोषी असलेल्या कोणत्याही व्यक्तीने इच्छापूर्वक एखाद्या व्यक्तीचा मृत्यू घडवून आणला किंवा तिला जबर दुखापत केली अथवा तसे करण्याचा प्रयत्न केला तर, रात्रीच्या वेळी असे चोरटे गृह-अतिक्रमण किंवा रात्रीच्या वेळी घरफोडी करण्यात संयुक्तपणे संबंधित असलेल्यांपैकी प्रत्येक व्यक्तीला [1][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व ती द्रव्यदंडासही पात्र होईल.

आतमध्ये मालमत्ता असलेले पात्र अप्रामाणिकपणाने फोडून उघडणे.

**४६१.** ज्यामध्ये मालमत्ता आहे किंवा ती ज्यात आहे असे स्वत: समजतो असे कोणतेही बंद पात्र जो कोणी अप्रामाणिकपणाने किंवा आगळीक करण्याच्या उद्देशाने फोडून किंवा सोडून उघडील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

जिच्याकडे अभिरक्षेचे काम सोपवले आहे त्या व्यक्तीने असा अपराध केला असता त्याबद्दल शिक्षा.

**४६२.** ज्यामध्ये मालमत्ता आहे किंवा ती ज्यात आहे असे स्वत: समजतो असे कोणतेही बंद पात्र स्वत:कडे विश्वासाने सोपवण्यात आले असून ते उघडण्याचा प्राधिकार स्वत:ला नसताना जो कोणी अप्रामाणिकपणाने किंवा आगळीक करण्याच्या उद्देशाने ते पात्र फोडून किंवा सोडून उघडील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

## प्रकरण १८ वे

## दस्तऐवज आणि [2]* * * स्वामित्व-चिन्हे यांसंबंधीच्या अपराधांविषयी

बनावटीकरण.

**४६३.** जो कोणी जनतेला किंवा कोणत्याही व्यक्तीला नुकसान किंवा क्षती पोचवण्याच्या अगर कोणत्याही हक्कमागणीस किंवा स्वत्वाधिकारास पुष्टी देण्याच्या अगर कोणत्याही व्यक्तीला तिच्या मालमत्तेचा कब्जा सोडून द्यावयास लावण्याच्या अगर कोणतीही स्पष्ट किंवा उपलक्षित संविदा करण्याच्या उद्देशाने अथवा कपट करण्याच्या किंवा ते कपट करणे शक्य व्हावे या उद्देशाने कोणताही खोटा दस्तऐवज किंवा त्याचा काही भाग बनवतो तो "बनावटीकरण" करतो.

खोटा दस्तऐवज बनवणे.

**४६४.** जी व्यक्ती,—

**एक.**—एखादा दस्तऐवज किंवा दस्तऐवजाचा भाग ज्या व्यक्तीने किंवा जिच्या प्राधिकारान्वये बनवलेला नव्हता, स्वाक्षरित, मुद्रांकित किंवा निष्पादित केलेला नव्हता हे स्वत:ला माहीत आहे त्या व्यक्तीने किंवा तिच्या प्राधिकारान्वये, अथवा ज्यावेळी तो बनवलेला नव्हता, स्वाक्षरित, मुद्रांकित किंवा निष्पादित केलेला नव्हता हे स्वत:ला माहीत आहे त्या वेळी असा दस्तऐवज किंवा दस्तऐवजाचा भाग बनवला गेला, स्वाक्षरित, मुद्रांकित किंवा निष्पादित केला गेला असा समज निर्माण करण्याच्या उद्देशाने अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने असा दस्तऐवज किंवा दस्तऐवजाचा भाग बनवते, स्वाक्षरित, मुद्रांकित किंवा निष्पादित करते अगर दस्तऐवजाचे निष्पादन दर्शवणारी कोणतीही खूण करते; अथवा

**दोन.**—स्वत:ने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने एखादा दस्तऐवज बनवल्यानंतर किंवा निष्पादित केल्यानंतर, मजकूर खोडून किंवा अन्यप्रकारे कायदेशीर प्राधिकारावाचून अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने त्या दस्तऐवजाच्या कोणत्याही महत्त्वाच्या भागात फेरबदल करते—मग अशा फेरबदलाच्या वेळी ती अन्य व्यक्ती हयात असो वा मृत असो—; अथवा

**तीन.**—एखादी व्यक्ती दस्तऐवजाचा मजकूर किंवा फेरबदलाचे स्वरूप मनोविकलतेमुळे किंवा नशेमुळे समजू शकणार नाही किंवा तिची फसवणूक केली गेल्यामुळे तिला समजलेले नाही हे स्वत:ला माहीत असून अशा व्यक्तीला तो दस्तऐवज स्वाक्षरित, मुद्रांकित किंवा निष्पादित करण्यास, किंवा त्यात तसा फेरबदल करण्यास अप्रामाणिकपणाने किंवा कपटीपणाने भाग पाडते,

तिने खोटा दस्तऐवज बनवला असे म्हटले जाते.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळेपाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १९५८ चा अधिनियम ४३-कलम १३५ व अनुसूची यांद्वारे "व्यापार किंवा" हे शब्द गाळण्यात आले (२५ नोव्हेंबर, १९५९ रोजी व तेव्हापासून).

### उदाहरणे

(क) 'य' ने 'ख' वर काढलेले १०,००० रु. चे पतपत्र 'क' कडे आहे. 'ख' ला गंडवण्यासाठी 'क' १०,००० वर एक पूज्य चढवतो आणि ते पतपत्र 'य' ने तसे लिहिलेले आहे असा 'ख' चा समज व्हावा या उद्देशाने ती रक्कम १,००,००० रु. अशी करतो. 'क' ने बनावटीकरण केलेले आहे.

(ख) 'य' ने 'क' ला एका संपदेचे अभिहस्तांतरण केले आहे असे दाखवणाऱ्या दस्तऐवजावर; 'ख' ला ती संपदा विकून त्याद्वारे 'ख' कडून खरेदीची किंमत मिळवावी या उद्देशाने 'क' हा 'य' च्या प्राधिकारावाचून 'य' ची मोहोर लावतो. 'क' ने बनावटीकरण केले आहे.

(ग) एका बँकरवर काढलेला धारणकर्त्याला प्रदेय असा 'ख' च्या स्वाक्षरीचा, पण काहीही रक्कम न भरलेला असा धनादेश 'क' लांबवतो. 'क' कपटीपणाने त्या धनादेशात दहा हजार रुपयांचा आकडा घालून पूर्ण करतो. 'क' बनावटीकरण करतो.

(घ) प्रदेय रक्कम किती ते न भरता एका बँकरच्या नावावर काढलेला आपल्या सहीचा एक धनादेश 'क' आपला अभिकर्ता 'ख' याच्या स्वाधीन करतो आणि विवक्षित रकमा चुकत्या करण्यासाठी दहा हजार रुपयांपेक्षा अधिक नाही इतका आकडा भरून धनादेश पूर्ण करण्यास 'ख' ला प्राधिकृत करतो. 'ख' कपटीपणाने वीस हजार रुपयांचा आकडा घालून धनादेश पूर्ण करतो. 'ख' बनावटीकरण करतो.

(ङ) 'क' स्वतःप्रीत्यर्थ 'ख' च्या नावाने पण 'ख' च्या प्राधिकारावाचून एक विपत्र काढतो. ते खरे विपत्र असल्याप्रमाणे बँकरकडे वटवण्याचा त्याचा उद्देश असून, विपत्र परिपक्व होताच त्याची रक्कम वसूल करण्याचा त्याचा इरादा आहे. 'क' हा आपल्याकडे 'ख' चे तारण होते असा बँकरचा समज करून देऊन त्याची फसवणूक करण्याच्या आणि त्यायोगे ते विपत्र वटवण्याच्या उद्देशाने ते विपत्र काढतो, म्हणून 'क' हा बनावटीकरणाबद्दल दोषी आहे.

(च) 'य' च्या मृत्युपत्रात असे शब्द आहेत—"मी असे निदेशित करतो की, माझी सर्व उर्वरित मालमत्ता 'क', 'ख' आणि 'ग' यांच्यामध्ये समसमान विभागली जावी." सर्व मालमत्ता आपल्यासाठी आणि 'ग' साठी ठेवण्यात आली आहे असा समज व्हावा या उद्देशाने 'क' हा 'ख' चे नाव काढून टाकतो. 'क' ने बनावटीकरण केलेले आहे.

(छ) 'क' एक सरकारी वचनपत्र पृष्ठांकित करतो आणि त्या विपत्रावर " 'य' ला किंवा त्याच्या आदिष्टास द्यावे" असे शब्द लिहून आणि पृष्ठांकन स्वाक्षरित करून ते 'य' ला किंवा त्याच्या आदिष्टास प्रदेय करतो. 'ख' अप्रामाणिकपणाने " 'य' ला किंवा त्याच्या आदिष्टास द्यावे" हे शब्द खोडून टाकतो आणि त्याद्वारे विशेष पृष्ठांकन कोऱ्या पृष्ठांकनामध्ये परिवर्तित करतो. 'ख' बनावटीकरण करतो.

(ज) 'क' एक संपदा 'य' ला विकून अभिहस्तांतरित करतो. त्यानंतर 'य' कडून संपदा कपटाने हिरावून घेण्यासाठी 'क' हा 'य' ला ती संपदा अभिहस्तांतरित केल्याच्या तारखेच्या सहा महिने अगोदरच्या तारखेचे तीच संपदा 'ख' ला देणारे अभिहस्तांतरणपत्र निष्पादित करतो. ती संपदा 'य' कडे अभिहस्तांतरित करण्याच्या अगोदर त्याने ती 'ख' कडे अभिहस्तांतरित केली होती असा समज व्हावा असा त्याचा उद्देश आहे. 'क' ने बनावटीकरण केलेले आहे.

(झ) 'य' स्वतःचे मृत्युपत्र 'क' ला उतरून घेण्यास सांगतो. 'क' उद्देशपूर्वक 'य' ने सांगितलेल्या उत्तरदानग्राहीच्या नावापेक्षा वेगळ्या उत्तरदानग्राहीचे नाव लिहितो आणि आपण ते मृत्युपत्र 'य' च्या सूचनेबरहुकूम तयार केलेले आहे असे 'य' ला अभिवेदन करून त्याला मृत्युपत्रावर स्वाक्षरी करण्यास प्रवृत्त करतो. 'क' ने बनावटीकरण केलेले आहे.

(ञ) 'क' हा सच्छील मनुष्य असून अकल्पित दुर्दैवामुळे तो विपन्नावस्थेस पोचला आहे असा हवाला देणारे पत्र लिहून 'क' अशा पत्राच्या साहाय्याने 'य' कडून आणि इतर व्यक्तींकडून मदत मिळवावी या उद्देशाने, 'ख' च्या प्राधिकाराशिवाय त्यावर 'ख' च्या नावाची स्वाक्षरी करतो. याबाबतीत, ज्याअर्थी मालमत्तेचा कब्जा सोडून देण्यास 'य' ला प्रवृत्त करण्यासाठी 'क' ने खोटा दस्तऐवज बनवला आहे, त्याअर्थी 'क' ने बनावटीकरण केलेले आहे.

(ट) 'क' च्या चारित्र्याचा हवाला देणारे एक पत्र 'क' हा 'ख' च्या प्राधिकाराशिवाय लिहितो आणि त्यायोगे 'य' कडे नोकरी मिळवावी या उद्देशाने त्यावर 'ख' च्या नावाची स्वाक्षरी करतो. ज्याअर्थी, बनावट प्रमाणपत्राने 'य' ला फसवावे आणि त्यायोगे नोकरीची स्पष्ट किंवा उपलक्षित संविदा करण्यास त्याला प्रवृत्त करावे असा 'क' चा उद्देश होता, त्याअर्थी त्याने बनावटीकरण केलेले आहे.

**स्पष्टीकरण १.**—एखाद्या माणसाने केलेली स्वतःच्या नावाची स्वाक्षरी ही 'बनावटीकरण' या सदरात जमा होऊ शकेल.

### उदाहरणे

(क) 'क' हा एका विनिमयपत्रावर स्वतःच्या नावाची, त्याच नावाच्या दुसऱ्या व्यक्तीने ते विपत्र काढले होते असा समज व्हावा या उद्देशाने स्वाक्षरी करतो. 'क' ने बनावटीकरण केलेले आहे.

(ख) 'क' एका कागदावर "स्वीकृत" असा शब्द लिहितो आणि 'य' च्या नावाची स्वाक्षरी करतो, उद्देश असा की, 'ख' ने 'य' च्या नावावर काढलेले विनिमयपत्र 'ख' ने नंतर त्या कागदावर लिहावे आणि जणू काही 'य' ने ते स्वीकृत केलेले असावे त्याप्रमाणे ते परक्रामित करावे. 'क' हा बनावटीकरणाबद्दल दोषी आहे, आणि जर 'ख' ने सत्य माहीत असूनही 'क' च्या उद्देशानुसार त्या कागदावर विनिमयपत्र लिहिले तर, 'ख' सुद्धा बनावटीकरणाबद्दल दोषी होईल.

(ग) 'क' त्याच्याच नावाच्या दुसऱ्या व्यक्तीच्या आदिष्टास प्रदेय असलेले विनिमयपत्र लांबवतो. ते विपत्र ज्या व्यक्तीच्या आदिष्टास प्रदेय होते तिनेच ते पृष्ठांकित केले असा समज व्हावा या उद्देशाने 'क' ते स्वतःच्या नावे पृष्ठांकित करतो. याबाबतीत, 'क' ने बनावटीकरण केलेले आहे.

(घ) 'ख' विरुद्ध झालेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत विक्रीला काढलेली संपदा 'क' खरेदी करतो. संपदेच्या अभिग्रहणानंतर 'ख' हा 'क' ला गंडवावे आणि अभिग्रहणापूर्वी संपदेचा भाडेपट्टा झाला होता असा समज व्हावा या उद्देशाने 'य' शी संगनमत करून, 'य' ला नाममात्र भाड्याने आणि दीर्घ मुदतीने संपदा देणारा भाडेपट्टा निष्पादित करतो व अभिग्रहणाच्या सहा महिने आधीची तारीख भाडेपट्ट्यावर घालतो. 'ख' ने जरी स्वतःच्याच नावाने भाडेपट्टा निष्पादित केला असला तरी मागील तारीख टाकल्यामुळे त्याने बनावटीकरण केले असे होते.

(ङ) दिवाळखोरीच्या पूर्वकल्पनेने 'क' हा व्यापारी आपल्या फायद्यासाठी आणि आपल्या धनकोंना गंडवण्याच्या उद्देशाने 'ख' कडे जायदाद ठेवतो आणि त्या व्यवहाराला खरेपणाची छटा देण्यासाठी तो, मिळालेल्या मूल्याइतकी रक्कम 'ख' ला देण्यासाठी स्वतःला बांधून घेणारी एक वचनचिठ्ठी लिहितो आणि 'क' वर दिवाळखोर होण्याची पाळी येण्याअगोदरच त्याने ती लिहिली होती असा समज व्हावा या उद्देशाने त्यावर मागील तारीख घालतो. 'क' ने व्याख्येच्या पहिल्या सदराखाली बनावटीकरण केलेले आहे.

**स्पष्टीकरण. २**—एखादा खोटा दस्तऐवज खऱ्याखुऱ्या व्यक्तीने बनवला होता असा समज निर्माण व्हावा या उद्देशाने कल्पित व्यक्तीच्या नावाने किंवा तो दस्तऐवज एखाद्या व्यक्तीने हयात असताना केला होता असा समज निर्माण व्हावा या उद्देशाने मृत व्यक्तीच्या नावाने तसा दस्तऐवज बनवणे हे 'बनावटीकरण' या सदरात जमा होऊ शकेल.

**उदाहरण**

'क' कल्पित व्यक्तीच्या नावावर एक विनिमयपत्र काढतो, आणि ते परक्रामित करण्याच्या उद्देशाने तो कपटीपणाने अशा व्यक्तीच्या नावाने ते विपत्र स्वीकारतो. 'क' बनावटीकरण करतो.

बनावटीकरणाबद्दल शिक्षा.

**४६५.** जो कोणी बनावटीकरण करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

न्यायालयीन अभिलेख किंवा सार्वजनिक नोंद-पुस्तक, इ. चे बनावटीकरण.

**४६६.** जो दस्तऐवज म्हणजे न्यायालयाचा किंवा न्यायालयातील अभिलेख किंवा कार्यवाही असल्याचे अथवा जन्म, बाप्तिस्मा, विवाह किंवा दफन यांचे नोंदपत्र असल्याचे अथवा लोक सेवकाने त्या नात्याने ठेवलेले नोंदपुस्तक असल्याचे दिसते अगर लोक सेवकाने त्याच्या पदाच्या नात्याने तयार केलेले प्रमाणपत्र किंवा दस्तऐवज असल्याचे अथवा दावा मांडणे किंवा त्यात बचाव देणे किंवा त्यातील कोणतीही कार्यवाही करणे किंवा न्यायनिर्णयास कबुली देणे याविषयीचे प्राधिकारपत्र असल्याचे अथवा एखादा मुखत्यारनामा असल्याचे दिसते त्या दस्तऐवजाबाबत जो कोणी बनावटीकरण करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

मूल्यवान् रोखा, मृत्युपत्र, इ. चे बनावटीकरण.

**४६७.** जो दस्तऐवज म्हणजे एखादा मूल्यवान् रोखा किंवा एखादे मृत्युपत्र किंवा मुलगा दत्तक घेण्याविषयीचे एखादे प्राधिकारपत्र असल्याचे दिसते, अथवा एखादा मूल्यवान् रोखा बनवण्याचा किंवा हस्तांतरित करण्याचा अगर मुद्दल, त्यावरील व्याज किंवा लाभांश घेण्याचा अगर कोणतीही रक्कम, जंगम मालमत्ता किंवा मूल्यवान् रोखा स्वीकारण्याचा किंवा सुपूर्द करण्याचा प्राधिकार कोणत्याही व्यक्तीला देत असल्याचे दिसते असा एखादा दस्तऐवज अथवा जो दस्तऐवज म्हणजे पैसे चुकते झाल्याची पोच देणारे निस्तारपत्र किंवा पावती अगर कोणतीही जंगम मालमत्ता किंवा मूल्यवान् रोखा सुपूर्द करण्यात आल्याबद्दलचे निस्तारपत्र किंवा पावती असल्याचे दिसते असा कोणताही दस्तऐवज जो कोणी बनावट तयार करील त्याला, [1][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

ठकवणूक करण्यासाठी बनावटीकरण.

**४६८.** बनावट दस्तऐवज ठकवणूक करण्यासाठी वापरला जावा या उद्देशाने जो कोणी बनावटीकरण करील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची याद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

४६९. जो कोणी बनावटीकरण करील आणि त्या बनावट दस्तऐवजामुळे कोणत्याही व्यक्तीच्या लौकिकास बाध यावा असा ज्याचा उद्देश असेल किंवा त्या प्रयोजनासाठी तो वापरला जाणे संभवनीय आहे याची ज्याला जाणीव असेल त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. लौकिकास बाध आणण्यासाठी बनावटीकरण.

४७०. जो दस्तऐवज संपूर्णत: किंवा अंशत: बनावटीकरण करुन केलेला असेल तो दस्तऐवज "बनावट दस्तऐवज" होय. बनावट दस्तऐवज.

४७१. जो दस्तऐवज बनावट असल्याचे स्वत:ला माहीत आहे किंवा तसे समजण्यास स्वत:ला कारण आहे असा कोणताही दस्तऐवज जो कोणी कपटीपणाने किंवा अप्रामाणिकपणाने खरा म्हणून वापरील त्याला, जणू काही त्याने अशा दस्तऐवजाबाबत बनावटीकरण केलेले असावे त्याप्रमाणे तीच शिक्षा होईल. बनावट दस्तऐवज खरा म्हणून वापरणे.

४७२. जर कोणी एखादी मोहोर, मुद्रापट्ट किंवा ठसा उमटवण्याचे अन्य साधन बनवले किंवा नकली तयार केले आणि त्यामागे, या संहितेच्या कलम ४६७ अन्वये शिक्षापात्र होऊ शकेल असे कोणतेही बनावटीकरण करण्यासाठी त्याचा वापर करावा असा त्याचा उद्देश असेल अथवा अशी कोणतीही मोहोर, मुद्रापट्ट किंवा अन्य साधन नकली असल्याचे माहीत असून त्याने तशा उद्देशाने ते कब्जात बाळगले तर, त्याला [1][आजीव कारावासाची], किंवा सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. कलम ४६७ अन्वये शिक्षापात्र असलेले बनावटीकरण करण्याच्या उद्देशाने नकली मोहोर, इ. बनवणे किंवा कब्जात बाळगणे.

४७३. जर कोणी एखादी मोहोर, मुद्रापट्ट किंवा ठसा उमटवण्याचे अन्य साधन बनवले किंवा नकली तयार केले आणि या प्रकरणातील कलम ४६७ हून अन्य कोणत्याही कलमाअन्वये शिक्षापात्र होऊ शकेल असे कोणतेही बनावटीकरण करण्यासाठी त्याचा वापर करावा असा त्यामागे, त्याचा उद्देश असेल अथवा अशी कोणतीही मोहोर, मुद्रापट्ट किंवा अन्य साधन नकली असल्याचे माहीत असून त्याने तशा उद्देशाने ते कब्जात बाळगले तर, त्याला सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. अन्यथा शिक्षापात्र असलेले बनावटीकरण करण्याच्या उद्देशाने नकली मोहोर, इत्यादी बनवणे किंवा कब्जात बाळगणे.

४७४. एखादा दस्तऐवज बनावट असल्याचे स्वत:ला माहीत असून जो कोणी, तो कपटीपणाने किंवा अप्रामाणिकपणाने खरा म्हणून वापरण्याच्या उद्देशाने कब्जात बाळगील त्याला, जर तो दस्तऐवज या संहितेच्या कलम ४६६ मध्ये नमूद केलेल्या वर्णनाचा दस्तऐवज असेल तर, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल; आणि जर तो दस्तऐवज कलम ४६७ मध्ये नमूद केलेल्या वर्णनाचा दस्तऐवज असेल तर, त्याला [1][आजीव कारावासाची], किंवा सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. कलम ४६६ किंवा ४६७ मध्ये वर्णन केलेला दस्तऐवज तो बनावट असल्याचे माहीत असताना, तो खरा म्हणून वापरण्याच्या उद्देशाने कब्जात बाळगणे.

४७५. जर कोणी कोणत्याही सामग्रीवर किंवा तिच्या मुख्य द्रव्यात या संहितेच्या कलम ४६७ मध्ये वर्णन केलेला कोणताही दस्तऐवज अधिप्रमाणित करण्यासाठी वापरले जाणारे कोणतेही बोधचित्र किंवा चिन्ह नकली तयार केले आणि अशा सामग्रीवर त्यावेळी बनावट तयार केलेला किंवा त्यानंतर बनावट तयार करावयाचा कोणताही दस्तऐवज अधिप्रमाणित असल्याचे भासवण्यासाठी असे बोधचित्र किंवा चिन्ह यांचा वापर केला जावा असा त्यामागे त्याचा उद्देश असेल तर, अथवा जिच्यावर किंवा जिच्या मुख्य द्रव्यात असे कोणतेही नकली बोधचित्र किंवा चिन्ह अंकित केलेले आहे अशी कोणतीही सामग्री जर कोणी अशा उद्देशाने कब्जात बाळगली तर, त्याला [1][आजीव कारावासाची], किंवा सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. कलम ४६७ मध्ये वर्णन केलेले दस्तऐवज अधिप्रमाणित करण्यासाठी वापरले जाणारे बोधचित्र किंवा चिन्ह नकली तयार करणे किंवा अशी नकली चिन्हाने अंकित सामग्री कब्जात बाळगणे.

४७६. जर कोणी कोणत्याही सामग्रीवर किंवा तिच्या मुख्य द्रव्यात या संहितेच्या कलम ४६७ मध्ये वर्णन केलेल्याहून अन्य कोणताही दस्तऐवज अधिप्रमाणित करण्यासाठी वापरले जाणारे कोणतेही बोधचित्र किंवा चिन्ह नकली तयार केले आणि अशा सामग्रीवर त्यावेळी बनावट तयार केलेला किंवा त्यानंतर बनावट तयार करावयाचा कोणताही दस्तऐवज अधिप्रमाणित असल्याचे भासवण्यासाठी असे बोधचित्र किंवा चिन्ह यांचा वापर केला जावा असा त्यामागे त्याचा उद्देश असेल तर, अथवा जिच्यावर किंवा जिच्या मुख्य द्रव्यात असे कोणतेही नकली बोधचित्र किंवा चिन्ह अंकित केलेले आहे अशी कोणतीही सामग्री जर कोणी तशा उद्देशाने कब्जात बाळगली तर, त्याला सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तोद्रव्यदंडासही पात्र होईल. कलम ४६७ मध्ये वर्णन केलेल्याहून अन्य दस्तऐवज अधिप्रमाणित करण्यासाठी वापरले जाणारे बोधचित्र किंवा चिन्ह नकली तयार करणे किंवा अशी नकली चिन्हाने अंकित सामग्री कब्जात बाळगणे.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

कपटीपणाने मृत्युपत्र, दत्तक घेण्यासंबंधीचे प्राधिकारपत्र किंवा मूल्यवान् रोखा खोडून रद्द करणे, तो नष्ट करणे, इत्यादी.

४७७. जो दस्तऐवज म्हणजे एखादे मृत्युपत्र, मुलगा दत्तक घेण्यासंबंधीचे प्राधिकारपत्र किंवा कोणताही मूल्यवान् रोखा आहे किंवा तसा असल्याचे दिसते असा कोणताही दस्तऐवज जो कोणी कपटीपणाने किंवा अप्रामाणिकपणाने अथवा जनतेला किंवा कोणत्याही व्यक्तीला नुकसान किंवा क्षती पोचवण्याच्या उद्देशाने खोडून रद्द करील, नष्ट करील किंवा विरूपत करील अथवा खोडून रद्द करण्याचा नष्ट करण्याचा किंवा विरूपित करण्याचा प्रयत्न करील अथवा तो गुप्त राखील किंवा गुप्त राखण्याचा प्रयत्न करील अथवा अशा दस्तऐवजाच्या बाबतीत आगळीक करील त्याला, [१][आजीव कारावासाची], किंवा सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

खोटे हिशेब तयार करणे.

[२][४७७क. लिपिक, पदाधिकारी किंवा सेवक असलेला अथवा लिपिक, पदाधिकारी किंवा कर्मचारी याच्या कामावर नेमलेला किंवा ते काम करणारा जो कोणी बुद्धिपुरस्सर आणि लुबाडण्याच्या उद्देशाने, आपल्या नियोक्त्याच्या मालकीची किंवा त्याच्या कब्जात असलेली किंवा आपल्या नियोक्त्याकरता किंवा त्याच्या वतीने घेतलेली अशी कोणतीही वही, कागद, लिखाण, मूल्यवान् रोखा किंवा हिशेब नष्ट करील, बदलील, विच्छिन्न करील किंवा खोटी तयार करील अथवा बुद्धिपुरस्सर आणि लुबाडण्याच्या उद्देशाने अशी कोणतीही वही, कागद, लिखाण, मूल्यवान् रोखा किंवा हिशेब यामध्ये कोणतीही खोटी नोंद करील अगर त्यातील एखादा महत्वाचा तपशील त्यामधून गाळून टाकील किंवा तो बदलील अगर तो गाळण्यास किंवा बदलण्यास अपप्रेरणा देईल त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाखालील दोषारोपात, कोणाला लुबाडण्याचा उद्देश होता त्या विशिष्ट व्यक्तीचे नाव न देता अथवा कपटविषय म्हणून पैशाची कोणती रक्कम उद्देशित होती ती विशिष्ट रक्कम किंवा ज्या दिवशी तो अपराध करण्यात आला तो विशिष्ट दिवस विनिर्दिष्ट न करता लुबाडण्याचा सर्वसाधारण उद्देश होता असे अभिकथन करणे पुरेसे होईल.]

[३][ [४]* * * स्वामित्वविषयक व इतर चिन्हे यांविषयी

४७८. [व्यापार-चिन्ह] 'व्यापार-चिन्ह आणि पण्य-चिन्ह अधिनियम, १९५८' (१९५८ चा ४३) कलम १३५ आणि अनुसूची यांद्वारे निरसित (२५ नोव्हेंबर, १९५९ रोजी व तेव्हापासून).

स्वामित्व-चिन्ह.

४७९. जंगम मालमत्ता एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या मालकीची आहे असे दर्शवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या चिन्हास 'स्वामित्व-चिन्ह' असे म्हणतात.

४८०. [खोटे व्यापार-चिन्ह वापरणे]. 'व्यापार-चिन्ह आणि पण्य-चिन्ह अधिनियम, १९५८' (१९५८ चा ४३)-कलम १३५ आणि अनुसूची यांद्वारे निरसित (२५ नोव्हेंबर, १९५९ रोजी व तेव्हापासून).

खोटे स्वामित्व-चिन्ह वापरणे.

४८१. जर कोणी कोणतीही जंगम मालमत्ता किंवा माल अगर ज्याच्या आत जंगम मालमत्ता किंवा माल आहे असा कोणताही खोका, आवेष्टन किंवा अन्य पात्र अशा रीतीने चिन्हांकित केले की, अथवा ज्यावर कोणतेही चिन्ह अंकित आहे असा कोणताही खोका, आवेष्टन किंवा अन्य पात्र अशा रीतीने वापरले की, जेणेकरून अशी चिन्हांकित मालमत्ता किंवा माल अथवा याप्रमाणे चिन्हांकित अशा कोणत्याही पात्रात असलेली कोणतीही मालमत्ता किंवा माल ज्या व्यक्तीच्या मालकीचा नाही तिच्या मालकीचा तो आहे असा समज निर्माण व्हावा, तर त्याने खोटे स्वामित्व-चिन्ह वापरले असे म्हटले जाते.

खोटे स्वामित्व-चिन्ह वापरण्याबद्दल शिक्षा.

४८२. जो कोणी [५]* * * कोणतेही खोटे स्वामित्व-चिन्ह वापरील त्याने लुबाडणूक करण्याचा उद्देश नसताना आपण तसे वागलो असे शाबीत केले नाही तर, त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

दुसऱ्याने वापरले असेल तसे स्वामित्व-चिन्ह नकली तयार करणे.

४८३. जो कोणी अन्य कोणत्याही व्यक्तीने वापरले असेल तसे कोणतेही [६] * * * स्वामित्व-चिन्ह नकली तयार करील, त्याला दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे "जन्मठेप काळे पाणी" याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १८९५ चा अधिनियम, ३-कलम ४ द्वारे हे कलम जादा दाखल केले.

३. १८८९ चा अधिनियम ४-कलम ३ द्वारे मूळ शीर्षक आणि कलमे ४७८ ते ४८९ यांऐवजी हे शीर्षक व कलमे दाखल करण्यात आली.

४. १९५८ चा अधिनियम ४३-कलम १३५ व अनुसूची यांद्वारे "व्यापार" हा शब्द गाळण्यात आला (२५ नोव्हेंबर, १९५९ रोजी व तेव्हापासून).

५. किता—कलम १३५ व अनुसूची यांद्वारे "कोणतेही खोटे व्यापार-चिन्ह किंवा" हे शब्द गाळण्यात आले (२५ नोव्हेंबर, १९५९ रोजी व तेव्हापासून).

६. किता—कलम १३५ व अनुसूची यांद्वारे "व्यापार-चिन्ह किंवा" हे शब्द गाळण्यात आले (२५ नोव्हेंबर, १९५९ रोजी व तेव्हापासून).

४८४. जो कोणी लोक सेवकाने वापरलेले कोणतेही स्वामित्व-चिन्ह अथवा एखादी मालमत्ता एखाद्या विशिष्ट व्यक्तीने किंवा विशिष्ट वेळी किंवा विशिष्ट स्थळी निर्मिलेली आहे अगर ती मालमत्ता विशिष्ट प्रतीची आहे किंवा एखाद्या कार्यालयाच्या मार्गे निर्गमित झालेली आहे किंवा ती एखाद्या प्रकारे सूट मिळण्यास हक्कदार आहे असे दर्शवण्यासाठी लोक सेवकाने वापरलेले कोणतेही चिन्ह नकली तयार करील अथवा असे कोणतेही चिन्ह नकली आहे हे माहीत असून ते खरे म्हणून वापरील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. लोक सेवकाने वापरलेले चिन्ह नकली तयार करणे.

[१][४८५. जो कोणी स्वामित्व-चिन्ह नकली तयार करण्यासाठी एखादा साचा, मुद्रापट्ट किंवा अन्य साधन बनवील किंवा कब्जात बाळगील अथवा एखादा माल ज्या व्यक्तीच्या मालकीचा नाही तिच्या मालकीचा तो आहे असे दर्शवण्यासाठी एखादे स्वामित्व-चिन्ह कब्जात बाळगील त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.] स्वामित्व-चिन्ह नकली तयार करण्यासाठी कोणतेही साधन बनवणे किंवा कब्जात बाळगणे.

४८६. [२][कोणत्याही मालावर किंवा वस्तूवर अथवा ज्याच्या आत असा माल आहे असा कोणताही खोका, आवेष्टन किंवा अन्य पात्र यांवर एखादे नकली स्वामित्व-चिन्ह लावलेले किंवा ठसवलेले असताना जो कोणी असा माल किंवा वस्तू विकेल अथवा विक्रीसाठी मांडील किंवा कब्जात बाळगील त्याने,]— नकली स्वामित्व-चिन्हाने अंकित असलेला माल विकणे.

(क) या कलमाच्या विरुद्ध कोणताही अपराध घडू नये म्हणून सर्वप्रकारे वाजवी खबरदारी घेतली असल्यामुळे, अभिकथित अपराध घडतेवेळी चिन्हाच्या खरेपणाविषयी संशय घेण्याचे आपणांस कारण नव्हते, आणि

(ख) आपण ज्या व्यक्तींकडून असा माल किंवा वस्तू मिळवल्या त्यांच्याबद्दल फिर्यादीने किंवा त्याच्या वतीने केलेल्या मागणीनुसार यथाशक्ति सर्व माहिती दिली, किंवा

(ग) अन्यथा आपण निरागसपणे वागलो होतो,

असे शाबीत केले नाही तर, त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

४८७. ज्याच्या आत माल आहे असा कोणताही खोका, आवेष्टन किंवा अन्य पात्र यावर जो कोणी अशा रीतीने खोटे चिन्ह करील की जेणेकरून, जो माल अशा पात्रात नाही तो त्यात आहे असा किंवा जो माल त्याच्यात आहे तो त्यात नाही असा किंवा अशा पात्रातील माल त्याचे खरे स्वरूप किंवा प्रत याहून वेगळ्या स्वरूपाचा व प्रतीचा आहे असा कोणत्याही लोक सेवकाचा किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीचा समज व्हावा असा वाजवी ठोकताळा बांधता येईल, त्याने लुबाडणूक करण्याच्या उद्देशाने आपण तसे वागलो नव्हतो असे शाबीत केले नाही तर, त्याला तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. ज्याच्या आत माल आहे अशा कोणत्याही पात्रावर खोटे चिन्ह करणे.

४८८. जो कोणी लगतपूर्व कलमाने मना केलेल्या अशा कोणत्याही खोट्या चिन्हाचा कोणत्याही रीतीने उपयोग करील त्याने, लुबाडणूक करण्याच्या उद्देशाने आपण तसे वागलो नव्हतो असे शाबीत केले नाही तर, जणू काही त्याने त्या कलमाविरुद्धच अपराध केलेला असावा त्याप्रमाणे त्याला शिक्षा होईल. अशा कोणत्याही खोट्या चिन्हाचा उपयोग करण्याबद्दल शिक्षा.

४८९. जर कोणी कोणतेही स्वामित्व-चिन्ह काढून टाकले, नष्ट केले, विरूपित केले किंवा त्यात भर घातली आणि त्यायोगे कोणत्याही व्यक्तीला क्षती पोचवावी असा त्याचा उद्देश असेल किंवा तसे होण्यास आपण कारण होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव असेल तर, त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.] क्षती पोचवण्याच्या उद्देशाने स्वामित्व-चिन्हाबाबत गैरफेर करणे.

### [३][चलनी नोटा व बँक-नोटा-यांविषयी

४८९क. जो कोणी कोणतीही चलनी नोट किंवा बँक-नोट नकली तयार करील किंवा ती नकली तयार करण्याच्या प्रक्रियेपैकी कोणताही भाग पार पाडील त्याला, [४][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल. चलनी नोटा किंवा बँक-नोटा नकली तयार करणे.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या आणि कलमे ४८९ ख, [५][४८९ ग, ४८९ घ, आणि ४८९ ङ] यांच्या प्रयोजनार्थ "बँक-नोट" या शब्दप्रयोगाचा अर्थ, जगाच्या कोणत्याही भागामध्ये बँकव्यवसाय करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा कोणत्याही राज्यसत्तेच्या किंवा सार्वभौम सत्तेच्या प्राधिकारान्वये किंवा त्याखाली जे वचनपत्र किंवा अभिसंकेतपत्र मागणी होताच धारणकर्त्याला पैसे चुकते करण्यासाठी काढलेले असून पैशाचा सममूल्यक म्हणून किंवा पर्याय म्हणून वापरण्यासाठी योजलेले असते असे कोणतेही वचनपत्र किंवा अभिसंकेतपत्र असा आहे.

---

१. १९५८ चा अधिनियम ४३-कलम १३५ व अनुसूची यांद्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले (२५ नोव्हेंबर, १९५९ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम १३५ व अनुसूची यांद्वारे विवक्षित मजकुराऐवजी घातले (२५ नोव्हेंबर, १९५९ रोजी व तेव्हापासून).

३. १८९९ चा अधिनियम १२-कलम २ द्वारे जादा दाखल केले.

४. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

५. १९५० चा अधिनियम ३५-कलम ३ व २ री अनुसूची यांद्वारे "४८९-ग व ४८९-घ" याऐवजी दाखल केले.

बनावट किंवा नकली चलनी नोटा किंवा बँक-नोटा खऱ्या म्हणून वापरणे.

४८९ख. जो कोणी कोणतीही बनावट किंवा नकली चलनी नोट किंवा बँक-नोट, ती बनावट किंवा नकली असल्याचे माहीत असून किंवा तसे समजण्यास कारण असून, ती खरी म्हणून अन्य कोणत्याही व्यक्तीला विकेल किंवा तिच्याकडून खरेदी करील किंवा घेईल किंवा अन्यथा तिचा अपव्यापार किंवा उपयोग करील त्याला, [१][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

बनावट किंवा नकली चलनी नोटा किंवा बँक-नोटा कब्जात बाळगणे.

४८९ग. जो कोणी कोणतीही बनावट किंवा नकली चलनी नोट किंवा बँक-नोट, ती बनावट किंवा नकली असल्याचे माहीत असून किंवा तसे समजण्यास कारण असून आणि ती खरी म्हणून वापरावी किंवा ती खरी म्हणून वापरली जावी अशा उद्देशाने कब्जात बाळगील त्याला, सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

चलनी नोटा किंवा बँक-नोटा बनावट किंवा नकली तयार करण्यासाठी साधने किंवा सामग्री बनवणे किंवा कब्जात बाळगणे.

४८९घ. कोणतीही यंत्रसामग्री, साधन किंवा सामग्री ही, कोणतीही चलनी नोट किंवा बँक-नोट बनावट तयार करण्याच्या किंवा नकली तयार करण्याच्या प्रयोजनार्थ वापरण्यासाठी अथवा त्यासाठी ती वापरण्याचे उद्देशित आहे हे माहीत असून किंवा तसे समजण्यास कारण असून जो कोणी ती साधन-सामग्री बनवील किंवा ती बनवण्याच्या प्रक्रियेपैकी कोणताही भाग पार पाडील किंवा ती विकत घेईल किंवा विकेल किंवा तिची वासलात लावील किंवा ती कब्जात बाळगील त्याला, [१][आजीव कारावासाची], किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.]

चलनी नोटा किंवा बँक-नोटा यांसारखे दिसणारे दस्तऐवज बनवणे किंवा वापरणे.

[२][४८९ङ. (१) जो दस्तऐवज म्हणजे एखादी चलनी नोट किंवा बँक-नोट असल्याचे दिसते किंवा कोणत्याही प्रकारे तीसारखा दिसतो किंवा चलनी नोट अगर बँक-नोट म्हणून फसगत होऊ शकण्याइतपत जवळजवळ तसाच दिसतो असा कोणताही दस्तऐवज जो कोणी बनवील किंवा बनवून घेईल किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरील किंवा कोणत्याही व्यक्तीकडे सुपूर्द करील त्याला, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) जो दस्तऐवज बनवणे हा पोटकलम (१) अन्वये अपराध आहे त्यावर जिचे नाव दिसते अशा कोणत्याही व्यक्तीने जर पोलीस अधिकाऱ्याकडून तिला विचारणा झाली असता, कोणत्या व्यक्तीने तो छापला किंवा अन्यथा बनवला तिचे नाव आणि पत्ता उघड करण्यास कायदेशीर सबबीशिवाय नकार दिला तर, तिला दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(३) ज्या कोणत्याही दस्तऐवजाबाबत पोटकलम (१) खाली कोणत्याही व्यक्तीवर अपराधाचा दोषारोप केलेला असेल त्यावर अथवा त्या दस्तऐवजाच्या संबंधात वापरण्यात अगर देण्यात आलेल्या अन्य कोणत्याही दस्तऐवजावर एखाद्या व्यक्तीचे नाव दिसून येईल तेव्हा, त्या व्यक्तीने तो दस्तऐवज बनवून घेतला असे, तद्‌विरुद्ध शाबीत होईपर्यंत, गृहीत धरता येईल.]

## प्रकरण १९ वे

## सेवा-संविदांच्या फौजदारीपात्र भंगाविषयी

४९०. [जलप्रवासात किंवा प्रवासात असताना केलेला सेवा-संविदेचा भंग.] 'कर्मचाऱ्यांचा संविदाभंग (निरसन) अधिनियम, १९२५' (१९२५ चा ३)-कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

असहाय व्यक्तीची देखभाल करणे व तिच्या गरजा पुरवणे यांबाबतच्या संविदेचा भंग.

४९१. अल्पवय किंवा मनोविकलता यामुळे अथवा रोग किंवा शारीरिक दुबळेपणा यामुळे जी कोणतीही व्यक्ती असहाय असेल किंवा तिच्या स्वतःच्या सुरक्षिततेची तजवीज करण्यास किंवा तिच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यास असमर्थ असेल त्या व्यक्तीची देखभाल करण्यास किंवा तिच्या गरजा पुरविण्यास विधितः बद्ध असलेला जो कोणी तसे करण्याचे इच्छापूर्वक टाळील त्याला, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

४९२. [जेथे कर्मचाऱ्याला मालकाच्या खर्चाने नेण्यात येते त्या दूरच्या ठिकाणी काम करण्याच्या संविदेचा भंग] 'कर्मचाऱ्यांचा संविदाभंग (निरसन) अधिनियम, १९२५' (१९२५ चा ३)-कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'जन्मठेप काळेपाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १९४३ चा अधिनियम ६-कलम २ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

## प्रकरण २० वे

## विवाहासंबंधीच्या अपराधांविषयी

*एखाद्या पुरुषाने कायदेशीर विवाह झाल्याचा समज लबाडीने निर्माण करून दांपत्यभावाने सहवास घडवून आणणे.*

४९३. जी स्त्री आपल्याशी कायदेशीरपणे विवाहबद्ध झालेली नाही तिचा, आपल्याशी ती कायदेशीरपणे विवाहबद्ध झालेली आहे असा लबाडीने समज करून देऊन तशा समजुतीत तिला आपल्याबरोबर दांपत्यभावाने राहण्यास किंवा लैंगिक संभोग करण्यास जो पुरुष भाग पाडतो त्या प्रत्येक पुरुषाला दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

*पती किंवा पत्नी हयात असतानाच्या काळात पुन्हा विवाह करणे.*

४९४. पती किंवा पत्नी जिवंत असताना जो कोणी विवाह करील आणि असा विवाह अशा पतीच्या किंवा पत्नीच्या हयातीत झाला या कारणामुळे तो रद्दबातल असेल तर, त्याला सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

अपवाद.—ज्या कोणत्याही व्यक्तीचा अशा पतीबरोबर किंवा पत्नीबरोबर झालेला विवाह सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयाने रद्दबातल असल्याचे घोषित केलेले असेल त्या व्यक्तीला हे कलम लागू होत नाही,

तसेच, जी कोणतीही व्यक्ती अगोदरच्या पतीच्या किंवा पत्नीच्या हयातीत विवाह करील आणि असा पती किंवा पत्नी नंतरच्या विवाहाच्या वेळी अशा व्यक्तीपासून सात वर्षेपर्यंत सातत्याने दूर राहिलेला/राहिलेली असेल आणि तो/ती जिवंत असल्याचे त्या कालावधीत अशा व्यक्तीच्या ऐकिवात आले नसेल तर, त्या व्यक्तीला हे कलम लागू होत नाही—मात्र असा नंतरचा विवाह करणाऱ्या व्यक्तीने ज्या व्यक्तीशी असा विवाह करण्यात येईल तिला आपल्याला माहीत असेल त्या मर्यादेपर्यंत खरी वस्तुस्थिती विदित करावयास हवी.

*ज्या व्यक्तीबरोबर नंतरचा विवाह झाला असेल तिच्यापासून पूर्वीच्या विवाहाची वस्तुस्थिती लपवल्याने तोच अपराध घडतो.*

४९५. जो कोणी नंतरचा विवाह ज्या व्यक्तीबरोबर झाला आहे त्या व्यक्तीपासून पूर्वीच्या विवाहाची वस्तुस्थिती लपवून त्याद्वारे लगतपूर्व कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

*कायदेशीर विवाह न करता कपटीपणाने आपला विवाह-संस्कार करून घेणे.*

४९६. अप्रामाणिकपणाने किंवा कपटपूर्ण उद्देशाने जर कोणी स्वतःच्या बाबतीत विवाहबद्ध होण्याचा संस्कार करून घेतला आणि त्याद्वारे आपण कायदेशीरपणे विवाहबद्ध होत नाही याची त्याला जाणीव असेल तर, त्याला सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

*परगमन.*

४९७. जी व्यक्ती अन्य पुरुषाची पत्नी असून ते स्वतःला माहीत असेल किंवा तसे समजण्यास स्वतःला कारण असेल अशा व्यक्तीशी त्या पुरुषाची संमती किंवा मूकानुमती नसताना जो कोणी लैंगिक संभोग करील व हा लैंगिक संभोग 'बलात्काराचा अपराध' या सदरात मोडत नसेल तर, तो परगमनाच्या अपराधाबद्दल दोषी असेल, आणि त्याला पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. अशा प्रकरणी, पत्नी ही अपप्रेरक म्हणून शिक्षापात्र होणार नाही.

*गुन्हेगारी उद्देशाने विवाहित स्त्रीस भुरळ पाडून नेणे किंवा पळवून नेणे किंवा अडकवून ठेवणे.*

४९८. जी स्त्री अन्य कोणत्याही पुरुषाची पत्नी असून ते स्वतःला माहीत असेल किंवा तसे समजण्यास कारण असेल अशा कोणत्याही स्त्रीला जर कोणी तिचा कोणत्याही व्यक्तीबरोबर विधिनिषिद्ध संभोग घडावा या उद्देशाने तिला त्या पुरुषापासून किंवा त्या पुरुषाच्या वतीने तिची देखभाल करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीपासून दूर पळवून किंवा भुरळ पाडून नेले किंवा त्या उद्देशाने अशा कोणत्याही स्त्रीस लपवून किंवा अडकवून ठेवले तर, त्याला दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

[1][प्रकरण २० वे-क

## पतीने किंवा पतीच्या नातेवाईकांनी क्रूर वागणूक देण्याविषयी

एखाद्या स्त्रीच्या पतीने किंवा पतीच्या नातेवाईकांनी तिला क्रूर वागणूक देणे.

४९८क. जो कोणी एखाद्या स्त्रीचा पती असून किंवा पतीचा नातेवाईक असून, अशा स्त्रीला क्रूर वागणूक देईल त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ "क्रूर वागणूक देणे" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(क) ज्यामुळे त्या स्त्रीला आत्महत्या करणे क्रमप्राप्त होईल अथवा तिला दुखापत होईल अथवा तिच्या जीविताला, अंगाला किंवा स्वास्थ्याला (मानसिक किंवा शारीरिक) धोका निर्माण होईल अशा तऱ्हेचे कोणतेही बुद्धिपुरःसर वर्तन;

(ख) जेव्हा त्या स्त्रीवर किंवा तिच्याशी संबंधित असलेल्या कोणत्या व्यक्तीवर कोणात्याही मालमत्तेची किंवा मूल्यवान रोख्याची बेकायदेशीर मागणी पूर्ण करण्याची जबरदस्ती करण्याच्या हेतूने अथवा अशी मागणी पूर्ण करण्यात तिच्याकडून किंवा तिच्याशी संबंधित असलेल्या व्यक्ती-कडून कसूर झाल्याबद्दल तिला सतावले जाते तेव्हा, अशी सतावणूक.]

प्रकरण २१ वे

## अब्रूनुकसानीविषयी

अब्रूनुकसानी.

४९९. बोललेल्या किंवा वाचण्यासाठी योजलेल्या शब्दांद्वारे, किंवा खुणांद्वारे किंवा दृश्य प्रतिरूपणांद्वारे जर कोणी कोणत्याही व्यक्तीसंबंधी कोणताही अभ्यारोप केला किंवा प्रकाशित केला आणि अशा अभ्यारोपामुळे अशा व्यक्तीच्या लौकिकाला बाध यावा असा त्याचा उद्देश असेल अथवा याची त्याला जाणीव असेल किंवा तसे समजण्यास त्याला कारण असेल तर, यात यापुढे अपवाद केलेली प्रकरणे खेरीजकरून एरव्ही, त्याने त्या व्यक्तीची अब्रूनुकसानी केली असे म्हटले जाते.

**स्पष्टीकरण १.**—मृत व्यक्तीच्या बाबतीत करण्यात आलेला अभ्यारोप ती व्यक्ती जिवंत असती तर तिच्या लौकिकास बाध आणू शकला असता आणि तिच्या कुटुंबीयांच्या किंवा इतर जवळच्या नातेवाईकांच्या भावना दुखविण्यासाठी योजलेला आहे असे असेल तर, ते 'अब्रूनुकसानी' या सदरात जमा होऊ शकेल.

**स्पष्टीकरण २.**—एखादी कंपनी अथवा व्यक्तींचा अधिसंघ किंवा समूह या नात्याने त्यांच्यासंबंधी अभ्यारोप करणे हे 'अब्रूनुकसानी' या सदरात जमा होऊ शकेल.

**स्पष्टीकरण ३.**—पर्याय-स्वरूपातील किंवा वक्रोक्तिपूर्वक व्यक्त केलेला अभ्यारोप हा 'अब्रू-नुकसानी' या सदरात जमा होऊ शकेल.

**स्पष्टीकरण ४.**—एखाद्या अभ्यारोपामुळे इतरांच्या नजरेत प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे एखाद्या व्यक्तीच्या नैतिक किंवा बौद्धिक व्यक्तित्वाला उणेपणा आला अथवा त्या व्यक्तीची जात किंवा तिचा व्यवसाय यासंबंधात तिच्या व्यक्तित्वाला उणेपणा आला अथवा त्या व्यक्तीच्या विश्वासपात्रतेला उणेपणा आला अथवा त्या व्यक्तीचे शरीर घृणास्पद अवस्थेत किंवा सर्वसामान्यपणे जी लाजिरवाणी म्हणून मानली जाते अशा अवस्थेत आहे असा समज निर्माण झाला असे झाल्याशिवाय त्या अभ्यारोपाने त्या व्यक्तीच्या लौकिकाला बाध आणला असे मानले जात नाही.

**उदाहरणे**

(क) 'य' नेच 'ख' चे घड्याळ चोरले असा समज निर्माण व्हावा या उद्देशाने 'क' म्हणतो— "'य' हा प्रामाणिक माणूस आहे; त्याने कधीही 'ख' चे घड्याळ चोरलेले नाही." कोणत्याही अप-वादाच्या कक्षेत येत नसेल तर ही अब्रूनुकसानी आहे.

(ख) 'ख' चे घड्याळ कोणी चोरले असे 'क' ला विचारले जाते. 'य' ने 'ख' चे घड्याळ चोरले असा समज निर्माण व्हावा या उद्देशाने 'क' हा 'य' कडे निर्देश करतो. कोणत्याही अपवादाच्या कक्षेत येत नसेल तर, ही अब्रूनुकसानी आहे.

(ग) 'य' ने 'ख' चे घड्याळ चोरले असा समज निर्माण व्हावा या उद्देशाने 'ख' चे घड्याळ घेऊन 'य' पळून जात आहे असे एक चित्र 'क' काढतो. कोणत्याही अपवादाच्या कक्षेत येत नसेल तर, ही अब्रूनुकसानी आहे.

---

१. फौजदारी विधि (दुसरे विशोधन) अधिनियम, १९८३ (१९८३ चा ४६)-कलम २ द्वारे हे प्रकरण समाविष्ट केले (२५ डिसेंबर, १९८३ रोजी व तेव्हापासून).

**पहिला अपवाद.**—कोणत्याही व्यक्तीच्या संबंधात खऱ्या असलेल्या कोणत्याही गोष्टीचा अभ्यारोप केला जाणे किंवा ती प्रकाशित केली जाणे हे लोकहितासाठी आवश्यक असेल तर, असा अभ्यारोप ही अब्रूनुकसानी नव्हे. मात्र तो लोकहितासाठी आहे किंवा नाही हा तथ्यविषयक प्रश्न आहे.

लोकहितासाठी आवश्यक अशा खऱ्या गोष्टीचा अभ्यारोप करणे किंवा ती प्रकाशित करणे.

**दुसरा अपवाद.**—आपली सार्वजनिक कार्ये पार पाडताना एखाद्या लोक सेवकाने केलेल्या वर्तनासंबंधी अथवा त्या वर्तनामध्ये जितपत त्याचे व्यक्तित्व दिसून येते तितपत—त्या पलिकडे मात्र नाही—त्याच्या व्यक्तित्वासंबंधी सद्भावपूर्वक कसलेही मत व्यक्त करणे ही अब्रूनुकसानी नव्हे.

लोकसेवकांचे सार्वजनिक वर्तन.

**तिसरा अपवाद.**—कोणत्याही सार्वजनिक प्रश्नाच्या अनुषंगाने कोणत्याही व्यक्तीने केलेल्या वर्तनासंबंधी आणि त्या वर्तनामध्ये जितपत तिचे व्यक्तित्व दिसून येते तितपत—त्या पलिकडे मात्र नाही—तिच्या व्यक्तित्वासंबंधी सद्भावपूर्वक कसलेही मत व्यक्त करणे ही अब्रूनुकसानी नव्हे.

कोणत्याही सार्वजनिक प्रश्नाच्या अनुषंगाने कोणत्याही व्यक्तीचे वर्तन.

**उदाहरण**

एखाद्या सार्वजनिक प्रश्नावर शासनाला लेखी विनंतीअर्ज करणे, एखाद्या सार्वजनिक प्रश्नावर सभा बोलावणाऱ्या मागणी-अर्जावर सही करणे, अशा सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणे किंवा तिला हजर राहणे, जनतेचा पाठिंबा मागण्यासाठी एखादी संस्था स्थापन करणे किंवा तिच्यामध्ये सामील होणे, ज्या पदाची कामे कार्यक्षमतेने पार पाडली जाण्यामध्ये जनतेचे हित आहे अशा कोणत्याही पदाकरता एखाद्या विशिष्ट उमेदवाराच्या बाजूने मतदान करणे किंवा प्रचार करणे याबाबतीत 'य' ने केलेल्या वर्तनासंबंधी 'क' ने सद्भावपूर्वक कसलेही मत व्यक्त करणे ही अब्रूनुकसानी होत नाही.

**चौथा अपवाद.**—एखाद्या न्यायालयाच्या कार्यवाहीचे किंवा अशा कोणत्याही कार्यवाहीच्या निकालाचे बव्हंशी सत्य असे प्रतिवृत्त प्रकाशित करणे ही अब्रूनुकसानी नव्हे.

न्यायालयाच्या कार्यवाहीची प्रतिवृत्ते प्रकाशित करणे.

**स्पष्टीकरण.**—न्यायालयातील संपरीक्षेच्या पूर्वीची अशी चौकशी करणारा जस्टिस ऑफ दि पीस किंवा अन्य अधिकारी हा वरील कलमाच्या अर्थानुसार न्यायालय असतो.

**पाचवा अपवाद.**—न्यायालयाने ज्याचा निर्णय केलेला आहे अशा कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी खटल्याच्या गुणावगुणांच्याबाबत अथवा अशा खटल्यातील पक्षकार किंवा साक्षीदार किंवा अभिकर्ता म्हणून कोणत्याही व्यक्तीने केलेल्या वर्तनाबाबत अथवा अशा वर्तनातून जितपत अशा व्यक्तीचे व्यक्तित्व दिसून येते तितपत—त्या पलिकडे मात्र नाही—तिच्या व्यक्तित्वाबाबत सद्भावपूर्वक कसलेही मत व्यक्त करणे ही अब्रूनुकसानी नव्हे.

न्यायालयात निर्णीत झालेल्या खटल्याचे गुणावगुण किंवा साक्षीदारांचे आणि इतर संबंधितांचे वर्तन.

**उदाहरणे**

(क) 'क' म्हणतो—"त्या संपरीक्षेमधील 'य' ची साक्ष ही इतकी असंगत आहे की, मला वाटते 'य' हा एकतर मूर्ख किंवा अप्रामाणिक तरी असला पाहिजे." 'क' हे सद्भावपूर्वक बोलला असेल तर, तो या अपवादाच्या कक्षेत आहे, कारण त्याने व्यक्त केलेले मत हे साक्षीदार म्हणून 'य' ने केलेल्या वर्तनामध्ये जितपत 'य' चे व्यक्तित्व दिसून येते तितपतच त्याच्या व्यक्तित्वाशी संबंधित आहे,—त्या पलिकडे मात्र नाही.

(ख) पण जर 'क' असे म्हणाला की, "त्या संपरीक्षेमध्ये 'य' ने जे प्रपादन केले त्यावर माझा विश्वास नाही, कारण मी त्याला असत्यवादी मनुष्य म्हणून ओळखतो." तर 'क' या अपवादाच्या कक्षेत येत नाही. कारण 'य' च्या व्यक्तित्वाबाबत 'क' जे मत व्यक्त करतो ते 'य' ने साक्षीदार म्हणून केलेल्या वर्तनावर आधारलेले मत नाही.

**सहावा अपवाद.**—जी कोणतीही आविष्कृती तिच्या कर्त्याने मूल्यांकनासाठी जनतेपुढे सादर केली असेल तिच्या गुणावगुणांबाबत किंवा अशा आविष्कृतीमध्ये जितपत कर्त्याचे व्यक्तित्व दिसून येते तितपतच—त्या पलिकडे मात्र नाही—त्याच्या व्यक्तित्वाबाबत सद्भावपूर्वक कसलेही मत व्यक्त करणे ही अब्रूनुकसानी नव्हे.

जाहीर आविष्कृतीचे गुणावगुण.

**स्पष्टीकरण.**—एखादी आविष्कृती मूल्यांकनासाठी जनतेपुढे स्पष्टपणे सादर करता येईल किंवा कर्त्याच्या ज्या कृतींमध्ये मूल्यांकनासाठी जनतेपुढे असे सादर करणे हे उपलक्षित आहे त्या कृतींच्या द्वारे सादर करता येईल.

**उदाहरणे**

(क्) जी व्यक्ती एखादे पुस्तक प्रकाशित करते ती ते पुस्तक मूल्यांकनासाठी जनतेपुढे सादर करते.

(ख्) जी व्यक्ती एखादे जाहीर भाषण करते ती ते भाषण मूल्यांकनासाठी जनतेपुढे सादर करते.

(ग्) सार्वजनिक मंचावर येणारा अभिनेता किंवा गायक आपला अभिनय किंवा गायन मूल्यांकनासाठी जनतेपुढे सादर करतो.

(घ्) 'क' हा 'य' ने प्रकाशित केलेल्या पुस्तकाबद्दल म्हणतो, "'य' चे पुस्तक मूर्खपणाचे आहे, 'य' नेभळा माणूस असला पाहिजे. 'य' चे पुस्तक असभ्य आहे, 'य' घाणेरड्या मनोवृत्तीचा माणूस असला पाहिजे." जर 'क' हे सद्भावपूर्वक बोलला असेल तर तो अपवादाच्या कक्षेत आहे, कारण 'क' हा 'य' बद्दल जे मत व्यक्त करतो ते 'य' च्या पुस्तकामध्ये जितपत 'य' चे व्यक्तित्व दिसून येते तितपतच त्याच्या व्यक्तित्वासंबंधी आहे—त्या पलिकडे मात्र नाही.

(ङ्) पण जर 'क' असे म्हणाला की, "'य' चे पुस्तक मूर्खपणाचे आणि असभ्य आहे याचे मला अजिबात आश्चर्य वाटले नाही, कारण तो नेभळा आणि स्वैराचारी माणूस आहे." तर, 'क' या अपवादाच्या कक्षेत येत नाही, कारण 'क' ने 'य' च्या व्यक्तित्वाबद्दल व्यक्त केलेले मत हे 'य' च्या पुस्तकावर आधारलेले मत नाही.

दुसऱ्यावर कायदेशीर हुकूमत असलेल्या व्यक्तीने सद्भावपूर्वक निर्भर्त्सना करणे.

**सातवा अपवाद.**—एखाद्या व्यक्तीची अन्य व्यक्तीवर, कायद्याने प्रदान केलेली किंवा त्या व्यक्तीबरोबर केलेल्या कायदेशीर संविदेतून निर्माण होणारी कोणतीही हुकूमत असते तेव्हा, तिने अशी कायदेशीर हुकूमत ज्यांच्याशी संबंधित आहे त्या बाबींमध्ये त्या अन्य व्यक्तीने केलेल्या वर्तनाबाबत सद्भावपूर्वक निर्भर्त्सना करणे ही अब्रूनुकसानी नव्हे.

**उदाहरणे**

साक्षीदाराच्या किंवा न्यायालयीन अधिकाऱ्याच्या वर्तनाबाबत सद्भावपूर्वक निर्भर्त्सना करणारा न्यायाधीश ; आपल्या हुकुमाचे ताबेदार असलेल्यांची सद्भावपूर्वक निर्भर्त्सना करणारा विभाग-प्रमुख ; इतर मुलांच्या समक्ष एखाद्या मुलाची सद्भावपूर्वक निर्भर्त्सना करणारी आई-वा-बाप ; विद्यार्थ्यांच्या आई-वा-बापाकडून हुकूमत प्राप्त झालेला शाळेतील जो शिक्षक सद्भावपूर्वक त्या विद्यार्थ्यांची इतर विद्यार्थ्यांच्या देखत निर्भर्त्सना करतो तो शिक्षक ; कामचुकारपणाबद्दल सद्भावपूर्वक एखाद्या नोकराची निर्भर्त्सना करणारा मालक ; आपल्या बँकेच्या रोखपालाला त्याने अशा रोखपाल म्हणून केलेल्या वर्तनाबद्दल सद्भावपूर्वक निर्भर्त्सना करणारा एखादा बँकर—हे या अपवादाच्या कक्षेत येतात.

प्राधिकृत व्यक्तीकडे सद्भावपूर्वक आरोप सादर करणे.

**आठवा अपवाद.**—कोणत्याही व्यक्तीविरुद्ध करावयाचा आरोप, त्या आरोपाच्या विषयवस्तुबाबत त्या व्यक्तीवर ज्यांची कायदेशीर हुकूमत असेल त्यांच्यापैकी कोणाकडेही सद्भावपूर्वक सादर करणे ही अब्रूनुकसानी नव्हे.

**उदाहरणे**

जर 'क' ने सद्भावपूर्वक दंडाधिकाऱ्यासमोर 'य' वर आरोप केला ; जर 'क' ने सद्भावपूर्वक 'य' या नोकराच्या वर्तनाबाबत 'य' च्या मालकाकडे तक्रार केली ; जर 'क' ने सद्भावपूर्वक 'य' या मुलाच्या वर्तनाबाबत 'य' च्या वडिलांकडे तक्रार केली तर, 'क' या अपवादाच्या कक्षेत येतो.

एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या किंवा इतरांच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी सद्भावपूर्वक केलेला अभ्यारोप.

**नववा अपवाद.**—दुसऱ्याच्या चारित्र्यावरील अभ्यारोप जर तो करणाऱ्या व्यक्तीच्या, किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी किंवा लोककल्याणासाठी सद्भावपूर्वक केलेला असेल तर, असा अभ्यारोप करणे ही अब्रूनुकसानी नव्हे.

**उदाहरणे**

(क्) 'क' हा दुकानदार, त्याच्या धंद्याची व्यवस्था पाहणाऱ्या 'ख' ला म्हणतो, "'य' ने तुला रोख पैसे दिल्याशिवाय तू त्याला काहीही विकू नकोस, कारण त्याच्या प्रामाणिकपणाविषयी माझी खात्री नाही." जर 'क' ने स्वतःच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी सद्भावपूर्वक 'य' वर अभ्यारोप केलेला असेल तर, 'क' अपवादाच्या कक्षेत आहे.

(ख्) 'क' हा दंडाधिकारी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे अहवाल देताना, 'य' च्या चारित्र्यावर अभ्यारोप करतो. याबाबतीत, जर तो अभ्यारोप सद्भावपूर्वक आणि लोककल्याणासाठी केलेला असेल तर, 'क' अपवादाच्या कक्षेत आहे.

एखाद्या व्यक्तीला तिचे हित करण्याच्या किंवा लोकहित साधण्याच्या उद्देशाने सावधान-सूचना देणे.

**दहावा अपवाद.**—सद्भावपूर्वक एखाद्या व्यक्तीस दुसऱ्यापासून सावध राहाण्याबद्दल द्यावयाची सूचना, ज्या व्यक्तीला ती द्यावयाची तिच्या किंवा जिच्यामध्ये ती हितसंबंधित आहे अशा एखाद्या व्यक्तीच्या हितासाठी किंवा लोकहितासाठी उद्देशित असेल तर, सद्भावपूर्वक अशी सूचना देणे ही अब्रूनुकसानी नव्हे.

५००. जो कोणी दुसऱ्याची अब्रूनुकसानी करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची साध्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. अब्रूनुकसानीबद्दल शिक्षा.

५०१. जो कोणी एखादे साहित्य कोणत्याही व्यक्तीला अब्रूनुकसानीकारक आहे हे माहीत असताना किंवा तसे समजण्यास सबळ कारण असताना असे साहित्य छापील किंवा कोरील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची साध्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. अब्रूनुकसानीकारक असल्याचे माहीत असलेले साहित्य छापणे किंवा कोरणे.

५०२. अब्रूनुकसानीकारक साहित्य अंतर्भूत असलेला कोणताही छापील किंवा कोरीव पदार्थ, त्यात असे साहित्य आहे हे माहीत असून जो कोणी तो विकेल किंवा विकत देऊ करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची, साध्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. अब्रूनुकसानीकारक साहित्य अंतर्भूत असलेला छापील किंवा कोरीव पदार्थ विकणे.

## प्रकरण २२ वे

### फौजदारीपात्र धाकदपटशा करणे, अपमान करणे आणि त्रास देणे यांविषयी

५०३. जर कोणी दुसऱ्या व्यक्तीला तिचा देह, लौकिक किंवा मालमत्ता याबाबत किंवा जिच्यामध्ये ती व्यक्ती हितसंबंधित आहे अशा कोणाचाही देह किंवा लौकिक याबाबत क्षती पोचवण्याची धमकी दिली आणि त्यामागे, त्या व्यक्तीला भयभीत करण्याचा अथवा अशी धमकी अंमलात येण्याचे टाळण्याकरता साधन म्हणून, ती व्यक्ती जी कोणतीही कृती करण्यात विधितः बद्ध नाही ती कृती तिने करावी किंवा ती व्यक्ती जी कोणतीही कृती करण्यास विधितः हक्कदार आहे ती करण्याचे तिने चुकवावे अशी तिला सक्ती करण्याचा उद्देश असेल तर, त्याने फौजदारीपात्र धाकदपटशा केला असे होते. फौजदारीपात्र धाकदपटशा.

स्पष्टीकरण.—धमकी दिली गेलेली व्यक्ती ज्या मृत व्यक्तीमध्ये हितसंबंधित असेल तिच्या लौकिकास क्षती पोचवण्याची धमकी ही या कलमाच्या कक्षेत आहे.

#### उदाहरण

दिवाणी दावा चालू ठेवण्यापासून 'ख' परावृत्त व्हावा यासाठी 'क' हा 'ख' चे घर जाळण्याची धमकी देतो. 'क' हा फौजदारीपात्र धाकदपटशा केल्याबद्दल दोषी आहे.

५०४. जर कोणी उद्देशपूर्वक अपमान करून त्यायोगे कोणत्याही व्यक्तीला प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभनामुळे तिच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागे त्याचा उद्देश असेल किंवा तसे होण्याचा संभव असल्याची त्याला जाणीव असेल तर, त्याला दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील. शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे.

[१][५०५. [२][(१)] जर कोणी एखादे विधान, अफवा किंवा वृत्त, प्रकरणपरत्वे, करील, प्रसिद्ध करील किंवा प्रसृत करील आणि त्यामागे,— सार्वजनिक आगळीक होण्यास साधक अशी विधाने.

(क) [३][भारताची] भूसेना, [४][नौसेना किंवा वायुसेना] यातील कोणताही अधिकारी, भूसैनिक, [५][नौसैनिक किंवा वायुसैनिक] याच्याकडून बंड घडवून आणण्याचा किंवा त्या नात्याने त्याचे जे कर्तव्य असेल त्याकडे त्याला दुर्लक्ष करायला लावण्याचा किंवा त्यात कसूर करायला लावण्याचा उद्देश असेल किंवा त्यामुळे तसे होण्याची शक्यता असेल तर ; किंवा

(ख) ज्यामुळे एखादी व्यक्ती देशाविरुद्ध किंवा सार्वजनिक प्रशांततेविरुद्ध अपराध करण्यास प्रवृत्त होईल अशा प्रकारे जनतेमध्ये अथवा जनतेपैकी एखाद्या भागामध्ये भीती किंवा भयग्रस्तता निर्माण करण्याचा उद्देश असेल किंवा त्यामुळे तसे होण्याची शक्यता असेल तर ; किंवा

---

१. १८९८ चा अधिनियम ४-कलम ६ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

२. १९६९ चा अधिनियम ३५-कलम ३ द्वारे मूळ कलम ५०५ याला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "हर मॅजेस्टीच्या किंवा इम्पीरिअल सर्व्हिस ट्रूप्समधील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. "मॅजेस्टीच्या" या शब्दानंतर असलेला "किंवा रॉयल इंडियन मरीनमधील" हा मजकूर १९३४ चा अधिनियम ३५-कलम २ व अनुसूची यांद्वारे वगळण्यात आला होता.

४. १९२७ चा अधिनियम १०-कलम २ व अनुसूची यांद्वारे "नौसेना" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

५. कित्ता—कलम २ व अनुसूची यांद्वारे "किंवा नौसैनिक" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(ग) एखाद्या वर्गातील किंवा समूहातील व्यक्तींना दुसऱ्या कोणत्याही वर्गाविरुद्ध किंवा समूहाविरुद्ध कोणताही अपराध करण्यास चिथावणी देण्याचा उद्देश असेल किंवा त्यामुळे तशी चिथावणी दिली जाण्याची शक्यता असेल तर,

त्याला [1][तीन वर्षेपर्यंत] असू शकेल इतक्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

वर्गावर्गांमध्ये शत्रुत्व, द्वेषभाव किंवा दुष्टावा निर्माण करणारी किंवा वाढवणारी विधाने.

[2][(२) जर कोणी अफवा किंवा भयप्रद वृत्त अंतर्भूत असलेले कोणतेही विधान किंवा वृत्त करील, प्रसिद्ध करील किंवा प्रसृत करील आणि धर्म, वंश, जन्मस्थान, निवासस्थान, भाषा, जात किंवा समाज या कारणावरून किंवा इतर कोणत्याही कारणावरून निरनिराळे धार्मिक, वांशिक, भाषिक किंवा प्रादेशिक गट किंवा जाती किंवा समाज यांच्यामध्ये शत्रुत्वाची किंवा द्वेषाची भावना किंवा दुर्भावना निर्माण करण्याचा किंवा वाढवण्याचा त्यामागे उद्देश असेल अथवा त्यामुळे अशी शत्रुत्वाची किंवा द्वेषाची भावना किंवा दुष्टावा निर्माण होण्याची शक्यता असेल त्याला, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

उपासना स्थान, इत्यादी ठिकाणी केलेला पोटकलम (२) खालील अपराध.

(३) जो कोणी, कोणत्याही उपासनास्थानी अथवा धार्मिक उपासना किंवा धार्मिक संस्कार करण्यात गुंतलेल्या कोणत्याही जमावामध्ये पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला अपराध करील त्याला, पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.]

**अपवाद**—जेव्हा कोणतेही विधान, अफवा किंवा वृत्त करणाऱ्या, प्रसिद्ध करणाऱ्या किंवा प्रसृत करणाऱ्या व्यक्तीला असे विधान, अफवा किंवा वृत्त खरे आहे असे मानण्यास वाजवी आधारकारणे असतील आणि ती व्यक्ती ते विधान, अफवा किंवा वृत्त [3][सद्भावपूर्वक आणि पूर्वोक्त असा कोणताही उद्देश नसताना] करील, प्रसिद्ध करील किंवा प्रसृत करील तेव्हा, ते कृत्य या कलमाच्या अर्थानुसार 'अपराध' या सदरात जमा होणार नाही.

फौजदारीपात्र धाकदपटशाबद्दल शिक्षा.

५०६. जो कोणी फौजदारीपात्र धाकदपटशाचा अपराध करील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील ;

मृत्यू किंवा जबर दुखापत घडवून आणण्याची धमकी असल्यास.

आणि जर मृत्यू किंवा जबर दुखापत घडवून आणण्याची, अथवा आग लावून कोणतीही मालमत्ता नष्ट करण्याची अथवा मृत्यूच्या किंवा [4][आजीव कारावासाच्या], किंवा सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध घडवण्याची, अथवा कोणत्याही स्त्रीवर व्यभिचारीपणाचा अभ्यारोप करण्याची धमकी असेल तर, त्याला सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

निनावी संदेशाद्वारे फौजदारीपात्र धाकदपटशा.

५०७. जो कोणी निनावी संदेशाद्वारे किंवा कोणी धमकी दिलेली आहे त्या व्यक्तीचे नाव किंवा वास्तव्यस्थळ लपवण्याची खबरदारी घेऊन फौजदारीपात्र धाकदपटशाचा अपराध करील त्याला, त्या अपराधासाठी लगतपूर्व कलमान्वये उपबंधित केलेल्या शिक्षेच्या जोडीला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल.

एखादी व्यक्ती दैवी प्रकोपाचा विषय होईल असा तिचा समज करून देऊन घडवलेली कृती.

५०८. जर कोणी एखाद्या व्यक्तीला जी गोष्ट करावयास लावणे हे त्या अपराध्याचे उद्दिष्ट आहे ती तिने केली नाही तर किंवा तिला जी गोष्ट करण्याचे टाळावयास लावणे हे अपराध्याचे उद्दिष्ट आहे ती तिने केली तर ती व्यक्ती किंवा जिच्यामध्ये ती हितसंबंधित आहे अशी कोणतीही व्यक्ती दैवी प्रकोपाचा विषय होईल किंवा अपराध्याच्या कोणत्याही कृतीमुळे केली जाईल असा त्या व्यक्तीचा समज करून देऊन किंवा करून देण्याचा प्रयत्न करून त्या व्यक्तीला जी कोणतीही गोष्ट करण्यास ती विधितः बद्ध नाही ती करण्यास किंवा जी कोणतीही गोष्ट करण्यास ती विधितः हक्कदार आहे ती करण्याचे टाळण्यास इच्छापूर्वक भाग पाडले किंवा भाग पाडण्याच्या प्रयत्न केला तर, त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**उदाहरणे**

(क) 'क' हा 'य' च्या दाराशी अशा उद्देशाने धरणे धरून बसतो की, अशा बसण्याने तो 'य' ला दैवी प्रकोपाचा विषय बनवील असा समज व्हावा. 'क' ने या कलमामध्ये व्याख्या करण्यात आलेला अपराध केला आहे.

---

१. १९६१ चा अधिनियम ४१-कलम ४ द्वारे 'दोन वर्षे' या ऐवजी ही शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. १९६९ चा अधिनियम ३५-कलम ३ द्वारे पोटकलमे (२) व (३) समाविष्ट करण्यात आली.

३. कित्ता—कलम—३ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

(ख्) 'क' हा 'य' ला धमकी देतो की, जर 'य' ने एखादी विशिष्ट कृती केली नाही तर, 'क' स्वतःच्या मुलांपैकी एखाद्या मुलाची अशा परिस्थितीत हत्या करील की, त्या हत्येमुळे 'य' हा दैवी प्रकोपाचा विषय बनेल असा समज निर्माण होईल. 'क' ने या कलमामध्ये व्याख्या करण्यात आलेला अपराध केला आहे.

**५०९.** कोणत्याही स्त्रीचा विनयभंग करण्यासाठी जो कोणी, एखादा शब्द किंवा आवाज अशा स्त्रीच्या कानावर पडावा अथवा एखादा हावभाव किंवा वस्तू तिच्या नजरेला पडावी या उद्देशाने असा शब्द उच्चारील, असा आवाज किंवा हावभाव करील किंवा अशी वस्तू प्रदर्शित करील, अगर अशा स्त्रीच्या एकांतपणाचा भंग करील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने शब्दोच्चार, हावभाव किंवा कृती करणे.

**५१०.** जो कोणी नशेच्या अवस्थेत कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याने जेथे प्रवेश करणे हे अतिक्रमण आहे अशा कोणत्याही ठिकाणी वावरेल आणि कोणत्याही व्यक्तीस त्रास होईल अशा तऱ्हेने तेथे वर्तन करील त्याला, चोवीस तासांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा दहा रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

नशापाणी केलेल्या व्यक्तीने सार्वजनिक ठिकाणी केलेले गैरवर्तन.

## प्रकरण २३ वे

## अपराध करण्याच्या प्रयत्नांविषयी

**५११.** जो कोणी, या संहितेअन्वय [1][आजीव कारावासाच्या], किंवा कारावासाच्या शिक्षेस पात्र असा अपराध करण्याचा किंवा असा अपराध केला जावा असा प्रयत्न करील आणि अशा प्रयत्नात असताना तो अपराध करण्याच्या दिशेने कोणतीही कृती करील त्याला, अशा प्रयत्नाबद्दलच्या शिक्षेसाठी या संहितेद्वारे कोणताही स्पष्ट उपबंध करण्यात आलेला नसेल त्याबाबतीत, [2][अपराधासाठी उपबंधित केलेल्या कोणत्याही वर्णनाच्या आजीव कारावासाच्या निम्म्याइतक्या किंवा, प्रकरणपरत्वे, त्या अपराधासाठी उपबंधित केलेल्या कारावासाच्या दीर्घतम मुदतीच्या निम्म्याइतक्या मुदतीचा असू शकेल अशा कारावासाची], किंवा त्या अपराधासाठी उपबंधित केलेला असेल अशा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

आजीव कारावासाच्या किंवा अन्य कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेले अपराध करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल शिक्षा.

### उदाहरणे

(क्) 'क' एक पेटी फोडून काही रत्ने चोरण्याचा प्रयत्न करतो, आणि अशा रीतीने पेटी फोडल्यानंतर आत कोणतेही रत्न नसल्याचे त्याला आढळून येते. त्याने चोरी करण्याच्या दिशेने अशी कृती केलेली आहे आणि म्हणून तो या कलमाखाली दोषी आहे.

(ख्) 'क' हा 'य' च्या खिशात आपला हात खुपसून 'य' चा खिसा कापण्याचा प्रयत्न करतो. 'य' च्या खिशात काहीही नसल्यामुळे 'क' चा प्रयत्न फसतो. 'क' या कलमाखाली दोषी आहे.

---

१. १९५५ चा अधिनियम २६-कलम ११७ व अनुसूची यांद्वारे 'काळे पाणी' याऐवजी हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला ( १ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम ११७ व अनुसूची यांद्वारे विवक्षित मूळ शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ जानेवारी, १९५६ रोजी व तेव्हापासून),

# भारतीय दंड संहिता, १८६०

## THE INDIAN PENAL CODE, 1860.

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिकृत स्थान | official position | [क. ३७६(२)(ग)] |
| अधिमूल्याने | at a premium | [क. १६५-उदा.(ख)] |
| अनुकृति | imitation | [क. २६३क(३)] |
| अनुनय करणे | solicit | [क. १६४-उदा.] |
| अनुशासनाचा अभाव | want of discipline | [क. १३७] |
| अनैसर्गिक अपराध | unnatural offence | [क. ३७७-स.टी.] |
| अंत्यसंस्कार | funeral ceremony | [क. २९७] |
| अडत्या | factor | [क. ४०९] |
| अपकार | disservice | [क. १६१] |
| अपकृत्यकर्ता | wrongdoer | [क. १०३] |
| अपत्यजन्माची लपवणूक | concealment of birth | [क. ३१८] |
| अपथ्यकारक पदार्थ | unwholesome drug | [क. ३२८] |
| अपनयन | kidnapping | [क. ३५९-स.टी.] |
| अपप्रेरणा देणे | abetment | [प्रकरण ५ वे-शीर्षक] |
| अपराध | offence | [क. ३९-स.टी.] |
| अपराध सौम्य करणे | mitigate the offence | [क. ३५२-स्पष्टीकरण] |
| अपराध्यांना न्यायासनासमोर आणणे | bring offenders to justice | [क. २१-आठवे] |
| अपरिपक्व समजशक्ती | immature understanding | [क. ८३-स.टी.] |
| अपवर्जित करणे | exclude | [क. ४४३] |
| अपवित्र करणे | defile | [क. २९५] |
| (–चा) अपव्यापार करणे | traffic in | [क. ४८९ ख] |
| अपहरण | abduction | [क. ३६२-स.टी.] |
| अपहानि | harm | [क. ८१] |
| अपायकारक | 1. deleterious | [क. ३२४] |
| | 2. noxious | [क. २७२] |
| अपाय घडवून आणणे | produce harm | [क. १८८-स्पष्टीकरण] |
| अप्रतिष्ठा करणे | offer indignity | [क. २९७] |
| अप्रामाणिक अपहार | dishonest misappropriation | [क. ४०३-स.टी.] |
| अप्रामाणिकपणाने | dishonestly | [क. २४-स.टी.] |
| अप्रीतीची भावना चेतविणे | excite disaffection | [क. १२४ क] |
| अप्रीतिभावना | disaffection | [क. १२४ क-स्पष्टीकरण १] |
| अब्रूनुकसानकारक | defamatory | [क. ५०१] |
| अब्रूनुकसानी | defamation | [क. ४९९-स.टी.] |
| अभिकर्ता | agent | [क. ४०९] |
| अभिग्रहण | seizure | [क. ४६४-उदा.(घ)] |
| अभिधान | denomination | [क. २५५] |
| अभिनिर्णयाची कार्ये | adjudicatory functions | [कलम २१-तिसरे] |
| अभिरक्षा | 1. charge | [क. १५७] |
| | 2. custody | [क. ४३६] |
| अभिलेख किंवा कार्यवाही | record or proceeding | [क. ४६६] |
| अभिसंकेतपत्र | engagement | [क. ४८९ क-स्पष्टीकरण] |
| अभिहस्तांतरण | conveyance | [क. ४६४-तीन-उदा.(स)] |
| अभ्यारोप | imputation | [क. ४९९] |

एच ४१२५—२०

| | | |
|---|---|---|
| अमूर्त हक्क | incorporeal right | [क. १४१-चवथे] |
| अर्भकांना उघड्यावर टाकणे | exposure of infants | [क. ३११] |
| अवकृपा | disfavour | [क. १६१] |
| अवमूल्याने | at a discount | [क. १६५-उदा.] |
| अवैध | illegal | [क. ४२-स.टी.] |
| अवैधपणे पैसे देणे | illegal payments | [क. १७१ज-स.टी.] |
| अवैधपणे सोडवणे | rescue | [क. १३०] |
| असंगत | contradictory | [क. ४९९-पाचवा अपवाद उदा. (क)] |
| असत्यवादी मनुष्य | man without veracity | [क. ४९९-पाचवा अपवाद उदा. (ख)] |
| आग लावून आगळीक करणे | mischief by fire | [क. १०३] |
| आदेशिकेची अंमलबजावणी करणे | execute a process | [क. १८७] |
| आपल्या उपयोगासाठी स्वत:ची म्हणून वापरणे | convert to one's own use | [क. ४०३] |
| आपल्या पदाधिकाराच्या आभासामुळे | under the colour of one's office | [क. ९९] |
| आयोगी | commissioner | [क. २१-चवथे] |
| आरोप | accusation | [क. ३८८] |
| आवाहन | appeal | [क. २९२(१)] |
| आविष्कृतीतील गुणावगुण | merits of performance | [क. ४९९-सहावा अपवाद] |
| आवेष्टन | package | [क. ४८६] |
| आसरा देणे | harbour | [क. ५२क-स.टी.] |
| इच्छापूर्वक | voluntarily | [क. ३९-स.टी.] |
| इच्छापूर्वक दुखापत करणे | voluntarily causing hurt | [क. ३२१-स.टी.] |
| उन्मादवायू झालेली व्यक्ती | delirious person | [क. ३०५] |
| उपकार | service | [क. १६१] |
| उमेदवार | candidate | [क. १७१ क] |
| एकविचार होणे | concert | [क. १०८-स्पष्टीकरण ५] |
| एकांतपणाचा भंग करणे | intrude upon the privacy | [क. ५०९] |
| एकोपा | harmony | [क. १५३क(१)(ख)] |
| ओळखचिन्ह | token | [क. १४०] |
| औषधीय सिद्ध पदार्थ | medical preperation | [क. २७४] |
| औषधोपचाराचे प्रयोजन | medicinal purpose | [क. २७४] |
| कज्जा | cause | [क. २१-सहावे] |
| कपटीपणाने | fraudulently | [क. २५-स.टी.] |
| करण्यास विधित: बद्ध | legally bound to do | [क. ४३-स.टी.] |
| करामती करुन दाखवणे | performing tricks | [क. ३६३(४)(क)] |
| कर्तव्यापासून विचलित करणे | seduce from duty | [क. १३१] |
| कर्मचारी राज्य विमा निधि | Employees' State Insurance Fund | [क. ४०५-स्पष्टी. २] |
| कर्मचाऱ्याचे अंशदान | employee's contribution | [क. ४०५-स्पष्टी. १] |
| कल्पित व्यक्ती | fictitious person | [क. ४६४-स्पष्टी. २] |
| काढता पाय घेणे | effect retreat | [क. १०५] |
| कामुक | lascivious | [क. २९२ (१)] |
| कायदेशीर अभिरक्षा | lawful custody | [क. ३६१-स्पष्टी.] |
| कायदेशीरपणे नेमलेली व्यक्ती | person lawfully employed | [क. १८८] |
| कायदेशीर पालकाच्या ताब्यातून | out of the keeping of the lawful guardian | [क. ३६१] |

| | | |
|---|---|---|
| कायदेशीर पालकाच्या ताब्यातून अपनयन करणे | kidnapping from lawful guardianship | [क. ३६१-स.टी.] |
| कायदेशीर सबब | lawful excuse | [क. २६३-(क)(१)(ख)] |
| काळे पाणी | transportation | [क. ५३ क(४)] |
| कुटुंब वेतन निधि | Family Pension Fund | [क. ४०५-स्पष्टी. १] |
| कृती किंवा अवैध अकृती | act or illegal omission | [क. १०७] |
| कृपा | favour | [क. १६१] |
| कृपा करणे | show a favour | [क. १०९-उदा. (क)] |
| क्रिया | operation | [क. २४६] |
| क्रूरपणे किंवा अवाजवी रीतीने वागणे | act in a cruel or unusual manner | [क. ३००-अपवाद ४] |
| खबर | information | [क. २१-आठ] |
| (म्हणून) खपून जाणे | pass (as) | [क. २४८-स.टी.] |
| खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क | right of private defence | [क. ९६ ते १०६-शीर्षक] |
| खून | murder | [क. ३००-स.टी.] |
| 'खून' या सदरात न मोडणारा सदोष मनुष्यवध | culpable homicide not amounting to murder. | [क. ३०४-स.टी.] |
| खोका | case | [क. ४८६] |
| खोटा दस्तऐवज बनवणे | make a false document | [क. ४६४] |
| खोटा मुद्रांक | fictitious stamp | [क. २६३ क-स.टी.] |
| खोटी तयार करणे | falsify | [क. ४७७ क] |
| खोटी साक्ष | perjury | [क. १६५-उदा. (ग)] |
| खोटे स्वामित्त्व चिन्ह | false property mark | [क. ४८२] |
| गंडवणे | defraud | [क. ४६४-उदा. (क)] |
| गति | motion | [क. ३४९] |
| गतिबदल | change of motion | [क. ३४९] |
| गतिविराम | cessation of motion | [क. ३४९] |
| गर्भस्राव | miscarriage | [क. ३१२] |
| गवेषक | finder | [क. ४०३-स्पष्टी. २] |
| गावाचा पहारेकरी | village watchman | [क. १७७-उदा. (ख)] |
| गुन्हेगारी उद्देश किंवा जाणीव | 1. Guilty intention or knowledge. | [क. १०८-स्पष्टी. ३] |
| | 2. Criminal intention or knowledge. | [क. ८०] |
| गुन्हेगारी स्वरूपाची कृति | criminal act | [क. ३४] |
| गृह-अतिक्रमण | house-trespass | [क. ४४२-स.टी.] |
| गैर निरोध | wrongful restraint | [क. ४४०] |
| गैरपणे | wrongfully | [क. ३६८] |
| गैर परिरोध | wrongful confinement | [क. ३४०] |
| गैर लाभ | wrongfully gain | [क. २३-स.टी.] |
| गैरवाजवी प्रभाव | undue influence | [क. १७१ ग-स.टी.] |
| गैर हानी | wrongful loss | [क. २३-स.टी.] |
| घरफोडी | house-breaking | [क. ४४५] |
| घातक हत्यार | dangerous weapon | [क. ३२४-स.टी.] |
| घातकीपणाने | malignantly | [क. २७०] |
| घृणास्पद अवस्था | loathsome state | [क. ४९९-स्पष्टी-४] |
| घोड्याच्या चाबकाने मारणे | horsewhip | [क.-३०० दुसरा अपवाद–उदा.] |

| | | |
|---|---|---|
| (नाणे) चालवणारा | utterer | [क. २४१-उदा.] |
| चिथावणी देणे | instigate | [क. १०७] |
| चोरटे गृह अतिक्रमण | lurking house-trespass | [क. ४४३] |
| चोरी | theft | [क. ४४३] |
| चोरीची मालमत्ता | stolen property | [क. ४१०-स.टी.] |
| चोरीची मालमत्ता स्वीकारणे | receiving of stolen property | [क. ४१० ते ४१४-शीर्षक] |
| छापील किंवा कोरीव पदार्थ | printed or engraved substance | [क. ५०२] |
| जंगम मालमत्ता | moveable property | [क. २२-स.टी.] |
| जन्मठेप कैदी | life-convict | [क. ३०३-स.टी.] |
| जन्मठेप काळे पाणी | transportation for life | [क. ५३ क (१)] |
| जबर दुखापत | grievous hurt | [क. ३२०-स.टी.] |
| जबरी चोरी | robbery | [क. ३९०-स.टी.] |
| जबरीने घेणे | extort | [क. ३२७] |
| जबरीने भाग पाडणे | constrain | [क. ३२७] |
| जातीने हजर राहणे | attend in person | [क. १७२] |
| जायदाद | effects | [क. ४६४-उदा. (ङ)] |
| जाहीर आविष्कृति | public performance | [क. ४९९-सहावा अपवाद] |
| जीवित | life | [क. ४५-स.टी.] |
| ज्यूरी-सदस्य | juryman | [क. २१ पाचवा] |
| ज्वालाग्राही पदार्थ | combustible matter | [क. २८५] |
| टपाल हशीलाचा दर | rate of postage | [क. २६३ क (४)] |
| (जहाज) टाकून देणे | cast away (a ship) | [क. ४२५-उदा. (च)] |
| टोळीनिशी बलात्कार | gang rape | [क. ३७६ (२) (छ)] |
| ठकवणूक | cheating | [क. ४६८-स.टी.] |
| ठग | thug | [क. ३१०] |
| ठसवलेले | impressed upon | [क. ४८६] |
| ठसा उमटवण्याचे साधन | instrument for making an impression | [क. ४७२] |
| तथ्यविषयक चूकभूल | mistake of fact | [क. ७६] |
| तथ्यविषयक प्रश्न | question of fact | [क. ३००-अपवाद एक] |
| (अपराधाचा) तलास लागणे | detection (of offence) | [क. ३३०] |
| ताबाधारक | Occupier | [क. १५४-स.टी.] |
| तात्काळ मृत्यू | instant death | [क. १०५] |
| तेढ | disharmony | [क. १५३ क (१) (क)] |
| दंगल | affray | [क. १५९-स.टी.] |
| दफनाची जागा | place of sepulture | [क. २९७] |
| दरखास्त कार्यवाही | execution | [क. ४२५-उदा. (ख)] |
| दरवडा | dacoity | [क. ३९१-स.टी.] |
| दलाल | broker | [क. ४०९] |
| दस्तऐवज | document | [क. २९] |
| दांपत्यभावाने सहवास | cohabitation | [क. ४९३-स.टी.] |
| दांपत्यवत् संबंध | quasi-marital relation | [क. ३७२-स्पष्टी. २] |
| दिवाळखोरी | insolvency | [क. ४६४-उदा. (ङ)] |
| दिशाभूल करणे | deceive | [क. ४१५] |
| दुखापत | hurt | [क. ३१९-स.टी.] |

**मराठी-इंग्रजी शब्दसूची—चालू**

| | | |
|---|---|---|
| दुष्ट उद्देश | malicious intention | [क. २९५क] |
| दुष्टावा | ill-will | [क. १५३क(१)(क)] |
| दुस्तर | impassable | [क. ४३१] |
| दूषित करणे किंवा घाण करणे | corrupt or foul | [क. २७७] |
| दृश्य प्रतिरूपण | visible representation | [क. ४९९] |
| देय रक्कम | demand | [क. ४२२] |
| दैवी प्रकोपाचा विषय | object of Divine displeasure | [क. ५०८] |
| धारणकर्त्याला प्रदेय | payable to bearer | [क. ४६४-उदा. (ग)] |
| धार्मिक जमाव | religious assembly | [क. २९६-स.टी.] |
| धार्मिक भावनांवर अत्याचार करणे | outraging the religious feelings | [क. २९५ क] |
| धार्मिक संस्कार | religious ceremony | [क. २९६] |
| धार्मिकेतर सामायिक प्रयोजने | secular common purposes | [क. २१-दहावे] |
| नकलीकरण | counterfeiting | [क. २८-स्पष्टी. १] |
| नकली तयार करणे | counterfeit | [क. २८-स.टी.] |
| नशा | intoxication | [क. ८५] |
| नशेची अवस्था | state of intoxication | [क. ३०५] |
| नहर | channel | [क. ४३१] |
| नाणेकार | coiner | [क. २४१-उदा.] |
| नापसंती | disapprobation | [क. १२४ क-स्पष्टी. २] |
| न्यायनिर्णयास कबुली देणे | confess judgement | [क. ४६६] |
| नाव्य | navigable | [क. ४३१] |
| निघून जाणे | depart | [क. १७४] |
| निनावी संदेश | anonymous communication | [क. ५०७] |
| नित्यश: व्यवहार करणे | habitual dealing in | [क. ३७१-स.टी.] |
| (—मध्ये) निबद्ध | concerned (in) | [क. १६५] |
| निरागसपणे | innocently | [क. ४८६] |
| निर्जन ठिकाण | desert place | [क. ३०७-उदा. (ख)] |
| निर्बुद्ध | idiot | [क. ३०५] |
| निर्भर्त्सना | censure | [क. ४९९-सातवा अपवाद-स.टी.] |
| निर्भेळ | unadulterated | [क. २७५] |
| निर्णयबुद्धि | judgement | [क. ८५-स.टी.] |
| निर्णायक न्यायनिर्णय | definitive judgement | [क. १९] |
| निवड | selection | [क. २१-स्पष्टी. ३] |
| निवडणूकविषयक हक्क | electoral right | [क. १७१ क-(ख)] |
| निसर्गक्रमाविरुद्ध लैंगिक वासनापूर्ती करणे | gratify unnatural lust | [क. १००] |
| निस्तारपत्र | acquittance | [क. ४६७] |
| निक्षेपस्थान | depository | [क. २९७] |
| नीतिभ्रष्ट करणे व बिघडवणे | deprave and corrupt | [क. २९२ (१)] |
| नेहमीचे व्यवसाय | ordinary pursuits | [क. ३२०-आठवी] |
| नैतिक किंवा बौद्धिक व्यक्तित्वाला उणेपणा आणणे | lower the moral or intellectual character | [क. ४९९-स्पष्टी. ४] |
| नोंदपत्र | register (of birth) | [क. ४६६] |
| नोंदपुस्तक | register | [क. ४६६] |
| नौकाधिपति | master (of vessel) | [क. १३७] |
| नौतारण | bottomry | [S. 425-ill.(f)] |
| न्यायसहायक | assessor | [क. २१-पाचवे] |

मराठी–इंग्रजी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| न्यायालय | Court of Justice | [क. २०] |
| पतपत्र | letter of credit | [क. ४६४-उदा. (क्)] |
| पद | situation | [क. १६१-उदा. (क्)] |
| पदाधिकाराच्या मिषाने | under colour of office | [क. १७०] |
| पदीय कार्य | official act | [क. १६१] |
| पदीय कार्याधिकार | official function | [क. १६१] |
| परक्रामित करणे | negotiate | [क. ४६४-उदा. (ख्)] |
| परितोषण | gratification | [क. १६१] |
| परिवाहक | carrier | [क. ४०७] |
| पलायित | deserter | [क. १३६-स.टी.] |
| पळवून नेणे | make away with | [क. ४१४] |
| पाठ म्हणणे | recite | [क. २९४ (ख्)] |
| पात्र | receptacle | [क. ४८६] |
| पारोलवर मुक्त | at large on parole | [क. १३०-स्पष्टी.] |
| पुंस्त्वहरण | emasculation | [क. ३२०-पहिली] |
| पूर्वकल्पना करणे | contemplate | [क. १८८-स्पष्टी.] |
| पूर्वनियोजित नसताना | without premeditation | [क. ३००-अपवाद ४] |
| पूर्वसंकल्पित बेत | premeditated design | [क. ३००-उदा. (घ्)] |
| पृथक्‌वासाचा नियम | quarantine rule | [क. २७१-स.टी.] |
| पृष्ठांकित करणे | endorse | [क. ४६४-उदा. (ग्)] |
| पोखरणे | scoop out | [क. २४६-स्पष्टी.] |
| प्रजाक्षोभन | sedition | [क. १२४ क] |
| प्रतिफल | consideration | [क. १६५] |
| प्रतिरूप | facsimile | [क. २६३ क (३)] |
| प्रतिरूपण | representation | [क. २६३ क (३)] |
| प्रतिषिद्ध मीठ | contraband salt | [क. १८२-उदा. (ख्)] |
| प्रदर्शनीय वस्तू | exhibit | [क. ३६३ क(४) (क्) (चार)] |
| प्रपादन करणे | assert | [क. ४९९-पाचवा अपवाद उदा. (ख्)] |
| प्रलोभन | motive | [क १६१ (३)] |
| प्रक्षोभकारण | provocation | [क. ३००-अपवाद] |
| प्रक्षोभन | provocation | [क. १५३] |
| प्राणघातक हत्यार | deadly weapon | [क. १४४] |
| प्राणी | animal | [क. ४७-स.टी.] |
| प्रापक | receiver | [क. २१-चवथे] |
| फरारी होणे | abscond | [क. १७२] |
| फसवणुकीचे उपाय | deceitful means | [क. ३६२] |
| फोडून उघडणे | break open | [क. ४६१] |
| फौजदारीपात्र अतिक्रमण | criminal trespass | [क. ९७] |
| फौजदारीपात्र अपहार | criminal misappropriation | [क. ४०३-स.टी.] |
| फौजदारीपात्र कट | criminal conspiracy | [प्रकरण ५ बे-क-शीर्षक] |
| फौजदारीपात्र न्यासभंग | criminal breach of trust | [क. ४०५-स.टी.] |
| फौजदारीपात्र बलप्रयोग | criminal force | [क. ३५०-स.टी.] |
| (हक्क) बजावणे | enforce (a right) | [क. १४१-चवथे] |
| बंड | mutiny | [क. १३१] |
| बतावणी करणे | personate | [क. १७०-स.टी.] |

## मराठी-इंग्रजी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| बंद पात्र | closed receptacle | [क. ४६१] |
| बनावट दस्तऐवज | forged document | [क. ४७०-स.टी.] |
| बनावटीकरण | forgery | [क. ४६३-स.टी.] |
| बलप्रयोग | force | [क. ३४९-स.टी.] |
| बलात्कार | rape | [क. ३७५-स.टी.] |
| बलाद्ग्रहण | extortion | [क. ३८३-स.टी.] |
| बहाणा करणे | pretend | [क. १७०] |
| बव्हंशी | substantially | [क. ४९९-चौथा अपवाद] |
| बक्षिशी | reward | [क. १६१] |
| बुद्धिपुरःसर अपवेदन | wilful misrepresentation | [क. १०७] |
| बेकायदेशीर जमाव | unlawful assembly | [क. १४१] |
| बेछूटपणे | wantonly | [क. १५३-स.टी.] |
| (अपराध करण्याचा) बेत | design (to commit offence) | [क. ११८] |
| बेदरकार किंवा हयगयीची कृती | rash or negligent act | [क. ३०४ क] |
| बेदरकारपणे किंवा हयगयीने | rashly or negligently | [क. २८६] |
| बोधचित्र किंवा चिन्ह | device or mark | [क. ४७५-स.टी.] |
| बोया | buoy | [क. ४३३] |
| बोली देणे | bid | [क. १६९] |
| (कायद्याचा) भंग | infraction (of law) | [क. २१-नववे] |
| भयंकर धोक्याची | imminently dangerous | [क. ३००-चार] |
| भयप्रद वृत्त | alarming news | [क. ५०५ (२)] |
| भ्रमिष्ट व्यक्ती | insane person | [क. ३०५] |
| भविष्य निधि | Providend Fund | [क. ४०५-स्पष्टी. (१)] |
| भाड्याने देणे | let for hire | [क. ३७२] |
| भारतातून अपनयन करणे | kidnapping from India | [क. ३६०-स.टी.] |
| भीषण रोग | grievous disease | [क. ८९-परंतुक] |
| भुरळ पाडणे | entice | [क. ४९८] |
| भूमीशी संलग्न | attached to the earth | [क. ३७८-स्पष्टी. १] |
| भोगवटा | occupation | [क. १५७] |
| भ्रमिष्ट | insane | [क. ८९-स.टी.] |
| मजली जलयान | decked vessel | [क. ४३७] |
| मनोविकल व्यक्ती | person of unsound mind | [क. ८४-स.टी.] |
| माणसांचे वसतिस्थान | human dwelling | [क. ४३६] |
| मांडणी करणे | frame | [क. १६७-स.टी.] |
| मानीव हक्क | supposed right | [क. १४१-चवथे] |
| मारामारी | fight | [क. ३००-अपवाद ४] |
| मार्गाधिकार | right of way | [क. १४१-चवथे] |
| मालधक्कावाला | wharfinger | [क. ४०७] |
| माहिती | information | [क. १७६] |
| (नाण्याचे) मिश्रण | composition (of coin) | [क. २४६] |
| मुखत्यार | attorney | [क. ४०९] |
| मुख्य द्रव्य | substance | [क. ४७५] |
| मुद्रापट्ट | plate | [क. ४८५] |
| मुले चोरून नेणे | child-stealing | [क. ३१०] |
| मूर्च्छाकारक | stupefying | [क. ३२८] |
| मूल्यवान् मालमत्ता | valuable property | [क. ३७८-उदा. (घ)] |
| मूल्यवान् रोखा | valuable security | [क. ३८३] |

| | | |
|---|---|---|
| मूल्यवान् वस्तू | valuable thing | [क. १६५-स.टी.] |
| मूल्यांकन | judgement (of public) | [क. ४९९-सहावा अपवाद] |
| मृत्यु | death | [क. ४६-स.टी.] |
| मेहेनताना | pay | [क. १६३-उदा.] |
| मोहोर | seal | [क. ४७२] |
| मोहोर लावणे | affix a seal | [क. ४६४-उदा.(ख्)] |
| याचना करणे | solicit | [क. ३६३ क(४) (क्)] |
| यार | paramour | [क. ३७८-उदा.(ण्)] |
| युद्ध करणे | wage war | [क. १२१-स.टी.] |
| युद्धकैदी | prisoner of war | [क. १२८] |
| येणे रक्कम किंवा हक्कमागणी सोडून देणे | release a demand or claim | [क. ४२४] |
| रक्षणभार | charge | [क. ८९] |
| राज्यकैदी | 1. State prisoner | [क. १२८] |
| | 2. prisoner of State | [क. १२८-स.टी.] |
| राज्यसत्ता | State | [क. ४८९ क-स्पष्टी.] |
| रात्रीच्या वेळी घरफोडी | house-breaking by night | [क. ४४६] |
| रात्रीच्या वेळी चोरटे गृह अतिक्रमण | lurking house-trespass by night | [क. ४४४] |
| रूप | appearance | [क. २४९] |
| लाचलुचपत | bribery | [क. १७१ ख-स.टी.] |
| लाजिरवाणी | disgraceful | [क. ४९९-स्पष्टी. ४] |
| (धनादेश) लांबवणे | pick up (a cheque) | [क. ४६४-उदा. (ग्)] |
| लावणी/पोवाडा | ballad | [क. २९४] |
| लूटमार | depredation | [क. १२६-स.टी.] |
| लैंगिक अपराध | sexual offences | [क. ३७५ ते ३७६ घ-शीर्षक] |
| लोकधोरण जाहीर करणे | declaration of public policy | [क. १७१ ख (१) (दोन)-परंतुक] |
| लोक प्राधिकारी | public authority | [क. ९९] |
| लोक सेवक | public servant | [क. २१] |
| लोकहित | public good | [क. ४९९-पहिला अपवाद] |
| लोकोपयोगी कारवाई | public action | [क. १७१ ख-(१) (दोन) परंतुक] |
| लॉटरीची सोडत काढणे | draw a lottery | [क. २९४ क] |
| लौकिकाला बाध आणणे | harm the reputation | [क. ४९९] |
| वक्रोक्तिपूर्वक | ironically | [क. ४९९-स्पष्टी. ३] |
| वखारपाल | warehouse-keeper | [क. ४०७] |
| वचनपत्र | promissory note | [क. ४८९ क-स्पष्टी.] |
| (नुसते) वर चढणे | climbing | [क. ४४५-दुसरा] |
| (सैनिकाची) वर्दी | gabr (of soldier) | [क. १४०] |
| वसूल करणे | levy | [क. ६९] |
| वासलात लावणे | disposing of | [क. ४१४] |
| विकलता | infirmity | [क. ८९-परंतुक] |
| विकलांग करणे | maiming | [क. ३६३क-स.टी.] |
| विकार | disorder | [क. २९९-स्पष्टी.-१] |
| विकार, रोग किंवा शारीरिक दुर्बलता यांनी पछाडलेला. | labouring under a disorder, disease or bodily infirmity. | [क. २९९-स्पष्टी. १] |
| विक्रीसाठी मांडणे | expose for sale | [क. ४८६] |

| | | |
|---|---|---|
| विच्छिन्न करणे | mutilate | [क. ४७७ क] |
| विच्छेद करणे | privation | [क. ३२०-दुसरी] |
| विद्रूप करणे | disfiguration | [क. ३२०-सहावी] |
| विधिप्रक्रिया | process of law | [क. ६८] |
| विधितः समर्थनीय | justifiable by law | [क. ९९] |
| विधिनिदेश | direction of law | [क. ४०५] |
| विधिनिषिद्ध संभोग | illicit intercourse | [क. ४९८] |
| विधिविषयक चूकभूल | mistake of law | [क. ७६] |
| विनिमयपत्र | bill of exchange | [क. ४६४-उदा. (ख)] |
| विपन्नावस्था | distressed circumstances | [क. ४६४-उदा. (ञ)] |
| विलग करणे | sever | [क. ३७८-स्पष्टी. १] |
| विलगीकरण | severance | [क. ३७८-स्पष्टी. २] |
| विल्हेवाट | disposition | [क. ४२१] |
| विषयलोलुपता | prurient interest | [क. २९२ (१)] |
| विशेष कायदा | special law | [क. ४१-स.टी.] |
| विश्वासपात्रता | credit | [क. ४९९-स्पष्टी. ४] |
| विज्ञापन | memorial | [क. १६३-उदा.] |
| विज्ञापनकर्ता | memorialist | [क. १६३-उदा.] |
| वेढणाऱ्या सीमा | circumscribing limits | [क. ३४०] |
| वैध आदेशिका | legal process | [क. १४१] |
| वैध पारिश्रमिक | legal remuneration | [क. १६१] |
| वैध संविदा | legal contract | [क. ५०४] |
| व्यक्तिगत चारित्र्य किंवा वर्तन | personal character or conduct | [क. १७१ छ] |
| व्यक्तिगत निरोध | personal restraint | [क. १०५] |
| व्यक्तित्व | character | [क. ४९९-दुसरा अपवाद] |
| व्यत्यय आणणे | cause disturbance | [क. २९६] |
| व्यभिचारीपणा | unchastity | [क. ५०६] |
| व्यादेश | injunction | [क. २९१] |
| व्यापारधंदा करणे | engage in trade | [क. १६८-स.टी.] |
| व्यापारी | merchant | [क. ४०९] |
| व्यापारी जलयान | merchant vessel | [क. १३७-स.टी.] |
| शपथ घेवविणे किंवा दृढकथन करवून घेणे | administer an oath or affirmation | [क. १८१] |
| शरीरसंभोग | carnal intercourse | [क. ३७७] |
| शांततेचे संबंध असलेली सत्ता | power at peace | [क. १२५] |
| शिडीने वर चढणे | scaling | [क. ४४५-दुसरा] |
| शिक्षा ठोठावण्यात आलेला गुन्हेगार | condemned criminal | [क. १६३-उदा.] |
| शिक्षा सौम्य करणे | mitigate the punishment | [क. ३५२-स्पष्टी.] |
| (—च्या) शिक्षेस पात्र | punishable (with) | [क. ११६] |
| संयोग किंवा बंधन | union or tie | [क. ३७२-स्पष्टी. दोन] |
| संरक्षक व्यक्ती | defender | [क. १०६] |
| संशयास्पद इसम | suspicions charactor | [क. १७७-उदा. (ख)] |
| संस्कार | ceremony | [क. ५०५ (३)] |
| सक्तमजुरी | penal servitude | [क. ५६] |
| सख्याचे संबंध असलेली सत्ता | power in alliance | [क. १२५] |
| संगनमत करून | in collusion with | [क. ४६४-उदा. (घ)] |
| सच्छील | of good character | [क. ४६४-उदा. (ञ)] |
| सदोष मनुष्यवध | culpable homicide | [क. २९९-स.टी.] |
| सद्भाव | good faith | [क. ५२-स.टी.] |
| सबळ कारण | good reason | [क. ५०१] |

मराठी–इंग्रजी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| समजण्यास कारण | reason to believe | [क. २६-स.टी.] |
| समज लबाडीने निर्माण करणे | deceitfully inducing a belief | [क. ४९३-स.टी.] |
| समन्स | subpoena | [क. १७४-उदा. (क)] |
| समपहरण | forfeiture | [क. १२६] |
| सममूल्यक | equivalent | [क. ४८९क-स्पष्टी.] |
| समान उद्दिष्ट | common object | [क. १४६] |
| समापक | liquidator | [क. २१-चवथे] |
| सरबराई | treating | [क. १७१-ङ-स्पष्टी.] |
| सर्वसामान्य बुद्धीची व वृत्तीची व्यक्ती | person of ordinary sense and temper. | [क. ९५] |
| सश्रम कारावास | rigorous imprisonment | [क. ३८२] |
| सागरी धोक्याची निशाणी | sea-mark | [क. ४३३] |
| साचा | die | [क. ४८५] |
| सादृश्य | resemblance | [क. २८-स्पष्टी. २] |
| सामयिक उपद्रव | common nuisance | [क. २६८] |
| सामान्य नैसर्गिक क्रमानुसार | in the ordinary course of nature | [क. ३००-तीन] |
| सार्वजनिक आगळीक | public mischief | [क. ५०५-स.टी.] |
| सार्वजनिक न्यायाच्या अभिवृद्धीकरता कार्य करणारा. | acting for the advancement of public justice. | [क. ३००-स्पष्टी. ३] |
| सार्वजनिक निचरा-गटार | public drainage | [क. ४३२] |
| सार्वजनिक नौकानयन मार्ग | public line of navigation | [क. २८३] |
| सार्वजनिक रस्ता | public way | [क. २८३] |
| सार्वजनिक हक्क | public right | [क. २६८] |
| सीमाचिन्ह | land-mark | [क. ४३४] |
| सोडून उघडणे | unfasten | [क. ४६१] |
| स्त्रियांची किंवा बालकांची संस्था | women's or children's institution | [क. ३७६-स्पष्टी. २] |
| स्थान | situation | [क. २१-स्पष्टी. २] |
| (मालमत्ता) स्थानभ्रष्ट करणे | move (a property) | [क. ३७८] |
| स्थानिक कायदा | local law | [क. ४२-स.टी.] |
| स्थितिस्थान | situation | [क. ४२५] |
| स्पंदन पावणारा अजात गर्भजीव | quick unborn child | [क. ३१६] |
| स्पंदितगर्भा | quick with child | [क. ३१२] |
| स्पर्श-संवेदना | sense of feeling | [क. ३४९] |
| स्वत:वरचा ताबा | power of self-control | [क. ३००-अपवाद १] |
| स्वत्वाधिकार | title | [क. ४६३] |
| स्वामित्वचिन्ह | property mark | [प्रकरण १८ वे-शीर्षक] |
| स्वैराचारी | libertine | [क. ४९९-सहावा अपवाद] |
| हक्कमागणी | claim | [क. ४६३] |
| हमला | assault | [क. ३५१-स.टी.] |
| हल्ल्याचे हत्यार | weapon of offence | [क. १४४] |
| हल्लेखोर | assailant | [क. १०१] |
| हानी करणे | impairing | [क. ३२०-पाचवी] |
| हुकूमत | 1. authority | [क. ४९९-सातवा अपवाद-स.टी.] |
| | 2. dominion | [क. ४०५] |
| (च्या) हुकूमतीखाली | under one's charge | [क. २८३] |
| हुसकावून लावणे | eject | [क. ४४३] |
| क्षति | injury | [क. १६६] |
| क्षयंकारक पदार्थ | corrosive substance | [S. 324] |

## THE INDIAN PENAL CODE, 1860

## भारतीय दंड संहिता, १८६०

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abduction | अपहरण | [S. 362-m.n. ] |
| abetment | अपप्रेरणा देणे | [Chapter-V-heading] |
| abscond | फरारी होणे | [S. 172] |
| accusation | आरोप | [S. 388] |
| act in a cruel or unusual manner | क्रूरपणे किंवा अवाजवी रीतीने वागणे | [S. 300-Except.-4] |
| act or illegal omission | कृती किंवा अवैध अकृती | [S. 107] |
| acting for the advancement of public justice | सार्वजनिक न्यायाच्या अभिवृद्धीकरता कार्य करणारा | [S. 300-Except.-3] |
| acquittance | निस्तारपत्र | [S. 467] |
| adjudicatory functions | अभिनिर्णयाची कार्ये | [S. 21-Third] |
| administer an oath or affirmation | शपथ घेवविणे किंवा दृढकथन करवून घेणे | [S. 181] |
| affix a seal | मोहोर लावणे | [S. 464-ill. (*b*)] |
| affray | दंगल | [S. 159-m.n.] |
| agent | अभिकर्ता | [S. 409] |
| alarming news | भयप्रद वृत्त | [S. 505 (2)] |
| animal | प्राणी | [S. 47-m.n.] |
| anonymous communication | निनावी संदेश | [S. 507] |
| appeal | आवाहन | [S. 292 (1)] |
| appearance | रूप | [S. 249] |
| assailant | हल्लेखोर | [S. 101] |
| assault | हमला | [S. 351-m.n.] |
| assert | प्रपादन करणे | [S. 499-Fifth Except.-ill. (*b*)] |
| assessor | न्यायसहायक | [S. 21-Fifth] |
| at a discount | अवमूल्याने | [S. 165-ill.] |
| at a premium | अधिमूल्याने | [S. 165-ill. (*b*)] |
| at large on parole | पारोलवर मुक्त | [S. 130-Expl.] |
| attached to the earth | भूमीशी संलग्न | [S. 378-Expl. 1] |
| attend in person | जातीने हजर राहणे | [S. 172] |
| attorney | मुखत्यार | [S. 409] |
| authority | हुकूमत | [S. 499-Seventh Except.-m.n.] |
| ballad | लावणी/पोवाडा | [S. 294] |
| bid | बोली देणे | [S. 169] |
| bill of exchange | विनिमयपत्र | [S. 464-ill. (*b*)] |
| bottomry | नौ तारण | [S. 425-ill. (*f*)] |
| break open | फोडून उघडणे | [S. 461] |
| bribery | लाचलुचपत | [S. 171B-m.n.] |
| bring offenders to justice | अपराध्यांना न्यायासनासमोर आणणे | [S. 21-Eighth] |
| broker | दलाल | [S. 409] |
| buoy | बोया | [S. 433] |
| candidate | उमेदवार | [S. 171A] |
| carnal intercourse | शरीरसंभोग | [S. 377] |

| | | |
|---|---|---|
| carrier | परिवाहक | [S. 407] |
| case | खोका | [S. 486] |
| cast away (a ship) | (जहाज) टाकून देणे | [S. 425-ill. (*f*)] |
| cause | कज्जा | [S. 21-sixth] |
| cause disturbance | व्यत्यय आणणे | [S. 296] |
| censure | निर्भर्त्सना | [S. 499-Seventh Except. m.n.]. |
| ceremony | संस्कार | S. 505(3) |
| cessation of motion | गतिविराम | [S. 349] |
| change of motion | गतिबदल | [S. 349] |
| channel | नहर | [S. 431] |
| character | व्यक्तित्व | [S. 499-Second Except.]. |
| charge | १. रक्षणभार | [S. 89] |
| | २. अभिरक्षा | [S. 157] |
| cheating | ठकवणूक | [S. 468-m.n.] |
| child-stealing | मुले चोरून नेणे | [S. 310] |
| circumscribing limits | वेढणाऱ्या सीमा | [S. 340] |
| claim | हक्कमागणी | [S. 463] |
| climbing | (नुसते) वर चढणे | [S. 445-Secondly] |
| closed receptacle | बंद पात्र | [S. 461] |
| cohabitation | दांपत्यभावाने सहवास | [S. 493-m.n.] |
| coiner | नाणेकार | [S. 241-ill.] |
| combustible matter | ज्वालाग्राही पदार्थ | [S. 285] |
| commissioner | आयोगी | [S. 21-Fourth] |
| common nuisance | सामायिक उपद्रव | [S. 268] |
| common object | समान उद्दिष्ट | [S. 146] |
| composition (of coin) | (नाण्याचे) मिश्रण | [S. 246] |
| concealment of birth | अपत्यजन्माची लपवणूक | [S. 318] |
| concerned (in) | (—मध्ये) निबद्ध | [S. 165] |
| concert | एकविचार होणे | [S. 108-Expl. 5] |
| condemned criminal | शिक्षा ठोठावण्यात आलेला गुन्हेगार | [S. 163-ill.] |
| confess judgment | न्यायनिर्णयास कबुली देणे | [S. 466] |
| consideration | प्रतिफल | [S. 165] |
| constrain | जबरीने भाग पाडणे | [S. 327] |
| contemplate | पूर्वकल्पना करणे | [S. 188-Expl.] |
| contraband salt | प्रतिषिद्ध मीठ | [S. 182-ill.(*b*)] |
| contradictory | असंगत | [S. 499-Fifth Except.-ill.(*a*)] |
| convert to one's own use | आपल्या उपयोगासाठी स्वतःची म्हणून वापरणे | [S. 403] |
| conveyance | अभिहस्तांतरण | [S. 464-Thirdly-ill.(*b*)] |
| corrosive substance | क्षयकारक पदार्थ | [S. 324] |
| corrupt or foul | दूषित करणे किंवा घाण करणे | [S. 277] |
| counterfeit | नकली तयार करणे | [S. 28-m.n.] |
| counterfeiting | नकलीकरण | [S. 28-Expl. 1] |
| Court of justice | न्यायालय | [S. 20] |
| credit | विश्वासपात्रता | [S. 499-Expl. 4] |

इंग्रजी-मराठी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| criminal act | गुन्हेगारी स्वरूपाची कृती | [S. 34] |
| criminal breach of trust | फौजदारीपात्र न्यासभंग | [S. 405-m.n.] |
| criminal conspiracy | फौजदारीपात्र कट] | [Chapter-VA-heading] |
| criminal force | फौजदारीपात्र बलप्रयोग | [S. 350-m.n.] |
| criminal intention or knowledge | गुन्हेगारी उद्देश किंवा जाणीव | [S. 80] |
| criminal misappropriation | फौजदारीपात्र अपहार | [S. 403-m.n.] |
| criminal trespass | फौजदारीपात्र अतिक्रमण | [S. 97] |
| culpable homicide | सदोष मनुष्यवध | [S. 299-m.n.] |
| culpable homicide not amounting to murder | 'खून' या सदरात न मोडणारा सदोष मनुष्यवध | [S. 304-m.n.] |
| custody | अभिरक्षा | [S. 436] |
| dacoity | दरवडा | [S. 391-m.n.] |
| dangerous weapon | घातक हत्यार | [S. 324-m.n.] |
| deadly weapon | प्राणघातक हत्यार | [S. 144] |
| death | मृत्यु | [S. 46-m.n.] |
| deceitful means | फसवणुकीचे उपाय | [S. 362] |
| deceifully inducing a belief | समज लबाडीने निर्माण करणे | [S. 493-m.n.] |
| deceive | दिशाभूल करणे | [S. 415] |
| decked vessel | मजली जलयान | [S. 437] |
| declaration of public policy | लोकधोरण जाहीर करणे | [S. 171B(1)(ii)-proviso] |
| defamation | अब्रूनुकसानी | [S. 499-m.n.] |
| defamatory | अब्रूनुकसानकारक | [S. 501] |
| defender | संरक्षक व्यक्ती | [S. 106] |
| defile | अपवित्र करणे | [S. 295] |
| definitive judgment | निर्णायक न्यायनिर्णय | [S. 19] |
| defraud | गंडवणे | [S. 464-ill.(*a*)] |
| deleterious | अपायकारक | [S. 324] |
| delirious person | उन्मादवायू झालेली व्यक्ती | [S. 305] |
| demand | देय रक्कम | [S. 422] |
| denomination | अभिधान | [S. 255] |
| depart | निघून जाणे | [S. 174] |
| depository | निक्षेपस्थान | [S. 297] |
| deprave and corrupt | नीतिभ्रष्ट करणे व बिघडविणे | [S. 292 (1)] |
| depredation | लूटमार | [S. 126-m.n.] |
| desert place | निर्जन ठिकाण | [S. 307-ill.] |
| deserter | पलायित | [S. 136-m.n.] |
| design (to commit offence) | (अपराध करण्याचा) बेत | [S. 118] |
| detection (of an offence) | (अपराधाचा) तलास लागणे | [S. 330] |
| device or mark | बोधचित्र किंवा चिन्ह | [S. 475-m.n.] |
| die | साचा | [S. 485] |
| direction of law | विधिनिदेश | [S. 405] |
| disaffection | अप्रीतिभावना | [ S. 124A Expl. 1] |
| disapprobation | नापसंती | [S. 124 A-Expl. 2] |
| disfavour | अवकृपा | [S. 161] |
| disfiguration | विद्रूप करणे | [S. 320-Sixthly] |
| disgraceful | लाजिरवाणी | [S. 499-Expl. 4] |

इंग्रजी–मराठी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| disharmony | तेढ | [S. 153A(1) (*a*)] |
| dishonest misappropriation | अप्रामाणिक अपहार | [S. 403-m.n.] |
| dishonestly | अप्रामाणिकपणाने | [S. 24-m.n.] |
| disorder | विकार | [S. 299-Expl. 1] |
| disposing of | वासलात लावणे | [S. 414] |
| disposition | विल्हेवाट | [S. 421] |
| disservice | अपकार | [S. 161] |
| distressed circumstances | विपन्नावस्था | [S. 464-ill (*j*)] |
| document | दस्तऐवज | [S. 29] |
| dominion | हुकूमत | [S. 405] |
| draw a lottery | लॉटरीची सोडत काढणे | [S. 294 A] |
| effect retreat | काढता पाय घेणे | [S. 105] |
| effects | जायदाद | [S. 464-ill. (*e*)] |
| eject | हुसकावून लावणे | [S. 443] |
| electoral right | निवडणूकविषयक हक्क | [S. 171 A(*b*)] |
| employee's contribution | कर्मचाऱ्याचे अंशदान | [S. 405-Expl. 1] |
| Employee's State Insurance Fund | कर्मचारी राज्य विमा निधि | [S. 405-Expl. 2] |
| emasculation | पुंस्त्वहरण | [S. 320-First] |
| endorse | पृष्ठांकित करणे | [S. 464-ill.(*c*)] |
| enforce (a right) | (हक्क) बजावणे | [S. 141-fourth] |
| engage in trade | व्यापारधंदा करणे | [S. 168-m.n.] |
| engagement | अभिसंकेतपत्र | [S. 489A-Expl.] |
| entice | भुरळ पाडणे | [S. 498] |
| equivalent | सममूल्यक | [S. 489A-Expl.] |
| excite disaffection | अप्रीतीची भावना चेतविणे | [S. 124A] |
| exclude | अपवर्जित करणे | [S. 443] |
| execute a process | आदेशिकेची अंमलबजावणी करणे | [S. 187] |
| execution | दरखास्त-कार्यवाही | [S. 425-ill.(*d*)] |
| exhibit | प्रदर्शनीय वस्तू | [S. 363 A(4) (*a*) (*iv*)] |
| expose for sale | विक्रीसाठी मांडणे | [S. 486] |
| exposure of infants | अर्भकांना उघड्यावर टाकणे | [S. 311] |
| extort | जबरीने घेणे | [S. 327] |
| extortion | बलाद्ग्रहण | [S. 383-m.n.] |
| facsimile | प्रतिरूप | [S. 263A(3)] |
| factor | अडत्या | [S. 409] |
| false property mark | खोटे स्वामित्व चिन्ह | [S. 482] |
| falsify | खोटी तयार करणे | [S. 477A] |
| Family Pension Fund | कुटुंब वेतन निधि | [S. 405-Expl. 1] |
| favour | कृपा | [S. 161] |
| fictitious person | कल्पित व्यक्ती | [S. 464-Expl. 2 ] |
| fictitious stamp | खोटा मुद्रांक | [S. 263A-m.n.] |
| fight | मारामारी | [S. 300-Except. 4 ] |
| finder | गवेषक | [S. 403-Expl. 2 ] |
| force | बलप्रयोग | [S. 349-m.n.] |
| forfeiture | समपहरण | [S. 126] |
| forged document | बनावट दस्तऐवज | [S. 470-m.n.] |

इंग्रजी-मराठी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| forgery | बनावटीकरण | [S. 463-m.n.] |
| fradulently | कपटीपणाने | [S. 25-m.n.] |
| frame | मांडणी करणे | [S. 167-m.n.] |
| funeral ceremony | अंत्यसंस्कार | [S. 297 ] |
| gang rape | टोळीनिशी बलात्कार | [S. 376 (2) (g)] |
| garb (of soldier) | (सैनिकाची) वर्दी | [S. 140] |
| good faith | सद्भाव | [S. 52-m.n. ] |
| good reason | सबळ कारण | [S. 501]] |
| gratification | परितोषण | [S. 161] |
| gratify unnatural lust | निसर्गक्रमाविरुद्ध लैंगिक वासनापूर्ती करणे | [S. 100] |
| grievous disease | भीषण रोग | [S. 89-proviso] |
| grievous hurt | जबर दुखापत | [S. 320-m.n.] |
| guilty intention or knowledge | गुन्हेगारी/उद्देश किंवा जाणीव | [S. 108-Expl.3 ] |
| habitual dealing in | नित्यश: व्यवहार करणे | [S. 371-m.n.] |
| harbour | आसरा देणे | [S. 52A-m.n.] |
| harm | अपहानि | [S. 81] |
| harm the reputation | लौकिकाला बाध येणे | [S. 499] |
| harmony | एकोपा | [S. 153A (1)(*b*)] |
| horsewhip | घोडयाच्या चाबकाने मारणे | [S. 300-Except.2-ill.] |
| house-breaking | घरफोडी | [S. 445] |
| house-breaking by night | रात्रीच्या वेळी घरफोडी | [S. 446] |
| house-trespass | गृह अतिक्रमण | [S. 442-m.n.] |
| human dwelling | माणसांचे वसतिस्थान | [S. 436] |
| hurt | दुखापत | [S. 319-m.n.] |
| idiot | निर्बुद्ध | [S. 305] |
| illegal | अवैध | [S. 42-m.n. ] |
| illegal payments | अवैधपणे पैसे देणे | [S. 171 H-m.n.] |
| illicit intercourse | विधिनिषिद्ध संभोग | [S. 498] |
| ill-will | दुष्टावा | [S. 153A(1)(a)] |
| imitation | अनुकृति | [S. 263A (3)] |
| immature understanding | अपरिपक्व समजशक्ती | [S. 83-m.n.] |
| imminently dangerous | भयंकर धोक्याची | [S. 300-Fourth] |
| impairing | हानी करणे | [S. 320-Fifthly] |
| impassable | दुस्तर | [S. 431] |
| impressed upon | ठसवलेले | [S. 486] |
| imputation | अभ्यारोप | [S. 499] |
| in collusion with | संगनमत करून | [S. 464-ill.(*d*)] |
| incorporeal right | अमूर्त हक्क | [S. 141-Fourth] |
| infirmity | विकलता | [S. 89-proviso] |
| information | १ खबर | [S. 21-Eighth] |
| | २ माहिती | [S. 176] |
| infraction (of law) | (कायद्याचा) भंग | [S. 21-Ninth] |
| injunction | व्यादेश | [S. 291] |
| injury | क्षति | [S. 166] |
| innocently | निरागसपणे | [S. 486] |
| insane | भ्रमिष्ट | [S. 89-m.n.] |

# इंग्रजी–मराठी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| insane person | भ्रमिष्ट व्यक्ती | [S. 305] |
| insolvency | दिवाळखोरी | [S. 464-ill. (*e*)] |
| instant death | तात्काळ मृत्यू | [S. 105] |
| instigate | चिथावणी देणे | [S. 107] |
| in the ordinary course of nature | सामान्य नैसर्गिक क्रमानुसार | [S. 300-Third] |
| intrude upon the privacy | एकांतपणाचा भंग करणे | [S. 509] |
| instrument for making an impression | ठसा उमटवण्याचे साधन | [S. 472] |
| intoxication | नशा | [S. 85] |
| ironically | वक्रोक्तिपूर्वक | [S. 499-Expl.3] |
| judgment | निर्णयबुद्धि | [S. 85-m.n.] |
| judgment (of public) | मूल्यांकन | [S. 499-Sixth Except.] |
| juryman | ज्यूरी-सदस्य | [S. 21-Fifth] |
| justifiable by law | विधितः समर्थनीय | [S. 99] |
| kidnapping | अपनयन | [S. 359-m.n.] |
| kidnapping from India | भारतातून अपनयन करणे | [S. 360-m.n.] |
| kidnapping from lawful guardianship | कायदेशीर पालकाच्या ताब्यातून अपनयन करणे | [S. 361-m.n.] |
| labouring under a disorder, disease or bodily infirmity | विकार, रोग किंवा शारीरिक दुर्बलता यांनी पछाडलेला | [S. 299-Expl. 1] |
| land-mark | सीमाचिन्ह | [S. 434] |
| lascivious | कामुक | [S. 292 (1)] |
| lawful custody | कायदेशीर अभिरक्षा | [S. 361-Expl.] |
| lawful excuse | कायदेशीर सबब | [S. 263A (1)(*b*)] |
| legal contract | वैध संविदा | [S. 405] |
| legal process | वैध आदेशिका | [S. 141] |
| legal remuneration | वैध पारिश्रमिक | [S. 161] |
| legally bound to do | करण्यास विधितः बद्ध | [S. 43-m.n.] |
| let for hire | भाड्याने देणे | [S. 372] |
| letter of credit | पतपत्र | [S. 464-ill. (*a*)] |
| levy | वसूल करणे | [S. 69] |
| libertine | स्वैराचारी | [S. 499-Sixth Except.] |
| life | जीवित | [S. 45-m.n.] |
| life-convict | जन्मठेप कैदी | [S. 303-m.n.] |
| liquidator | समापक | [S. 21-Fourth] |
| local law | स्थानिक कायदा | [S. 42-m.n.] |
| losing wrongfully | गैरपणे हानी सोसणे | [S. 23-m.n.] |
| lothsome state | घृणास्पद अवस्था | [S. 499-Expl. 4] |
| lower the moral or intellectual character | नैतिक किंवा बौद्धिक व्यक्तित्वाला उणेपणा आणणे | [S. 499-Expl. 4] |
| lurking house-trespass | चोरटे गृह अतिक्रमण | [S. 443] |
| lurking house-trespass by night | रात्रीच्या वेळी चोरटे गृह अतिक्रमण | [S. 444] |
| maiming | विकलांग करणे | [S. 363A-m.n.] |
| make a false document | खोटा दस्तऐवज बनवणे | [S. 464] |
| make away with | पळवून नेणे | [S. 414] |

| | | |
|---|---|---|
| malicious intention | दुष्ट उद्देश | [S. 295A] |
| malignantly | घातकीपणाने | [S. 270] |
| man without veracity | असत्यवादी मनुष्य | [S. 499-Fifth Except.-ill(*b*)] |
| master (of vessel) | नौकाधिपति | [S. 137] |
| medical preparation | औषधीय सिद्धपदार्थ | [S. 274] |
| medicinal purpose | औषधोपचाराचे प्रयोजन | [S. 274] |
| memorial | विज्ञापन | [S. 163-ill.] |
| memorialist | विज्ञापनकर्ता | [S. 163-ill.] |
| merchant | व्यापारी | [S. 409] |
| merchant vessel | व्यापारी जलयान | [S. 137-m.n.] |
| merits of performance | आविष्कृतीतील गुणावगुण | [S. 499-Sixth Except.] |
| miscarriage | गर्भस्राव | [S. 312] |
| mischief by fire | आग लावून आगळीक करणे | [S. 103] |
| mistake of fact | तथ्यविषयक चूकभूल | [S. 76] |
| mistake of law | विधिविषयक चूकभूल | [S. 76] |
| mitigate the offence | अपराध सौम्य करणे | [S. 352-Expl.] |
| mitigate the punishment | शिक्षा सौम्य करणे | [S. 352-Expl.] |
| motion | गति | [S. 349] |
| motive | प्रलोभन | [S. 161(3)] |
| move (a property) | (मालमत्ता) स्थानभ्रष्ट करणे | [S. 378] |
| moveable property | जंगम मालमत्ता | [S. 22-m.n.] |
| murder | खून | [S. 300-m.n.] |
| mutilate | विच्छिन्न करणे | [S. 477A] |
| mutiny | बंड | [S. 131] |
| navigable | नाव्य | [S. 431] |
| negotiate | परक्रामित करणे | [S. 464-ill.(*b*)] |
| noxious | अपायकारक | [S. 272] |
| object of Divine displeasure | दैवी प्रकोपाचा विषय | [S. 508] |
| occupation | भोगवटा | [S. 157] |
| occupier | ताबाधारक | [S. 154-m.n.] |
| of good character | सच्छील | [S. 464-ill.(j)] |
| offence | अपराध | [S. 39-m.n.] |
| offer indignity | अप्रतिष्ठा करणे | [S. 297] |
| official act | पदीय कार्य | [S. 161] |
| official function | पदीय कार्याधिकार | [S. 161] |
| official position | अधिकृत स्थान | [S. 376-(2)(*c*)] |
| operation | क्रिया | [S. 246] |
| ordinary pursuits | नेहमीचे व्यवसाय | [S. 320-Eighthly] |
| out of the keeping of the lawful guardian | कायदेशीर पालकाच्या ताब्यातून | [S. 361] |
| outraging the religious feelings | धार्मिक भावनांवर अत्याचार करणे | [S. 295A] |
| package | आवेष्टन | [S. 486] |
| paramour | यार | [S. 378-ill.(*o*)] |
| pass (as) | (म्हणून) खपून जाणे | [S. 248-m.n.] |
| pay | मेहेनताना | [S. 163-ill.] |
| payable to bearer | धारणकर्त्याला प्रदेय | [S. 464-ill.(*c*)] |

**इंग्रजी–मराठी शब्दसूची—चालू**

| | | |
|---|---|---|
| penal servitude | सक्तमजुरी | [S. 56] |
| performing tricks | करामती करून दाखवणे | [S. 363A(4)(*a*)] |
| perjury | खोटी साक्ष | [S. 165-ill.(*c*)] |
| person lawfully employed | कायदेशीररित्या नेमलेली व्यक्ती | [S. 188] |
| person of ordinary sense and temper | सर्वसामान्य बुद्धीची व वृत्तीची व्यक्ती | [S. 95] |
| person of unsound mind | मनोविकल व्यक्ती | [S. 84-m.n.] |
| personal character or conduct | व्यक्तिगत चारित्र्य किंवा वर्तन | [S. 171G] |
| personal restraint | व्यक्तिगत निरोध | [S. 105] |
| personate | बतावणी करणे | [S. 170-m.n.] |
| pick up (a cheque) | (धनादेश) लांबवणे | [S. 464-ill.(*c*)] |
| place of sepulture | दफनाची जागा | [S. 297] |
| plate | मुद्रापट्ट | [S. 485] |
| power at peace | शांततेचे संबंध असलेली सत्ता | [S. 125] |
| power in alliance | सख्याचे संबंध असलेली सत्ता | [S. 125] |
| power of self-control | स्वत:वरचा ताबा | [S. 300-Except. 1] |
| premeditated design | पूर्वसंकल्पित बेत | [S. 300-ill. (*d*)] |
| pretend | बहाणा करणे | [S. 170] |
| printed or engraved substance | छापील किंवा कोरीव पदार्थ | [S. 502] |
| prisoner of State | राज्य कैदी | [S. 128–m.n.] |
| prisoner of war | युद्धकैदी | [S. 128] |
| privation | विच्छेद करणे | [S. 320-Second] |
| process of law | विधिप्रक्रिया | [S. 68] |
| produce harm | अपाय घडवून आणणे | [S. 188-Expl.] |
| promissory note | वचनपत्र | [S. 489 A-Expl.] |
| property mark | स्वामित्व चिन्ह | [Ch. XVIII-heading] |
| Provident Fund | भविष्य निधि | [S. 405-Expl.1] |
| provocation | १. प्रक्षोभन<br>२. प्रक्षोभकारण | [S. 153]<br>[S. 300-Except. 1] |
| prurient interest | विषयलोलुपता | [S. 292(1)] |
| public action | लोकोपयोगी कारवाई | [S. 171B(1)(*ii*)-proviso] |
| public authority | लोक प्राधिकारी | [S. 99] |
| public drainage | सार्वजनिक निचरा-गटार | [S. 432] |
| public good | लोकहित | [S. 499-First Except.] |
| public line of nagivation | सार्वजनिक नौकानयन मार्ग | [S. 283] |
| public mischief | सार्वजनिक आगळीक | [S. 505-m.n.] |
| public performance | जाहीर आविष्कृति | [S. 499-Sixth Except.] |
| public right | सार्वजनिक हक्क | [S. 268] |
| public servant | लोक सेवक | [S. 21] |
| public way | सार्वजनिक रस्ता | [S. 283] |
| punishable (with) | (—च्या) शिक्षेस पात्र | [S. 116] |
| quarantine rule | पृथक्वासाचा नियम | [S. 271-m.n.] |
| quasi-marital relation | दांपत्यवत् संबंध | [S. 372-Expl. II] |
| question of fact | तथ्यविषयक प्रश्न | [S. 300-Except. 1] |
| quick unborn child | स्पंदन पावणारा अजात गर्भजीव | [S. 316] |
| quick with child | स्पंदितगर्भा | [S. 312] |
| rape | बलात्कार | [S. 375-m.n.] |

| | | |
|---|---|---|
| rash or negligent act | बेदरकार किंवा हयगयीची कृती | [S. 304A] |
| rashly or negligently | बेदरकारपणे किंवा हयगयीने | [S. 286] |
| rate of postage | टपालहशीलाचा दर | [S. 263A(4)] |
| reason to believe | समजण्यास कारण | [S. 26-m.n.] |
| receiver | प्रापक | [S. 21-Fourth] |
| receiving of stolen property | चोरीची मालमत्ता स्वीकारणे | [Ss. 410 to 414-heading] |
| receptacle | पात्र | [S. 486] |
| recite | पाठ म्हणणे | [S. 294(*b*)] |
| record or proceeding | अभिलेख किंवा कार्यवाही | [S. 466] |
| register | नोंदपुस्तक | [S. 466] |
| register (of birth) | नोंदपत्र | [S. 466] |
| release a demand or claim | येणे रक्कम किंवा हक्कमागणी सोडून देणे | [S. 424] |
| religious assembly | धार्मिक जमाव | [S. 296-m.n.] |
| religious ceremony | धार्मिक संस्कार | [S. 296] |
| representation | प्रतिरूपण | [S. 263A(3)] |
| rescue | अवैधपणे सोडवणे | [S. 130] |
| resemblance | सादृश्य | [S. 28-Expl. 2] |
| reward | बक्षिशी | [S. 161] |
| right of private defence | खाजगीरीत्या बचाव करण्याचा हक्क | [Ss. 96 to 106-heading] |
| right of way | मार्गाधिकार | [S. 141-Fourth] |
| rigorous imprisonment | सश्रम कारावास | [S. 382] |
| robbery | जबरी चोरी | [S. 390-m.n.] |
| scaling | शिडीने वर चढणे | [S. 445-Secondly] |
| scoop out | पोखरणे | [S. 246-Expl.] |
| sea-mark | सागरी धोक्याची निशाणी | [S. 433] |
| seal | मोहोर | [S. 472] |
| secular common purposes | धार्मिकेतर सामयिक प्रयोजने | [S. 21-Tenth] |
| sedition | प्रजाक्षोभन | [S. 124A] |
| seduce from duty | कर्तव्यापासून विचलित करणे | [S. 131] |
| seizure | अभिग्रहण | [S. 464-ill.(*d*)] |
| selection | निवड | [S. 21-Expl. 3] |
| sense of feeling | स्पर्श-संवेदना | [S. 349] |
| service | उपकार | [S. 161] |
| sever | विलग करणे | [S. 378-Expl.1] |
| severance | विलगीकरण | [S. 378-Expl. 2] |
| sexual offences | लैंगिक अपराध | [Ss. 375 to 376D-heading] |
| show favour | कृपा करणे | [S. 161] |
| situation | १. स्थितिस्थान | [S. 425] |
| | २. स्थान | [S. 21-Expl.2] |
| | ३. पद | [S. 161-ill.(*a*)] |
| solicit | १. अनुनय करणे | [S. 164-ill.] |
| | २. याचना करणे | [S. 363A(4)(*c*)] |
| special law | विशेष कायदा | [S. 41-m.n.] |
| State | राज्यसत्ता | [S. 489A-Expl.] |

| | | |
|---|---|---|
| state of intoxication | नशेची अवस्था | [S. 305] |
| State prisoner | राज्यकैदी | [S. 128] |
| stolen property | चोरीची मालमत्ता | [S. 410-m.n.] |
| stupefying | मूर्च्छाकारक | [S. 328] |
| subpoena | समन्स | [S. 174-ill.(*a*)] |
| substance | मुख्य द्रव्य | [S. 475] |
| substancially | बव्हंशी | [S. 499-Fourth Except.] |
| suspicious character | संशयास्पद इसम | [S. 177-ill.(6)] |
| supposed right | मानीव हक्क | [S. 141-Fourth] |
| theft | चोरी | [S. 378-m.n.] |
| thug | ठग | [S. 310] |
| title | स्वत्वाधिकार | [S. 463] |
| token | ओळखचिन्ह | [S. 140] |
| traffic in | (–चा) अपव्यापार करणे | [S. 489B] |
| transportation | काळे-पाणी | [S. 53A(4)] |
| transportation for life | जन्मठेप काळे-पाणी | [S. 53A(1)] |
| treating | सरबराई | [S. 171E-Expl.] |
| unadulterated | निर्भेळ | [S. 275] |
| unchastity | व्यभिचारीपणा | [S. 506] |
| under colour of one's office | आपल्या पदाधिकाराच्या आभासामुळे | [S. 99] |
| under colour of office | पदाधिकाराच्या मिषाने | [S. 170] |
| under one's charge | (–च्या) हुकूमतीखाली | [S. 283] |
| undue influence | गैरवाजवी प्रभाव | [S. 171C-m.n.] |
| unfasten | सोडून उघडणे | [S. 461] |
| union or tie | संयोग किंवा बंधन | [S. 372-Expl. II] |
| unlawful assembly | बेकायदेशीर जमाव | [S. 141] |
| unnatural offence | अनैसर्गिक अपराध | [S. 377-m.n.] |
| unwholesome drug | अपथ्यकारक पदार्थ | [S. 328] |
| utterer | (नाणे) चालवणारा | [S. 241-ill.] |
| valuable property | मूल्यवान् मालमत्ता | [S. 378-ill.(*o*)] |
| valuable security | मूल्यवान् रोखा | [S. 383] |
| valuable thing | मूल्यवान् वस्तू | [S. 165-m.n.] |
| vessel | जलयान | [S. 48-m.n.] |
| village watchman | गावाचा पहारेकरी | [S. 177-ill.(*b*)] |
| visible representation | दृश्य प्रतिरूपण | [S. 499] |
| voluntarily | इच्छापूर्वक | [S. 39-m.n.] |
| voluntarily causing hurt | इच्छापूर्वक दुखापत करणे | [S. 321-m.n.] |
| wage war | युद्ध करणे | [S. 121.-m.n.] |
| want of discipline | अनुशासनाचा अभाव | [S. 137] |
| wantonly | बेछूटपणे | [S. 153-m.n.] |
| warehouse-keeper | वखारपाल | [S. 407] |
| weapon of offence | हल्ल्याचे हत्यार | [S. 144] |
| wharfinger | मालधक्कावाला | [S. 407] |
| wilful misrepresentation | बुद्धिपुरःसर अपवेदन | [S. 107] |
| without premeditation | पूर्वनियोजित नसताना | [S. 300-Except.4] |
| women's or children's institution | स्त्रियांची किंवा बालकांची संस्था | [S. 376-Expl. 2] |

इंग्रजी–मराठी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| wrongdoer | अपकृत्यकर्ता | [S. 103] |
| wrongful confinement | गैर परिरोध | [S. 340] |
| wrongful gain | गैर लाभ | [S. 23-m.n.] |
| wrongful loss | गैर हानी | [S. 23-m.n.] |
| wrongfully | गैरपणे | [S. 368] |
| wrongfully gain | गैर लाभ | [S. 23-m.n.] |
| wrongful restraint | गैर निरोध | [S. 440] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई